म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. नं. ५२८८
१०७३

# … आणि तारे

मराठ…
संग्रह…

…आणि

म. ग्रं. … ठाणे.

RFL BK-0006384

किंमत ४॥ रुपये

# ग्रह आणि तारे

१ ... ठाणे.

लेखक

सत्यग्राही

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. ६३८४

REFBK-0006384

प्रकाशक व व्यवस्थापक :
**रा. ज. देशमुख,**
देशमुख आणि कंपनी,
१९१ शनिवार, पुणें २

संचालक :
**भ. त्र्यं. देशमुख,**
बी. ए., एल्एल्. बी.

१ उतारे घेणें व पुढील आवृत्त्या यांसंबंधीं सर्व हक्क, **विविध वृत्ताकडे** आहेत.

२ मुखपृष्ठावरील चित्र व आंतील चित्रें श्री. दीनानाथ दलाल यांचीं आहेत.

**क्रमांक ४७**
प्रकाशन—१५ ऑक्टोबर १९४३

मुद्रक :
**रा. का. तटणीस,**
श्रीलक्ष्मी-नारायण प्रेस,
३६४, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

# आमचीं प्रकाशनें

वि. स. खांडेकर

| | | |
|---|---|---|
| १ | फुलें आणि दगड | १॥। |
| २ | घरट्याबाहेर | १॥। |
| ३ | पहिलें प्रेम ( आ. २ री ) | ३ |
| ४ | जळलेला मोहर | ३ |
| ५ | क्रौंचवध | ४ |
| ६ | सायंकाल (आ. २ री) | १॥ |
| ७ | अविनाश | १॥। |
| ८ | मंदाकिनी | १॥। |
| ९ | सहा भाषणें | १॥। |
| १० | कलिका | २। |

ग. त्र्यं. माडखोलकर

| | | |
|---|---|---|
| १ | अवशेष | २ |
| २ | नागकन्या | २ |
| ३ | माझी नभोवाणी | २ |
| ४ | नवे संसार ( जप्त ) | ४ |
| ५ | चंदनवाडी | ६॥ |

ना. धों. ताम्हनकर

| | | |
|---|---|---|
| १ | तात्या भा. १ ला | २॥ |
| २ | तात्या भा. २ रा | ३ |
| ३ | निवाडे भा. १ ला | २॥ |
| ४ | चकमकी | १॥ |
| ५ | बच्चा नवरा | १॥ |

चिं. वि. जोशी

| | | |
|---|---|---|
| १ | आणखी चिमणराव(आ.२) | ४ |
| २ | नवें भारूड | २ |
| ३ | स्टेशनमास्तर | २ |

साने गुरुजी

| | | |
|---|---|---|
| १ | पुनर्जन्म | २॥ |
| २ | आस्तिक | २॥ |

दत्तु बांदेकर

| | | |
|---|---|---|
| १ | सख्या हरि | १॥। |
| २ | नवी आघाडी | १॥ |

द. र. कवठेकर

| | | |
|---|---|---|
| १ | अपुरा डाव | ३ |
| २ | रेशमाच्या गांठी | ३ |

वा. म. जोशी

| | | |
|---|---|---|
| १ | स्मृति-लहरी | २ |
| २ | विचार-लहरी | २। |

पु. य. देशपांडे

| | | |
|---|---|---|
| १ | नवें जग ? | २॥ |

भाई बेके

| | | |
|---|---|---|
| १ | रॅायचरित्र | १॥ |

प्र. ले. वि. स. खांडेकर

| | | |
|---|---|---|
| १ | काव्यज्योति | १ |

आनंदीबाई जयवंत

| | | |
|---|---|---|
| १ | पारंब्या | १॥ |

लक्ष्मणराव सरदेसाई

| | | |
|---|---|---|
| १ | ढासळलेले बुरुज | २ |

प्रो. वि. ह. कुलकर्णी

| | | |
|---|---|---|
| १ | व्यक्तिचित्रें | २॥ |

ना. ह. आपटे

| | | |
|---|---|---|
| १ | फसगत | १॥ |

प्र. के. अत्रे

| | | |
|---|---|---|
| १ | साखरपुडा | १॥ |

कृष्णाबाई मोटे

| | | |
|---|---|---|
| १ | मीनाक्षीचें जीवन | २। |

र. गो. सरदेसाई

| | | |
|---|---|---|
| १ | चलतीं नाणीं | २ |

रा. श्री. जोग

| | | |
|---|---|---|
| १ | सौंदर्यशोध आणि आनंदबोध | ८ |

ना. म. पटवर्धन

| | | |
|---|---|---|
| १ | हितपत्रें | ३ |

वि. वि. बोकील

| | | |
|---|---|---|
| १ | बेबीची बहीण | ३ |

सत्यग्राही

| | | |
|---|---|---|
| १ | ग्रह आणि तारे—भाग १ ला | ४॥ |

अनंत काणेकर

| | | |
|---|---|---|
| १ | धुक्यांतून लाल ताऱ्याकडे | ३ |

# आगामी प्रकाशनें

## वि. स. खांडेकर

१ अश्रु
२ बुद्ध आणि हिटलर
३ चल ये राणी
४ विसावें शतक
५ तिसरी भूक
६ वर्षाकाल
७ छाया भाग १-२
८ वालुका
९ कालचीं स्वप्नें
१० चार भिंती
११ मंजिऱ्या
१२ मराठीचा नाट्यसंसार
१३ वा. म. जोशी व्यक्ति आणि वाङ्मय

## ग. त्र्यं. माडखोलकर

१ तीन दिवस
२ व्यक्तिरेखा
३ ऋणभार
४ माझे आवडते कवि
५ चक्रवर्ति उदयन
६ ऊर्वशी

## द. र. कवठेकर

१ आपुलकीची झळ
२ दगाआड

## ना. धों. ताम्हनकर

१ निवाडे भा. २ रा
२ गुजाताई
३ अनेक आशीर्वाद

## कृष्णाबाई मोटे

१ मवाली
२ कलाक्षेत्रांत

## काकासाहेब कालेलकर

१ ब्रह्मदेशाचा प्रवास
२ स्मरण यात्रा

## अनंत काणेकर

१ उघड्या खिडक्या
२ काळे आणि पांढरे

## चिं. वि. जोशी

१ गुंड्याभाऊ-
२ दरबार कथा

## वि. म. भुस्कुटे

१ स्टॅलिन-

## सत्यग्राही

ग्रह आणि तारे-भाग २ रा

# प्रास्ताविक दोन शब्द

इ. स. १९३७च्या जुलै महिन्यांत कॉंग्रेस मंत्रिमंडळानें मुंबई इलाख्याचा कारभार हातीं घेतला आणि त्याच महिन्यांत या पुस्तकांतील पहिलें स्वभावचित्र **विविध वृत्तांत** प्रसिद्ध झालें. कॉंग्रेसच्या मंत्रिमंडळांतील प्रमुख मंत्री, कॉंग्रेसच्या हायकमांडमधील कांहीं ठळक व्यक्ति, मुंबई ॲसेंब्लींतील विरोधी पक्षांतील कांहीं सभासद आणि मुंबईच्या सार्वजनिक क्षेत्रांतील कांहीं प्रमुख पुढारी यांचीं स्वभावचित्रें त्यानंतर क्रमशः प्रसिद्ध होत गेलीं. ह्या स्वभावचित्रांचें, तीं प्रसिद्ध होत असतांच सर्वसामान्य वाचकांनीं मोठ्या प्रेमानें स्वागत केलें आणि **विविध वृत्ताच्या** राजकीय विचारसरणीशीं सहमत नसलेल्या '**लोकशक्ति**' पत्रासारख्या कांहीं कट्टर कॉंग्रेसपक्षीय वृत्तपत्रांनींही या स्वभावचित्रांची वाचनीयता व त्यांतील इतर वैशिष्ट्यें यांचा उल्लेख करून त्यांची प्रशंसा केली. हीं सर्व स्वभावचित्रें ग्रंथरूपानें एकत्र प्रसिद्ध व्हावीत अशा सूचना त्या वेळीं करण्यांत आल्या होत्या आणि त्याप्रमाणें तीं लौकरच प्रकाशित होतील असें प्रसिद्धही करण्यांत आलें होतें. पण वृत्तपत्रीय धांवत्या जीवनांत तेवढा निवांतपणा मिळूं न शकल्यानें ह्या पुस्तकाचें प्रकाशन लांबत गेलें. शेवटीं या पुस्तकाचे प्रकाशक रा. **रा. ज. देशमुख** यांच्या चिकाटीमुळें अर्धतपाच्या कालावधीनंतर ह्या पुस्तकाच्या प्रकाशनाला जोरानें चालना मिळाली व आज ग्रंथरूपानें हीं स्वभावचित्रें वाचकांना मी सादर करीत आहें. पुस्तकाची मुद्रितें काळजीपूर्वक तपासल्याबद्दल म. भा. भू. **ज. र. आजगांवकर** यांचा, आणि कांहीं कर्तनें जवळ नसल्यामुळें तीं मूळ फाइलींतून उतरून

काढून व इतर प्रकारें माझे स्नेही रा. **विश्वनाथ पालेकर** यांनीं मला जें सहाय्य केलें आहे त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहें.

हीं स्वभावचित्रें जरी '**सत्यग्राही**' या नांवानें प्रसिद्ध झालीं, तरी हीं सर्वच स्वभावचित्रें मीं लिहिलेलीं नाहींत हेंही येथें सांगणें मला अवश्य वाटतें. एखादी लेखमाला सुरू होऊन ती लोकप्रिय झाल्यानंतर कार्यव्याप्तृत्वामुळें तींत खंड पडण्याचा संभव असतो आणि तसा खंड पडूं देणें जर इष्ट नसेल, तर त्यासाठीं इतरांचें सहकार्य मिळविणें अवश्य असतें. ह्या स्वभावचित्रांच्या बाबतींत मला तोच अनुभव आला व त्यामुळें माझ्या कांहीं सन्मान्य स्नेह्यांचें सहकार्य मला मिळवावें लागलें. या स्नेह्यांच्या सहकार्याचें मोल फार आहे व त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

या पुस्तकांतील व्यक्तिचित्रांचा उल्लेख जरी 'स्वभावचित्रें' या रूढ शब्दानें मीं आतांपर्यंत केलेला असला, तरी 'स्वभावचित्र' ह्या शब्दांतील अर्थाला तीं कितपत उतरतील याची मला शंका वाटते. गार्डिनर, इथेल मॅनिन प्रभृति लेखक-लेखिकांनीं ज्या पद्धतीचीं स्वभावचित्रें लिहिलीं आहेत, त्यांच्याशीं हीं स्वभावचित्रें जुळतीं नाहींत. स्वभावचित्रविषयाशीं निकटचा व दीर्घ सहवास आल्याखेरीज, वेगवेगळ्या आंदोलनप्रसंगीं त्या त्या व्यक्तीवर होणाऱ्या क्रिया-प्रतिक्रिया जवळ राहून पाहावयास मिळाल्याखेरीज आणि तिच्या गुणदोषांचें याथातथ्य मोजमाप करण्याची संधि मिळाल्याखेरीज अशीं स्वभावचित्रें लिहितां येणें शक्य नाहीं. अर्थात् माझीं हीं स्वभावचित्रें 'व्यक्तिदर्शना'पुरतींच मर्यादित आहेत आणि त्यांची घडण झालीच असेल तर ती मि. चर्चिल यांनीं लिहिलेल्या "Great Contemporaries" या प्रसिद्ध पुस्तकांतील व्यक्ति-चित्रांबरहुकूम झालेली आहे असें मीं म्हणूं शकतों; तथापि हें पुस्तक मात्र माझ्या अलीकडेच वाचनांत आलेलें असल्यामुळें त्याचा आदर्श मीं माझ्यासमोर ठेवला नव्हता हें सांगणें अवश्य आहे.

ज्या भूमिकेवरून हीं स्वभावचित्रें लिहिण्यांत आलीं, ती भूमिका शक्य तेवढी पक्षातीत व निर्विकल्प ठेवण्याचा प्रयत्न मीं केला आहे व त्यासाठीं त्या त्या व्यक्तींच्या चरित्रांतील प्रसंग व घटना यांच्यामधूनच हें व्यक्तिदर्शन वाचकांना आपोआप होत जावें व लेखकाचें कार्य फक्त त्या प्रसंगीं ' धांवती टीका ' करणाऱ्या टीकाकाराचें असावें असें बंधन मीं स्वतःला घालून घेतलें होतें. माझी ही भूमिका कशी काय वठली आहे हें पाहणें अर्थात्च टीकाकारांचें काम आहे.

सहा वर्षांनंतर हीं स्वभावचित्रें प्रसिद्ध होत असल्यामुळें चित्रविषयक व्यक्तींच्या आयुष्यांतील नंतरच्या घटनांचा समावेश तींत करून तीं अद्ययावत् करणें जरूर होतें; पण तें काम मीं मुद्दामच टाळलें आहे. कारण एक तर त्यामुळें ह्या स्वभावचित्रांची लांबी वाढली असती आणि दुसरें असें कीं सहा वर्षांपूर्वीं जीं विधानें ( थोडीफार भविष्यबाजीही ) मीं केलीं, तीं वाजवी होतीं कीं गैरवाजवी होतीं, याचा पडताळा पाहण्याची संधीही वाचकांना मिळाली नसती. गांधींच्या स्वभावचित्राचेंच उदाहरण मी घेतों. त्यांत जर मीं जास्त भर टाकली असती, तर या पुस्तकांतील त्यांच्या स्वभावचित्रांत निर्दिष्ट न झालेली वीरावला प्रकरण, त्रिपुरी-प्रकरण, खरे प्रकरण, ' चले-जाव ' चळवळ, १९४३ च्या फेब्रुवारींतील उपवास हीं नंतरचीं प्रकरणें ग्रथित करावीं लागलीं असतीं व त्यामुळें माझ्या विधानांना जास्त पुष्टीच मिळाली असती. तीं तीं व्यक्तिचित्रें लिहितांना चित्रविषयांचीं जीं प्रमुख वैशिष्ट्यें अथवा स्वभावगुण मीं दाखवून दिले, त्यांबरहुकूमच गेल्या सहा वर्षांत त्यांची प्रगति झाल्याचें आढळून येतें. श्री. खेर, वल्लभभाई, कोळसे पाटील शिस्तीच्या शिपाई-गड्याप्रमाणें तुरुंगांत गेले, लठ्ठे बाहेर राहिले, मुनशींनीं काँग्रेसशीं घटस्फोट करून व नंतर अनेक ढोंगधत्तुरे करून संधिसाधु राजकारणाचे सप्त रंग दाखविले, जयकर-चंदावरकरांनीं विशेष प्रतिष्ठा प्राप्त करून घेतली, जमनादास पूर्वींएवढेच लढाऊ राहिले, आणि जिन्हांच्या ज्ञाति-निष्ठेची परमावधि झाली. गांधींनीं केलेल्या ' हिमालयीन चुकी 'बद्दल न

लिहिलेलेंच चांगलें. पण या दुरुस्त्यांमुळें माझ्या मूळ चिकित्सेमध्यें मीं फेरफार केला असेल असा संशयही निर्माण झाला असता, आणि या कारणामुळेंच हीं स्वभावचित्रें अद्ययावत् करण्याचा मोह मीं टाळला.

वृत्तपत्रीय लिखाण म्हणजे धांदलीचें साहित्य (Literature in a hurry) असतें. पुरेसा विचार करण्यास अथवा सुश्लिष्ट व सुडौल मांडणी करण्यास त्यांत अवधि नसतो. ह्या पुस्तकांतील स्वभावचित्रांचा जन्म याच परिस्थितींत झालेला आहे याची वाचकांनीं जाणीव ठेवावी अशी शेवटीं वाचकांना विनंति करून हे प्रास्ताविक दोन शब्द मी संपवितों.

मुंबई, १ ऑक्टोबर १९४३ —सत्यग्राही

म. ग्रं. सं. ठाणे.



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा.

## बाळासाहेब खेर : : १

गेल्या फेब्रुवारी महिन्यांतोल तो १८ वी तारीख होती. त्या दिवशीं गिरगांवतर्फे ॲसेंब्लींतील स्त्री-सभासदांच्या निवडणुकीची दंगल चालू होती, आणि सकाळींच ती गंमत पाहण्यासाठीं मी बाहेर पडलों होतों. प्रतिस्पर्धि उमेदवारांच्या धडपडींत मतदारांची होत असलेली ओढाताण पहात ९ वाजण्याच्या सुमारास गिल्डर टँक मार्केटवरील मतनोंदणीच्या छावणींत मी येऊन दाखल झालों. सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. देशमुख हे कॉंग्रेसपुढारी तेथें हजर होते. त्यांच्याशीं नमस्काराची देवघेव करून 'बातचीत' करीत असतां कांहीं वेळानें घाईघाईनें लांबलांब पावलें टाकीत एक व्यक्ति सहास्य मुद्रेनें तेथें येऊन दाखल झाली. तिला पाहतांच मी आणि माझे स्नेही श्री. बखले यांनीं एकदम "या होम मेंबर" असें म्हणून त्यांना उत्थापन दिलें. 'होम मेंबर' या 'उपाधी'नें ती व्यक्ति किंचित् गोंधळल्यासारखी झाली आणि आपल्या हास्याला शब्दाचें स्वरूप देत ती म्हणाली "अरे, काय घेऊन बसलांत होम मेंबर. आमची तर मुळीं 'ऑफिसच' स्वीकारण्याला तयारी नाहीं. निवडणुकीसाठीं मी उभा राहिलों हेंच फार झालं. यापुढं या निवडणुकीला नमस्कार ! "

गोड अपघात

—आणि सॉलिसिटर खेर यांच्या या उद्गारांमुळें—ती व्यक्ति सॉलिसिटर बाळासाहेब खेर हीच होती हें आतां सांगण्याची जरूरी नाहीं—कॉंग्रेसच्या अर्धवट व रुसव्या राजकारणावर आमच्या संभाषणाचा ओघ वळला. सरदार वल्लभभाई पटेल यांनीं त्या वेळीं मनांतल्या मनांत "पाहून घेऊं बच्चंजी!" अशा अर्थानें अधरदंश केला असेल! वल्लभभाई पटेल हे कुटिल राजकारणी आहेत. त्यांच्या मनाला राजकारणाचे तिढे डावपेंच खेळण्याची हौस फार. पण कुटिल राजकारणी पुरुषाच्या मनोवृत्तीचीही अशी एक विचित्र घडण असते कीं त्यामुळें त्याच्या रोषाला आणि स्नेहालाही तीव्र व आत्यंतिक स्वरूप येतें. आपल्या रोषाला पात्र झालेल्या व्यक्तीची केविलवाणी धडपड पाहत असतां जो आनंद होतो, तसाच आनंद आपल्या स्नेहविषयाभोंवतीं अकल्पित व आकस्मिकपणें आपल्या प्रसादाचे पाश टाकून त्याला भांबावून टाकण्यांतही होतो. सॉलिसिटर खेर यांचा होम मेंबर ह्या पदवीनें गोंधळ उडाला. मुख्य प्रधानपदाचें संकट जर त्यांच्यावर अकस्मात् कोसळलें, तर या 'आपत्ती'ची प्रतिक्रिया त्यांच्यावर कशी होईल असा विचार त्या वेळीं वल्लभभाई पटेल यांच्या मनाला स्पर्श करून गेला नसेलच, असें मी म्हणणार नाहीं. सॉलिसिटर खेर हे मुंबईच्या ॲसेंब्लींतील कॉंग्रेसपक्षीय सभासदांचे पुढारी होऊन मुख्य प्रधानपदाचे धनी झाले. वीर नरिमन यांच्यासारख्या महत्त्वाकांक्षी पुढाऱ्याचा या निवडणुकींत तेजोभंग व मनोभंगही झाला. सरदार वल्लभभाई पटेल यांचें अंग या निवडणुकींत कितपत आहे हा कित्येकांच्या मतें वादाचा विषय असेल; पण वल्लभभाई या प्रकरणांत पूर्ण निर्दोषी आहेत अशी माझी खात्री आहे. पण कांहींही असलें, तरी सॉलिसिटर खेर यांची कॉंग्रेसपक्षाचे पुढारी म्हणून झालेली योजना जेवढी इतरांना अकल्पित होती, तेवढीच त्यांना स्वत:लाही ती अतर्क्य होती यांत शंका नाहीं. कॉंग्रेसनें कौन्सिलप्रवेश करण्यापूर्वीच कॉंग्रेसचीं मंत्रिमंडळें बनवून आणि त्यांतील जागांच्या वांटण्या पाडून बरेच कॉंग्रेसवाले मोकळेही झाले होते; अशा स्थितींत पुढारीपणा, मंत्रिपद यांच्याबद्दल उदासीन असणारी सॉलिसिटर खेर यांच्यासारखी एक व्यक्ति एका शुभप्रभातीं अचानकपणें जणूं

अज्ञातवासांतूनच प्रगट झाल्याप्रमाणें राजकारणाच्या आणि भावी राज्यकार-भाराच्या अग्रभागीं दिसूं लागावी हा एक अपघातच नव्हे काय ? पण हा अपघात असला तरी एक 'गोड अपघात' आहे. असे अपघात वारंवार दृष्टीला पडत नाहींत. अपघाताच्या रूढ अर्थानें जे अपघात घडलेले दिसतात, ते विकृतिकारक अपघात असतात व त्यांमुळें वैषम्य व दुःखच वाटतें; पण खेरांना घडलेल्या अपघातानें उद्भवणारा आश्चर्याचा ओघ एकदां ओसरल्यावर आनंद व समाधान यांच्याखेरीज दुसरी भावनाच शिल्लक राहत नाहीं.

सुदैवी अपघात !

—आणि बाळ गंगाधर खेर यांच्या सर्वच आयुष्याचें बारकाईनें निरीक्षण केलें, तर त्यांच्या आयुष्यांत असे अपघाताचे प्रसंग वारंवार आलेले दृष्टीस पडल्यावांचून राहत नाहींत. विल्सन कॉलेजांत एक तल्लख, हुषार व बुद्धिवान् विद्यार्थी असा त्यांचा विद्यार्थिदशेंत लौकिक होता. या बुद्धिवैभवाची चुणुक संस्कृत विषयांत १९०४ मध्यें इंटरला असलेली वरजीवनदास संस्कृत स्कॉलरशिप ( अर्धी ) मिळवून आणि १९०६ सालीं बी. ए.च्या परीक्षेंत संस्कृतचें भाऊ दाजी पारितोषिक मिळवून त्यांनीं दाखविली. १९०८ मध्यें ते एल्एल्. बी. झाले व पुढें १९०९ सालीं मेसर्स खंडेराव व लाड, सॉलिसिटर्स, यांच्या ऑफिसांत आर्टिकल्ड क्लार्क म्हणून राहिले. या सुमारास त्या वेळचे मुंबई हायकोर्टाचे एक न्यायाधीश ना. न्या. मू. बीमन यांच्याशीं ओळख व संबंध जुळून येण्याचा योगायोग त्यांना लाभला. न्या. मू. बीमन यांच्याबरोबर १९१२ सालीं अमेरिकेची व १९१६ सालीं युरोपची अशा दोन यात्रा करण्याचीही संधि त्यांना मिळाली आणि याच काळांत सार्वजनिक कार्यकर्त्यांच्या अंगीं आवश्यक असलेल्या गुणांचा परिपाक त्यांच्या अंगीं होऊन कै. टिळकांच्या राजकारणांत एक सैनिक या नात्यानें त्यांना उमेदवारी करतां आली. गांधीयुगानें पुढारी तयार केले. टिळकांच्या राजकारणांत सैनिकांच्या शिस्तीचें महत्त्व अधिक होतें. गांधी-युगांतील पुढारी होण्याची संधि मिळण्यापूर्वी टिळकांच्या राजकारणांत अनुयायी या नात्यानें काम करण्याची संधि त्यांना मिळाली व या योगाचेंच महत्त्व

मला विशेष वाटतें. सॅा. खेर यांच्या सार्वजनिक कार्यकर्तृत्वांत अथवा स्वभावांत जी अहंभावातीतता अगदीं ठळकपणें प्रथम दृष्टीस पडते, तिचें कारण टिळकांच्या निष्काम कर्मयोगाची शिकवण हेंच असावें असा माझा समज आहे. पुढारीपणाची जाणीव उत्पन्न झाली कीं, व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा, वैयक्तिक मतांचा आग्रह, द्वेष–मत्सरादि मनोविकारांचा पगडा, कारस्थानीपणा, इत्यादि दुर्गुणांची मालिका उत्पन्न होते. आपल्या कर्तव्यापेक्षां पुष्कळदां आपल्या मतांना व महत्त्वाकांक्षेला प्राधान्य देण्याचा मोह अनावर होतो. संधिसाधूपणाचा स्वार्थही अशा वेळीं डोकावतो. सॅा. खेर यांच्या सार्वजनिक कार्यांत यांपैकीं एकही दोष संशयरूपानेंसुद्धां दिसत नाहीं याचें रहस्य मी म्हणतों त्याप्रमाणें वरील योगायोगांतच आहे. सॅा. खेर यांचे व्यवसायगुरु व स्नेही न्या. मू. बीमन, व राजकारणी गुरु कै. टिळक या उभयतांच्या शिकवणुकीची छाप त्यांच्यावर अढळपणें पडली आणि त्यामुळेंच त्यांच्या सार्वजनिक कार्याचा व सेवाधर्माचा विकास झाला. राजकारणाचें आकर्षण वेगवेगळ्या व्यक्तींना कां वाटतें याची चिकित्सा करतांना गार्डिनर म्हणतो:

"The political mind has many manifestations. It may be an exercise in strategy, a passion for order and constitutional forms of Government, a secular instrument of religious orthodoxy or lively adventure."

श्री. खेर यांच्या बाबतींत ह्या आकर्षणाचें मर्म शोधावयाचें झाल्यास तें निष्काम कर्मयोगी सेवाधर्मांतच सांपडेल.

### स्वार्थ–परार्थांचें द्वंद्व

न्या. मू. बीमन यांच्याशीं श्री. खेर यांचे जे वादविवाद होत, त्यांत नीत्शे या तत्त्ववेत्याच्या तत्त्वज्ञानाचाही खूप ऊहापोह होई. न्या. मू. बीमन यांच्याशीं झालेल्या संभाषणांना उद्देशून श्री. खेर एकदां मला म्हणाले होते, "There was not a subject under the sun which we did not discuss," पण त्यांतही वादांतील समरप्रसंग घडवून आणण्याचा मान नीत्शेलाच मिळत असे. बीमन हे एक थोर वेदांती व तत्त्वज्ञानी होते आणि नीत्शे त्यांचा आवडता तत्त्ववेत्ता होता. पण या तत्त्ववेत्याचें स्वार्थी व

अधार्मिक ठरलेलें 'बळी तो कान पिळी' हें साम्राज्यवादी तत्त्वज्ञान श्री. खेर यांना आवडत नसे. चार्वाक मताप्रमाणेंच नीत्शे याची थोडीफार स्वार्थी व व्यक्तिनिष्ठ विचारसरणी असल्यामुळें बीमन व बाळासाहेब यांचे त्यावरून नेहमीं खटके उडत; पण या खटक्यांमुळें अथवा मतांच्या आग्रहीपणानें उभयतांपैकीं कोणाचेंही मतांतर घडून आलें नाहीं आणि आग्रहीपणाही कमी झाला नाहीं. 'मी नीत्शेचा उपासक असलों तरी माझ्या वर्तनानें तुम्हाला कधीं त्रास झाला आहे काय?' असें बीमनसाहेबांनीं बाळासाहेबांना एकदां विचारलें होतें! व्यक्तीनें स्वार्थतत्पर दृष्टि ठेवण्याऐवजीं त्यागमय व परार्थपर दृष्टि ठेवूनच कार्य करीत राहिलें पाहिजे हें बाळासाहेबांनीं हातीं धरलेलें तत्त्वज्ञान बीमन यांच्याशीं झगडून, भांडून व हेका धरून केवळ वादापुरतेंच स्मरणांत न ठेवतां तें आपल्या आचरणांतही आणलें. हेंच तत्त्वज्ञान उराशीं बाळगून त्यांनीं आपल्या नव्या जीवनक्रमास सुरुवात केली तर, मला वाटतें, गव्हर्नर व काँग्रेसपक्ष यांजमध्यें खटके उडण्याचा प्रसंग कधींच उद्भवणार नाहीं!

## विशुद्ध जीवन

श्री. खेर यांचें स्वभावचित्र रेखाटणें ही गोष्ट जेवढी सोपी आहे, तेवढीच ती अवघडही आहे. स्वभावचित्र आकर्षक, उठावदार व मनोहर दिसण्यासाठीं त्यांत वेगवेगळ्या रंगांची खुलावट असणें अवश्य असतें. वेगवेगळ्या प्रकारच्या रंगछटांचे मारलेले कांहीं जोरदार फटकारे व सौम्य अशी पार्श्वभूमि यांच्यामुळें उठावदार चित्र निर्माण होतें; पण श्री. खेर यांच्या स्वभावांत अथवा सार्वजनिक आयुष्यक्रमांत असा रंगीबेरंगीपणा मुळींच नसल्यामुळें त्यांचें स्वभावचित्र रेखाटणें म्हणजे निळ्या कागदावर निर्झराचें चित्र चितारण्यासारखेंच आहे. चमत्कृतीबद्दल सामान्यांना आकर्षण वाटतें. खेरांच्या जीवनक्रमांत विसंगतीच्या चमत्कृति असत्या, तर त्यांपैकीं प्रत्येक विसंगतीचा तपशीलवार पाढा वाचून त्याचें समर्थन करतां आलें असतें, अगर समर्थन व दोषदिग्दर्शन अशी गोळाबेरीज करून ती मोठ्या चलाखीनें लेखकाला वाचकांपुढें मांडतां आली असती; पण अशा विसंगति त्यांच्या जीवनक्रमांत नाहींत. त्यांचा जीवनक्रम फारशी खळबळ न करतां संथपणें वाहणाऱ्या

ओढ्याप्रमाणें आहे. निर्झराच्या संगीतांत नादमाधुर्य असतें, त्याच्या हाल-चालींत काव्य असतें; पण या काव्याचा अथवा नादमाधुर्याचा आस्वाद सामान्यांना घेतां येत नाहीं. या निर्झर-संगीताऐवजीं महापुरानें दुथडी भरून फेंसाळत, रोंरावत, कड्यावरून उड्या टाकीत धबधबे निर्माण करीत, भोंवऱ्यांनीं गिरके घेत घेत जाणाऱ्या तुफान नदीची रुद्र व गंभीर गर्जना त्यांच्या मनाची चटकन् पकड घेते. तथापि जीवन हें नांव सार्थत्वानें निर्झरांतील पाण्याच्या बाबतींतच प्रत्ययाला येतें. त्यांत गढूळपणाचा लवलेशही नसतो आणि या पाण्यांत सूर्यकिरण पडले, कीं त्यांच्या तळांतील कोंपरान्कोंपरा न्याहाळतां येतो. श्री. खेर यांचें अंतरंग, व त्यांचें सार्वजनिक कार्य या पाण्याप्रमाणेंच स्वच्छ, शुद्ध व निर्मळ आहे.

## विधायक कार्यकर्ता

१९१८ मध्यें कै. डी. डी. नाणावटी, आय्. सी. एस्., यांचे बंधु रा. मणिलाल नाणावटी यांच्याशीं सहकार करून श्री. खेर यांनीं आपल्या सॉलिसिटरच्या धंद्याला सुरुवात केली. पहिल्याच दिवशीं आपले व्यवसायगुरु ना. न्या. मू. बीमन यांच्या हस्तें त्यांनीं आपल्या ऑफिसचा अनावरण-समारंभ साजरा केला. पण व्यवसायासाठीं त्यांच्या बुद्धीचा व वेळेचा जेवढा व्यय झाला, त्यापेक्षां किती तरी पटीनें जास्त काळ त्यांना सार्वजनिक कार्या-साठीं खर्च करावा लागला. महाराष्ट्रांत अथवा मुंबईत कोणतेंही उपयुक्त व जनहिताचें कार्य निघो, या कार्याशीं संबंध असलेल्या व्यक्तींत "मुंबईचे सॉ. खेर" यांचें नांव झळकलें नाहीं असें क्वचितच झालें आहे. मुंबईच्या लॉ-जर्नलचे ते संस्थापक व संपादक आहेत. लीगल एड् सोसायटी त्यांनींच स्थापन केली. याशिवाय सोशल सर्व्हिस लीग, श्रद्धानंद रेस्क्यू होम, हिंदु लॉ रिसर्च अँड रिफॉर्मस् असोसिएशन या संस्थांच्या कार्यकारी मंडळांशीं त्यांचा संबंध आला आणि सामाजिक कार्याची व परोपकाराची कळकळ त्यांना प्रत्यक्ष कृतींत उतरवितां आली. त्यांच्या विधायक व दलितवर्गासाठीं केलेल्या कार्याचें एक जिवंत प्रतीक म्हणजे खारनजीक असलेल्या चांभार-वाडीची त्यांनीं केलेली सुधारणा हें होय. या वाडींत चांभारांसाठीं त्यांनीं एक शाळा काढून चांभारांमध्यें शिक्षणप्रसार केला, त्यांच्यासाठीं दवाखाना

उघडला आणि कातडें कमावण्याचें शिक्षण देण्याची शाळा स्थापून त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्नही समाधानकारक रीतीनें सुटण्यास मदत केली. प्रतिष्ठितपणाचें साधन म्हणून बऱ्या लोकांचा मोठ्या संस्थांशीं संबंध येतो; पण श्री. खेर यांच्या प्रयत्नांनीं संस्थांना प्रतिष्ठितपणा प्राप्त करून दिला आहे. हातीं घेतलेलें कार्य मोठ्या उत्साहानें, चिकाटीनें व वेळीं पदराला खार लावूनही चालवायचें हा त्यांचा बाणा असल्यामुळें सार्वजनिक कार्याची हौस त्यांच्या मनाच्या समाधानाला कारण झाली, तरी पैशाच्या दृष्टीनें ही हौस त्यांना बरीच महाग पडली आहे! कायदेभंगाच्या चळवळींत दोन वेळां भोगाव्या लागलेल्या कारागृहवासामुळें त्यांचें प्रत्यक्ष असें आर्थिक नुकसानही बरेंच झालें आहे. पण या स्वार्थत्यागाची त्यांनीं कधींही जाहिरात केली नाहीं. राजकारण अथवा सार्वजनिक कार्य या दोन्ही गोष्टींकडे कीर्ति-लाभापेक्षां कर्तव्याच्या दृष्टीनेंच ते आतांपर्यंत पाहत आले व म्हणूनच आपल्या सहकाऱ्यांशीं व स्वपक्षीयांशीं त्यांचा मतभेद होण्याचा प्रसंग आला नाहीं अथवा विरोधकांशींही पूर्वी असलेल्या अगर नंतर जडलेल्या स्नेहसंबंधांत दुजाभाव अथवा किल्मिष उत्पन्न झालें नाहीं. महाराष्ट्रांत राजकारणांतील मतभेद हेसुद्धां खासगी मालकीच्या वस्तु होतात! त्यामुळें मतांतराच्या प्रयत्नाकडेही अपहरणाच्या संशयानें पाहण्यांत येतें. आमची छावणी वेगळी, शत्रूचा गोट वेगळा; हरहर महादेवाच्या वेळींच काय ती आमची—त्यांची गांठ पडावयाची, या कुढ्या मनोवृत्तीची गर्द छाया महाराष्ट्राच्या व पर्यायानें सर्व देशाच्या राजकारणावर पडली आहे आणि गेल्या निवडणुकीच्या पूर्वीच्या काळांत तर ह्या छायेनें घनदाट अंधारच उत्पन्न केला होता. आपल्या गोटांतून परक्या छावणींत जाणाऱ्या अथवा परक्या छावणींतून आपल्या गोटांत येणाऱ्या प्रत्येक शिपायाकडे संशयी दृष्टीनें पाहण्यांत येत असे; पण या काळांतही दोन्ही गोटांत जर कोणता अपवाद असेल, तर तो श्री. खेर यांचाच होता. त्यांच्या स्वैर संचाराला कोठेंही निर्बंध नव्हता आणि त्यांच्या जाण्यानें जसा त्यांच्या मंडळींना संशय वाटला नाहीं, तसें त्यांच्या आगमनानें इतरांनाही अवघडल्यासारखें वाटलें नाहीं. निवडणुकीच्या दंगलींत कोणीही पुढारी क्षुल्लक अगर गंभीर अशा दोषारोपांतून सुटला नाहीं. पण बाळासाहेबांच्या बाबतींत त्यांच्या मित्रांप्रमाणेंच

त्यांच्या विरोधकांनाही त्यांच्याबद्दलच्या स्तुतीचे शब्द अपुरेच वाटले. श्री. खेर यांच्या या अजातशत्रुत्वामुळें त्यांच्या स्नेहीमंडळींत बॅ. जिन्हा, सर चिमणलाल सेटलवाड, श्री. केळकर, बॅ. जयकर, डॉ. आंबेडकर आणि कॅाँग्रेसगोटाचा रोष ओढवून घेतलेल्या अशा किती तरी थोर लोकांचा समावेश झालेला आहे. पक्षविशिष्ट सरकार बदलून पूर्ण प्रातिनिधिक असें एखादें 'राष्ट्रीय' सरकार बनविण्याचा प्रसंग आज उपस्थित झाला असता अगर पुढेंमागें उपस्थित झाला, तर विरोधी गटांतील योग्य अशा अनेक स्नेह्यांचा सहकार मिळवून आपलें संयुक्त प्रधानमंडळ तयार करण्यास सॉ. खेर यांना क्षणाचाही विचार करण्याचें कारण उरणार नाहीं. सॉ. खेर यांच्या जिव्हाळ्याच्या स्नेहाला राजकीय मतभेदाची अडचण जशी कधींच भासली नाहीं, त्याप्रमाणें ज्ञातिभेद अथवा भाषाभेद हे भेदही आड आलेले नाहींत. सॉ. खेर हे बहुभाषाकोविद आहेत. गुजराती व कानडी या दोन्ही भाषा त्यांना सफाईनें बोलतां येतात आणि या भाषांप्रमाणेंच त्या बोलणारांचें अंतरंगही त्यांना तेवढ्याच चाणाक्षपणें पारखतां येत असल्यामुळें गुजराती आणि कन्नड यांनाही बाळासाहेबांबद्दल स्वज्ञातीयाएवढेंच प्रेम व आदर वाटतो. आपल्या आयुष्यांत, कडक वाटणारें असें भाषण एकदांच करून त्यांनीं अहमदाबादेला जमनादास मेहता यांच्यावर कांहीं दिवसांपूर्वी टीका केली. पण या टीकेपेक्षांही खेरांसारख्या व्यक्तींच्या तोंडून हा चढा स्वर कसा उमटला याचेंच त्यांच्या प्रतिपक्षीयांना आश्चर्य वाटलें!

### अलौकिक निग्रह

श्री. खेर यांनीं राजकारणासाठीं इतर कष्टांबरोबर शरीरकष्टही भरपूर सोसले आहेत. कायदेभंगाच्या चळवळींत त्यांना १९३० सालीं सत्याग्रहाबद्दल ८ महिन्यांच्या कारावासाची व १९३२ सालीं दोन वर्षांच्या कारावासाची अशा दोन वेळां शिक्षा झाल्या व या शिक्षा त्यांनीं आनंदानें भोगल्या. तो प्रसंग मला चांगलाच आठवतो. दुसऱ्या रा. टे. परिषदेहून गांधी परत येण्यास निघाले असतां मध्येंच आततायीपणा करून पं. जवाहरलाल यांनीं आपल्यावर अटक व तुरुंगवास ओढवून घेतला. १९३२ च्या जानेवारीची चौथी तारीख. त्या दिवशीं मुंबईंत सरसि धरपकड चालू

होती. दुपारीं सुमारें २ वाजतां बॅ. मुकुंदराव जयकर यांच्या हायकोर्टांतील चेंबर-मध्यें बसून शहरांत व उपनगरांत चाललेल्या धरपकडीबद्दल मी त्यांच्याशीं चर्चा करीत होतों. इतक्यांत श्री. खेर तेथें आले. " या बाळासाहेब, आतां तुम्ही केव्हां यात्रेला निघतां ? " असा मीं प्रश्न केला. श्री. खेर फक्त हंसले. नंतर करारी स्वरानें म्हणाले, " माझ्या बाबतींत मी तुम्हांला कांहींच सांगत नाहीं. तुरुंगवास अपरिहार्य असला, तर मीही त्यांत ओढला जाणें टळणार नाहीं. " तुरुंगवासामुळें क्षीणप्रकृति झालेल्या खेरांनीं तुरुंगवासाची आपत्ति पुनः आपल्यावर ओढवून घेऊं नये असा आग्रहाचा सल्ला आम्हीं त्यांना दिला.

—आणि दुसऱ्याच दिवशीं श्री. खेर यांना अटक झाल्याचें आम्हांला समजलें ! अंगचोरपणा त्यांना कसा तो माहित नाहीं. टिळकांच्या राजकारणा-नंतर गांधींच्या राजकारणाची इमानदारी त्यांनीं पत्करली व ती मोठ्या निष्ठेनें व स्वार्थत्यागपूर्वक पार पाडली. स्वराज्यपक्षाच्या मुंबई शाखेचे चिटणीस, बारडोली चौकशी कमिटीचे उपाध्यक्ष, विलेपार्लें सत्याग्रह छावणीचे सूत्रचालक इत्यादि नात्यांनीं त्यांनीं बजावलेल्या कामगिरींत त्यांचा मेहनतीपणा कसाला लागला.आपल्या कर्तव्याची टाळाटाळ खऱ्याखोट्या सबबी सांगून अगर धंद्याची ढाल पुढें करून करण्याचा विचार त्यांना कधींही शिवला नाहीं. स्वीकृत कार्य निष्ठेनें व उत्साहानें पार पाडावयाचें हीच त्यांची कामगिरी व हाच त्यांच्या कार्याचा मोबदला. या गुणाचे दुष्परिणाम त्यांना व त्यांच्या कुटुं-बीयांना पुढें केव्हांही भोवूं नयेत म्हणून माझे मित्र श्री. तेरसी यांनीं एका रानटी युक्तीची सूचना श्री. खेर यांच्या पत्नीला केली होती ! दुसऱ्या तुरुंग-वासानें जर्जर होऊन श्री.खेर हे विश्रांतीसाठीं नाशिक येथें गद्र्यांच्या वाड्यांत राहण्यास गेले होते व श्री. तेरसी यांचा मुक्कामही तेथें होता. एकदां श्री. तेरसी खेरांच्या निवासस्थानीं गेले होते. राजकारणाच्या गोष्टी त्या वेळीं निघाल्या असतां हें राजकारण श्री. खेर यांना कसें भोवलें हें त्यांच्याकडे अंगुलिनिर्देश करून त्यांच्या पत्नीनें दाखविलें. त्यावर श्री. तेरसी म्हणाले, " तुम्ही आतां यांना कोणत्याच कारणासाठीं कॉंग्रेसच्या आजूबाजूला फिरकूं देऊं नका. त्यांना वठणीवर आणण्याचा उपाय मला माहित आहे. बाजा-रांतून एक काठी विकत आणा, नाहीं तर मी तुम्हांला एक चांगली काठी

आणून देतों आणि तिचा एकदां प्रयोग करून तुमच्या या बाळासायबाला धाक लावल्यावर मग तो कँग्रेसचं नांवही काढणार नाहीं ! ” श्री. तेरसी यांनीं सुचविलेल्या या युक्तीचा अवलंब श्री. खेर यांच्या बाबतींत करून पाहण्यांत आला कीं नाहीं हें मला माहित नाहीं !

त्यांच्या या तुरुंगवासाबद्दल एक गोष्ट मला विशेष उल्लेखनीय वाटते. कायदेभंगाच्या चळवळींत हजारों पुढारी व अनुयायी तुरुंगांत गेले; पण आपणास अपमानकारक वाटणाऱ्या अटींना मान न तुकावतां प्रत्यक्ष आपल्या जन्मदात्या पित्याचें अंत्यदर्शन घेण्यासाठींही तुरुंगांतून बाहेर पडण्याचें ज्यांनीं निग्रहपूर्वक व निष्ठुरपणें नाकारलें, असे या तुरुंगवासीय पुढाऱ्यांपैकीं श्री. खेर हे एकच व एकटे बाणेदार सत्याग्रही ठरले. पं. जवाहरलाल नेहरू यांच्यासारख्या अत्यंत ध्येयनिष्ठ पुढाऱ्यालाही जें दिव्य करतां आलें नाहीं, तें श्री. खेर यांच्यासारख्या कोमल व नवनीतमृदु अंतःकरणाच्या सत्याग्रहीनें करून दाखविलें आणि आपल्या ध्येयनिष्ठेला डोळे दिपून जाण्याजोगा उजाळा चढविला.

## ‘बा-ळ गं-गा-ध-र’

अत्यंत ध्येयनिष्ठ, बुद्धिवान्, निग्रही, सच्छील, चारित्र्यसंपन्न, अशा या अजातशत्रु पुढाऱ्याच्या हातीं एका इलाख्याचीं भवितव्यसूत्रें यावीं ही गोष्ट त्याच्या इमानाचें व निष्ठेचें फळ असलें, तरीही त्याचें नेतृत्व सर्व अनुयायांनीं बिनतक्रार मान्य करून या निवडीबद्दल आनंद प्रदर्शित करावा यांतच श्री. खेर यांच्या मोठेपणाचें खरें मर्म आहे. श्री. खेर यांचे प्रतिस्पर्धि श्री. नरिमन यांनाही श्री. खेर यांच्या निवडीबद्दल वैषम्य वाटत नाहीं; नरिमन–वल्लभभाई या झुंजांत कितीही उखाळ्यापाखाळ्या निघाल्या, तरी खेर यांच्या योग्यतेबद्दल संशय व्यक्त करण्यास कांहीं जात्यंध पारशां-शिवाय कोणीही पुढें आला नाहीं, ही गोष्ट या भांडणांतील एक उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणून नमूद करतां येईल. या भांडणांतील आरोपप्रत्यारोपांचा कीस काढण्याचें हें स्थळ नव्हे; परंतु श्री. नरिमन यांनीं १९३३ सालीं Whither Congress या पुस्तकांत विचारसरणीची कोल्हांट उडी मारून आणि नंतर १९३४ सालच्या ॲसेंब्लीनिवडणुकींत रुसवा दाखवून कॉंग्रेस-

दैवतांचा व विशेषत: पं. जवाहरलाल नेहरू यांचा रोष ओढवून घेतला असतां, श्री. नरिमन यांना डावललें असतांही सर्व अनुयायांचा आदर व निष्ठा आपल्याकडे खेंचून घेईल असा एकच एक विश्वासाचा पुढारी आपल्या गोटांत आहे असें समजून हीं दैवतें श्री. खेर यांच्यावरच विसंबून निश्चित राहिलीं होतीं एवढें सांगितल्यावर या दुर्दैवी भांडणाच्या जास्त तपशिलांत शिरण्याची गरज मला वाटत नाहीं.

**बाळ गंगाधर टिळक** यांचें शिष्यत्व पत्करून सार्वजनिक कार्याचा ओनामा गिरविणारे **बाळ गंगाधर खेर** यांना नव्या घटनेंतील अंमलांत **मुंबई इलाख्याचा कॉंग्रेसचा पहिला मुख्य मंत्री** होण्याचें भाग्य लाभावें, याबद्दल मला अभिमान वाटतो. हा बाळ गंगाधर कॉंग्रेसच्या विधायक कार्याचा ओनामा घालून देणार आहे. गांधींच्या कार्यक्रमांतील हरिजनसेवा, दलितोद्धार, स्वदेशी इत्यादि विधायक कार्यांत श्री. खेर हे समरस झालेले असल्यामुळें इतर कॉंग्रेसपुढाऱ्यांप्रमाणें या बाबतींत त्यांना बिचकण्याचा प्रसंग येणार नाहीं. त्यांचा मोकळेपणा सांसर्गिक आहे, निगर्वी-पणा अकृत्रिम आहे, कार्यनिष्ठा तीव्र आहे आणि या सर्व गुणांना भूषणभूत होणारा असा नि:स्वार्थीपणा संशयातीत आहे. या गुणांच्या जोरावर स्वपर-जनांच्या प्रेमाला व आदराला श्री. खेर हे पात्र होऊन त्यांचें भावी कार्य उज्ज्वल व स्फूर्तिप्रद ठरावें एवढीच अपेक्षा मी या प्रसंगीं प्रकट करतों.

विविध वृत्त, ता. १८ जुलै १९३७

## कन्हय्यालाल मुनशी : : २

शुक्रवार ता. ३ ऑक्टोबर १९३० ची ती सायंकाळ होती. त्या दिवशीं सुप्रसिद्ध प्रागतिक पुढारी सर तेजबहादूर सप्रू यांचा मुंबईंत मुक्काम होता. दुसऱ्या दिवशीं रा. टे. परिषदेसाठीं सर तेज मेलबोटीनें जाणार असल्यामुळें त्यांच्याशीं विचारविनिमय करून त्यांचे विचार तरुण प्रागतिकांना ऐकविण्यासाठीं सर चिमणलाल सेटलवाड यांनीं वेस्टर्न इंडिया लिबरल्स ॲसोसिएशनच्या सभासदांची एक बैठक आपल्या ऑफिसमध्यें बोलावली होती. विचार-विनिमय आटोपल्यावर सर तेज व इतर सभासद सर चिमणलाल यांच्या चेंबरमधून बाहेर पडले. सर तेज टॅक्सीची वाट पाहत फूटपाथवर इतर मंडळीसह गप्पा मारीत उभे राहिले असतां एक व्यक्ति त्या संध्याप्रकाशांत बाजूच्या इमारतींतून त्या फूटपाथवर आली. निऱ्या सोडलेलें धोतर, पायघोळ कफनी, त्यावर उत्तरीय आणि डोळयाला चष्मा असा तिचा पोषाख होता. त्या व्यक्तीकडे इतरांचें लक्ष जाऊन ती कोण हें त्यांच्या लक्षांत येण्यापूर्वींच तिनें सर तेज यांच्या पायांवर भर फूटपाथवर सपशेल लोटांगण घातलें आणि उठून उभी राहून “आज आपल्यासारख्या थोर कायदेपंडिताची, मुत्सद्दी पुढाऱ्याची, देशभक्ताची भेट झाली—आज मी धन्य झालों ”





असें पुटपुटूं लागली ! सर्वच मंडळी या अपूर्व प्रकारामुळें आश्चर्यचकित झाली.सर तेज तर दोन पावलें मागें सरले.सर चिमणलाल यांनीं पुढें होऊन त्या व्यक्तीकडे न्याहाळून पाहिलें आणि ते म्हणाले, " हे पहा आपले मित्र श्री.के. एम्. मुनशीः यांचा-आपला परिचय करून देतों."

—पण परिचयविधीलाही त्या प्रसंगीं वेळ मिळाला नाहीं. टॅक्सी आली व तींत पाऊल ठेवून सर तेजबहादूर सप्रू आपल्या निवासस्थानाकडे निघून गेले. त्यांच्या टॅक्सीकडे पाहत मुनशी बराच वेळ उभे राहिले होते. सर तेजबहादूर सप्रू यांच्या पायांवर लोटांगण घालणारी व्यक्ति आजच्या मुंबई सरकारच्या कायदा व सुव्यवस्था खात्याचे मंत्री नामदार कन्हय्यालाल मुनशी हीच होती हें आतां निराळें सांगण्याचें कारण नाहीं.

'साहित्यिक' आणि 'साष्टांग नमस्कार' यांचें साहचर्य आहे कीं काय हें मला कळत नाहीं. ना. कन्हय्यालाल मुनशी यांचें " काकानी शशी " हें नाटक मराठींत भाषांतरित करून मराठी रंगभूमीवर आणण्यास त्यांची परवानगी घेण्यासाठीं आमचे मराठी साहित्यिक श्री. वरेरकर हे दोन आठवड्यांपूर्वीं पुण्याला गेले होते. वरेरकरांच्या बाबतींतही हा साष्टांग नमस्काराचा प्रकार झालेला आहे. एकदां गुरुप्रेमानें उचंबळून येऊन भर रस्त्यांत वरेरकरांनीं आपल्या सुप्रसिद्ध सोटयासह कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांना साष्टांग नमस्कार घातला होता. पण श्री. मुनशी यांनीं त्यांच्यापेक्षां साष्टांग नमस्काराचा कित्ता अधिक वेळां घोटवून वळणदार केला आहे. अगदीं कालपरवांचीच गोष्ट. शुक्रवार ता. २३ जुलै रोजीं मुंबईंत श्री. मुनशी यांनीं मुंबई सरकारचे गृहमंत्री या नात्यानें पहिल्यानेंच प्रवेश केला. स्टेशनवरून उतरतांच अधिकाऱ्यांचे मुजरे घेत घेत ते बाहेर पडले; पण सेक्रेटरियटमध्यें जाऊन आपल्या आसनावर आरूढ होण्याची लगबग न करतां ते आधीं सरळ हायकोर्टांत गेले. हायकोर्टाच्या बारलायब्ररीमध्यें जाऊन भुलाभाई देसाई यांची त्यांनीं भेट घेतली, त्यांच्या पायांवर डोई ठेवली, आणि नंतर त्यांना कडकडून आलिंगन दिलें. " हे दिवस

मी आपल्याच कृपेनें पाहत आहें " अशा अर्थाचीं कांहीं वाक्यें ते पुटपुटले.

आपला आदरभाव, पूज्यबुद्धि अथवा कृतज्ञता अशा पूर्वापार 'सनातन' पद्धतीनें व्यक्त करणाऱ्या व्यक्तीचें वर्णन अलीकडे वरचेवर उच्चारण्यांत येणाऱ्या हिंदी शब्दाप्रमाणें करावयाचें झाल्यास तें "भारतीय सभ्यता का आदर्श" असेंच करावें लागेल; पण श्री. मुनशी यांच्या बाबतींत हा शब्दप्रयोग त्यांच्या निर्भेळ स्तुतिपाठकानें केला, तरी त्यावर वाचकांचा विश्वास बसेल काय? गुरुशिष्यप्रेमाचीं, त्यांच्या प्रेमळ मीलनाचीं वरील प्रकारचीं वर्णनें वाचतांना व लिहितांनाही अंतःकरणांत गुदगुल्या होतात; पण श्री. मुनशी यांना अशा भूमिकेंत उभें केलें, तर मात्र "ऊः कनूचें हें नाटक असावें" असे उद्गार कोणाच्याही तोंडून बाहेर पडतील. आणि या उद्गारांत अगदींच सत्यांश नाहीं असें निदान मी तरी म्हणणार नाहीं. कन्हय्यालाल मुनशी हे पुढारी आहेत; पण गुजराती समाज त्यांना पुढारी म्हणून ओळखीत नसून साहित्यिक म्हणूनच आधीं ओळखतो. ते नाटककार आहेत; पण त्यांच्या सार्वजनिक आयुष्याकडे पाहिलें, म्हणजे नाटककारापेक्षां नट म्हणूनच त्यांनीं अधिक यश मिळविलें आहे असें मला वाटतें!

## 'वृद्ध कपि'

त्यांच्या अभिनयाला त्यांच्या महत्त्वाकांक्षेप्रमाणेंच तोड नाहीं. सर तेजबहादूर सप्रू यांच्या पायांवर लोटांगण घातल्याची आठवण मीं वर दिली आहे. हा प्रसंग घडून येण्याच्या आदल्याच दिवशीं ते नाशिक जेलमधून ८ महिन्यांची शिक्षा भोगून मुंबईत येऊन मोठ्या थाटामाटानें मिरवले होते. त्या वेळच्या राजकारणाला श्री. मुनशी यांनीं ज्या हिरीरीनें वाहून घेतलें होतें, त्या वृत्तीशीं वरील प्रकार खात्रीनें विसंगत वाटतो. असहकारितेच्या चळवळींत "गांधींचा चरख्याचा कार्यक्रम देशाला कुठें नेणार हें मला कळत नाहीं" असें म्हणून ज्या मुनशींनीं कॉंग्रेसचा संबंध तोडला, कायदेभंगाची मोहीम सुरू करण्यासाठीं गांधींनीं दांडीच्या यात्रेचा संकल्प जाहीर केल्यावर "देशाला आग लावण्यास उठलेल्या वृद्ध कपी"ला नामोहरम करण्यासाठीं

प्रचंड चळवळ केली पाहिजे अशा विचारानें ज्यांनीं स्वत: स्वयंस्फूर्तीनें लेखणी सरसावली होती, त्यांनींच १९३० च्या एप्रिलमध्यें " कॉंग्रेसच्या बाहेर राहून प्रामाणिकपणानें देशसेवा करतां येत नसल्यामुळें मी फिरून कॉंग्रेसचा सभासद होत आहें " असें जाहीर करून कायदेभंग केला आणि तुरुंगांतून सुटल्यावर पुन: दुसऱ्याच दिवशीं सर तेज सप्रू यांच्या पायांवर डोई ठेवली; या सर्वच प्रकाराचें 'अभिजात नाटकीपणा' यापलीकडे दुसऱ्या कोणत्या शब्दांनीं वर्णन करतां येईल ? राजकारण हें वारांगनेप्रमाणें आहे हें पूर्ण लक्षांत घेऊन राजकारणाचें प्रियाराधन जर कोणी हौसेनें केलें असेल तर तें मुनशींनीं केलें. आपलें व्यक्तित्व, आपली बुद्धिमत्ता, वाणी व वागणूक यांतील आपलें सौष्ठव, लाघवीपणा, औदार्य इत्यादि गुणांचा उपयोग आपलें चरित्र व चारित्र्य उदात्त व उज्ज्वल करण्यासाठीं त्यांनीं केला असता, तर केवढें तरी लोभनीय यश त्यांना मिळवितां आलें असतें; पण या अमोल गुणांचा उपयोग परार्थ अगर परमार्थ यांच्यासाठीं न करतां त्यांनीं व्यवहारासाठीं केला. या प्रयत्नांत त्यांना यश आलें खरें; पण मुनशींच्या यशाची संभाव्यता पाहिली, तर तें खात्रीनें फिकें वाटतें.

## स्वभाववैशिष्ठ्य

श्री. मुनशी यांच्या या यशाला अगर अपयशाला कारणीभूत झालेली जर कोणती एकच एक ठळक गोष्ट असेल, तर ती त्यांच्या स्वभावांतील उपरोक्त महत्त्वाकांक्षा हीच होय. मुनशींची ही महत्त्वाकांक्षा बुद्धिनिष्ठ व्यक्तीची महत्त्वाकांक्षा नसून भावनाप्रधान व्यक्तीची महत्त्वाकांक्षा आहे. त्यांचे सर्व व्यवहार बाह्यत: बुद्धिनिष्ठतेच्या चाकोरींतूनच चालत असलेले दिसले, तरी तींत रेखींवपणा आढळून येत नाहीं. भावनांच्या लाटा अंत:करणांत तुफान माजवीत असल्यामुळें ही चाकोरी कारणपरत्वें सुटलेली दिसून येते. कायदेभंगाच्या दिवसांत स्थानिक कॉंग्रेस कमिटीच्या पोटकमिटीचें स्थानिक गिरण्यांवरील बहिष्काराचें धोरण नापसंत पडून त्यांनीं उद्वेगानें जो सुप्रसिद्ध अन्नसत्याग्रह केला होता, तो माझ्या या विधानाचें प्रत्यंतर पटवून देईल. मुनशींसारख्या पूर्ण व्यवहारी रजोगुणी व्यक्तीनें उपवास, अन्नसत्याग्रह असा त्राग्याचा तामसी मार्ग अंमलांत आणावा, हा त्या वेळीं एक कुतूहलाचाच

विषय झाला; पण हा तामसी मार्ग इतर कॉंग्रेसपंथीय पुढाऱ्यांच्या प्रसिद्धिप्रियतेच्या चेष्टितांप्रमाणें आंखीव मार्ग नसून भावनेच्या क्षणिक भरांत अनुसरण्यांत आलेला वांकडा मार्ग होता. या प्रसंगीं बुद्धीवर भावनेनें कडी केली आणि मला वाटतें, आतांपर्यंतच्या आपल्या आयुष्याचें सिंहावलोकन करण्याचा प्रयत्न मुनशींनीं केला, तर संयम सुटल्यामुळें दिसून आलेल्या या भावनाविष्काराबद्दल मनांतल्या मनांत ते लज्जितही होतील. भावनावश मनुष्य कितीही बुद्धिवान् असला, तरी त्याला बुद्धि व भावना यांचा तीव्र कलह उत्पन्न झाल्यावर बुद्धिनिष्ठ राहतां येत नाहीं. या स्वभावाला महत्त्वाकांक्षेची–अमर्याद महत्त्वाकांक्षेची–जोड मिळाल्यावर तर ही बुद्धिमत्तासुद्धां आकुंचित व एककल्ली होते. प्रबल प्रतिस्पर्धि जोर करीत असतां त्यांच्यापासून फटकून राहून मनांतल्या मनांत कुढत इतर व्यवसायांच्या जाळ्यांत आपल्याला गुरफटून घ्यावयाचें आणि योग्य संधि मिळाल्यावर धीटपणें पुढें येऊन आपला मार्ग बेछूटपणें आक्रमण करण्यास सुरुवात करावयाची, आणि त्यासाठीं भल्याबुऱ्या सर्व साधनांचा उपयोग करावयाचा अशी मुरड अशा व्यक्तींच्या स्वभावाला व जीवनक्रमाला पडत जाते. मुनशींचा जीवनक्रम अशाच प्रकारें बनत गेला आहे.

### जीवनचरित्र

श्री. मुनशी यांचा जन्म ता. २९ डिसेंबर १८८७ रोजीं भडोच येथें झा[illegible]. धनाढ्य नसला, तरी सधन अशा सुखवस्तु पांढरपेशा कुटुंबांत त्यांचा [illegible]न झाल्यामुळें त्यांच्या बालपणीं त्यांच्या बालमनावर जे संस्कार झाले, ते सम[illegible]त रुळलेल्या मार्गानें कीर्ति आणि प्रतिष्ठा कशी प्राप्त करून घेतां येईल या विचारालाच पोषक होते. त्यांच्याभोंवतालचें व घरांतलें वातावरण वकिली व्यवसायाशीं निगडित झालें होतें. त्यांचे चुलते एक प्रसिद्ध वकील होते आणि निदान तरुणपणीं तरी आपल्या चुलत्याचाच आदर्श त्यांच्यापुढें [illegible]ता. वकिली व्यवसायाचे पहिले धडे आपण आपल्या या चुलत्याकडूनच घेतले असें १९३४ सालीं झालेल्या एका व्याख्यानांत श्री. मुनशी यांनीं सांगितल्याचें मला आठवतें. भडोच येथील शिक्षणक्रम आटोपल्यावर ते बडोदा कॉ[illegible]जमध्यें गेले आणि तेथून १९०६ सालीं संस्कृत व तर्कशास्त्र हे विषय घेऊन

बी. ए. ची परीक्षा दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण झाले. त्यांच्याबरोबर ही परीक्षा त्या सालीं उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांत केसरीचे श्री. दा. वि. ऊर्फ बाबुराव गोखले हे बडोदा कॉलेजचे व श्री. के. एफ्. नरिमन, क्रॉनिकलचे श्री. एल्. जी. खरे आणि सिंध सरकारचे मुख्य सेक्रेटरी श्री. एच्. के. कृपलानी हे विद्यार्थी प्रमुख होते. नरिमन व श्री. गोखले यांनीं १९०९ सालीं त्यांना एलएल्. बी. च्या परीक्षेंतही साथ दिली. नरिमन आणि मुनशी यांची तोंड-ओळखही नसतां विद्यार्थीदशेंतील "महोदधी"मध्यें त्यांची एकत्र गांठ पडावी आणि नंतर "समेत्यच व्यपेयाताम्" असें होण्याऐवजीं महापुरांत वाहून जाणाऱ्या इसापनीतींतील दोन भांड्यांप्रमाणें एकमेकांवर आदळण्याचे, एकमेकांना टाळण्याचे प्रसंग त्यांच्यावर येऊन हे रिकाम्या भांड्यांचे ( आणि त्यांच्या भांडणाचेही ) निनाद अनेक प्रकारें ऐकूं यावे हा खरोखरच एक अकल्पित योगायोग नव्हे काय ? कौन्सिलांत नरिमन-मुनशींचे खटके उडाले, कॅाग्रेसच्या चळवळींत हे कलहप्रसंग त्यांनीं काळजीपूर्वक टाळले, आतां गाजत असलेल्या नरिमन प्रकरणांत पुनः या उभयतांच्या खाजगी वैमनस्यांतून उत्पन्न झालेल्या कारस्थानांचे संशय जोरानें घोंघावत आहेत. दैवयोगा-एवढाच कर्मयोगही या योगायोगाच्या नाटकांत प्रबळ आहे असें म्हटल्यास तें चुकीचें होईल काय ?

## वकिली

वकिलीची परीक्षा पास होतांच श्री. मुनशी यांनीं मुंबईत प्रॅक्टिस करण्यास सुरुवात केली. लक्ष्मी आणि सरस्वती यांची एकाच वेळीं उपासना करण्यास त्यांनीं याच काळांत प्रारंभ केला. वकिलांची वसाहत असलेल्या हायकोर्टा-जवळच्या ओक लेनमध्यें त्यांनीं दोन खुर्च्या आणि एक टेबल आणून ऑफिस थाटलें. कुळांची वाट पाहत बसण्यांत उमेदवारीचे दिवस फुकट न घालवितां त्या वेळीं भरपूर मिळणाऱ्या फावल्या वेळेचा उपयोग ते साहित्यसेवेसाठीं करूं लागले. 'गुजराती' या साप्ताहिकांत व इतर प्रमुख गुजराती नियत-कालिकांत त्यांचे फुटकळ लेख व कथा प्रसिद्ध होऊं लागल्या. "घनःश्याम व्यास" या टोपण नांवानें "वेरनी वसुलात" ही आपली ललितकृति त्यांनीं रसिकांपुढें ठेवली. या काळांतील लेखनानें त्यांच्याकडे गुजराती समाजाचें लक्ष वेधलें व 'साक्षर' ( साहित्यिक ) म्हणून त्यांची लोकप्रियता वाढूं

लागली. साहित्यानंदाच्या कैफांत मग्न होऊन आपल्याच विचारांच्या तंद्रींत हातावर वकिलीचा झगा घेऊन, हातवारे करीत एखाद्या 'कवि'प्रमाणें त्यांना हायकोर्ट ते कचेरी व कचेरी ते हायकोर्ट अशा फेऱ्या घालतांना मीं पाहिलें आहे. शारदेचा वीणाझंकार त्यांच्या मंदिरांत सुरू झाला, पण त्या असूयेनें लक्ष्मीनें त्यांच्याकडे पाठ फिरविली नाहीं. उलट लक्ष्मीनेंही आपल्या नूपुरांचा ताल त्याला धरला आणि मुनशींच्याभोंवतीं हळूहळू सघन कुळांची गर्दी जमूं लागली. १९१३ मध्यें ते ॲडव्होकेटच्या यादींत प्रविष्ट झाले आणि त्या वेळेपासून २६ वर्षांच्या या पोरसवदा वकिलानें जाणते कायदेपंडित आणि हायकोर्टांतील न्यायाधीश या दोन्ही दैवतांवर हळूहळू चांगलीच छाप पाडली. ओरिजिनल व ॲपिलेट या दोन्ही भागांतील 'ब्रीफ्स' त्यांना मिळूं लागलीं व त्यांचा आस्ते आस्ते चांगलाच जम बसला. ॲ. भुलाभाई देसाई यांचा मुनशींवर अनुग्रह होऊन भुलाभाईंच्या 'बासुंदी' क्लबमध्यें त्यांचा समावेश झाला. या क्लबाचें अस्तित्व व विसर्जन यांचा इतिहास मोठा मनोरंजक आहे. पण तो सांगण्याचें हें स्थळ नव्हे. हायकोर्टांतील निवडक वकील-पत्रांचें दूध आटवून केलेली ही बासुंदी या क्लबमार्फत तिच्या मोजक्या सभासदांना मिळत असे एवढाच संक्षिप्त उल्लेख या ठिकाणीं पुरेसा आहे!

वकिलीबरोबरच सार्वजनिक कार्यही कळत–नकळत उत्साही व्यक्तीच्या गळ्यांत घेऊन पडणें अपरिहार्यच असतें. गांधींच्या नांवाशीं संलग्न झालेलें 'यंग इंडिया' हें पत्र जमनादास द्वारकादास यांच्या साहाय्यानें अस्तित्वांत आलें आणि श्री. मुनशी हे या पत्राचे १९१५ मध्यें संयुक्त संपादक झाले. श्री. इंदुलाल याज्ञिक यांचें 'नवजीवन व सत्य' हें मासिकही याच सुमारास निघालें व या मासिकाशीं लेखक या नात्यानें मुनशींचा संबंध जडला. हीं दोन्ही नियतकालिकें पुढें गांधींनीं स्वतःकडे घेतलीं व नवजीवनाचें रूपांतर साप्ताहिकामध्यें त्यांनीं केलें. पण यंग इंडिया व नवजीवन या दोन्ही नियतकालिकांना बाळसेदार स्वरूप आणून देण्यांत श्री. मुनशी व याज्ञिक यांचेच प्रारंभींचे परिश्रम कारणीभूत झाले, ही गोष्ट विसरून चालणार नाहीं.

### गुजराती विरुद्ध 'घांटी'

पण श्री. मुनशी यांच्या राजकारणाला प्रत्यक्ष अशी सुरुवात मात्र होमरूल लीगच्या चळवळीपासूनच झाली. मुंबई इलाख्याच्या व महाराष्ट्राच्या

राजकारणांत 'गुजराती व दक्षिणी,' अथवा मुनशींच्या आवडत्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास 'घांटी' या भेदभावाचा विषबिंदु जर केव्हां पडला असेल, तर तो याच चळवळीच्या वेळीं! टिळक व ॲनी बेझंट यांचे सवते सुभे या चळवळींत निर्माण झाले. टिळकांच्या होमरूल लीगमध्यें सामील होणारे पहिले गुजराती सभासद डॉ. चंदुलाल देसाई हे होत. या सवत्या सुभ्याचा फायदा घेऊन इतर गुजराती कार्यकर्त्यांना टिळकांपासून दूर ठेवून मिसेस बेझंट यांच्या नेतृत्वाखालीं आणण्यास जर कोणत्या व्यक्तीचें धोरण कारणीभूत झालें असेल, तर तें श्री. मुनशी यांचेंच असें म्हटल्यावांचून गत्यंतर नाहीं. मिसेस बेझंट यांच्या होमरूल लीगचे श्री. मुनशी हे मुंबईशाखेचे सेक्रेटरी झाले आणि या लीगमध्यें श्री. जमनादास द्वारकादास, आज हायकोर्ट जज्ज असलेले श्री. दिवेटिया, सिंध्या कंपनीचे सेक्रेटरी श्री. मनसुखलाल मेहता, बॅ. विभाकर, व श्री. चंद्रशेखर पंड्या यांचा समावेश झाला. या चळवळींत परिषदा व सभा यांमध्यें व्याख्यानें देऊन आपल्या राजकीय आकांक्षा व्यक्त करण्यापलीकडे विशेष महत्त्वाची अगर नजरेंत भरण्याजोगी कामगिरी मुनशींच्या हातून झाली नाहीं. होमरूल लीगच्या मागोमाग असहकारितेची चळवळ सुरू झाली. चरख्याचें तत्त्वज्ञान मुनशींना पटण्याजोगें नव्हतें. त्याचप्रमाणें गांधींचा तिहेरी बहिष्काराचा मार्गही त्यांना अनुकरण करण्याजोगा अथवा त्यांच्या महत्त्वाकांक्षेला मान्य होण्याजोगा नव्हता. ही चळवळ सुरू झाल्यावर मुनशींनीं राजकारणांतून आपलें अंग काढून घेतलें व ते पुनः व्यवसाय व साहित्यसेवा यांत मग्न झाले. असहकारितेच्या चळवळींत मुनशींच्या मनाची व मतांची झालेली धरसोड व साशंक वृत्ति उल्लेख करण्याजोगी आहे. या चळवळीपासून सर्वस्वी अलिप्त राहणें त्यांना अवघड वाटूं लागलें व चळवळींत उडी घेणें धोक्याचें वाटलें! त्यांच्या मनाचे हेलकावे त्यांना अस्थिर व अस्वस्थचित्त करूं लागले; पण अखेर मनाचा निर्धार करून प्रेक्षकाची तटस्थ भूमिका स्वीकारणेंच त्यांना इष्ट वाटलें! त्यांनीं आपला मोर्चा शिक्षणकार्य व शिक्षणसुधारणा या क्षेत्राकडे वळविला. सेनेटच्या निवडणुकीला उभे राहून ते मुंबई युनिव्हर्सिटी सेनेटमध्यें निवडून आले. सेनेटच्या गुजराती शिक्षण बोर्डावर त्यांची नंतर निवड झाली व बडोदा युनिव्हर्सिटी कमिशनवरही त्यांना नेमण्यांत आलें. शिक्षणकार्य हेंच जवळजवळ त्यांचें अंगीकृत कार्य झालें.

## सक्रिय सुधारक

श्री. मुनशी यांच्या आयुष्यांतील एक महत्त्वाची घटना या काळांत घडून येऊं लागली होती. आपल्या राजकीय मतांचें स्वरूप मूर्त स्थितींत आणणें परिस्थितीमुळें त्यांना शक्य झालें नाहीं, तरी आपलीं सामाजिक व पुरोगामी मतें सक्रिय स्वरूपांत प्रकट करण्याची संधि त्यांना श्रीमती शेठ यांच्याशीं विवाह करून साधतां आली. सौ. लीलावती मुनशी यांच्याशीं त्यांचा निकट वास्तव्यामुळें प्रथम परिचय झाला. सहानुभव व साहित्यप्रेमाचा समानधर्म यांच्यामुळें या उभयतांचें स्नेहसंवर्धन झालें आणि हा स्नेह विवाहग्रंथीनें दृढमूल करण्याचा योग त्या उभयतांना अकल्पित रीतीनें आला. श्री. मुनशी हे आपल्या प्रथम कुटुंबाच्या आजारांत युरोपच्या प्रवासाला गेले असतां सौ. लीलावती याही त्यांच्याबरोबर गेल्या होत्या. प्रवासाहून आल्यानंतर १९२५ मध्यें मुनशी यांच्या प्रथमपत्नी कैलासवासी झाल्या. १९२६ मध्यें श्री. शेठ हेही निधन पावले. दुर्दैवाचे आघात उभयतांवरही लागोपाठ बसल्यामुळें जी उणीव उभयतांच्या जीवनांत उत्पन्न झाली, तिचें निवारण दीडच महिन्याच्या अल्पावधींत करून या नवदंपतीनें आपले जीवनप्रवाह एकत्र मिळविले आणि नव्या उत्साहानें, नव्या उमेदीनें नवजीवनाला प्रारंभ केला ! या विवाहप्रसंगीं पुण्याचे श्री. यशवंतराव दाते व कै. डॉ. केतकर यांनीं पौरोहित्य करून त्यांच्या समाजसुधारणेचें अभीष्टचिंतन केलें हें मुद्दाम सांगणें जरूर आहे.

## कौन्सिलांतील कार्य व नंतर

युनिव्हर्सिटीमध्यें बस्तान बसल्यानंतर श्री. मुनशी हे १९२७ मध्यें बॅ. जयकर यांच्या पुरस्कारानें युनिव्हर्सिटीतर्फे कौन्सिलांत शिरले. युनिव्हर्सिटीच्या कायद्याची फेरतपासणी करण्याचें बिल त्या वेळीं कौन्सिलांत आलें होतें. ह्या बिलाला पाठिंबा देऊन बिलांतील प्रतिगामी सूचनांना उचलून धरण्यांत श्री. मुनशी यांनीं जें पांडित्य व युक्तिवाद प्रकट केला, त्याची स्मृति अजून पुष्कळांच्या मनांत ताजी असेल. नरिमन यांनीं त्यांच्यावर 'सरकारजमा' झाल्याचे कौन्सिलमधील चर्चेंत गर्भित आरोप केले व श्री. मुनशी यांनीं ते खोडून काढण्याचा प्रयत्न केला. आज श्री. मुनशी हे 'सरकार'

झाले आहेत व श्री. नरिमन यांचा सरकार होण्याचा मोका हुकल्यामुळें ते ‘ सरकारजमा ’ झाले आहेत. श्री. मुनशी यांच्या राजकारणानें कायदेभंगाच्या चळवळीमुळें पुन: एकदां कोल्हाट उडी मारली. गांधींचें दांडीयात्रेचें ‘ वेड ’ पटत नसतांही त्यांनीं ‘हरहर महादेव ’ करून कायदेभंगाच्या चळवळींत उडी टाकली व कौन्सिलचा राजिनामा दिला.

**मुनशींच्या या आकस्मिक मतांतराचें कारण समजणें कठीण असलें, तरी गांधींनीं त्यांना या प्रसंगीं जो मार्मिक प्रश्न विचारला होता, त्यावरून या कारणाची थोडी संगति लावतां येईल. श्री. मुनशी हे आपला हा नवा मनोदय गांधींना कळविण्यासाठीं सपत्निक गेले असतां गांधींनीं सौ. लीलावती यांच्याकडे पाहत त्यांना विचारलें, “ तुम्ही उभयतांही चळवळींत पडणार आहांत;पण या चळवळींत तुम्हांपैकीं कोणी कोणाला ओढून आणलें ? ” या प्रश्नाचें उत्तर मुनशी दांपत्यानें शब्दांनीं न देतां हास्यानें दिलें व तें हास्यच जास्त अर्थसूचक होतें.**

कॅांग्रेसशिवाय आपल्या राजकारणाला गति नाहीं ही नक्की जाणीव झाल्या-नंतर त्यांनीं भाटिया बागेंत मिठाचा सत्याग्रह करून कायदेभंग केला व तुरुंगाचा रस्ता धरला; तुरुंगांतून बाहेर आल्यावर कोर्टांत प्रवेश केला; पुन: चळवळ सुरू झाल्यावर ते तुरुंगाची वाट चालून गेले व विजापूरच्या जेलमध्यें दोन वर्षें शिक्षा भोगीत राहिले. तुरुंगांतून मुक्तता झाल्यावर पुन: त्यांनीं कोर्ट जवळ केलें. तुरुंग नाहीं तर कोर्ट आणि कोर्ट नाहीं तर तुरुंग अशी सुसूत्रता त्यांच्या हालचालींत दृग्गोचर झाली. १९३४ च्या ॲसेंब्ली-निवडणुकींत नरिमन यांनीं आपली उमेदवारी मागें घेतल्यामुळें कॅांग्रेसचे उमेदवार म्हणून श्री. मुनशी यांना श्री. नरिमन यांच्या जागीं उभें करण्यांत आलें; पण या निवडणुकींत त्यांचा पराभव झाला. पराभूत होण्याचा हा पहिलाच प्रसंग त्यांच्यावर आला. पण या पराभवाची भरपाई आतां पुरेपूर होऊन चुकली आहे.

## व्यक्ति

येथपर्यंतच्या जीवनक्रमावरून मुनशींच्या चरित्राकडे पाहतां अलौकिक अथवा असामान्य असें कर्तृत्व या चरित्रांत कांहींच आढळून येत नाहीं.

तथापि साधनापेक्षां साध्यावरून जर कर्तृत्वाचें मोजमाप करावयाचें असेल, तर कमींत कमी कर्तृत्वानें जास्तींत जास्त साध्य मुनशींनीं संपादन केलें असें म्हटलें पाहिजे. ही सिद्धि त्यांना प्राप्त होण्याचें कारण त्यांच्या स्वभावांतील हिकमतीपणा हेंच आहे. मुनशींच्या प्रकृतीला विरोध मानवत नाहीं. विरोधक अथवा प्रतिस्पर्धि यांच्याशीं उघड उघड झुंज करून त्यांना नेस्तनाबूत करण्याएवढें बुद्धीचें चापल्य व कणखरपणें प्रहार करण्याची शक्ति त्यांच्या अंगीं आहे; पण उत्साहशक्तीचा अशा रीतीनें अपव्यय न करतां हा सांठा राखून ठेवणेंच त्यांना अधिक पसंत पडतें. विरोधकांच्या मर्मस्थलांवर प्रहार करून अल्प सायासानें जेथें इष्ट हेतु साध्य होत असेल, तेथें कुस्तीची दंगल माजविणें त्यांना आवडत नाहीं. लोकशाहीचे ते भोक्ते आहेत, पण लोकशाहीचा वडेजाव सुलतानीचें ऐश्वर्य खुलून दिसण्यासाठीं व त्यापुरताच व्हावा असें वाटण्याजोगी त्यांच्या मनाची घडण आहे. त्यांची शालीनता स्वभावजन्य नसून परिश्रमांची कमाई आहे, असा त्यांच्या सहवासांत भास होतो. वृत्तीनें ते उदार, आतिथ्यशील व लाघवी आहेत; पण तेवढेच ते प्रसंगीं ताठर व तुटक वाटतात. रोष आणि लोभ यांचा आत्यंतिकपणा त्यांच्या वृत्तींत एकवटला आहे. त्यांच्या सर्वच हालचालींत घोटींवपणा आणि उच्च गंड यांचें प्रतिबिंब पडलेलें असतें. त्यामुळें त्यांचा मोकळेपणासुद्धां कृत्रिम वाटतो. विशिष्ट मर्यादेच्या खालीं जाऊन इतरांशीं त्यांना समरस होतां येत नाहीं. 'घांच्यां'बद्दल त्यांना वाटणारी अढी असूयामूलक विरोधी भक्तीची निदर्शक असावी अशी माझी कल्पना आहे. आपलें वर्चस्व जेथें अप्रतिहतपणें चालेल, तेथें आपल्या स्नेहशीलतेची ते परमावधि दाखवितील; पण तीही सहजावस्था या रूपानें प्रकट झालेली न दिसतां अनुग्रहबुद्धीमुळेंच प्रकट झालेली दिसेल. मुंबईच्या गुजराती साहित्यसंघ या संस्थेचे ते १९२२ पासून अध्यक्ष आहेत. साहित्य क्षेत्रांत आपलें वर्चस्व बिनतक्रार मान्य होणें भागच आहे, या कल्पनेचा निःशंकपणा त्यांना लाभल्यामुळें या संस्थेच्या कारभारांत त्यांच्या हालचालीला अगर धोरणाला कोणत्याच सावधगिरीच्या उपाधीची बाधा झालेली नाहीं; पण हा स्वयमेवतेचा निःशंकपणा इतरत्र त्यांना लाभत नसल्यामुळें मतभेद व कलहप्रसंग उद्भवतात व अशाच वेळीं ते आपल्या भ्रष्ट अवस्थेंत दिसूं लागतात. ह्या संशयी सावधगिरीमुळें असो,

अगर मनाच्या कमकुवतपणामुळें असो, पण गुजराती कार्यकर्त्यांपैकीं बऱ्याच प्रमुख अशा कार्यकर्त्यांशीं त्यांना अनौपचारिक अशा दाट स्नेहाचें नातें जोडतां आलेलें नाहीं. गुजराती कार्यकर्ते त्यांच्याकडे आदरानें पाहतात; पण या आदरांत अभिमानापेक्षां अलगपणाचाच अंश अधिक आहे. मुनशी थोर देशभक्त व पुढारी आहेत या प्रश्नावर त्यांच्या ज्ञातिबांधवांचेंही एकमत होणें दुरापास्त आहे; पण ते एक श्रेष्ठ दर्जाचे साहित्यिक आहेत याचा मात्र ते एकमुखानें व अभिमानानें उल्लेख करतील. पृथ्वीवल्लभ, राजाधिराज, या त्यांच्या कादंबऱ्यांबद्दल गुजराती वाचक स्तुतीखेरीज दुसरा शब्द उच्चारणार नाहीं. 'गुजराती साहित्याचा इतिहास,' या इंग्रजी भाषेंत लिहिलेल्या त्यांच्या ग्रंथाचा ते कौतुकानें उल्लेख करतील, नाशिकच्या तुरुंगांत त्यांनीं लिहिलेल्या आत्मचरित्रात्मक 'शिशु अने सखि' या ग्रंथाबद्दल ते माना डोलावतील. पण तेवढ्याच प्रांजलपणें श्री. मुनशी यांच्या देशसेवेबद्दल ग्वाही देण्यास ते तयार होणार नाहींत.

## दुधारी तलवार

पण भरींव व अनुकरणीय अशी देशसेवा करण्याची खरी संधि आतां यापुढेंच श्री. मुनशी यांना मिळणार आहे. कृतकृत्यतेचा बराचसा वांटा पदरांत पडल्यामुळें मुनशींचें महत्त्वाकांक्षी मन आतां समाधानानें स्वस्थ झालें असेल. दूषित पूर्वग्रह अगर गैरसमज यांना थारा न देतां स्वतःच्या सर्व शक्तींचा उपयोग निःपक्षपातीपणें व निरलसपणें राष्ट्रकार्यासाठीं करण्याची जबाबदारी आणि राजकारणाच्या दुधारी तलवारीचा उपयोग कौशल्यानें व जपून करण्याची जोखीम त्यांच्यावर येऊन पडलेली आहे. काँग्रेसनें किंबहुना देशानें पत्करलेल्या एका अभिनव अशा जबाबदारीच्या प्रयोगाचें यशापयश त्यांच्यासारख्या प्रत्यक्ष कारभाराची धुरा वाहणाऱ्या मूठभर मंडळीच्या कर्तबगारीवरच अवलंबून आहे. लोकशाहीचें भवितव्य या प्रयोगानें ठरणार आहे. हें भवितव्य उज्ज्वल करण्यासाठीं श्री. मुनशी अंतःकरणपूर्वक झटतील अशी आशा मी प्रकट करतों.

विविध वृत्त, ता. ५ सप्टेंबर १९३७

## अ. बा. लठ्ठे : : ३

" एहा, आमचे मास्तर मिनिस्टर झाले. फिरून दिवाण झाले. "

" मास्तर म्हणूं नका, प्रोफेसर म्हणा."

" मास्तर काय अन् प्रोफेसर काय, पेशा एकच. "

" बरं कबूल; पण या आनंदाबद्दल कांहीं पेढेबिढे देणार आहांत काय ? आतां तुम्हां मंडळींचीही किंमत वाढली आहे. तडक सेक्रेटरियट-मध्यें जाल, आणि I was your student, Sir. असें म्हणून वशिला लावाल. "

" अहं, तसं कांहीं होणार नाहीं; तसं कांहीं करायला गेलों तर आपली स्वतःचीच केस प्रेज्युडिस करून घेतल्यासारखें होईल. त्यांचा स्वभाव आम्हीं चांगला जाणतों; आमचे मास्तर मिनिस्टर झाले असं मुद्दाम तुम्हांला मी सांगितलं त्याचं कारण नाहीं आलं लक्षांत तुमच्या ? "

" नाहीं बुवा, काय कारण तें ? "

" कारण असं कीं, या तुमच्या राजकारणांत मुख्य भरणा बड्या बड्या वकिलांचा आणि त्यांच्या खालोखाल डॉक्टरांचा. मास्तरकीचा



पेशा सुरुवातीला स्वीकारून नंतर राजकारणांत अगर राज्यकारभारांत चमकणारीं अशीं माणसं थोडीं! आमचे मास्तर त्यांपैकींच झाले, म्हणून मला विशेष अभिमान वाटतो."

"मग मला वाटतं असाच अभिमान ना. शास्त्री, पं. मालवीय, डॉ. परांजपे, सर मनुभाई मेहता, सर प्रभाशंकर पट्टणी, सर रघुनाथराव सबनीस यांच्या विद्यार्थ्यांनाही वाटत असेल. मध्यप्रांत सरकारचे शिक्षणमंत्री ना. रविशंकर शुक्ल हेही एक शाळा मास्तरच होते. आणि अरेच्या! एवढं कशाला? आपले टिळक! तेही मास्तरच होते की!"

"तुम्ही आहांत विघ्नसंतोषी लोक! एखाद्याच्या निर्मळ आनंदांत बारीकसा मिठाचा खडा हळूच टाकून द्याल! पण तुमच्या तोंडीं-सुद्धां किती थोडीं नांवं आलीं? झालं तर मग! मी तरी तेच म्हणतो."

"रागावूं नका हो."

"रागावत नाहीं, पण आतां दिसेल."

"काय?"

"आमचे मास्तर काय करतात तें. मास्तर म्हटला म्हणजे तिथं शिस्त आलीच, आणि राज्यकारभारांत दुसरं काय पाहिजे? आतां वक्तृत्व नको, आतां शिस्तच पाहिजे. करडी शिस्त पाहिजे. सेक्रेटरि-यटमधील अधिकारी तुमच्या या सर्व मंत्र्यांमध्यें जर कोणाला वचकून आणि बिचकून वागतील तर लठ्ठ्यांना, हें नीट लक्षांत ठेवा."

× × ×

स्वभाव

शनिवार ता. १७ जुलै रोजीं मुंबई सरकारच्या मंत्रिमंडळांतील मंत्र्यांचीं नांवें पुण्यांत जाहीर झालीं, त्या वेळीं सायंकाळीं ना. लठ्ठे यांच्या एका माजी विद्यार्थ्याशीं माझें वरील संभाषण झालें. या संभाषणानंतर माझ्या कानांत फक्त हीं तीनच वाक्यें गुणगुणत राहिलीं.

**" अहं, तसं कांहीं होणार नाहीं; तसं कांहीं करायला गेलों, तर आपली स्वतःची केस प्रेज्युडिस करून घेतल्यासारखें होईल; त्यांचा स्वभाव आम्हीं चांगला जाणतों."**

या वाक्यांमुळें ना. अण्णा बाबाजी लठ्ठे यांच्या चरित्रांतील एका महत्त्वाच्या वैशिष्ट्याबद्दल माझी खातरजमा झाली. तें वैशिष्ट्य हें कीं, लठ्ठे या व्यक्तीपासून लठ्ठे हे अधिकारी भिन्न आहेत. लठ्ठे ही व्यक्ति अनेकांना अनेक स्वरूपांत दिसली असेल. निकट परिचयांतील स्नेह्यांची गोष्ट सोडली, तरी लठ्ठे यांची आतिथ्यतत्परता व मोकळेपणा अल्पपरिचितांनाही कृत्रिम न वाटण्याजोगा स्वभावजन्यच आहे. कॅांग्रेसची गांधी टोपी त्यांच्या डोक्यावर चढण्यापूर्वी त्यांचे बरेच फोटो मासिकांत व वृत्तपत्रांत झळकले आहेत. लठ्ठे हें नांव उच्चारल्याबरोबर उत्तम कटूचा कोट घातलेली व नेक-टॅाय कॅालरच्या अॅांग्लवेषानें विभूषित झालेली रुबाबदार चेहऱ्याची त्यांची या पूर्वीच्या फोटोंतलीच मूर्ति अजून डोळ्यांसमोर उभी राहते; पण या फोटोमध्यें प्रतिबिंबित झालेले लठ्ठे हे खरे लठ्ठे नसून ती निव्वळ फसवणूकच होती असें म्हटलें तरी चालेल. पोषाखांतील नीटनेटकेपणा ही लठ्ठयांच्या बाबतींत प्रकृति नसून विकृति आहे आणि कॅांग्रेसवाल्यांशीं मतांच्या दृष्टीनें जरी त्यांनीं अलीकडे जुळवून घेतलें असलें, तरी पोषाखाच्या दृष्टीनें मात्र त्यांचें कॅांग्रेसवाल्यांशीं प्रारंभापासूनच जमण्यासारखें होतें, एवढे ते पोषाखांत गबाळ आहेत ! ता. १८ जुलै रोजीं बेळगांवी तांबड्या मातीच्या रंगानें कळकट झालेलें धोतर नेसून आणि खाकी कोट घालून सर मनमोहनदास रामजी यांच्या बंगल्यांत भरलेल्या कॅांग्रेससभासदांच्या सभेला ज्या वेळीं ते आले, त्या वेळीं त्यांचें तें ' ध्यान ' पाहून त्यांच्या एका परिचिताजवळ मीं आश्चर्य प्रकट केलें. मला वाटलेला विस्मय पाहून त्यांचा हा स्नेही मला म्हणाला " अण्णासाहेब मूळापासूनच असे आहेत. पोषाखाप्रमाणें प्रवासांतही ते गबाळ आहेत. आवश्यक वस्तु विसरल्याशिवाय एकदां तरी त्यांनीं प्रवास केला असेल कीं नाहीं याची मला शंका वाटते. तथापि अण्णासाहेबांचें कुठेंही अडत नाहीं. एका गोष्टीचा मात्र त्यांना फार त्रास होतो. त्रास म्हणजे काय, ते त्यामुळें चिडतातदेखील. ती गोष्ट म्हणजे घोरणें ! झोंपेंत घोरणाऱ्या माणसाचा

त्यांना तिटकारा वाटतो आणि अशा इसमाला—मग तो कितीही मोठा असो, ते आपल्या घरीं जवळपास मुळींदेखील थारा देणार नाहींत.”

व्यक्ति या दृष्टीनें ना. लठ्ठे यांच्याबद्दल अशा प्रकारचे आपले अनुभव वेगवेगळ्या व्यक्ति वेगवेगळ्या प्रकारांनीं सांगतील; पण अधिकारी या नात्यानें त्यांच्याबद्दल आलेला सर्वांचा अनुभव एकाच धर्तीचा आहे. त्यांना तुम्हीं कामानिमित्त भेटावयाला गेला, कीं शिष्टाचाराला कमीत कमी आवश्यक एवढाच औपचारिकपणा ते दाखवितील; आणि मुद्दा टाळून आडवळणें घेत घेत तुम्हीं मुद्द्याकडे येऊं पाहत असाल तर वेळीं तुसडेपणाचा आरोप पत्करूनही ते तुम्हांला सरळ मुद्द्याकडे वळवतील. तुमचें काम ऐकल्यावर योग्य तें उत्तर तुम्हांला देतील. संस्थानी राजकारणाशीं दीर्घकालपर्यंत संबंध येऊनसुद्धां दरबारी आदब यांना ठाऊक झालेली नाहीं, अगर कामांतील दीर्घसूत्रीपणाशीं त्यांचा परिचय झालेला नाहीं. एखाद्या साध्यासुध्या पत्राची पोंच अगर उत्तर त्यांनीं तत्परतेनें दिलें नाहीं, असें बहुधा झालेलें नाहीं. बोलण्यांत ते मितभाषी आहेत. अपरिचित व नवख्या इसमाला त्यामुळें जास्त संकोच वाटतो व गांगरल्यासारखेंही होतें. आणि त्यांच्या घारीसारख्या न्याहाळून पाहणाऱ्या तीक्ष्ण दृष्टीनें तर तो किंचित् अस्वस्थदेखील होतो. मुद्द्यापुरतेंच का होईना, पण दुसऱ्यालाच बोलूं देऊन स्वतःच्या शब्दांची बचत करण्याचा त्यांचा हा काटकसरीपणा त्यांच्या रोखठोकपणामुळें म्हणा अगर सौहार्दशून्यतेमुळें म्हणा, अधिकच भयाण वाटतो. त्यामुळें लठ्ठयांशीं कारणपरत्वें प्रथमच परिचय झालेल्या व्यक्तीचें मत त्यांच्याबद्दल अनुकूल होत नाहीं. पण त्यांच्याशीं जसजसा परिचय वाढत जातो, तसतसा त्यांचा हा स्वभाव उपजत नसून फाजील सावधानतेमुळें तो त्यांच्या रक्तांत आतां दुसरा स्वभाव होण्याजोगा भिनून गेला आहे आणि त्यावरून त्यांच्या अंतरंगाची कल्पना करणें चुकीचें होईल हें कळून येतें. ही फाजील सावधानता म्हणजे संस्थानी अनुभवानें त्यांच्या वृत्तीवर चढविलेलें किटण आहे. संस्थानी आयुष्यांत जर कोणतें सुभाषित नेहमीं मनांत घोळवणें अवश्य असेल, तर तें “ आत्मानं सततं रक्षेत् दारैरपि धनैरपि ” हें होय! खिशांत राजिनामा, एक पाऊल संस्थानच्या हद्दींत आणि दुसरें पाऊल कँटोनमेंटमध्यें, रेसिडेन्सींत अगर स्टेशनांत, अशा प्रकारें तोल संभाळून संस्थानी नोकरींतील

सुळावरची पोळी खाणाऱ्या मुत्सद्द्याच्या वृत्तीवर फाजिल सावधानतेचे दाट थर चढले तर त्याला त्याबद्दल दोष देतां येईल काय ? ना. लठ्ठे हे संस्थानी नोकरींत तयार झालेले मुत्सद्दी आहेत. वरिष्ठाप्रमाणें मित्राबद्दलही साशंक राहून नोकरी करण्याचा प्रसंग त्यांच्यावर आलेला आहे. इंग्रज मुत्सद्दी हा सकृद्दर्शनीं कोणाही परक्या माणसाबद्दल आपलें मन कलुषित करून घेत नसतो. मन कलुषित होण्यासारखा अनुभव आला, तरी शक्य तों दुसऱ्याची भूमिका जाणून घेण्याचा तो प्रयत्न करील व त्यानंतरही अनुभव विपरीत आला, तर आपलें धोरण बदलील. पण परका इसम हा Gentleman नसून तो Scoundrel आहे असा प्रथमच ग्रह करून घेऊन त्याच्याशीं वागण्याचें धोरण ठेवावयाचें अशी सावधगिरी बाळगल्याखेरीज हिंदी संस्थानी मुत्सद्द्याला इलाजच नसतो. भावनेपेक्षां कठोर व्यवहाराकडे पाहूनच त्याला आपलीं धोरणें आंखावीं लागतात. ह्या धोरणाचेच ठसे ना. लठ्ठे यांच्या चरित्रावर सर्वत्र उमटलेले आढळतात. कै. शाहूछत्रपतींच्या मेहेरनजरेंत वाढून रावबहादूर व दिवाणबहादूर अशा पदव्यांनीं त्यांनीं सरकारमान्यता मिळविली. पण हीच सरकारमान्यता राष्ट्रमान्यतेच्या आड येऊं पाहत आहे असें त्यांना कालांतरानें दिसून येतांच त्यांनीं तिचा पूर्ण सावधगिरीनें व विचारानें त्यागही केला ! या त्यागाचें कारण मतांतर हें नसेल असें मी म्हणत नाहीं; पण या त्यागाचें जें हुकमी फळ ना. लठ्ठयांच्या पदरांत पडलें, त्यावरून पाहतां मतांतराएवढेंच त्यांचें व्यवहारकौशल्यही त्याला जबाबदार आहे असें म्हटल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं.

ना. लठ्ठे यांचा जन्म १८७८ सालीं कुरुंदवाड येथें झाला. त्यांचें हायस्कूलमधील शिक्षण सांगलींत झालें. पुढील शिक्षणासाठीं कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्यें ते दाखल झाले; पण पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्यें कॉलेजशिक्षण पुरें करून त्यांनीं १९०१ मध्यें बी. ए. ची डिग्री घेतली. एक मजेदार योगायोगाची गोष्ट म्हणजे याच सालीं बी. ए. ची डिग्री घेतलेल्या विद्यार्थ्यांमध्यें श्री. लठ्ठे यांचे आजचे सहकारी ना. डॉ. मंचरशा गिल्डर हेही होते. श्री. लठ्ठे हे लॉजिक व मॉरल फिलॉसफी विषय घेऊन फक्त पास क्लासांत आले आणि डॉ. गिल्डर हे झेवियर कॉलेजांतून पहिल्या वर्गांत दुसरे आले. श्री. लठ्ठयांच्याबरोबर डेक्कन कॉलेजमधून पास होऊन या वर्षी बी. ए.ची डिग्री घेणाऱ्या

विद्यार्थ्यांत श्री. ना. म. जोशी, भास्करराव जाधवांचे बंधु श्री. गोविंदराव जाधव, मुंबईचे प्रे. मॅजिस्ट्रेट श्री. खंडाळावाला व श्री. दत्तोपंत तुळजापूरकर हे विद्यार्थी होते. त्यानंतर १९०३ मध्यें लठ्ठे एम्. ए. झाले आणि त्यांनीं सार्वजनिक कार्यास प्रारंभ केला. या कार्याची मुहूर्तमेढ त्यांनीं दक्षिण महाराष्ट्र जैन सभा ही संस्था स्थापन करून रोवली व मागसलेल्या जैन समाजाची संघटणा करण्याचें कार्य हातीं घेतलें. या सभेचें मुखपत्र " जिनविजय " हेंही त्यांच्याच प्रयत्नानें अस्तित्वांत आलें. कोल्हापूरचे शाहू छत्रपति हे आपल्या सत्यशोधक चळवळीसाठीं तरुण व कर्तबगार ब्राह्मणेतर गोळा करण्याच्या उद्योगांत असतांना लठ्ठे यांची कर्तबगारी त्यांच्या नजरेंत भरली आणि त्यांनीं लठ्ठयांना कोल्हापुरांत बोलावून १९०७ सालीं राजाराम कॉलेजमध्यें इंग्रजी भाषेचे प्रोफेसर म्हणून त्यांची नेमणूक केली! लठ्ठयांच्या महत्त्वाकांक्षेचा व कर्तबगारीचा विकास होण्यास या काळापासूनच सुरुवात झाली. कै. शाहू छत्रपति यांच्या झेंड्याखालीं ब्राह्मणेतर सत्यशोधक चळवळीचे आधारस्तंभ म्हणून श्री. भास्करराव जाधव, रा. ब. डोंगरे, श्री. दाजिबा अमृत विचारे, श्री. बाळासाहेब गायकवाड व श्री. लठ्ठे हे जे पांच तरुण अधिकारी त्या काळांत कोल्हापुरांत वावरूं लागले, त्यांमध्यें शाहूमहाराजांची विशेष मेहेरनजर लाभण्याचें भाग्य श्री. लठ्ठे यांच्याच वांट्याला आलें. शाहूमहाराजांनीं १९११ मध्यें संस्थानचें विद्याखातें लठ्ठयांच्या हवालीं करून त्यांना एज्युकेशनल इन्स्पेक्टर नेमलें. ब्राह्मणेतर चळवळीची आग त्या काळांत महाराष्ट्रांत धुमसत राहून तिनें कोल्हापूर संस्थानांत तर चांगलाच पेटही घेतला होता. या चळवळीमध्यें लठ्ठयांनीं आपल्या भाषणांनीं आणि लेखांनीं इंधन घालीत राहण्याचें कार्य अव्याहत सुरू ठेवलें होतें. चातुर्वर्ण्ययुक्त सनातन वैदिक अशा हिंदूंमध्यें न मोडणाऱ्या जैन समाजाला केवळ मागसलेपणाच्या कारणानेंच मारूनमुटकून ब्राह्मणेतर बनवून सत्यशोधक चळवळीशीं एकरूप करून घेण्याचें कार्य लठ्ठयांनीं केलें एवढीच त्यांची शाहू छत्रपतींना मदत झाली नाहीं, तर स्वतःच्या विद्वत्तेमुळें जें " ब्राह्मण्य " लठ्ठयांनीं संपादन केलें होतें, त्या ब्राह्मण्याचाही " शापादपि " सारखा उपयोग त्यांनीं या चळवळीसाठीं महाराजांना करूं दिला. १९११ सालीं लठ्ठे विद्याधिकारी झाले, ही या कामगिरी-

बद्दल त्यांना मिळालेली बढती होती, असें म्हणावयास हरकत नाहीं. कारण याच सालीं सर व्हॅलंटाइन चिरोल यांच्या "The Indian Unrest" या सुप्रसिद्ध ग्रंथाचें "हिंदुस्थानची अस्वस्थता" हें भाषांतर प्रसिद्ध झालें आणि या भाषांतरामध्यें या पुस्तकाचे प्रकाशक रा. ब. डोंगरे यांच्यापेक्षांही श्री. लठ्ठे यांचाच हात जास्त होता. ब्राह्मणेतर चळवळीचें मूळ कार्य प्रेमापेक्षां व्यक्तिद्वेषांतच त्या वेळीं कसें रुतून बसलें होतें याची कल्पना येण्यास या भाषांतरित पुस्तकाच्या स्वतंत्र प्रस्तावनेंतील पुढील एकच उतारा उपयोगीं पडेल. प्रस्तावनाकार (!) या प्रस्तावांत म्हणतात:—

> "डेक्कन एज्युकेशन सोसायटी", "सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी" वगैरे संस्था ज्या महाराष्ट्रांत आहेत, तेथेंच गणपतिउत्सव, शिवाजीउत्सव, गुप्त राज्यक्रांतीचे कट, वगैरे संस्थाही अस्तित्वांत आल्या आहेत. ज्या महाराष्ट्रांत कै. रानडे व तेलंग, परलोकवासी बद्रुद्दिन तय्यबजी, डॉ. भांडारकर, दादाभाई नवरोजी शेट, सर फेरोजशहा मेहता, नामदार गोखले वगैरेसारख्या साऱ्या हिंदुस्थानास ललामभूत होऊन राहिलेल्या विभूति निर्माण झाल्या आहेत, त्याच महाराष्ट्रांत टिळक-परांजपे यांसारखे राजद्रोहप्रवर्तक लोक व फडके, चाफेकर-बंधु, सावरकर-बंधु, कान्हेरे वगैरे-सारखे अघोरकर्मी लोक जन्मास आले आहेत. राजकारणपटुत्वांत व स्वार्थ-त्यागांत ज्याप्रमाणें नामदार गोखल्यांना आज सर्व हिंदुस्थानांत कोणी जोड नाहीं, त्याचप्रमाणें टिळकांसारखा सर्व राजद्रोहात्मक चळवळीचा सूत्रधारही दुसरा कोणी नव्हता."

ही टीका सौम्य वाटल्यास याच पुस्तकाच्या उत्तरार्धाच्या समारोपांत भाषांतरकर्त्यानें आपला टीकाविषय पुढील शब्दांत अधिक स्पष्ट केला.

> "टिळकानें आपल्या राजकीय महत्त्वाकांक्षेच्या भरीस पडून एकंदर देशाचें इतकें नुकसान केलें आहे कीं, त्याच्या अंगीं इतर कांहीं गुण असले, तरी ते आमच्या दृष्टीनें मातीमोल होऊन गेले आहेत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, टिळकाच्या भगतांप्रमाणें आम्हाला त्याच्याविषयीं यत्किंचित्‌ही आदरबुद्धि नाहीं, हें आम्हीं अगदीं प्रांजलपणें सांगतों. दुर्यो-धन कांहीं कमी पराक्रमी नव्हता; पण त्याच्या दुष्टबुद्धीमुळें त्याच्या अंगच्या सर्व गुणांवर कसें पाणी पडलें होतें, हें कोणास सांगावयास नको."

लठ्ठे यांच्या लेखणीशीं हीं वाक्यें चिकटविण्याचा माझा हेतु नसला, तरी कोणत्या विचारांचीं आंदोलनें लठ्ठे यांच्याभोंवतीं त्या काळांत उठलीं होतीं व त्या आंदोलनास स्वतः त्यांनींही अधिक हेलकावे देऊन कशी मदत केली होती हें दाखवून देण्यासाठींच हे उतारे मीं दिले आहेत. निपाणी येथें केलेल्या एका परिषदेंतील भाषणांत तर संस्कृत भाषा ही नष्ट केली पाहिजे असें प्रतिपादन करण्यापर्यंत त्यांच्या आवेशाची मजल गेली होती ! बी.ए.च्या वेळीं ऐच्छिक विषयांबरोबर संस्कृत भाषा त्यांनीं घेतली होती हें येथें जरूर लक्षांत ठेवलें पाहिजे. अशा आवेशपूर्ण प्रचारानें ब्राह्मणेतरांना क्षुब्ध करण्याचें सत्यशोधक पुढाऱ्यांचें इच्छित कार्य तडीस गेलें; पण खुद्द लठ्ठे यांना त्यापासून कोणती फलप्राप्ति झाली ? कार्डिनल वुल्से याला मिळालेलें राजसेवेचें फळ लठ्ठयांनाही चाखावें लागलें आणि घाईघाईनें कोल्हापूर सोडून जाण्याचें संकट त्यांच्यावर गुदरलें ! ! लठ्ठयांच्या चरित्राचा पूर्वार्ध येथेंच संपून त्यांच्या चरित्राला येथूनच निराळें वळण लागलें व येथूनच त्यांच्या चरित्राचा उत्तरार्ध सुरू झाला असें म्हणतां येईल.

## राजकारण

संस्थानी हवेंतून मोकळ्या वातावरणांत आल्यावर मननशील होऊन आपल्या कार्याचा आढावा लठ्ठयांनीं घेतला असावा. विकारवशतेची आंच लावून जी भूमि भाजली, तिच्यावर बहुजनसमाजाच्या हिताचें बीं पेरून या भूमींतून राष्ट्रकार्याचें पीक काढण्याचा त्यांनीं विचार केला. विध्वंसक कार्य-पद्धतीला फांटा देऊन त्यांनीं विधायक कार्याकडे आपला मोर्चा वळविला. १९१५ मध्यें त्यांनीं वकिलीची परीक्षा दिली व बेळगांवांत डेक्कन रयत सभेची स्थापना केली. 'डेक्कन रयत' नांवाचें इंग्रजी साप्ताहिकही त्यांनीं बेळ-गांवांत सुरू केलें. १९२० सालीं ते कॉंग्रेसनें बहिष्कार घातलेल्या ' देशद्रोही ' ॲसेंब्लीसाठीं उभे राहिले व निवडणुकींत निवडून आले; पण ॲसेंब्लींतील ३ वर्षांच्या कारकीर्दींत त्यांचें तेज मात्र पडलें नाहीं. नंतर मॉंटफर्ड रिफॉर्म्स-मधील मुंबई कायदेकौन्सिलसाठीं ते १९२६ मध्यें बेळगांव जिल्ह्यांतील मराठा जागेतर्फें निवडणुकीसाठीं उभे राहिले; पण कॉंग्रेस व ब्राह्मणेतरांमधील मराठे या उभयतांनीं त्यांना विरोध केला. हल्लीं डिस्ट्रिक्ट जज्ज असलेले

श्री. भुजंगराव केशव दळवी यांना त्यांचे प्रतिस्पर्धि म्हणून उभे करण्यांत आलें होतें. मराठा समाजानें आपले ज्ञातिबंधु श्री. दळवी यांना पाठिंबा दिला, व 'कर्नाटकी सिंह' गंगाधरराव देशपांडे व इतर ब्राह्मण कॉंग्रेसवाल्यांनींही श्री. दळवी यांचीच उमेदवारी उचलून धरली ! या प्रसंगीं श्री. गंगाधरराव देशपांडे यांनीं बेळगांव येथें मारुतीच्या देवळांत भरलेल्या सभेंत श्री. दळवी यांचा पुरस्कार करतांना ब्राह्मण मतदारांचीं मनें वळविण्याकरितां जो युक्तिवाद केला होता, त्याची आठवण मला झाल्याशिवाय राहत नाहीं ! त्यांचे शब्द या वेळीं माझ्या कानांत गुणगुणत आहेत; पण मी ते येथें मुद्दामच देत नाहीं.

या निवडणुकींत लठ्ठे पडले व ब्राह्मणेतर पक्षाचे अध्वर्यु व दिवाण होण्याचा मान श्री. भास्करराव जाधव यांच्या वांट्याला आला ! ब्राह्मणेतर म्हणूनच जो मान भास्करराव जाधव यांना मिळाला, तोच मान ब्राह्मणेतर म्हणूनच लठ्ठयांना मिळाला नाहीं याचें कारण तरी ब्राह्मणेतर व ब्राह्मण या उभय समाजांच्या डोळ्यांत सारखीच सलत राहिलेली त्यांची कामगिरीच होय असें म्हणावयास हरकत नाहीं. लठ्ठे यांची कर्तबगारी "कानामागून येऊन तिखट" झाल्याप्रमाणें ब्राह्मणेतरांना वाटत होती आणि दुखविलेल्या ब्राह्मणांना तर त्यांनीं प्रतिकाराची आयतीच संधि आणून दिली होती. उभय समाजांनीं नेमका या संधीचा फायदा घेतला !

## कोल्हापूरचे दिवाण

१९२५ सालच्या अखेरीस म्हणजे कोल्हापूर सोडल्यानंतर ११ वर्षांनीं, शाहू छत्रपति यांच्या निधनानंतर कोल्हापूरला त्यांचे पाय पुनः लागले. श्रीमंत राजाराम महाराजांनीं त्यांना आपले कायदेशीर सल्लागार या नात्यानें पाचारण केलें व १९२६ मध्यें कोल्हापूरचे दिवाण म्हणून त्यांची नेमणूक केली. राज्यकारभाराशीं त्यांचा प्रत्यक्ष असा संबंध दिवाणगिरीच्या या पांच वर्षांच्या काळांतच आला, आणि कोल्हापूर संस्थानांत अंतर्बाह्य प्रगति करण्याजोग्या अशा बऱ्याच सुधारणा त्यांनीं याच काळांत घडवून आणल्या व याच अनुभवाचा फायदा त्यांना यापुढें होणार आहे.

## साहित्यसेवा

लठ्ठे यांच्या राजकारणाचें क्षेत्र संस्थानापुरतें आकुंचित राहिलें, तरी साहित्याच्या सर्वव्यापि क्षेत्राशीं त्यांचा संबंध जडल्यामुळें त्यांच्या विचारांचा परिचय त्यांच्या साहित्यसेवेमुळेंच महाराष्ट्राला करून घेतां आला. Introduction to Jainism हें पुस्तक लिहून त्यांनीं जैन धर्माची ओळख पटवून दिली. "हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याचा उदय" ही त्यांची लेखमाला सुप्रसिद्ध असून ती पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाली आहे. शाहू छत्रपतींच्या निधनानंतर त्यांचें राजाराम महाराजांच्या विनंतीवरून त्यांनीं विस्तृत चरित्र व आठवणी हें पुस्तक लिहिलें आणि "प्रॉब्लेम्स ऑफ इंडिया" हाही एक ग्रंथ लिहून आपलें सव्यसाचित्व पटविलें. लठ्ठयांचें लेखन, भाषासौष्ठव, अलंकारप्राचुर्य, नटवेपणा या ललितगणांनीं युक्त नसलें, तरी तें विचारांची पकड तत्काळ घेतें. या साहित्यसेवेमुळें १९२८ सालीं बेळगांव येथें भरलेल्या महाराष्ट्र साहित्यसंमेलनाच्या स्वागताध्यक्षाचा मान त्यांना देण्यांत आला होता. भास्करराव जाधव यांच्याप्रमाणेंच बोजड पांडित्यप्रदर्शनाचे ते शत्रु आहेत आणि पांडित्याशीं यां उभयतांचें उत्पन्न झालेलें वैर पंडितांशीं उत्पन्न झालेल्या वैरामुळेंच जन्म पावलें असावें असा माझा तर्क आहे. तथापि साहित्यसेवक म्हटला कीं लठ्ठयांना त्याच्याबद्दल विशेष आत्मीयता वाटते; बरेच साहित्यसेवक त्यांच्या गुप्त ऋणाच्या ओझ्याखालीं भारावलेले आहेत. आज हयात असलेल्या एका विद्वान् साहित्यसेवकावर कोल्हापूर संस्थानांत असतांना गुदरलेलें संकट लठ्ठयांच्या परिश्रमानें व मध्यस्थीनें टळून त्याचा पुनर्जन्म झाला ही वस्तुस्थिति मला चांगली माहीत आहे.

## मतांतर

पण लठ्ठयांच्या सर्व हालचालींतील एकसूत्रीपणा विसकटून टाकणारी अत्यंत वादग्रस्त गोष्ट म्हणजे त्यांचें झालेलें मतांतर ही होय. हें मतांतर विचारांतील उत्क्रांतीचें द्योतक आहे, कीं क्रांतिकारक विचारसरणींतून तें जन्माला आलें आहे ? आणि आयुष्याची जवळजवळ सर्व उमेद संपुष्टांत येण्याच्या काळीं विचारांत क्रांति घडून येण्याएवढी संस्कारक्षमता, युयुत्सु वृत्ति ना. लठ्ठयांमध्यें

आहे काय ? या महत्त्वाच्या दोन प्रश्नांचीं उत्तरें मिळण्यासाठीं ना. लठ्ठयांचे अनुभव आणि परिस्थिति यांचा तुलनात्मक विचार करणें अवश्य आहे. ब्राह्मणद्वेषाच्या मनोवृत्तींतून उत्पन्न झालेली ब्राह्मणेतरांची सत्यशोधक चळवळ लठ्ठयांच्या नजरेसमोर सुरू झाली व फोंफावली; पण मूठभर नालायकांची नालायकी झांकून त्यांना महत्पदावर बसविण्यापलीकडे आणि स्वार्थी पुढाऱ्यांना संधिसाधूपणासाठीं मोकळें मैदान ठेवण्यापलीकडे या चळवळीपासून बहुजनसमाजाचा, विशेषत: शेतकरी समाजाचा काय फायदा झाला ? संस्थानी कारभाराची प्रगति विशिष्ट मर्यादेपुढें जाऊं शकत नाहीं, कट आणि कारस्थानें यांनीं बुजबुजलेल्या संस्थानी कारभारांत बहुजनसमाजाचें दैन्यनिवारण करण्याजोगें विधायक कार्य घडवून आणणें मुष्कील, हेंही त्यांना अनुभवानें पटलें. कोल्हापूरला दिवाण म्हणून जाण्यासाठीं ते निघाले असतां बेळगांवीं त्यांचा जो सत्कार करण्यांत आला, त्या वेळीं घोड्याच्या शेपटाकडे तोंड करून बसून नेमणुकीच्या गांवीं जाणाऱ्या पेशवाईंतील मामलेदाराचा जो दृष्टांत त्यांनीं आपल्या नेमणुकीबद्दल दिला, त्यावर उपहास अगर विनोद यापेक्षांही कटु अनुभवजन्य अशा विषादाचीच गर्द छाया पसरली होती. सार्वजनिक कार्यास प्रारंभ करतांना आपल्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षापूर्तीबरोबरच विधायक कार्याचीं जीं कल्पनाचित्रें त्यांनीं रंगविलीं असतील, तीं खरीं ठरण्यासाठीं अवश्य असलेलें स्वतंत्र कर्तृत्व त्यांना लाभलें नाहीं. लठ्ठयांची महत्पदाची वैयक्तिक महत्त्वाकांक्षा कोल्हापूरच्या दिवाणगिरीनें पूर्णही झाली असेल; पण त्यांची बुद्धि, धडाडी व कर्तृत्वशक्ति यांचा पुरता कस लागून कृतकार्यतेचें समाधान त्यांना मिळू देईल असें कार्य त्यांच्या हातून अजून झालें नाहीं असें म्हटलें तर तें फारसें चूक होणार नाहीं. इच्छित मार्गानें जाण्याचें पूर्ण स्वातंत्र्य ज्या व्यक्तीला तिच्या सार्वजनिक जीवनक्रमांत मिळालेलें असतें, अशा व्यक्तीच्या अंगीं आपल्या मतांसाठीं व अंगीकृत कार्यपद्धतीसाठीं झगडण्याचा चिवटपणा उत्पन्न झाला नाहीं, तरी निदान विरोधी विचारसरणीपुढें वांकण्याचा लवचिकपणा तरी तिच्या अंगीं राहत नसतो. परंतु ज्या व्यक्तीला हें स्वातंत्र्य मिळालेलें नसतें, तिच्या चित्ताला ही अपुरेपणाची जाणीव सतत बोंचत राहिल्यास आश्चर्य नाहीं. अशा अस्वस्थ चित्ताला मोहिनी घालील असा एखादा कार्यक्रम आढळला, तर त्या संधीचा

फायदा घेण्यासाठीं उतावळ्या उत्सुकतेनें तें पुढें सरसावतें. ना. लठ्ठे यांच्या मतांतराची माझ्या मतें ही कारणमीमांसा आहे. ना. लठ्ठयांनीं पक्षांतर व मतांतर केलें म्हणून त्यांना दोष देण्यांत आलेला आहे; पण हें मतांतर परागतीच्या मार्गावर झालेलें असल्यामुळें ना. लठ्ठयांवरील टीकेचा रोंख ह्या मतांतरावर विशेष नसून तो त्यांच्या हेतूवर होता. ना. लठ्ठे मुंबईच्या कायदेमंडळासाठीं दहा वर्षांपूर्वी उभे राहिले असतां ज्या गंगाधरराव देशपांड्यांनीं त्यांना विरोध करून दिवाणगिरीची त्यांची संधि हुकविली, त्याच गंगाधररावांच्या पुरस्कारानें ही गमावलेली संधि त्यांना पुनः साधतां आली हा मात्र एक विचित्र परिस्थितीचा योगायोग आहे! ना. लठ्ठयांनीं मतांतर केलें म्हणून गाजावाजा होण्यापूर्वी बरेच दिवस त्यांच्या विचारांचा कल नव्या पक्षाकडे झुकूं लागला होता हें मात्र निर्विवाद आहे. कॉंग्रेसला जाऊन मिळण्यापूर्वी डॉ. आंबेडकरांबरोबर सहकार्य करण्याचीही त्यांनीं तयारी दर्शविली होती!

१९३५ सालीं चित्रमय जगत्च्या कॉंग्रेस खास अंकांत लिहिलेल्या लेखांत ना. लठ्ठयांनीं जें विवेचन केलें, त्यावरून त्यांच्या मतांतराचें स्वरूप त्यांच्याच शब्दांत स्पष्ट होतें. लठ्ठे लिहितात:—

“सगळाच हिंदी समाज आज विस्कळित झालेला आहे. जोरानें दगडावर आपटून फोडलेल्या कांचेच्या भांड्याप्रमाणें त्याचा चक्काचूर झाला आहे. ‘मीं त्या चुरापैकीं मोठा तुकडा’ असा अभिमान बाळगणें हा नुसता मूर्खपणा आहे. अनेक अंतर्बाह्य कारणांमुळें या तुकड्यांचें संधीकरण अवघड झालें आहे; या वेळीं, मी लहान म्हणून माझें महत्त्व जास्त म्हणणारे अल्पसंख्य काय किंवा मी मोठा म्हणून मीच मालक म्हणणारे बहुसंख्य काय, दोघेही ऐक्याच्या मार्गांत विघ्नकर्ते होत आहेत. अन्यायाचा इतिहास उगाळीत बसण्याचें टाळून, हिंदी जनतेच्या या विभक्त तुकड्यांत परस्परांविषयीं विश्वास, प्रेम आणि आपलेपणा जागृत करणें हें आज पहिलें काम आहे. मुस्लिम लीग किंवा कॉन्फरन्स एका बाजूनें, तर हिंदु महासभा दुसऱ्या बाजूनें, हें काम जास्त जास्त अवघड करीत आहे. गोखले-टिळक किंवा गांधी-अन्सारी यांनीं कॉंग्रेसला

**दाखवून दिलेल्या धोरणामुळेंच राष्ट्रीय संघटना व राष्ट्रीय ऐक्याची शक्ति आमच्या देशाला प्राप्त होण्याचा संभव आहे. म्हणूनच प्रत्येक हिंदी नागरिकानें राष्ट्रीय कार्यांत हिंदु-मुसलमान, स्पृश्य-अस्पृश्य, उच्च-नीच, पुढारलेले-मागसलेले, या भेदभावनांचा नायनाट करणाऱ्या काँग्रेसच्या धोरणाला पाठिंबा द्यावा हें योग्य होय."**

सुवर्णसंधि

राज्यव्यवहारांत मुरलेले माजी दिवाणबहादूर व आजी नामदार लठ्ठे यांनीं आज पुन्हां राज्यकारभाराची धुरा उचलली आहे. पण आज त्यांचें कार्यक्षेत्र अधिक व्यापक झालें आहे. त्यांच्या हातीं असलेली सत्ता सामुदायिक जबाब-दारीच्या तत्त्वावर आधारलेली असली, तरी अनियंत्रित संस्थानी सत्तेपेक्षां कार्यासाठीं उपयोग करतां येण्याचें तिचें सामर्थ्य मोठें आहे. ना. लठ्ठे चतुर आहेत, बुद्धिवान् आहेत, अनुभवी आहेत, पंडित आहेत, फाजिल व्यवहारी आहेत आणि चिकित्सकही आहेत. त्यांच्या मतांतराला जो हेतु चिकट-विण्यांत आला होता, त्याचें बहुजनसमाजाच्या हितासाठीं झटून निराकरण करण्याची सुवर्णसंधि त्यांना प्राप्त झालेली आहे. या संधीचा फायदा घेऊन आपल्या चरित्राचें नवें पान नव्या वातावरणांत ते लिहूं शकतील अशी मला अशा आहे.

विविध वृत्त, ता. २२ ऑगस्ट १९३७



म. ग्रं. सं. ठाणे.

## ल. मा. कोळसे पाटील : : ४

१९३१ सालच्या उन्हाळ्यांतील गोष्ट. सकाळीं १० वाजण्याची वेळ होती. रत्नागिरी शहरांतील गोखल्यांच्या तिठ्यावर दोन तरुण समोरासमोर येत होते. एकमेकांपासून दहा पांच पावलांवर येईपर्यंत दोघांपैकीं एकाचेंही लक्ष दुसऱ्याकडे गेलें नव्हतें. पण तेवढें जवळ आल्यावर दोघांनींही एकाच वेळीं एकमेकांना पाहिलें आणि ताबडतोब उभयतांना एकमेकांची ओळख पटली. दोघेही पुढें सरले आणि उभयतांनींही एकमेकांना कडकडून मिठ्या मारल्या.

भर रहदारीच्या रस्त्यावर रत्नागिरीच्या पांथस्थांना दिसून आलेलें हें पुनर्मीलनाचें दृश्य जेवढें कुतूहलजनक होतें, तेवढेंच अंमळ चमत्कारिकही होतें आणि त्याचबरोबर तेवढेंच आकर्षकही होतें. आपल्या भेटीचा आनंद अशा प्रकारें मिठ्या मारून प्रकट करणारे वृद्धही दुर्मिळ झालेले असतां पंचविशींतल्या दोन पोषाखी तरुणांनीं शिष्टाचाराच्या लौकिक कल्पनांना व रीतिरिवाजांना धाब्यावर बसवून पौराणिक चित्रांत शोभणाऱ्या हरिहरभेटीची तालिम रस्त्यावर करून दाखवावी ही गोष्ट अंमळ चमत्कारिकच नाहीं काय ?—पण हें चमत्कारिक दृश्यही या चमत्कारिपणामुळेंच आकर्षक ठरलें. समोरून येणाऱ्या एका मोटरीला वाट देण्यासाठीं या भुजबद्ध जोडीला

बाजूला होण्यास सांगणाऱ्या पोलिसाच्या शब्दांतही उघड उघड माणुसकी दिसून आली, त्यावरून त्यालाही या मीलनप्रसंगांतील काव्य पटलें व मानवलें असेंच म्हणावयास हरकत नाहीं !

धुरळा उडवीत मोटर निघून गेली व हे मित्रद्वयही बाजूला झाले. मिठ्या सुटतांच या मित्रद्वयामध्यें पुढील प्रश्नोत्तरें झालीं.

" तूं इकडे कोणीकडे ?—आणि अचानकपणें कसा उगवलास ? "
" मला बोलायला वेळ नाहीं–शिरगांव कोणत्या बाजूला आहे इकडे ? "

" तुला शिरगांवला जायचं आहे ? "

" हो." " कोणाकडे ? "

"—कडे "

"—ची आणि तुझी ओळख कुठची ? "

" झाली आपली निमित्तानिमित्तानं; पण तूं इथं काय करतोस ? "

" मी होय ? मी इथं—ऑफिसांत नोकरीला आहें. "

" म्हणजे सरकारी नोकर तूं ! मग तर तूं माझ्याशीं भाषणही करतां कामा नये ! "

" कां बुवा ? त्यांत काय वावगं झालं ? "

" वावगं असं कीं, मी फरारी आहें आणि माझ्यावर सरकारी पकड-वॉरंट आहे. "

" तुझ्यावर वॉरंट ! काय केलंस तूं ? आणि आतां आलास तरी कुठून ?"

पुण्याला माझ्यावर भाषणबंदीची नोटिस बजावण्यांत आली होती आणि ती मीं मोडली. आतां मी हा कोल्हापुराहून आलों आणि असाच हा शिरगांवला जाणार. "

" बरं, मग आतां घरीं चल अन् जेऊन जा. "

" नको, नको, तुला त्रास होईल मी तुझ्या घरीं आलों तर.

" कोणाचा ? "

" पोलिसचा. "

" अरेरे ! खुळा आहेस तूं; पोलिसची कार्यपद्धति तुला माहित नाहीं. आपण पोलिसांच्या हातावर तुरी देऊन फरारी झालों, याच भ्रमांत तूं जिवाची

धांद्ल करून भटकतो आहेस. आपण मोठी शिताफी केली असं तुला वाटत असेल; पण असा कच्चेपणा पोलिस करणार नाहींत. मी सांगतों तुला फरारी होऊं देण्यांत पोलिसांचा काय बेत असेल तो; कांहीं दिवस तुझ्यासंबंधानं डोळ्यांवर मुद्दामच कातडं ओढायचं, तुझ्या हालचाली पाहायच्या आणि त्या हालचालींवरून तुझे छुपे साहाय्यक आणि साथीदार हुडकून काढायचे हाच पोलिसांचा डाव असणार–"

"मग तुझ्याकडे मी आलों तर तुझीदेखील गणना ते माझ्या साथी-दारांत करणार नाहींत काय?"

"प्रारंभीं त्यांना तशी शंका येईल कदाचित् आणि मला तुझ्या कोंडा-ळ्यांत गोवण्यासाठीं ते माझ्याकडे येतीलही; पण मला त्यांनीं धाकदपटशा दाखविला आणि वेडेवांकडे प्रश्न विचारले, तरी त्यांना दुसरं काय समजणार आहे माझ्याकडून? तूं आणि मी पांच वर्षांपूर्वी बडोद्यासारख्या दूरच्या ठिकाणीं एका कॉलेजांत, एकाच वर्गांत आणि रेसिडेन्सींत शेजारीं शेजारीं राहत होतों, त्या वेळीं आपली मैत्री होती; पांच वर्षांच्या ताटातुटीनंतर आपली अचानकपणें रस्त्यांत गांठ पडली आणि मी तुला घरीं घेऊन गेलों. गेल्या पांच वर्षांत तुझी काय उन्नति-अवनति झाली, अगर तूं कोणकोणतीं दुष्कृत्यं केलींस त्यांची दाद मला नाहीं. माझी माहिती तुला नाहीं. साधीं, सरळ अन् कोणालाही सहज पटणारीं हीं कारणं आहेत. पोलिस झाले म्हणून कांहीं त्यांना अंतःकरण नसतं असं नाहीं, आणि माझ्या माहितींत खरेखोटेपणाचा भाग किती आहे हें ओळखण्याएवढं धोरणही त्यांना असतं. मी तुला सांगतों, मला कसलाही धोका नाहीं. तूं माझ्या घरीं आलंच पाहिजे. तुला मी उपाशीं पाठवणार नाहीं."

**—आणि एवढ्या युक्तिवादानंतर आणि आढेवेढे घेतल्यानंतर आपल्या मित्राकडे जेवण्यास जाण्यास तो तरुण तयार झाला. हा 'फरारी' तरुण म्हणजे आजचे मुंबई सरकारच्या स्थानिक स्वराज्य खात्याचे मंत्री ना. लक्ष्मणराव माधवराव कोळसे पाटील हेच होत.**

## पुरुषस्य भाग्यम् ।

कोळसे पाटील ह्यांच्या चरित्रांतील हा एक प्रसंग सांगितल्यानंतर त्यांच्याबद्दल आणखी इतर कांहीं विशेष व अपरिचित माहिती माझ्याकडून मिळेल अशी जर वाचकांची अपेक्षा असेल, तर ती पुरी करण्याचें कोणतेंच साधन दुर्दैवानें मला उपलब्ध नाहीं. आणि जीं साधनें उपलब्ध झालीं, त्यांचा जास्तींत जास्त उपयोग करूनही कोणतीच ‘ रोमहर्षक ’ माहिती त्यांच्या पूर्वचरित्रांत मला मिळालेली नाहीं. त्यांच्या पूर्वचरित्राची जी माहिती उपलब्ध झाली, तीवरून एवढेंच दिसतें कीं, श्री. पाटील हे अगदीं कोंवळे तरुण आहेत. ते डेक्कन कॉलेमधून बी. ए. झाले, पुण्याला त्यांनीं पहिल्या एलूएल्. बी. ची. परीक्षा दिली व कोल्हापुरला दुसऱ्या एलूएल्. बी. च्या परीक्षेला बसून १९३३ सालीं ते एलूएल्. बी. झाले. अहमदनगरला त्यांनीं कांहीं दिवस वकिली केली. ते घरचे सुखवस्तू शेतकरी आहेत व सावकारीही करतात. ते ब्राह्मणेतर आहेत; मुंबई सरकारच्या मंत्रिमंडळांत स्थान मिळण्याचा जो बहुमान त्यांना लाभलेला आहे, त्या बहुमानाला शोभण्याजोगें कोणतेंच राजकीय कार्य त्यांच्या हातून झालेलें नाहीं; एवढेंच काय, पण राजकारणांतील त्यांची उमेदवारीही अल्प, प्रासंगिक व अगदींच सामान्य आहे. राजकीय क्षितिजावर झालेलें त्यांचें आगमन आकस्मिकपणें आलेल्या एखाद्या धूमकेतूप्रमाणें आहे आणि त्यांना मिळालेला बहुमान हा तर “ पुरुषस्य भाग्यम् ” या वचनाचें डोळ्यांत ठळकपणें भरणारें ( व पुष्कळांच्या सलणारेंही ) एक ढळढळीत उदाहरण आहे. निवडणुकीच्या वेळीं कॅांग्रेसनें दगडधोंड्यांवर शेंदूर टाकून त्यांना देवकळा आणली आणि कॅांग्रेसचीं सरकारें प्रांतांनिहाय स्थापन झाल्यावर “ अश्मापि याति देवत्वं महद्भिः सुप्रतिष्ठितः ” या न्यायानें ज्यांना दिवाणपदाचा अकारण लाभ झाला, अशांमध्यें कोळशांचेंही साधून गेलें; पण वरील वचनांतील उपमा कोळशांना मीं लागू करणें मात्र खात्रीनें कठोरपणाचें होईल. आणि याचें कारणही कोळसे या व्यक्तीचें योग्य व यथातथ्य दर्शन घडविण्याच्या बाबतींत असलेला माहितीचा अपुरेपणा हेंच आहे.

कठिण कार्य

पण त्यामुळें माझें कार्य मात्र कांहीं सुलभ होत नाहीं. आइन्स्टिनच्या सापेक्षवादाची माहिती करून देणें एक वेळ सोपें होईल; लॉर्ड रुदरफोर्ड यांनीं परमाणूचा भंग कसा केला हें सांगणें एक वेळ कठिण वाटणार नाहीं; अर्थशास्त्रांतील प्रो. गुस्टॉव्ह कॅसल यांचीं "Purchasing power parity theory" ही वादग्रस्त व अर्थशास्त्रज्ञानांही घोंटाळ्यांत पाडणारी सिद्धांत-कल्पना सुलभपणें एक वेळ मांडतां येईल; पण अज्ञात अशा कोळसे पाटलांचें स्वभावचित्र चितारणें या सर्वांपेक्षांही दुष्कर आहे. उगवत्या सूर्याला अर्घ्य देऊन 'पहा हा सूर्य अंधारांतून ठेंचाळत, दऱ्याखोऱ्या ओलांडीत उद्योग-उत्साहाच्या जोरावर उदयगिरीवर कसा आला,' असें दाखविणाऱ्या उत्कर्षत्रयीच्या महाराष्ट्रीय कारखानदारांना कोळसे पाटील यांची माहिती देतांना पहिल्या सपाट्यासरशीं 'सामान्य नांगऱ्याचा दिवाण कसा झाला ?' एवढा एकच एक आकर्षक मथळा तयार करतां येईल. पण पुढें काय ? पूर्ण काळोख ! "प्रथम ते मॅट्रिकच्या परीक्षेला बसले, ही परीक्षा ते मोठ्या तडफदारपणें पास झाले, नंतर ते कॉलेजांत गेले; तेथेंही त्यांनीं बी. ए.ची परीक्षा दिली आणि पुढें एल्एल्. बी. च्या परीक्षेला जो विशिष्ट पेपर होता, त्या पेपरमधील प्रश्नांना तर मुळींसुद्धां न डगमगतां त्यांनीं त्यांनाही मोठ्या धैर्यानें तोंड दिलें." बस्स ! यापुढें प्रगति या घाऊक व्यापाऱ्यांनाही फारशी करतां येणार नाहीं. श्रीमंत राजाराम छत्रपति यांचे भाचे देवास ( सीनियर ) चे राजे श्रीमंत विक्रमसिंह ह्यांनीं बी. ए. ची परीक्षा दिली, त्या वेळीं या परीक्षेंतील श्रीमंतांची कामगिरी रसाळपणें वर्णन करून सांगतांना कोल्हापूरच्या एका साप्ताहिकानें, "श्रीमंत युवराज ( त्या वेळीं ) हे भटांब्राम्हणांप्रमाणें संस्कृत घेऊन बी. ए. झाले नाहींत; तर अस्सल क्षात्र-धर्माला शोभण्याजोगा इतिहास व अर्थशास्त्र हा विषय घेऊनच बी. ए. झाले" अशा अर्थाचे उद्गार काढून त्यांना धन्यवाद दिले होते. कोळसे पाटलांच्या पूर्व-चरित्राबद्दलही असेंच कांहीं तरी लिहावयास हरकत नाहीं. पण तें स्वभावचित्र न होतां विडंबन–प्रकार अथवा विनोदी लेख होईल. कोळसे पाटील यांच्या क्षात्रतेजाला उठाव देतां येईल असा एकच प्रसंग मात्र मला आठवतो.

१९३२ सालीं पुण्याच्या यूथलीगचे ते सर्वाधिकारी असतां तुरुंगांत जाण्याचा प्रसंग आला तर तेथें भोगाव्या लागणाऱ्या हालअपेष्टांसाठीं ते आपल्या सहन-शक्तीची परीक्षा पाहत होते.

**एका रात्रीं त्यांनीं जळत्या दिव्याची चिमणी हातानें पकडून ती हातांत घट्ट धरून ठेवली व हात भाजून घेतला ! तापलेल्या चिमणीमुळें होणाऱ्या वेदना निमूटपणें सोसण्याएवढी सहनशक्ति आपल्या अंगीं आहे हें समजल्यावर त्यांची तुरुंगाची भीति मावळली व वाळवें तालुक्यांत जंगल सत्याग्रह करून ते तुरुंगांत गेले. ह्या एकाच प्रसंगानें कोळसे पाटील या व्यक्तीच्या स्वभावरचनेंतील कणखरपणा हा गुण व्यक्त होतो. आणि अंगावर पडणारी जबाबदारी पार पाडण्याची प्रामाणिक इच्छा व त्यासाठीं लायकी संपादन करण्याची तीव्र तळमळ ह्या दोन विशेषांचीही ओळख पटते.**

कोळसे पाटील ही व्यक्ति कालपरवांपर्यंत सर्वांनाच अज्ञात होती. अज्ञात व्यक्तीबद्दल सर्वसामान्यांना कुतूहल असतें व वचकही वाटतो. हें कुतूहल अथवा वचक नाहींसा केल्यानें त्या व्यक्तीच्या बाबतींत अन्याय केल्यासारखें होतें. गूढपणा हेंच कोळसे पाटील यांचें राजकीय वैशिष्ट्य आहे आणि या वैशिष्ट्यांवर सर्वस्वी त्यांची स्वतःचीच मालकी आहे. त्याला योग्य-अयोग्य आकार देण्याची जोखीम त्यांच्यावर येऊन पडली आहे व म्हणूनच त्यांच्या-बद्दल कोणत्याही प्रकारचा दूषित पूर्वग्रह उत्पन्न करून ठेवणें योग्य होणार नाहीं. त्यांच्याबद्दल लिहावयाचें म्हणजे ज्या परिस्थितीनें त्यांना उजेडांत आणलें, त्या परिस्थितीबद्दल लिहिलें पाहिजे व या परिस्थतीची भावी प्रति-क्रिया काय याचाही अंदाज घेतला पाहिजे. कोळसे पाटील ही परिस्थितीनें निर्माण केलेली व्यक्ति आहे. अर्थात् त्यांचें स्वभावचित्र लिहिणें म्हणजे या परिस्थितीचीच चिकित्सा करणें होय.

### सन्मान कीं अपमान ?

हिंदुस्थानामध्यें स्थापन झालेल्या काँग्रेस सरकारच्या प्रधान मंडळांत दोघां अल्पवयी व अननुभवी तरुणांचा समावेश झालेला आहे. त्यांपैकीं मद्रास सर-कारच्या प्रधान मंडळांत समाविष्ट झालेले बी. गोपाल रेड्डी हे एक असून ते

तिशीच्या आंतील आहेत आणि साहित्यिक व ललितकलाभक्त म्हणून त्यांचा लौकिक आहे. कोळसे पाटील यांच्याजवळ इतर क्षेत्रांत करून दाखविलेल्या अशा प्रकारच्या कामगिरीचेंही शिफारसपत्र नाहीं. तारुण्य, पदवी व ब्राह्मणेतरत्व या ब्राह्मणेतरांमध्येंही सवंग झालेल्या मालाला कोळशांच्या नेमणुकीनें भाव व उठाव देण्यांत आला. तरी एका प्रामाणिक व देशभक्तीनें रसरसलेल्या तरुणावर न पेलणाऱ्या जबाबदारीचें ओझें टाकून त्याच्या कर्तृत्वाची खच्ची होण्याचा संभव निर्माण करण्यांत काँग्रेसच्या सूत्रधारांनीं कोळशांचा सन्मान केला कीं अपमान केला हा प्रश्न सुटत नाहीं! कोळशांसारख्या तरुणाला सन्मानाच्या जागीं बसविण्यांत आपल्या कर्तुम् अकर्तुम् शक्तीची जाहिरात काँग्रेससूत्रधारांनीं करून घेतलेली असली, तरी या शक्तीच्या आदेशाप्रमाणें झुलण्याचा परतंत्रपणा त्यांच्यावर टाकून या सूत्रधारांनीं त्यांना आपल्या हातचें बाहुलें बनण्याची पाळी त्यांच्यावर आणलेली आहे हें विसरतां येत नाहीं. मंत्रिपदावरून कोळशांनीं केलेल्या पहिल्याच भाषणाचा जो विचका उडाला, त्यावरून त्यांच्याबद्दलच्या अपेक्षांना एक जोराचा धक्का बसलेला आहे आणि कोळशांच्या आत्मविश्वासालाही त्यामुळें तडा गेला आहे. कोळसे पाटील यांच्या कार्याची जेणेंकरून उपेक्षा होईल अशा परिस्थितीचा फायदा घेऊन सधन शेतकरी समाजांतील त्यांच्यासारख्या एका सुशिक्षित व्यक्तीला प्रखर प्रकाशांत आणून उभें करण्यांत आल्यामुळें कोळशांची मनोवृत्ति या प्रकाशांत करपून जाऊन तिला एक प्रकारें अगतिकत्व येण्याचा संभव आहे, आणि अशा परिस्थितींत त्यांच्या गुणांचा विकास होणें तर मुळींच संभवनीय नाहीं. कोळशांच्या अंगच्या गुणांची योग्य पारख त्यांना हुडकून काढून त्यांची शिफारस करणाऱ्या सूत्रचालकांना झाली आणि जबाबदारी हीच कर्तबगारीची कसोटी या न्यायानें त्यांच्यावर मोठी थोरली जबाबदारी टाकण्यांत आली, असा युक्तिवाद पुढें करितां येईल; पण ज्या युक्तिवादासाठीं हा प्रयोग करण्यांत आला, तो युक्तिवाद बराचसा धाडसी व घातक ठरणार नाहीं काय? हा प्रयोग यशस्वी होईल कीं नाहीं याबद्दलची खात्री देतां येत नसतां कोळसे पाटलांसारख्या एका प्रामाणिक व देशकार्याची तळमळ लागलेल्या सच्च्या व्यक्तीच्या उत्कर्षाचा खेळखंडोबा करण्याची काय जरूरी? कोळसे पाटील हे राजकारणनीतीला अनभिज्ञ व अननुभवी आहेत, म्हणूनच त्यांची महत्त्वा-

कांक्षा कोणत्याही संस्कारांनीं दूषित न झालेली आहे; पण राजकारणाच्या धकाधकीच्या मामल्यांत व मोठेपणाच्या अवास्तव कल्पनेमुळें यापुढें ती तशी राहणें शक्य नाहीं. आणि कोळसे अयशस्वी झाले, तर त्याबद्दलचा दोष त्यांची उच्च पदावर स्थापना करणाऱ्या मंडळीकडेच जाईल !

क-ळ-क-ळ

कोळशांचा राजकरणांतील प्रामाणिकपणा ह्या गुणावर मी विशेष जोर देण्याचें कारण हेंच कीं, सध्यां जें पद त्यांना लाभलेलें आहे तें इतर राजकारणी कार्यकर्त्यांप्रमाणें संधीसाधूपणाच्या जोरावर त्यांना मिळालेलें नाहीं आणि राजकीय चळवळींत भाग घेऊन त्यांनीं जी देशसेवा आपल्या मगदुराप्रमाणें बजावली, ती सेवाही पूर्ण निर्हेतुकपणेंच बजावली हेंच मला दाखवून द्यावयाचें आहे. कोळशांचें भूतकार्य उपेक्षणीय असलें तरी त्यांचीं मतें व त्यांचा राजकीय दृष्टिकोण या दोन्ही गोष्टी मात्र खात्रीनें उपेक्षणीय नाहींत. ब्राह्मणेतर समाजांतील एका सुशिक्षित तरुणाची व्यापक व ज्ञातिभेदातीत विचारसरणी दिसून येण्याला हीं मतें उपयुक्त ठरतील. कोळसे एल्‌एल्‌. बी.च्या टर्म्स भरीत असतां अभ्यासाची हेळसांड करून त्यांनीं चळवळींत पडावें हा विचार त्यांच्या घरच्या मंडळीला व हितचिंतकांना मानवला नाहीं. या विचारापासून त्यांना परावृत्त करण्याचे प्रयत्न त्यांच्या हितचिंतकांनीं व समवयस्क स्नेह्यांनींही केले; पण त्यांच्या उपदेशाला भीक न घालतां कोळसे चळवळींत पडले. या प्रसंगीं त्यांचा एक उपदेशक स्नेही व कोळसे पाटील यांच्यामध्यें एक ‘ गंभीर ’ संवाद झाला आणि या संवादाच्या पुढील सारांशांतच कोळसे या व्यक्तीच्या विचारांचें प्रतिबिंब आढळून येईल.

“ माझें कार्यक्षेत्र ”

कोळसे यांचा स्नेही त्यांना मोठ्या कळकळीनें म्हणाला,

“ हा अविचार करण्यापूर्वीं तूं थोडा विचार कां नाहीं केलास ? ”

“ कसला विचार करायला पाहिजे होता ? ”

“ ह्या चळवळी आणि हीं सोंगं बहुजनसमाजाच्या हितासाठींच खरोखर आहेत का ? ”

" मग कशासाठीं आहेत तर ? "

" राजकीय चळवळ या गोड नांवाखालीं बहुजनसमाजाची दिशाभूल करून आपल्याला प्रतिष्ठा प्राप्त करून घेण्यासाठीं कांहीं जबाबदार व बऱ्याचशा बेजबाबदार लोकांनीं उठविलेली ही वावटळ आहे."

" हें पाहा, तूं झाला आहेस वैतागल्यासारखा. तुझीं हीं जबाबदार अन् बेजबाबदार असलीं विशेषणं ठेव बाजूला आणि मला सांग, मी स्वतः काय केलं पाहिजे होतं तें. कोणी तरी कांहीं तरी केलं पाहिजे हें तर खरं ना ? "

" कांहीं तरी केलं पाहिजे हें खरं; पण हें कांहीं तरी म्हणजे 'कांहीं तरीच' असून उपयोग काय ! तूं ज्या क्षेत्रांत कांहीं तरी करायला उठला आहेस, तें क्षेत्र तुझं नाहीं. तूं भिंतीवर डोकं आपटतो आहेस. खडबडीत डोकं हें बुद्धिमत्तेचं लक्षण आहे; पण तें उपजतच खडबडीत असावं लागतं. टेंगूळ येऊन नंतर खडबडीत झालेलं उपयोगाचं नाहीं."

" मग माझं क्षेत्र कोणतं ? "

" तुझ्यासारखा शेतकऱ्याचा मुलगा आणि क्षेत्र कुठचं म्हणून विचारतो ? आश्चर्य आहे ! तुझी शेतकऱ्याची आणि मजुराची जात नाहीं तुला कार्य करायला ? नुसता जमीन कसणाऱ्या मराठ्यांचाच विचार केलास, तरी दोन कोट माणसं पाहात आहेत कीं तुझ्यासारख्याच्या तोंडाकडे ! "

" सबूर कर, दोस्त, दोन कोट आणि पस्तीस कोट यांच्यांतला भरींव आंकडा कोणता हें तर मला सांगशील ? जात-जात म्हणून म्हणतोस तूं ; पण मला तर असं वाटतं कीं निदान तुमच्याआमच्यासारख्या सुशिक्षित माणसांनीं तरी जातीच्यापलीकडे पाहायची वेळ आतां आपल्या चालू इतिहासांत आली आहे—"

" असं तुला वाटतं याबद्दल मी तुझं अभिनंदन करतों. पण इतर सुशिक्षितांना तसं वाटत नसल्यामुळं आपल्याला तसं वाटणं आणि आपण त्यासाठीं प्रयत्न करणं हा शक्तीचा अपव्यय आहे. असं वाटणाऱ्या लोकांची बहुसंख्या झाल्याखेरीज अल्पसंख्याकांनीं असं व्यापक औदार्याचं धोरण ठेवणं हानिकारक आहे. ज्या त्या गटानं आपल्यापुरती आपली उन्नतीची दृष्टि ठेवणं आणि राष्ट्राच्या समायिक सामर्थ्यांत आपला वांटा देण्याची

तयारी दाखवणं हें अधिक व्यवहार्य आणि अधिक शहाणपणाचं ठरेल."

" पुनः सबूर; पण हें पाहा, व्यवहार्य म्हणून ठरलेल्या ह्या अलगपणाच्या धोरणामुळं बहुतेक वेळां असंच होत नाहीं काय कीं, आपल्याला आपल्या धोरणाच्या विधायक भागाचा विसर पडतो आणि आपल्या हालचालीमुळं परद्वेषाचं वातावरण उत्पन्न व्हायला मदत होते ! "

" तसं पाहूं गेलं तर सर्वच सत्कार्यांमध्यें विकारांचं प्राबल्य होतं आणि कोणतंच कार्य निर्दोष राहूं शकत नाहीं आणि म्हणूनच प्रामाणिक माणसांवरची जबाबदारी वाढते. ब्राह्मणेतर चळवळीमुळं मोठ्या झालेल्या माणसांनीं आपल्या मिळत गेलेल्या मोठेपणाबरोबरच मनाचाही मोठेपणा त्याच प्रमाणांत वाढीला लावला असता, तर बरंचसं चांगलं कार्य झालं असतं, आणि तुझ्यासारखे तरुणही नाउमेद झाले नसते. स्वार्थी पुढारी अप्रामाणिक झाले म्हणून तुलाही तुझ्यावर विशेष हक्क असलेल्या आपल्या भाऊबंदांचा कां विसर पडावा ? "

" माफ कर बुवा, पण मला ही दृष्टि नाहीं. मला ज्या तऱ्हेनं कार्य करायचं आहे, त्या तऱ्हेचं कार्य करायला राष्ट्रीय चळवळीखेरीज दुसरा मार्गच मला दिसत नाहीं. माझा हा मार्ग मीं निश्चित केला आहे, आणि आतां तो बदलणं मला शक्य नाहीं, आणि पटतही नाहीं."

## निष्कामबुद्धीचें कार्य

—आणि यानंतरही या मित्रांचा बराच वाद झाला; पण कोळसे यांचा निश्चय बदलला नाहीं. कोळशांचा मित्र व कोळसे यांच्यामध्यें झालेल्या संवादांत वरील शब्द नसतील; पण कोळशांनीं प्रकट केलेल्या विचारसरणींतील सूर मात्र असाच होता. तुरुंगांतील हालअपेष्टा यापलीकडे कोळशांनीं स्वीकारलेल्या मार्गाला दुसरें जवळचें असें कोणतेंच लोभनीय फळ दिसत नसतां कोळसे–सुखवस्तूपणें ख्यालीखुशालीच्या वातावरणांत नांदत असलेले कोळसे–तुरुंगांत जाण्यास सिद्ध झाले, या एकाच गोष्टीमुळें त्यांच्या प्रामाणिकपणाची ओळख पटते. राजकीय चळवळींत भाग घेऊन दिखाऊ लौकिक त्यांना मिळवावयाचा नव्हता; कारण दिखाऊपणानें प्रसिद्धि मिळविण्याचें तंत्र त्यांना अवगत नव्हतें

व तें अवगत करून घेण्याची त्यांची इच्छाही नव्हती. टिनच्या डब्यावर उभें राहून चळवळीचें सवंग व जहाल वक्तृत्व त्यांनीं गाजविलें नाहीं, अगर तसा प्रयत्नही त्यांनीं केला नाहीं. ते प्रसिद्धिविन्मुख होते, आणि भिडस्तही होते; अर्थात् त्यांच्या त्या वेळच्या अल्पस्वल्प राजकीय कार्याचा संबंध कोणत्याही हेतूशीं लावतां येत नाहीं. त्या वेळची त्यांची कामगिरी म्हणजे निष्काम व खडतर कर्मयोग होता.

कॉंग्रेसचा शिपाई

पण कोळसे पाटलांच्या या कामगिरीनें त्यांना मातबर व लौकिकवान् पुढाऱ्यांनाही दुर्लभ झालेलें मंत्रिपद अचानकपणें मिळवून दिलें; तथापि “ मी कॉंग्रेसचा शिपाई आहें ” हीं कोळशांच्या तोंडांत त्या वेळीं शोभत असलेलीं वाक्यें मात्र आजही कायम राहिलीं आहेत. हीं वाक्यें सरावानें ते आजही बोलत आहेत; पण डोईजड जबाबदारीमुळें त्या शब्दांतील सफाई मात्र आज त्यांच्या तोंडांतून बाहेर पडणाऱ्या या शब्दांत दिसत नाहीं. शिपाई-गिरीच्या कल्पनेला ते आजही विसरले नाहींत; पण आपले आजचे शब्द पूर्वीच्या शिपाईगिरीची चेष्टा आहे, ह्याची जाणीव त्यांना नाहीं असें नाहीं. तलवार मारल्याशिवाय सेनानीपदाचा साध्या शिपायाला झालेला लाभ हा खरा शिपाईगडी कमीपणाचा समजतो, आणि कोळशांच्या शरीरांत सळसळणारें मराठ्याचें रक्त त्यांना याच कारणानें अस्वस्थ करतें. सर्व प्रधानमंडळांत कोणत्या एका व्यक्तीबद्दल जर मला मनापासून सहानुभूति वाटत असेल, तर ती कोळसे पाटील याच व्यक्तीबद्दल होय. प्रधानपदाचा लाभ झाल्या-नंतर ज्या ज्या वेळीं त्यांना पाहण्याचा व त्यांचीं दिवाण या नात्यानें झालेलीं प्रासंगिक भाषणें ऐकण्याचा मला योग आला, त्या त्या वेळीं त्यांची भारावल्यासारखी व सहानुभूतीला उघडउघडपणें आवाहन करणारी स्थिति पाहून मला त्यांची कींव आली. पुण्यांत मनमोहनदास रामजी यांच्या वाड्यांत नव्या कॉंग्रेसच्या प्रधानांची व कॉंग्रेस-सभासदांची जी सभा गेल्या जुलैमध्यें भरली होती, त्या वेळीं सभा संपल्यावर इतर प्रधानां-बरोबर कोळसे खालीं उतरले. प्रत्येक प्रधानाभोंवतीं त्याचा चाहता वर्ग व कंपू गोळा झाला व या मंडळींनीं आपापल्या प्रधानांना वेढून टाकलें.

मात्र कोळशांच्याजवळ कोणीही फिरकत नव्हतें आणि तेही नव्या पदाच्या जाणीवेनें अवघडल्यासारखे होऊन एकटेच इकडेतिकडे रेंगाळत राहिले होते. मीं त्यांना पुढें होऊन नमस्कार केला आणि “ काय हो, पोर्टफोलिओ ठरले कीं नाहीं ? ” असा सहजच प्रश्न केला. “ नाहीं. अजून नाहीं, ” एवढेंच लाजत लाजत त्यांनीं उत्तर दिलें आणि सभोंवार नजर टाकून हळूच पाठ फिरविली. कांहीं तरी बोलून वेळ काढीत राहावें असें वाटूं लागण्याजोगी त्यांची उपेक्षा इतर मंडळींनीं चालविली होती व कोळसेही संभाषणाला उत्सुक दिसले; पण आपल्यासारख्या नव्या कोऱ्या मंत्र्यानें बोलावें तरी काय आणि विषय तरी कोणता काढावा या विचारानें ते शंकित झाले असावेत. राजकारणाबद्दल बोलावें तर चुकून कांहीं तरी तोंडून जाईल आणि शिळोप्याच्या गप्पा मारणें आपल्यासारख्याला कितपत रास्त दिसेल कोण जाणे, अशा दुहेरी संशयांत ते अडकले आणि तसेच एकटेच बागेंतल्या पानांफुलांची शोभा पाहत पुन: रेंगाळूं लागले ! फोटोग्राफरनें फोटोसाठीं प्रधानांना “फॉल-इन्”ची विनंति केली त्या वेळीं कोळशांच्या अनुपस्थितीमुळें त्यांचें स्मरण झालें व “ अहो, कोळसे ! ” ही हाक बऱ्याच तोंडांतून बाहेर पडली. “ होय, होय, आलों ” असें म्हणत कॉंग्रेसचा हा शिपाईगडी लाजत लाजत परेडग्राउंडवर गेला आणि आपल्या जागीं उभा राहिला.

## सुदैवी–दुर्दैवी

या वेळीं कोळशांच्या हालचालींत जो कृत्रिमपणा व जी कुचंबणा दिसून आली, तींतून अजूनही त्यांची मुक्तता झालेली नाहीं. उच्चपदाला शोभण्यासाठीं हालचालींत उच्चगंड आणण्याचा ते प्रयत्न करितात; पण कनिष्ठपणाच्या जाणीवेनें उत्पन्न झालेल्या हीनगंडाला दाबण्याचा त्यांचा त्या वेळचा खटाटोप त्यांत उघड उघड दिसून येतो. त्यांच्यासारख्या प्रामाणिक शिपाईगड्याला ही कुचंबणा किती दिवस सहन करवेल ? स्वतंत्र बाणा आणि आपल्या कार्याबद्दल वाटणारी निष्ठा हे दोन गुण कोळसे पाटील यांच्या वृत्तींत भिनलेले आहेत; पण त्यांचा उपयोग करण्यास त्यांना वाव मिळाला नाहीं हेंच त्यांचें दुर्दैव आहे. शिवाय आपल्या अत्यल्प गुणांची इतरांप्रमाणें भरमसाट जाहिरात करण्याची कलाही मुखदुर्बळ कोळशांना अवगत नसल्या-

मुळें इतरांचीं बोलघेवडेपणामुळें गाजरें विकलीं गेलीं, तरी अबोलकेपणामुळें कोळशांचीं घवघवीत वांगींही विकलीं जाणार नाहींत अशी मला भीति वाटते. घुमेपणा व भिडस्तपणा हा कोळशांचा एक मोठा दोष आहे आणि या दोषा-मुळें त्यांची कर्तबगारीही काळोखांत राहण्याचा संभव आहे. कोळसे आणि हिरे यांची निवडणुकीच्या दिवसांत "सिंहाचे छावे" अशी जाहिरात करण्यांत आली होती. या दोन बच्चांपैकीं श्री. पाटलांना **विविध वृत्त** कचेरींत गेल्या मार्चच्या १३ तारखेला त्यांचे एक स्नेही घेऊन आले होते. संपादकांचा व कोळशांचा परिचय करून दिल्यानंतर प्रारंभीं जीं कांहीं औप-चारिक प्रश्नोत्तरें झालीं, तीं संपल्यावर कोळशांनीं जें तोंडाला कुलूप घातलें, तें कचेरींतून बाहेर पडेपर्यंत काढलें नाहीं. त्या वेळीं तेथें हजर असलेल्या इतर वड्या मंडळींना, सिंहाच्या ह्या बच्चानें गर्जना तर केल्या नाहींतच; पण तो नुसता गुरगुरलादेखील नाहीं म्हणून नवल वाटलें. घुमीं माणसें "भयंकर" असतात असा त्यांच्याबद्दल एक समज प्रचलित आहे; पण हा गैरसमज आहे. अशा माणसांचा शब्दापेक्षां कृतीवर अधिक विश्वास असतो; पण आपल्या गुणदोषांची पुरती जाणीव त्यांना असल्यामुळें भावी कृतीच्या परिणामा-बद्दलही तीं साशंक असतात आणि म्हणूनच आपल्या भावी कार्याचा आगाऊ स्फोट करण्यास तीं तयार होत नाहींत. त्यांची कृति अचानकपणें पुढें आल्यावर या अचानकपणामुळेंच ती 'भयंकर' वाटते. कोळशांच्या कर्तृत्वाला अवसर मिळाला तर आपल्या मनाशीं ठरवून ठेवलेल्या कार्याच्या सिद्धीसाठीं झटून प्रयत्न करण्याचा प्रामाणिकपणा व हौस हे दोन्ही गुण त्यांच्या ठिकाणीं आहेत; पण त्यांच्या कर्तृत्वाला योग्य वाव मिळण्याऐवजीं त्यांचें कर्तृत्व आज्ञापालनापुरतेंच मर्यादित करण्यांत आलेलें आहे. आवडीच्या गोष्टीचीही सक्ति माणसावर होऊं लागली, तर अशा गोष्टींना कसून विरोध करण्याची वृत्ति त्याच्यामध्यें उत्पन्न होऊं लागते आणि contrariness हें तिचें मानसशास्त्राच्या सिद्धांतांतील नांव आहे. शोभेचें बाहुलें हें मनाला बोचणारें शल्य कोळशांना काढून टाकावयाचें असेल, तर स्वतंत्रपणाची तडफ त्यांनीं दाखविली पाहिजे आणि तशी तडफ दाखविण्याचें धैर्य नसेल, अगर शक्यता नसेल, तर ताबेदार या नात्यानें स्वतःशींच कुढत राहून आपल्या मोठेपणाची चाकरी त्यांना मुकाट्यानें करावी लागेल. कोळशांची भावी कारकीर्द

ही त्यांच्या शिपाई बाण्याची कसोटी आहे. या कसोटींतून ते चांगल्या प्रकारें पार पडोत एवढीच माझी इच्छा आहे. पण त्यांच्यासारख्याच एका शिपाया-वर गुदरलेल्या एका पेंचप्रसंगाची मात्र आठवण मला येथें झाल्याखेरीज राहत नाहीं. ही आठवण धोक्याचा इषारा म्हणून त्यांच्यापुढें ठेवण्याची मी परवानगी घेतों. ह्या आठवणींतील शिपायाच्या हातीं प्रथम पाहन्यासाठीं एक साधी बंदूक देण्यांत आली होती, पण पुढें त्याला बढती मिळून तलवार बाळगण्याचीही त्याला परवानगी देण्यांत आली. पण त्यामुळें या शिपाई-गड्याची कुचंबणा झाली. तलवार व बंदुकीसाठीं दोन्ही हात गुंतल्यामुळें व कोणत्या शस्त्राचा उपयोग करावा याचा निश्चित हुकूम नसल्यामुळें दोन्ही हात शस्त्रांवर ठेवून हा भोळा शिपाई स्वस्थ उभा राहिला आणि दरवडे-खोरांनीं त्याच्या डोळ्यांदेखत खजिना लुटून नेला! स्वतंत्र वृत्ति व स्वाभिमान राखून बहुजनसमाजाची सेवा करण्याच्या कोळसे पाटील यांच्या प्रयत्नांत असा प्रसंग त्यांच्यावर ओढवणार नाहीं अशी मी आशा करतों.

विविध वृत्त, ता. २८ नोव्हेंबर १९३७



## मो. क. गांधी

## : : ५

"होय, हा इसम हिंदुस्थानच्या भावी इतिहासांत महत्त्वाचा भाग घेणार आहे. माझे शब्द नीट लक्षांत ठेवा. माझ्यापेक्षां तुम्ही वयानें लहान आहां. तो दिवस पाहण्यास मीं इहलोकीं असणार नाहीं. पण तुम्हांला तो दिवस खात्रीनें पाहावयास मिळेल. आम्हीं कांहीं मंडळी नाहींशी झाल्यावर देशांतील एका मोठ्या चळवळीच्या अग्रभागीं हा इसम चमकेल. ज्या वेळीं लोकांच्या भावना तुफान करून त्यांना त्याग करण्यासाठीं प्रवृत्त करावें लागेल अगर उच्च ध्येयाच्या प्रकाशांत त्यांना आणावें लागेल, त्या वेळीं हें कार्य करण्यास त्याच्याएवढा लायक पुढारी दुसरा कोणीं मिळणार नाहीं. गरिबांचें लक्ष चटकन् वेधून घेण्याची विलक्षण शक्ति त्याच्या अंगीं आहे. आणि दलित व दीन अशा लोकांमध्यें आपलेपणा निर्माण करण्याचें सामर्थ्यही त्याच्या अंगीं आहे; पण हेंही त्याचप्रमाणें ध्यानांत असूं द्या कीं, ज्या वेळीं मोठ्या मुत्सद्दीपणानें आणि व्यवहाराकडे लक्ष देऊन पूर्ण संयमानें कांहीं महत्त्वाचीं व नाजुक खलबतें व बोलणीं करण्याचा प्रसंग येईल, सबंध भाकरी मिळण्याऐवजीं मिळेल तो चतकोर पदरांत पाडून घेण्याकडे ज्या वेळीं लक्ष द्यावयाचें असेल, त्या

वेळीं ह्या व्यक्तीवर देशाचा विश्वास असणार नाहीं. तिच्याबद्दल देशाला संशयच वाटेल. दक्षिण आफ्रिकेमध्यें त्यानें अलौकिक कार्य केलें आहे. वेगवेगळ्या हिंदी गटांचें एकीकरण करून तेथें त्यानें त्यांची चळवळीच्या कार्यासाठीं एकजूट केली. तथापि, हिंदी राजकीय शिष्टाईचा इतिहास अत्यंत निःपक्षपाती रीतीनें लिहावयाचा ज्या वेळीं प्रसंग येईल, त्या वेळीं हा माणूस त्यांत अपयशी झालेला आढळून येईल. ”

—आणि हे उद्गार गांधींचे राजकीय गुरु कै. गोखले व श्री. जयकर यांच्यामध्यें झालेल्या संभाषणाच्या वेळीं कै. गोखले यांनीं गांधींबद्दल काढले होते. दक्षिण आफ्रिकेमध्यें काळ्या हिंदी लोकांविरुद्ध आफ्रिकन सरकारनें केलेल्या अन्याय्य जुलमी कायदेकानूंविरुद्ध शांततामय सत्याग्रहाची चळवळ यशस्वी करून गांधी त्या वेळीं हिंदुस्थानांत आले होते. शांततामय सत्याग्रहाच्या चळवळीची अभिनव कल्पना, तिची अत्यंत पायाशुद्ध रीतीनें केलेली उभारणी व गांधींच्या नेतृत्वाखालीं झालेला तिचा अत्यंत यशस्वी प्रयोग यांच्यामुळें जवळ जवळ सर्व जगाचे डोळे दिपून गेले. जनरल स्मट्स्सारख्या तेजस्वी व खंबीर मुत्सद्द्याला गांधींनीं नमविलें आणि आफ्रिकन सरकारवर विजय मिळविला. या यशाची शिदोरी जवळ घेऊन गांधी हिंदुस्थानांत आले, ते पुढारी म्हणूनच आले. १९१५ च्या जानेवारी महिन्यांत हिंदुस्थानांत कायम राहण्याच्या इराद्यानें गांधींनीं हिंदुस्थानांत पाऊल ठेवल्यानंतर या कीर्तिवान् पुढाऱ्याचें करावयाचें तरी काय असा सौम्य ‘ पेंच-प्रसंग ’ त्या वेळच्या वेगवेगळ्या राजकीय पंथांच्या पुढाऱ्यांपुढें उभा राहिला असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. गांधींसारखा पुढारी आपल्या पक्षाला लाभावा अशी प्रत्येक पक्षाची इच्छा होती; पण आपल्या पक्षाशीं या पुढाऱ्याचें कितपत पटेल हा संशयही या पक्षाच्या पुढाऱ्यांना वाटत होता. गोखल्यांच्या तत्त्वशुद्ध व सरळ ( Spiritual ) राजकारणाबद्दल गांधींना आकर्षण वाटत होतें; म्हणून प्रागतिकांनाही त्यांच्याबद्दल आपलेपणा वाटत होता. दंडुकेशाहीला नमवून एका करड्या सरकारला वठणीवर आणणारा पुढारी आपल्या पक्षांत सामील झाला तर या पक्षाची इभ्रत वाढेल या

कल्पनेनें जहाल पक्षाला गांधींबद्दल महत्त्व वाटत होतें आणि सर्व वितुष्ट व वैरभाव विसरून वेळप्रसंगीं आपल्या मदतीला धावून येणारा हा साधाभोळा पण हुकमी साहाय्यक आणि शांतताप्रेमी प्रजाजन जहाल पुढाऱ्यांवर मात करण्यास उपयोगीं पडेल या कल्पनेनें सरकारनेंही गांधींना " कैसर-ई-हिंद " हें पदक देऊन त्यांच्याबद्दल वाटणारा स्नेहभाव प्रकट केला होता. गांधींबद्दल सरकारसुद्धां सर्व पक्षोपपक्षांना कुतूहल व प्रेम वाटत होतें; पण खात्री वाटत नव्हती. मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांनीं आपली कारकीर्द संपवून मद्रासला प्रयाण करण्याच्या वेळीं मुंबईच्या भावी गव्हर्नरना उद्देशून जें खासगी व गुप्त सूचनापत्रक लिहून ठेवलें होतें, त्यांत गांधींबद्दल सावध राहण्याचा इशारा देऊन ठेवला होता अशी त्या वेळीं वदंता होती. लॉर्ड विलिंग्डन यांच्या सरकारशीं सहकार करून युद्धकार्याला मदत करणाऱ्या 'मित्रा'बद्दलसुद्धां लॉर्ड विलिंग्डन यांचा विपरीत ग्रह व्हावा याचीं कारणेंही तशींच जबरदस्त असावींत. लॉर्ड विलिंग्डन व्हाइसरॉय होऊन परत हिंदुस्थानांत आल्यावर गांधींना त्यांनीं थारा न देतां त्यांच्या चळवळीला कठोरपणें नेस्तनाबूद करण्याचा चंग कां बांधला याचीं कारणेंही या जुन्या परिचयांतील अनुभवांतून उत्पन्न झालेलीं असावींत असेंही म्हणावयास हरकत नाहीं.

### झाडू व घमेलें

अशा परिस्थितींत गांधींनीं गोखल्यांच्या भारतसेवक समाजाचा सदस्य होण्याची इच्छा प्रदर्शित करून सभासदत्वाचा अर्ज गोखल्यांच्या हातीं दिला व पुण्याला गेल्याबरोबर हातांत झाडू आणि घमेलें घेऊन भारतसेवकांच्या वसाहतींत शौचकूप साफ करण्यास त्यांनीं सुरुवात केली ! भारतसेवकांना गांधींनीं चालविलेली ही 'शुद्धि' पसंत पडली नाहीं. गोखल्यांनींही त्याबद्दल आपली नापसंती प्रकट करून गांधींना या उपक्रमापासून परावृत्त केलें. त्यांनीं भारतसेवक समाजाच्या लायब्ररींतील बहुमोल ग्रंथ गांधींना दाखविले व हिंदी राजकारणांत पडण्यापूर्वीं या ग्रंथांचा सूक्ष्म अभ्यास करण्याची विनंति केली; पण कपाटांतील ग्रंथ पाहतांच गांधी उद्गारले

**"हीं एवढीं पुस्तकें येथें कशाला पाहिजेत? निवडक पांचपन्नास पुस्तकें असलीं म्हणजे चालतील ! "**

गांधींचे हे उद्गार ऐकून गोखले चकित झाले. त्यांच्या सहकाऱ्यांनाही गांधींसारख्या तऱ्हेवाइक व लोकविलक्षण कल्पनांना उराशीं कवटाळून धरणाऱ्या आग्रही कार्यकर्त्याचें सभासदत्व आपल्या कार्याला विघातक वाटूं लागलें. सहकाऱ्यांचा विरोध लक्षांत येतांच आणि गांधींच्या अंतरंगाचाही बराचसा ठाव लागतांच गोखल्यांनीं गांधींच्या सभासदत्वाची मंजुरी थोपवून धरली व त्यांना देशांतील परिस्थितीचें स्वतः सर्व देश फिरून निरीक्षण करण्याचा व नंतरच आपलीं मतें व कार्यपद्धति निश्चित करण्याचा उपदेश केला. त्यानंतर एका महिन्यानेंच गोखले कैलासवासी झाले व नंतर पुढें गांधींच्या सभासदत्वालाही भारतसेवकांनीं नामंजुरी दिली. गांधींच्या विरोधकांत श्री. ना. म. जोशी हे प्रमुख होते. तथापि गांधींच्या एवढ्या व यापूर्वींच्या दक्षिण आफ्रिकेंतील दौऱ्याच्या वेळच्या परिचयामुळें गांधींबद्दल गोखल्यांनीं आपलें मत बनविलें व तेंच मत गोखल्यांच्या वरील संभाषणांत प्रकट झालें. गोखल्यांची ही भविष्यवाणी आज पूर्णपणें प्रचीतीला आली ! गोखले भविष्यवादी ठरले !

## पहिलें अपयश

ही गोखल्यांची भविष्यवाणी ज्या प्रसंगामुळें जयकरांना आठवली, त्या प्रसंगानेंही तिचें सत्य लौकरच अनुभवास आणून दिलें. होमरूल लीगच्या चळवळींत मुंबईच्या प्रांतिक शाखेचें अध्यक्षपद गांधींना द्यावें अशी लीगच्या कांहीं सभासदांनीं इच्छा प्रकट केली. कै. टिळक यांच्या नेतृत्वाखालीं स्थापन झालेल्या प्रांतिक संस्थेबरोबर स्पर्धा करण्यास तेवढ्याच कीर्तीचा पुढारी मुंबईसाठीं मिळावा हीच इच्छा या सूचनेच्या मागें होती ! पण गांधींच्या आगमनानें आपल्या शाखेमार्फत चाललेल्या विधायक व पद्धतशीर कार्याची हानि होईल अशी भीति शाखेचे उपाध्यक्ष बॅ. जयकर यांना वाटत होती. गांधींचें आगमन झाल्यानंतर गोखल्यांची व जयकरांची भेट झाली असतां, गांधींबद्दल आपलें काय मत आहे, असा जयकरांनीं त्यांना प्रश्न विचारला, व या प्रश्नाचें उत्तर गोखल्यांनीं वरीलप्रमाणें दिलें होतें. गोखल्यांच्या त्या उद्गारांची आठवण होतांच जयकरांची शंका दृढमूल झाली व गांधींना लीगचें नेतृत्व स्वीकारण्याची विनंति करण्यासाठीं गांवदेवीवर सभासदांची जी सभा

भरविण्यांत आली होती, त्या सभेंत गांधींच्या आगमनाला जयकरांनीं जोराचा विरोध केला. बॅ. जीना, जमनादास मेहता, उमर सोबानी हे पुढारी गांधींना अनुकूल होते. आपल्या विरोधाचीं कारणें सांगतांना जयकर गांधींना उद्देशून म्हणाले,

**" गांधींजी, तुम्हीं हिंदी राजकारणांत पडणार आहांत; पण तुमचा ध्येयवाद आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा आहे. तुमच्या तत्त्वांचा विस्तार सर्व मानवजातीला वेढणारा आहे. राष्ट्रीयत्वाची आकुंचित मर्यादा तुम्ही उल्लंघन करून पुढें पाऊल टाकलें आहे. आमच्या लीगसारख्या एका लहानशा व बंदिस्त संस्थेंत आपल्याला अडकवून ठेवणें रास्त होईल कीं काय हीच मोठी शंका आम्हांला वाटते ! या संस्थेची कार्यपद्धति सरकारच्या धोरणाप्रमाणें वरचेवर बदलत जाणार. तिला निश्चित स्वरूप नाहीं. सरकारी धोरणाशीं आम्हीं वैरभाव धरला तर आपल्या शांततेच्या व प्रेमाच्या तत्त्वज्ञानाचा या धोरणाशीं कलह निर्माण होईल. आमचें ध्येय व कार्यपद्धति बदलण्यास तुम्ही आम्हांला सांगाल आणि आपलीं जीं कांहीं ' वेडें ' (fads) आहेत असें आमच्यापैकीं बऱ्याच जणांना वाटतें, त्या आपल्या अनेक 'वेडां'पैकीं आपलें एखादें आवडतें वेडही तुम्ही आमच्या धोरणांत घुसडून द्याल अशी मला भीति वाटते. या कारणांसाठीं मीं तुम्हांला विरोध करीत आहें."**

या भाषणाला उत्तर देतांना गांधी म्हणाले, "आपण म्हणतां त्यांपैकीं बऱ्याच गोष्टी मला मान्य आहेत; परंतु माझ्या कांहीं कल्पनांना आपण 'वेड' म्हणावें याचा मला खेद होतो. मी आपल्या संस्थेला मिळालों, तर फक्त स्वदेशी, आणि देशी भाषांपैकीं एक कोणती तरी भाषा हिंदुस्थानची राष्ट्रभाषा असावी, हीं माझीं दोनच ' वेडें ' मान्य करण्याचा मी आग्रह धरीन. या दोन गोष्टींपलीकडे आपल्याला माझ्यापासून उपसर्ग होईल अशी भीति बाळगण्याचें आपल्याला कारण नाहीं."

या आश्वासनामुळें विरोध मागें पडून गांधींचा प्रवेश लीगमध्यें झाला; पण अखेर जयकरांची भीतीच खरी ठरली. लौकरच ह्या लीगच्या जागीं स्वराज्य सभा निर्माण होऊन लीग नामशेष झाली. लीगनें केलेल्या विधायक

कार्यक्रमावर पाणी पडलें, लीगचे सभासद चारी दिशांना फांकून निरनिराळ्या गोटांत सामील झाले व लीगच्या कार्यासाठीं देणगीरूपानें मिळालेला १।। लाखाचा फंड व्याज गोळा करीत हायकोर्टांत स्वस्थ पडून राहिला ! देशाच्या राजकारणांत गांधींना स्थान मिळालें नाहीं. या राजकीय विश्वामित्रानें नवी सृष्टि निर्माण करण्यासाठीं १९१५ च्या मे महिन्यांत ता. २० रोजीं साबरमतीच्या तीरीं अहमदाबाद येथें ३ लाखांच्या देणगीवर सत्याग्रहाश्रम स्थापन केला, व तेथून आपलीं सूक्तें व मंत्र म्हणण्यास प्रारंभ केला.

## गांधींचें यशापयश

गांधीजयंतीच्या निमित्तानें गेला आठवडा सर्व हिंदुस्थानभर दुमदुमून गेला आहे. गांधीमाहात्म्याचें मंदिर उभारण्यासाठीं या पंधरवड्यांत हजारों स्तंभ उभे राहतील; पण गांधींच्या कार्याचें यशापयश ठरवून गांधींचें योग्य व खरें श्रेय त्यांच्या पदरीं बांधण्याचा समय अजून आलेला नाहीं. गांधींच्या कार्याबद्दल जसे तीव्र मतभेद त्यांच्या चाहत्या व विरोधी टीकाकारांमध्यें आहेत, त्याचप्रमाणें गांधी या व्यक्तीबद्दलही बरेचसे मतभेद कायम राहिले आहेत. कार्य व व्यक्ति यांची एकरूपता गांधींसारखी कोणत्याही हिंदी पुढाऱ्यामध्यें झालेली नाहीं. गांधी हें एक कोडें आहे आणि तें अजून कोणत्याही गणितानें उलगडलेलें नाहीं ! दोन आणि दोन चार ह्या सिद्धांताला गणितशास्त्रांत जें महत्त्व तेंच राजकारणांत सुसंगतीला असतें. पण सुसंगतीचा आपण कधींच बडेजाव ठेवलेला नाहीं असें गांधींनीं अलीकडेच जाहीरपणें सांगून टाकल्यामुळें त्यांच्या कार्याची चिकित्सा सुसंगतीच्या साहाय्यानें करणेंही मुष्कील झालें आहे; पण विशेष आश्चर्याची गोष्ट हीच कीं गांधी आपल्या प्रत्येक नव्या हालचालीची फोड करून सांगतात त्या वेळीं सुसंगति व तर्कशास्त्र यांचें साहाय्य घेण्याचा प्रयत्न करतात व हा प्रयत्न ज्या वेळीं फोल होतो त्या वेळीं ते अंतःप्रेरणा व 'आंतला आवाज' यांचा हवाला देऊन आपल्या लौकिक विसंगतीचा रस नैतिक सुसंगतीच्या मुशींत ओततात. तथापि या दोन्ही प्रसंगीं गांधींची कोणतीही नवी हालचाल त्यांच्या चाहत्यांच्या व विरोधकांच्या मनांत सारख्याच प्रमाणांत अपेक्षा व भीति निर्माण करतात. गांधींनीं असाधारण

लोकप्रियता मिळविलेली आहे. बहुजनसमाजाच्या भावना उद्दीपित करण्याचें तंत्र त्यांच्याएवढें दुसऱ्या कोणत्याही भावनाविवश व जहाल पुढाऱ्यालाही साधलें नाहीं; परंतु प्रचंड लोकप्रियता मिळवूनही आपल्या सहकाऱ्यांचा संपूर्ण विश्वास गांधींना मिळवितां आला नाहीं. गांधी बुद्धिवान् नाहींत, पंडित नाहींत, उत्कृष्ट वक्ते नाहींत, मुत्सद्दी नाहींत अगर व्यवहारज्ञही नाहींत; पण असें असतांही त्यांची सामान्य बुद्धिमत्ता, अपुरें पांडित्य, खडबडित वक्तृत्व, उघडी मुत्सद्देगिरी व तर्कदुष्ट व्यवहारज्ञता यांनीं त्यांना हिंदी राजकारणांत मान्यतेच्या अत्युच्च शिखरावर बसविलें हें कोणालाही नाकारतां येणार नाहीं. पं. मोतिलाल नेहरू, दास, पटेलबंधु, राजगोपाळाचारियर यांच्यासारखे बुद्धिवान् , खंबीर, चतुर व राजकारणी पुढारी त्यांच्या सान्निध्यांत व राजकारणांत वावरले; पण गांधींनीं त्यांनाही आपल्या इच्छेप्रमाणें वांकवून खेळविलें. विभूतिपूजेबद्दल तिरस्कार व्यक्त करणारे पं. जवाहिरलाल नेहरू यांच्यासारख्या तरुण, तडफदार व उतावळ्या पुढाऱ्यावरही गांधींनीं कुरघोडी करून त्यांना आपल्या इच्छेचे दास बनविलें. अशी ही कर्तुमकर्तुम् शक्ति हिंदी राजकारणांत एका सामान्य व्यक्तीनें कोणत्या गुणांच्या जोरावर मिळविली ?

## गांधींचें नाट्य

या गूढ प्रश्नाचें बऱ्याच अंशीं आजही पटणारें असें उत्तर द्यावयाचें झाल्यास तें असें देतां येईल कीं राजकारणाचे कोणतेही शिष्टसंमत मार्ग न चोखळतां गांधींनीं बहुजनसमाजाच्या धारणाशक्तीला दिपवून व गोंधळून सोडणारे नवे मार्ग स्वीकारले आणि त्यांचा उपदेशक व निर्माता होण्यासाठीं स्वतःच्या व्यक्तीमध्येंही श्रद्धाळु मनाचें चित्त आकर्षून घेण्याजोगे फेरफार केले. गांधींची प्रभावी शक्ति त्यामुळें निर्माण झाली व या शक्तीमुळेंच त्यांना आपल्या वैगुण्यांना झांकून, इतकेंच नव्हे तर या वैगुण्यांना गुणाचें स्वरूप देऊन, देशाला झुलवितां आलें व बंडखोर सहकाऱ्यांवरही वचक ठेवतां आला. " नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम् " ही सुभाषितकारांनीं वर्णन केलेली लोकाराधनेची गुरुकिल्ली गांधींनीं बुद्ध्या साध्य करून घेतली असें म्हणतां येणार नाहीं; परंतु गांधींचें सर्वच राजकीय चरित्र

नाट्यप्रसंगांनीं एवढें परिपूर्ण आहे कीं, कोणाही प्रतिभाशाली नाटककाराला या प्रसंगांपैकीं कोणत्याही एका प्रसंगावर एक एक स्वतंत्र नाट्यकृति निर्माण करतां येईल. गांधींच्या दक्षिण आफ्रिकेंतील आत्मक्लेशांचा व चळवळीचा प्रसंग घ्या, त्यांच्या उपवासांची मालिका पाहा. तोकडा पंचा व शाल पांघरून एक दरिद्री प्रजाजन, ज्याच्या साम्राज्यावर सूर्य कधींही मावळत नाहीं अशा एका वैभवशाली सम्राटाची भेट घेण्यास त्याच्या ऐश्वर्यसंपन्न राजवाड्यांत जातो व त्याच्या प्रतिनिधींशीं बरोबरीच्या नात्यानें बोलणें चालणें करतो हा लोभनीय नाट्यप्रसंग अवलोकन करा. हरिजन–उद्धारासाठीं त्यांनीं काढलेल्या प्रचंड दौऱ्याकडे वळा. यांपैकीं प्रत्येक प्रसंगांत नाट्य, नाट्याला उठावदारपणा देणारा विरोध व गांधींचें वैशिष्ट्य हीं प्रतिबिंबित झालेलीं आढळून येतील. या नाट्यामुळें गांधींचें व्यक्तिमत्व खुलत गेलें, त्यांच्या शक्तीची पकड बळकटपणें बसत गेली व गांधी ही देशांतील बुद्धिमान् व झुंजार पुढाऱ्यांनाही अनावर होणारी अमोघ शक्ति बनली.

### योग्य तत्त्वज्ञान

विज्ञानाभिमुख, प्रवृत्तिप्रवण, जडवादी जनतेचे गांधी पुढारी बनले असते कीं नाहीं हा संशय आहे. अशा जनतेचे पुढारी बसण्यास अवश्य असलेला झुंजारपणा व ताठर तेजस्वीपणा गांधींच्या अंगीं नाहीं. पण निवृत्तिप्रवण जितांचे नेते होण्यास अवश्य असलेली चिकाटी व जोरदार प्रवाहांत दबले जात असतांही वर डोकें काढीत उसळ्या घेत राहण्याचा चिवटपणा गांधींसारखा दुसऱ्या कोणाही पुढाऱ्याच्या अंगीं नाहीं. त्यांच्या या स्थितिस्थापकत्वामुळें ते दबले तरी त्यांनीं जास्त जोरानें उसळी घेतली. गांधींचा हाच एक मोठ्यांत मोठा विशेष असल्यामुळें राजकारणनिवृत्त गांधी, राजकारणप्रवृत्त गांधीं-एवढेच कार्यक्षम ठरले आणि Gandhi is more powerful when in prison असा त्यांच्या खोडसाळपणाला तुरुंगाची वाट दाखविण्याऱ्या शासकांना अनुभव आला. एका विनोदी इंग्रज स्नेह्यानें गांधींचें वर्णन "Gandhi is like an India Rubber Band" असें केलें आहे. ही रबराची कांब वांकते, पुनः सरळ होते, वाटेल तेवढी ओढून लांबवितां येते, गुंडाळी करून खिशांत ठेवतां येते, तिचें खेळणें बनवितां येतें आणि इच्छा

असेल त्या वेळीं तिनें सणसणीत पण अहिंसात्मक प्रहारही करतां येतो. बर्ट्रांड रसेल यांच्या युद्धविरोधी व शांततावादी चळवळींत एका टीकाकारानें त्यांचें वर्णन anæmic worm असें करून पुढें leader of negative men असें दूषण त्यांना दिलें होतें. उपमेसाठींदेखील गांधींना कृमिकीटकांच्या प्राणिसृष्टींत ओढणें आज पावित्र्यविडंबन ठरेल, तथापि बर्ट्रांड रसेल यांना जें दूषण देऊन हिणविण्यांत आलें आहे तेंच दूषण गांधींच्या बाबतींत मात्र भूषण झालें आहे. अहिंसा, अल्पसंतृष्टवृत्ति, नम्र जीवन यांचा अंगीकार आक्रमणशील बहुजनसमाजाच्या वृत्तीला तिरस्करणीय व पराभूत मनोवृत्तीचा द्योतक वाटतो. पण या तत्त्वांचा प्रसार हिंदी बहुजन-समाजाला पूर्णपणें मानवेल हें गांधींनीं अचूक ओळखलें व पराभूत मनो-वृत्तीशीं समरस होणारें नवें राजकीय तत्त्वज्ञान उपयोगांत आणून विषावर विषाचा उतारा त्यांनीं शोधून काढला असेंही म्हणतां येईल. अक्रोधानें क्रोधाला जिंकावें, असाधुत्वाला साधुत्वानें जिंकावें, व कृपणाला दानानें वश करावें हें तत्त्वज्ञान कितीही उच्च असलें, तरी या उच्च तत्त्वज्ञानाचा सामुदायिक प्रयोग राजकारणांत करून मनुष्यस्वभाव बदलणें अशक्य आहे. ह्या तत्त्वज्ञानाच्या आचरणानें एखाद्या मनुष्याचा महात्मा होईल; पण सर्व-सामान्य लोकांच्या मर्यादित उड्डाणाला ही हनुमंताची झेंप झेंपणार नाहीं. ह्या तत्त्वज्ञानाचा आध्यात्मिक आदर्श पुढें ठेवून संघटना करतां येईल व गांधींना त्या दृष्टीनें त्याचा उपयोगही झाला; पण कसोटीची वेळ आली त्या प्रसंगीं दांभिकपणानें उचल खाल्ल्याचा व हिंसक मनुष्यस्वभावानें आप-ल्याला दगा दिल्याचा गांधींना अनुभव आला. गांधींच्या अनेक हिमालयन चुकांच्या मुळाशीं आपल्या तत्त्वज्ञानाची घातक प्रतिक्रिया झाल्याची त्यांची अप्रत्यक्ष कबुलीच आहे. 'विषमप्यमृतं क्वचिद्भवेत् अमृतम् विषमी-श्वरेच्छया' या वचनाप्रमाणें गांधींचें अमृतमय तत्त्वज्ञान जनताजनार्दनरूपी ईश्वराच्या इच्छेनें विषच बनलें; पण हें विषदेखील दुसऱ्या विषाला मारण्यासाठीं औषधाप्रमाणें उपयोगीं पडलें एवढें खरें.

## उत्क्रांति कीं क्रांति ?

गांधींचें चरित्र, या चरित्रांतील बारीकसारीक तपशील, सर्वांच्या

परिचयाचे आहेत. आणि गांधींनींही अत्यंत निष्ठुरपणें आपल्या चरित्राची चिकित्सा करून आपले ' सत्याचे प्रयोग ' स्वमुखानें जाहीर केले आहेत. गांधींच्या चरित्राची उजळणी करण्याचें आज कारण नाहीं; तथापि गांधींच्या माहात्म्याचा विकास कसा झाला याची चर्चा व चिकित्सा या प्रसंगीं करणें जेवढें उद्बोधक तेवढेंच मनोरंजकही ठरेल. गांधी कर्मवीर कधीं झाले आणि कर्मवीर गांधींचे महात्मा कधीं झाले ?

१९०६ सालीं कर्मवीर असतांनाच कै. गोखले यांनीं त्यांना महात्मा ही पदवी मोठया गौरवानें अर्पण केली. " गांधी हे खरोखर महात्मा आहेत. माझे गुरु महर्षि रानडे किंवा राजा राममोहन रॅाय हेच सबंध हिंदुस्थानांत फार झाले तर त्यांच्याजवळ येऊं शकतील, " असे उद्गार गोखल्यांनीं काढले होते. पाश्चात्यांची राहणी व बाह्य वेष यांची हास्यास्पद नक्कल करून इंग्रजांच्या कुचेष्टेचा विषय बनलेले गांधी, नृत्य व व्हायोलिनवादन यांचें शिक्षण घेऊन इंग्रजांच्या सामाजिक जीवनांत समरस होण्याचा निष्फळ प्रयत्न करणारे गांधी, सरकारच्या मर्जीतून उतरलेल्या आपल्या बंधूतर्फें राजकोटच्या पोलिटिकल एजंटशीं रदबदली करण्यासाठीं गेले असतां चपराशानें धक्के मारून घालविल्यामुळें पोलिटिकल एजंटवर फिर्याद करण्यास उठलेले पण सर फेरोजशहा मेहता यांच्या उपदेशानें या अविचारापासून परावृत्त झालेले आततायी गांधी, दक्षिण आफ्रिकेंत दादा अबदुला शेठ यांचा दावा चालविण्यासाठीं गेलेले पण अबदुलाशेठना या दाव्यांत तडजोड करण्याचा आग्रह करणारे व तडजोड घडवून आणणारे गांधी, दक्षिण आफ्रिकेंत टॉल-स्टाय फार्म स्थापन करून हिंदी देशबांधवांची चळवळ चालविणारे गांधी, बोअरयुद्धांत व झुलू लोकांच्या बंडांत शुश्रूषापथक घेऊन सरकारच्या साहाय्यास धावून जाणारे सार्जंट मेजर गांधी, अशीं कर्मवीर गांधींच्या विकासांतील उत्क्रांतिमय स्थित्यंतरें आढळून येतात; पण कर्मवीरत्व व महात्मापद ह्यांची सीमारेषा गांधींनीं कोठें जोडली हें ठरविणें मात्र मुष्कील आहे. सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें तर त्यांच्या जीवनांतील ही क्रांतिकारक सीमारेषा पुसटपणें एका प्रसंगीं उमटलेली दिसून येते. हा प्रसंग गांधींच्या सत्याग्रहाच्या मोहिमेंत उद्भवला. एशियाटिकांची नोंदणी करतांना त्यांच्या बोटांचे ठसे घेऊन त्यांची नोंदणी करण्याचा अपमानकारक कायदा ही नोंदणी पुरी झाल्यावरच मागें घेऊन रद्द

करण्याचें आश्वासन जनरल स्मट्स् यांनीं गांधींना दिल्यामुळें, नोंदणी न करण्याचा उपदेश आपल्या अनुयायांना करणारे गांधी स्वतः नोंदणी करण्यासाठीं रजिस्ट्रेशन ऑफिसकडे जाऊं लागले, त्या वेळचा हा प्रसंग होय. नोंदणी न करण्याचा उपदेश करून ज्या पुढाऱ्यानें आपल्याला संकटांत आणलें, तोच पुढारी स्वतः आपल्या अनुयायांना तोंडघशीं पाडून नोंदणीसाठीं जात आहे असें पाहतांच गांधींच्या अनुयायांपैकीं बिथरलेला एक पठाण मीर आलम यानें गांधींच्या डोक्यावर आपल्या सोटयाचा प्रहार केला. या प्रहारानें गांधी कोलमडून खालीं पडले व बेशुद्ध झाले. रेव्हरंड व मिसेस डोक यांच्या प्रयत्नानें व शुश्रूषेनें गांधी या अत्याचारांतून बचावले; पण बेशुद्ध पडलेले कर्मवीर गांधी शुद्धीवर आल्यानंतर महात्मा गांधी झाले. स्वबांधवांच्या व स्वतःच्या अनुयायाच्या प्रहारांना सहनशीलतेनें तोंड देण्याचा धडा या प्रसंगानें गांधी शिकले व त्यामुळेंच ते महात्मा झाले. गोऱ्या कुंभारानें नामदेवाचें डोकें थोपटून मडकें पक्कें कीं कच्चें हें पाहण्यासाठीं त्याची परीक्षा घेतली व या परीक्षेंत नामदेव संतापल्यामुळें कच्चा ठरला. पण मीर आलमनें आपल्या सोटयानें गांधींच्या डोक्याची परीक्षा घेऊन त्यांची कसोटी लावण्याचें कार्य केलें व शेवटीं या परीक्षेंत उतरलेल्या गांधींचे त्यानें पाय धरले.

### नवी विश्वामित्री सृष्टि

पण कर्मवीर गांधींच्या माहात्म्याचा जो विकास पायरीपायरीनें झाला, तो त्यांना महात्मापद प्राप्त झाल्यानंतर त्याच गतीनें वाढत जाऊन टिकला नाहीं. हिंदी राजकारणांत गांधींच्या कार्याला सूत्रबद्धता प्राप्त होईल असें क्षेत्र त्यांना मिळालें नाहीं. आपल्या माहात्म्याची जाणीव गांधींना विसरतां आली नाहीं, त्यामुळेंच स्वतःचा नवा पंथ व या पंथाचें नवें तत्त्वज्ञान त्यांना निर्माण करावें लागलें व हिंदी राजकारणांतील वेगवेगळ्या अवस्थांतून जातांना आपल्या माहात्म्यालाही त्यांनीं बरोबर चालविलें. गांधींचें माहात्म्य, त्या माहात्म्याला चिकटलेलीं भलींबुरीं वेडें, या वेडांशीं संबद्ध झालेलीं अनेकविध कार्यें व सुधारणा यांची पंचमेळ खिचडी म्हणजे गांधींचें राजकारण. या राजकारणामुळेंच सुसूत्र व तर्कशुद्ध राजकारणाची घडी विस्कटली व राजकारणांत नवें गांधीयुग निर्माण झालें. आपल्या निर्मत्सर व सत्यमय मनोवृत्तीचा परिचय

करून देण्यासाठीं अमृतसरच्या ३४ च्या कॉंग्रेसपर्यंत टिळकांना विरोध करून गांधींनीं सहकाराचा आग्रह धरला, सरकारसाठीं रिक्रूट भरती केली व १९१९च्या अमृतसर–कॉंग्रेसमध्यें मॉंटफर्ड सुधारणांना "निराशाजनक" हें विशेषण लावण्यासही जोराचा विरोध केला. आपली व आपल्या तत्त्वज्ञानाची भूमिका विशद करून तिचें स्पष्टीकरण करण्यासाठीं त्यांनीं टिळकांशीं गीता-वचनांवर एक जाहीर वादसुद्धां केला. पण पंजाबांतील शहारे आणणाऱ्या अत्याचारांमुळें गांधींच्या सहकाराचें एवढ्या वेगानें मतपरिवर्तन झालें कीं, लगेच सहकारपात्र सरकार सैतानी ठरून या सरकाराविरुद्ध गांधींनीं जाहीरपणें बंडाचें निशाण उभारलें. या बंडांत त्यांनीं खिलाफतीच्या चळवळीचाही शिरकाव केला व मुसलमान जात्यंधांचा वाघ चूड दाखवून घरांत आणला. एका वर्षांत स्वराज्य मिळवून देण्याच्या ऐतिहासिक आश्वासनानें त्यांनीं असहकारितेची प्रचंड चळवळ सुरू केली; पण हिमालयाएवढी पहिली चूक झाल्याचें चौरीचौऱ्याच्या अत्याचारानें दाखवून दिल्यामुळें त्यांनीं जेवढ्या आकस्मिकपणें ही चळवळ चालू केली, तेवढ्याच वैतागानें त्यांनीं तिची उत्तरक्रिया केली. गांधींना अटक झाली आणि अटक झाल्यानंतर त्यांनीं आपलें सुप्रसिद्ध ऐतिहासिक भाषण ता. १८ मार्च १९२२ रोजीं अहमदाबादच्या कोर्टांत ज. ब्रूमफील्ड यांच्यापुढें करून त्यांना न्यायासनावरून खालीं येण्याचें अगर आपल्याला जास्तींत जास्त कठोर शिक्षा करण्याचें आव्हान दिलें. महमदअल्लींना गांधींचा अदृश्य संदेश मिळून १९२३ च्या गयेच्या कॉंग्रेसमध्यें सैतानी सरकारावरील अधिकृत बहिष्कार कायम ठेवण्यांत आला. १९२४ मध्यें बेळगांव-कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून गांधींनीं वसाहतीच्या स्वराज्याची मागणी केली; पण साम्राज्यांतून फुटून निघण्याचा हक्क राखून ठेवला. १९२६ मध्यें त्यांनीं अज्ञातवास पत्करला. १९३० मध्यें कायदेभंगाची चळवळ सुरू केली व १९३२ मध्यें ती मागें घेऊन वैयक्तिक जबाबदारीपुरता कायदेभंग मर्यादित केला. रा. टे. परिषदेंतील अपयशामुळें गांधी बिथरले व त्यांनीं मुंबईच्या कॉंग्रेसच्या वेळीं राजकारणांतून अंग काढून घेतलें व खासगी रीतीनें राजकारण चालविलें, तें तहत नव्या राज्यघटनेंत पेंचप्रसंग आणून व या पेंचप्रसंगांतून कॉंग्रेसची मुक्तता करीपर्यंत म्हणजे कालपर्यंत !

## महात्मा कीं मुत्सद्दी ?

राजकारणांतील १७ वर्षांची ही उलाढाल गांधींनीं केली ती त्यांच्या महात्मपदाच्या जाहीर तत्त्वांना अनुरूप व पोषक आहे काय असा प्रामाणिक संशय बऱ्याच विरोधकांना आहे व या संशयाचीं अनेक कारणेंही देतां येण्याजोगीं आहेत. गांधी हे मुरब्बी मुत्सद्दी आहेत अशी गांधींच्या महात्म्याला कमीपणा आणणारी कबुली सुप्रसिद्ध ब्रिटिश मुत्सद्दी लॉइड जॉर्ज यांनीं मुंबईला भेट दिली त्या वेळीं केलेल्या भाषणांत दिली. गांधींना सत्तेची अमर्याद लालसा आहे असा आरोप त्यांच्यावर करण्यांत येतो व तो खरा आहे कीं नाहीं हें पाहण्यासाठीं त्यांनीं रा. टे. परिषदेंत केलेली धडपड व डॉ. आंबेडकरांनीं या परिषदेंत अस्पृश्यांच्या पुढारीपणाचा हक्क स्वतःकडे घेऊन गांधींना डिंवचल्यावर परिषदेवर त्यांनीं घातलेला बहिष्कार, आणि नंतर प्राणांतिक उपोषणाचा निकराचा बाण काढून आततायीपणानें घडवून आणलेला. करार हे प्रसंग· पाहावे. राजप्रतिनिधींशीं बरोबरीच्या नात्यानें मुलाखती मागण्याचा गांधींनीं घेतलेला ध्यास व रा. टे. परिषदेंत इतर प्रतिनिधींचा सरकारनियुक्त प्रतिनिधि म्हणून केलेला उपहास ह्या दोन्ही गोष्टींचाही कार्यकारणभाव त्यांच्या अधिकारलालसेमध्यें उठून दिसतो. दिखाऊ यश संपादन करण्यासाठीं त्यांनीं उपवासाच्या आत्मशुद्धीचा मार्ग पत्करला; पण दिल्ली येथें हिंदु-मुसलमान ऐक्यासाठीं त्यांनीं केलेला उपवास कागदी ऐक्यापलीकडे विशेष मोलाचा ठरला नाहीं. रा. टे. परिषदेला जाण्याची गांधींची इच्छा नव्हती, पण वर्किंग कमिटीनें सक्ती केल्यामुळें या परिषदेसाठीं गांधींना जावें लागलें. परंतु या परिषदेनें गांधींचा दुबळेपणा जगजाहीर केला. आपल्या दुबळेपणाची जाणीव गांधींना असल्यामुळेंच नाइलाजानें परिषदेंत भाग घेण्याचें दिव्य त्यांना करावें लागलें. ह्या सर्व गोष्टी गांधींच्या अधिकारलालसेच्याच द्योतक नाहींत काय ?

## दिशाभूल

गांधींच्या अधिकारलालसेप्रमाणेंच त्यांच्या मुत्सद्दीपणाचे कांहीं दाखले देतां येतील. रौलट ॲक्ट मंजूर झाल्यानंतर सरकारी कायदे मोडण्यासाठीं गांधींनीं

'सत्याग्रही' हें पत्र सायक्लोस्टाइलवर काढून मुंबईस वांटलें व आक्षिप्त पुस्तकांचीही विक्री केली. गांधींच्या या कायदेभंगानें जनता दिपून गेली; पण वस्तुतः हा कायदेभंग झाला नव्हता. सत्याग्रही पत्राच्या पहिल्या अंकांत सरकारविरुद्ध कायदेभंगाचा उद्देश गांधींनीं जाहीर केला व "The editor is liable at any moment to be arrested by the Government" अशी वाचकांना भीति घालून आपल्या कायदेभंगाबद्दल वाचकांच्या मनांत असलेला संशयही दूर करून जनतेचें लक्ष आपल्या अपेक्षित अटकेकडे वेधलें. उघड उघड कायदेभंगाचा देखावा त्यांनीं निर्माण केला. जनतेच्याही लक्षांत कायद्यांतील कमकुवतपणा येणें शक्य नव्हतें. त्यामुळें अखेर गांधींना अटक झाली नाहीं व सरकार गांधींना वचकलें हा आभास निर्माण झाला. मुंबई सरकारचे ॲड्व्होकेट जनरल सर थॉमस स्ट्रॅंगमन गांधींच्या या शिताफीबद्दल म्हणतातः—

**"I have come across remarkable instances of ingenuity in India; none was more striking than this."**

छापील वृत्तपत्रांवर जें कायदेशीर बंधन पडत होतें, तें सायक्लोस्टाइलनें छापलेल्या गांधींच्या 'सत्याग्रही' या पत्रकावर पडत नव्हतें, त्याप्रमाणें आक्षिप्त पुस्तकांच्या विक्रीलाही कायदेशीर हरकत येत नव्हती. कायद्यांतील हा कच्चेपणा गांधींनीं चांगलाच ओळखला व त्याचा भरपूर उपयोग करून घेतला. अशा प्रकारच्या कमकुवतपणामुळें साध्या कायद्याचें क्षेत्र सरकारला अपुरें पडून जादा कायदे करावे लागतात; पण जादा कायद्यांचा विषयही चळवळीला चांगलाच उपयोगीं पडतो.

### मुत्सद्दीपणाचे डावपेंच

आतां दुसरा आणखी एक प्रसंग पाहा. दुसरी रा. टे. परिषद् सुरू असतांच इंग्लंडनें सुवर्णपरिमाण सोडलें; इंग्लंड ज्या दिवशीं सुवर्णपरिमाणच्युत झालें, त्याच दिवशीं या नव्या आर्थिक धोरणाची प्रतिक्रिया रुपयावर कशी होईल हें जाणून घेण्यासाठीं सर सॅम्युअल होअर यांनीं गांधींना पाचारण केलें. पण हुंडणावळ व चलन यांचें आपल्यास ज्ञान नाहीं असें सांगून गांधींनीं

पौंड व रुपया यांच्या अन्योन्य संबंधाचा खुलासा ऐकण्याचें नाकारलें; तथापि त्यानंतर दुसऱ्या एका प्रतिनिधीनें ब्रिटिशांच्या या नव्या धोरणामुळें हिंदुस्थानच्या चलनावर परिणाम होईल असें गांधींना सांगतांच दुसऱ्याच दिवशीं गांधींनीं सुवर्णपरिमाण सोडून ब्रिटिशांनीं हिंदुस्थानचा आर्थिक व्यवहारांत वचनभंग केला, असा आरोप ब्रिटिश सरकारावर परिषदेंत केला. गांधी हिंदुस्थानांत आले, त्यानंतरच लौकरच मुदतबंदीच्या मजुरीचें उच्चाटन करण्याचें बिल पं. मालवीय यांनीं इंपीरियल कौन्सिलमध्यें आणण्याची परवानगी मागितली; पण लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनीं ती नाकारली. ही पद्धत नष्ट करण्याचें हिंदुस्थान सरकारनें आधींच निश्चित केलें होतें व १९१० मध्यें कै. गोखले यांनीं आणलेल्या तशा प्रकारच्या बिलाला लॉर्ड हार्डिंज यांनीं मान्यताही दिली होती. पण पं. मालवीय यांचें बिल नाकारल्याचें ऐकतांच गांधींनीं लॉर्ड चेल्म्सफर्ड यांची मुलाखत घेतली व ३१ मेपर्यंत ही पद्धति नष्ट झाली नाहीं, तर सत्याग्रह पुकारावा लागेल अशी जाहीर घोषणाही केली. ३१ मे रोजीं सरकारनें हुकूम काढून ही पद्धत बंद केली. तथापि हें श्रेय सत्याग्रहाच्या घोषणेलाच गांधींनीं दिलें आणि स्वतः सरकारनेंच आंखलेल्या कार्यक्रमाला सरकारनें दिलेलें मूर्त स्वरूप अंधारांत ठेवलें. अशा प्रकारच्या डावपेंचांनीं गांधी मुत्सद्देगिरीचे खेळ खेळले; पण या डावपेंचांचें यश स्वतःकडे घेऊन अपयश मात्र त्यांनीं 'सैतानी सरकार'च्या पदरीं बांधलें !

### मोतिलालजींचें मत

स्वतःवरची जबाबदारी झटकून टाकून आपल्या अपराधांचें खापर दुसऱ्यांच्या डोक्यावर फोडण्याची कला गांधींएवढी दुसऱ्या कोणाही पुढाऱ्याला अवगत झालेली नाहीं. आपल्या चुकांबद्दल सरकारला जबाबदार धरून त्यांनीं आपलें माहात्म्य वाढविलें आणि ज्या वेळीं सरकारावर दोषारोप करणें शक्य झालें नाहीं, त्या वेळीं आपल्या कारभारानें उत्पन्न झालेला गोंधळ निस्तारण्याची जबाबदारी टाळून त्यांनीं तुरुंगवास ओढवून घेतले. दोन ठळक प्रसंगांनीं या विधानाची सत्यता मला दाखवून द्यावयाची आहे. गांधी आपल्याला सहकारवादी म्हणवितात; पण हा सहकार त्यांनीं एका महत्त्वाच्या

प्रसंगीं बुद्धिपुरस्सर टाळलेला आहे. लॉर्ड रीडिंग यांच्या कारकीर्दींत गांधींनीं रा. टे. परिषदेची मागणी केली होती; आणि युवराजांच्या आगमनावर बहिष्कार पडूं नये म्हणून रा. टे. परिषद् भविण्याचें खासगी आश्वासन खासगी भेटींत लॉर्ड रीडिंग यांनीं त्यांना दिलेंही होतें. पुढें १९२९ मध्यें लॉर्ड अर्विन यांनीं रा. टे. परिषदेची घोषणा करून या परिषदेसंबंधीं विचार-विनिमय करण्यासाठीं दिल्ली येथें २३ डिसेंबर १९२९ रोजीं पुढाऱ्यांची खासगी सभा बोलावली होती. ही सभा यशस्वी होऊं नये म्हणून गांधींनीं आपल्या मौनाचा चांगलाच उपयोग करून घेतला. या मुलाखतीमध्यें कोणत्याही प्रकारचा औपचारिकपणा न बाळगतां आपल्याकडून शक्य तेवढी मदत करण्याचें आणि रा. टे. परिषदेस मान्यता दिल्यास सर्वसंमत अशी उभय पक्षांच्या प्रतिनिधींची यादीही करण्याचें खासगी आश्वासन लॉर्ड अर्विन यांच्याकडून देण्यांत आलें होतें. लॉर्ड अर्विन यांच्या सद्धेतूंचा व सदिच्छेचा भरपूर फायदा करून घेण्याच्या इराद्यानें या खासगी भेटीच्या वेळीं मागणीवर सर्व पुढाऱ्यांचें मतैक्य व्हावें म्हणून गांधींबरोबर आगाऊ बोलणें करण्याचा बॅ. जिना, डॉ. तेजबहादूर सप्रू वगैरे पुढाऱ्यांनीं मनोदय प्रकट केला आणि पं. मोतिलाल नेहरू यांनाही ही कल्पना पसंत पडल्यामुळें त्यांनीं व गांधींनीं या विचाराला मान्यता दिली. लॉर्ड अर्विन यांची मुलाखत होण्याच्या आदल्याच दिवशीं ही पुढाऱ्यांची आगाऊ सभा भरणार होती; पण त्याच दिवशीं गांधींनीं ऐन वेळीं आपल्या मौनाला प्रारंभ केला व कोणत्याच प्रकारच्या चर्चेंत भाग घेण्याचें या मौनाच्या सबबीवर नाकारलें. हें मौन लॉर्ड अर्विन यांच्या मुलाखतीला दुसऱ्या दिवशीं १५ मिनिटांचा अवधि शिल्लक राहीपर्यंत टिकलें व त्यामुळें मतैक्य करण्याच्या सर्वच आशा फोल झाल्या. लॉर्ड अर्विन यांची भेट झाल्यानंतर ३१ डिसेंबरपर्यंत वसाहतीचें स्वराज्य पदरांत टाकण्याची अशक्यप्राय व पोरकट अट गांधींनीं पुढें केली. एका वर्षांत स्वराज्य मिळवून देण्यांत अपयश पावलेल्या गांधींनीं लॉर्ड अर्विन यांच्या सदिच्छेची पर्वा न करतां ही निकराची अट त्यांना घातली व अर्थातच ही मुलाखत अपेशी ठरली. लाहोरच्या काँग्रेसनें त्यानंतर गांधींचा पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पास करून तडजोडीच्या सर्व आशांवर पाणी ओतलें. हा सहकार कीं सहकाराचें ढोंग ?

गांधींचा १९२२ चा तुरुंगवास, अगर पूर्ण स्वातंत्र्याच्या ठरावानें अडलेल्या राजकीय प्रगतीचा दोषारोप टळावा म्हणून दांडीयात्रा काढून त्यांनीं स्वतःवर ओढवून घेतलेला १९३० सालांतील तुरुंगवास गांधींच्या या धूर्तपणाचाच द्योतक आहे. कै. पं. मोतिलाल नेहरू यांनीं गांधींच्या माहात्म्याखालीं दडलेला हा कुटिल व्यवहार चांगलाच पारखला होता.

**एका खासगी भेटीच्या वेळीं बॅ. जयकर व पं. मोतीलाल यांचें गांधींच्या विरोधाबद्दल बोलणें निघालें असतां, " आमच्या स्वराज्य सरकारच्या करांना गांधींनीं विरोध केला, तर ब्रिटिश सरकार त्यांना ज्या ठिकाणीं नेऊन ठेवण्यास धजलें नाहीं अशा ठिकाणीं आम्हीं त्यांना नेऊन ठेवूं."** असें उत्तर पं. नेहरूंनीं देऊन स्वतःबाबत गांधीमाहात्म्याचा जयकरांना वाटत असलेला बुडबुडा फोडून टाकला.

आणखी कांहीं प्रसंग

या बोटावरची थुंकी त्या बोटावर करून वेळ मारून नेण्याचे प्रसंगही गांधींच्या आयुष्यांत कमी उत्पन्न झालेले नाहींत. बॅ. सावरकर यांच्या सुटकेच्या अर्जावर सही न देण्याचा त्यांनीं केलेला तर्कदुष्ट खुलासा सुप्रसिद्धच आहे. सावरकर यांची सुटका नव्या घटनेंत अधिकारारूढ होणारें कोणतेंही सरकार करील म्हणून आपल्याला त्या अर्जावर सही करण्याची आवश्यकता भासली नाहीं, असा खुलासा पेंचप्रसंग निर्माण करून नव्या सरकारच्या अस्तित्वाला शह देणाऱ्या गांधींनीं केला व हा खुलासाही यासंबंधानें उठलेल्या वादांतील पहिला खुलासा नव्हता, तर पश्चात् विचारानें तयार केलेला नंतरचा खुलासा होता.

रा. टे. परिषदेहून परत येत असतां हिंदुस्थानांत गेल्यावर कायदेभंगाची चळवळ पुनः जोरानें सुरू करण्याची इच्छा सिनोर गायडा यांच्या 'जर्नल द इतालिया' या पत्राच्या बातमीदाराला दिलेल्या मुलाखतींत गांधींनीं व्यक्त केली होती. गांधींनीं ही मुलाखत दिली कीं नाहीं हें गूढच आहे. पण ही मुलाखत नाकारण्याची गांधींनीं शिकस्त केली. तथापि गांधींच्या नकारावर पाश्चात्य जनतेचा विश्वास बसला नाहीं. गांधींचा सत्याबद्दलचा लौकिक या मुलाखतीची संशयनिवृत्ति करण्यास उपयोगीं पडला नाहीं.

**आणि जोंपर्यंत गांधींबरोबर त्या वेळीं असलेल्या सरोजिनी नायडू यांनीं या मुलाखतीचा जाहीर इन्कार केलेला नाहीं, तोंपर्यंत हा संशयही कायम राहणार.**

टिळक स्वराज्य फंड

गांधींच्या अशा लपवाछपवीच्या धोरणाचा पाढा वाचतांना टिळक स्वराज्य फंडाच्या कारभाराबाबत गांधींनीं स्वीकारलेल्या मौनाचाही उल्लेख करणें अवश्य आहे. १ कोटीचा हा अवाढव्य फंड फंडगुंडांनीं गिळंकृत केला; पण अनुयायांच्या अपवित्रतेची निष्ठुरपणें चिरफाड करणाऱ्या गांधींनीं या फंडगुंड-गिरीवर प्रकाश पाडण्यासाठीं अगर गुंडांचा दंभस्फोट करण्यासाठीं कोणतेच उपाय योजले नाहींत. व्यवहारांत शिथिल असल्याचा दोषारोप करून या फंडाच्या कारभारांत गांधींनीं महाराष्ट्रीयांना शिरकाव करूं दिला नाहीं ही गोष्ट बॅ. जयकर यांनीं सातारा येथें वेस्टर्न इंडिया या विमा कंपनीच्या वार्षिक सभेच्या वेळीं कांहीं वर्षांपूर्वी केलेल्या सुप्रसिद्ध अध्यक्षीय भाषणांत जाहीर केली; पण या भाषणानें वाद पेटूनही गांधींचा खुलासा मात्र बाहेर आला नाहीं. गांधींच्या विसंगतीचें आणखी एकच ठळक उदाहरण दाखवावयाचें म्हणजे सर्वाधिकारित्वाचा त्यांनीं केलेला निषेध व या निषेधाला विरोधी असें होणारें त्यांचें स्वतःचेंच आचरण हें होय. रा. टे. परिषदेहून परत आल्या-नंतर सर सॅम्युअल होअर यांना पाठविलेल्या पत्रांत गांधी म्हणतात:

"My whole being rebels against the idea that in a system called democratic, one man should have unfettered power of affecting the destiny of an ancient people three hundred million."

लोकशाहीच्या नांवाखालीं एकाच व्यक्तीनें लाखों प्रजेवर सत्ता गाजविण्याच्या पद्धतीविरुद्ध गांधींचें मन बंड पुकारतें आणि याच लाखों प्रजेच्या भवितव्याशीं दुराग्रहीपणें खेळ खेळून त्यांच्या एकमेव प्रतिनिधित्वाचें बिरूद मिरविण्यांत गांधींना आनंद वाटतो. या बंडखोरीची कारणचिकित्सा कशी करतां येईल ?

व्यक्ति आणि विसंगति

राजकीय विसंगतीप्रमाणें गांधींच्या चरित्रांत वैयक्तिक विसंगतीचींही कांहीं उदाहरणें आढळून येतात. आपल्या मतांचा करडेपणा त्यांनीं इतरांच्या बाबतींत दाखविला. निसर्गोपचारपद्धतीवर गांधींचा पूर्ण विश्वास आहे. दक्षिण आफ्रिकेंत त्यांनीं एका ॲपेंडिसायटिसच्या रोग्याला उपवासानें व आहार बदलण्यास सांगून रोगमुक्त केलें. कस्तुरबाईंची अवस्था मरणोन्मुख झाली असतां डॉक्टरनें त्यांना "बीफ टी" दिला म्हणून संतापून गांधींनीं कस्तुरबाईंना दुसरीकडे हालविलें व "वाटेंतच त्यांचें प्राणोत्क्रमण होईल" असें डॉक्टरनें बजावून सांगितलें असतांही आपल्या वैदूगिरीच्या प्रयोगासाठीं कस्तुरबाईंच्या जिवावर उदार होऊन आपला हट्टाग्रह त्यांनीं पुरा केला. त्यांच्या मुलाला आगबोटीवर धक्का लागल्यामुळें त्याचें दुखावलेलें हाड बोटीवरच्या खलाशानें बांधून त्याची शुश्रूषा केली; पण गांधींना तें आवडलें नाहीं. त्यांनीं मुलाच्या दुखऱ्या हाताचें बॅंडेज खस्‌कन्‌ ओढून सोडलें व त्यावर चिकणमाती थापली! गांधींच्या वैद्यकीय प्रयोगांत एका लहान मुलाची हत्या होण्याचाही प्रसंग आला होता. मिसेस पोलॉक यांचें तान्हें अर्भक आजारी असतां गांधींनीं त्याच्या डोक्यावर चिकणमाती थापली. पण या अत्याचारामुळें तें किंचाळून आंचके देऊं लागतांच मिसेस पोलॉक यांचें अंतःकरण कळवळलें व त्यांनीं गांधींना झिडकारून चिकणमातीचें प्लॅस्टर काढून टाकलें व आपल्या पाश्चात्य वैद्यकीनें त्याला बरें केलें. स्वतःच्या व इतरांच्या मुलांबाळांच्या व मृत्यूच्या दारांत पडलेल्या आपल्या पत्नीच्या जीवांना स्वतःच्या तत्त्वासाठीं कःपदार्थ लेखणाऱ्या आणि "पाश्चात्य वैद्यकीय नीतिमत्ते"चा निषेध करणाऱ्या गांधींनीं १९२४ मध्यें स्वतःचा आजार बळावल्यावर ऑपरेशनला आणि तेंही कर्नल मॅडॉक यांच्यासारख्या गोऱ्या सर्जनच्या हातून करून घ्यावयास मान्यता दिली!! हा चमत्कार कसा झाला? गांधींच्या या विलक्षण मतांतराबद्दल त्यांना स्नेह्यानें छेडल्यावर गांधींनीं उत्तर दिलें:

**"I plead guilty; unfortunately for me I am far from perfect. I am simply a humble aspirant for perfection. I know my way to it also. But knowing the way is not reaching the end!"**

चुका कबूल करून, पुढेंही चुका करण्याचा मक्ता स्वतःकडे कायम ठेवणें हें जर महात्मापणाचें लक्षण असेल, तर गांधींच्या प्रांजलपणामुळें त्यांना महात्मा म्हणावयास मुळींच हरकत नाहीं.

### नीला नागिणीची धिंड-पण—

विशुद्ध चारित्र्यावर गांधींचा कटाक्ष आहे; पण, त्यांतसुद्धां गांधींनीं पक्षपात व स्त्री-पुरुष हा भेदभाव दाखविलेला आहे. दक्षिण आफ्रिकेंतील टॉलस्टॉय फार्मच्या गांधींच्या वसाहतींत एका तरुण स्त्रीचें वांकडें पाऊल पडलें. गांधींच्या नजरेला हा प्रकार आल्यावर त्यांनीं त्या स्त्रीला उपवास करण्यास लावून तिचें केशवपन करविलें व तिच्या पापाचें तिला प्रायश्चित्त दिलें; परंतु या स्त्रीच्या भागीदाराला गांधींनीं कोणतें शासन केलें हें कळण्यास मार्ग नाहीं. एवढेंच कशाला ? १९३३ मध्यें गांधींची कुप्रसिद्ध शिष्या नीला नागिणी हिच्या अनैतिक वर्तनाचें प्रायश्चित्त घेण्यासाठीं गांधींनीं पर्णकुटींतील आपला सुप्रसिद्ध उपवास केला. नीला नागिणीचें मुंडण करून त्यांनीं तिला उपवास घडविला आणि तिला कांहीं दिवस कडक बंदोबस्तांत व पाहाऱ्यांत ठेवलें. एका अबलेच्या अब्रूचे गांधींनीं असे निर्दयपणें व जाहीरपणें धिंडवडे काढले; पण नीला नागिणीभोंवतीं घोटाळून, तिला विळखा घालणाऱ्या ज्या ६० शिष्यवरांची यादी नागिणीनें त्यांना दिली होती, त्या हरिजनोद्धारक शिष्यांपैकीं एकाच्याही नांवाची वाच्यता गांधींनीं कां केली नाहीं ? अगर नागिणीबरोबर हरिजनोद्धारांत गुंतलेले आपल्या चिरंजीवांकडून या प्रकरणीं खुलासा विचारून तो जाहीर कां केला नाहीं ?

### गांधींचे कलह

गांधींच्या राजकीय माहात्म्याची चिकित्सा करतांना कै. टिळक व डॉ. आंबेडकर यांच्याशीं झालेल्या त्यांच्या कलहप्रसंगांच्याही तपशिलांत शिरलें पाहिजे. मॉंटफर्ड सुधारणा समाधानकारक नसल्या, तरी अगदींच त्याज्य व टाकाऊ नाहींत असें टिळकांचें मत बनलें होतें. गांधींच्या जाहीर असहकारानें राजकारणांत फूट पडून ही चळवळ नव्या सुधारणांच्या मुळावर येऊं नये या हेतूनें गांधींशीं युक्तिवाद करून त्यांना वळविण्याचा निकराचा प्रयत्न

टिळकांनीं केला, व त्यांच्याशीं शिष्टाईही केली; पण आपलें माहात्म्य प्रस्थापित करण्यासाठीं आतुर झालेल्या गांधींनीं टिळकांच्या युक्तिवादाला भीक घातली नाहीं. या कलहानेंच महाराष्ट्राच्या सलंग राजकारणांत पुढें दोन तट पडले. आणि टिळकांनाही जबरदस्त धक्का बसला. मृत्युशय्येवर पडलेल्या टिळकांच्या मनांत अखेरच्या घटकेपर्यंत गांधींच्या अविचारी संकल्पाचेच विचार घोळत होते व त्यांचे अखेरचे शब्दही 'हा अविचार करूं नका' अशी गांधींना विनंति करण्यासाठींच बाहेर पडले.

डॉ. आंबेडकर यांच्याशीं झालेल्या कलहांत मात्र डॉ. आंबेडकरांनीं त्यांना आपला चांगलाच प्रभाव दाखविला. डॉ. आंबेडकरांनीं गांधींचें माहात्म्य दुसऱ्या रा. टे. परिषदेंत नाकारल्यामुळें गांधींच्या भावना चांगल्याच दुखावल्या. हिंदुस्थानांत कधींच समोरासमोर न आलेले डॉ. आंबेडकर व गांधी रा. टे. परिषदेंत प्रथमच समोरासमोर आले होते. डॉ. आंबेडकरांच्या निर्भय व खंबीर तत्त्वनिष्ठेचा याच प्रसंगानें गांधींना परिचय झाला. रा. टे. परिषदेंत डॉ. आंबेडकरांना शह देऊन नेस्तनाबूद करण्यासाठीं मुसलमान गटाशीं सख्य करून त्यांना कोरा चेक देण्याचीही तयारी गांधींनीं दाखविली; पण ना. आगाखान यांनीं या लाजिरवाण्या कारस्थानांत भागिदारी पत्करण्याचें नाकारून गांधींच्या माहात्म्यावर दडपण घातलें. ह्या अपमानाची जाणीव बाळगून डॉ. आंबेडकरांच्या निर्भय वृत्तीचा पुरता ठाव पाहण्यासाठीं १९३२ च्या प्राणांतिक उपवासानें त्यांनीं डॉ. आंबेडकरांविरुद्ध लोकक्षोभाचा एकच डोंब उठवून दिला. पण डॉ. आंबेडकर हे निश्चल राहिल्याचें पाहतांच, **"माझे प्राण तुमच्या हातीं आहेत; मला वांचवा अगर मारा"** अशी दीनवाणी गांधींनीं त्यांच्याजवळ उच्चारून आपल्या अपयशाची कबुली दिली! आपल्या माहात्म्यानें गांधींना ज्यांना दिपवून टाकतां आलें नाहीं, असे हिंदुस्थानांत डॉ. आंबेडकर हे एकच एक पुढारी आहेत.

### अनेक वेडें

गांधींचें वैयक्तिक व राजकीय माहात्म्य, त्यांचीं अनेक वेडें व दुराग्रहीपणा, यांची खिचडी अशा प्रकारें त्यांच्या खासगी व जाहीर चरित्रांत झाल्यामुळें त्यांचा एक ठराविक संप्रदाय तयार झालेला नाहीं अगर या संप्रदायाची

शिष्यमालिकाही गांधींना निर्माण करतां आलेली नाहीं. हें गांधींचें एक मोठेंच अपयश आहे. गांधी सहकारी आहेत; गोऱ्यांचे स्नेही आहेत; लॉर्ड चेल्मसफर्ड, लॉर्ड रीडिंग, लॉर्ड अर्विन, लॉर्ड विलिंग्डन व लॉर्ड लिन्‌लिथगो या पांचही व्हाइसरॉयांच्या मुलाखती मिळवून व मागून त्यांनीं गोऱ्यांबद्दल आपला सद्भाव प्रकट केला. जेथें मागितलेल्या मुलाखती मिळाल्या नाहींत, तेथें ही गोष्ट आपल्या माहात्म्याचा अपमान समजून त्यांनीं डोक्यांतही राख घातली. मुंबईचे हंगामी गव्हर्नर सर हेन्री लॉरेन्स यांनीं १९२४-२५ मध्यें त्यांना महाबळेश्वर मुक्कामीं निमंत्रण पाठविल्याबरोबर ते तांतडीनें धावून गेले व गोऱ्या अधिकाऱ्याबरोबर सद्भावाचें नातें प्रस्थापित करण्याची संधि त्यांनीं तत्परतेनें साधली. गोऱ्या अधिकाऱ्यांप्रमाणेंच गोऱ्या अनुयायांशीं संबंध जुळविण्यांत व गोऱ्या पत्रांच्या बातमीदारांना महत्त्वाच्या बातम्या प्रथम मिळूं देण्यांत गांधींनीं गोऱ्यांबद्दल वाटणारा आपला प्रेमभाव प्रकट केला.

यासंबंधांत गांधींच्या पक्षपाताची एक आठवण मला देतां येईल. १९३३च्या उपवासापूर्वी गांधींची मुक्तता झाल्यावर त्यांना पर्णकुटीवर नेण्यांत आलें. त्या वेळीं त्यांनीं टाइम्सच्या बातमीदाराला अगत्यपूर्वक बोलावून घेऊन त्याची प्रथम चौकशी केली. याच सुमारास एका प्रसंगीं फ्रीप्रेसनें अ. प्रे. च्या पूर्वी मिळविलेली एक बातमी तारेनें अगोदर पाठविल्यामुळें गांधी संतापले व त्यांनीं ती बातमी तारेनें रद्द करण्यास सांगून अ. प्रे. खेरीज अधिकृत बातम्या कोणालाही प्रथम मिळूं नयेत असा बंदोबस्त केला ! ! याच उपवासाच्या वेळीं त्यांनीं तुरुंगांत हजर असलेल्या देशीपरदेशी पत्रकारांतून, ऑस्ट्रेलियन वृत्तपत्राच्या एका गोऱ्या प्रतिनिधीचीच फक्त स्वतः मुद्दाम उठून वास्तपूस केली व त्याच्या पाठीवर हात फिरवून त्याला अंजारून गोंजारून, आपल्यातर्फे प्रचार करण्याची त्याला विनंति केली. हिंदी वृत्तपत्रकारांबद्दल गांधी अनादर व तुसडेपणा दाखवितात म्हणून या आठवणी मी मुद्दाम देत आहें.

गांधींचा अंगद रेजिनॉल्ड रेनॉल्डस्, त्यांच्या शिष्या मिराबाई, मार्गारेट स्पीगेल, नीला नागिणी यांचें माहात्म्य गांधींच्या सान्निध्यानेंच वाढलें. एकीकडे गोऱ्यांबद्दल त्यांनीं स्नेहभाव प्रकट केला, तर दुसरीकडे सद्भावसंपन्न ब्रिटिश अधिकाऱ्यांचा प्रामाणिक सल्ला झिडकारून व त्यांना डोईजड अटी घालून

गांधींनीं ह्या सद्भावाची हिंदुस्थानच्या प्रगतीला जोड मिळवून देण्याचे प्रसंग पिटाळून लावले. गांधी गरिबांचे स्नेही आहेत; पण धनिकांची सहानुभूति व त्यांचा पैसा यांच्यांतून हा स्नेह वस्त्रगाळ करण्यांत येतो असा त्यांच्यावर आरोप करण्यांत येतो. गांधी सहिष्णु आहेत, पण परपक्ष व परपक्षीय यांच्याशीं सहकार्य करण्याचे प्रसंग आले असतां त्यांच्या या सहिष्णुत्वाची प्रचीति कृतींत उतरल्याचें आढळांत नाहीं. परपक्षीयांवर, विशेषतः दुर्दैवी अत्याचारी कैद्यांवर दया दाखविण्याच्या प्रसंगींही त्यांना कोंडींत पकडून गांधींच्या अनुयायांनीं त्यांच्याकडून मतांतराच्या कबुल्या आधीं मागून घेतल्या. सहिष्णुतेचा हा विजयच म्हणावयाचा काय ? गांधी मजुरांचे नेते आहेत, पण यंत्रयुगाचे द्वेष्टे आहेत आणि अल्पसंतुष्टपणाच्या त्यांच्या तत्त्वज्ञानामुळें त्यांच्या प्रयत्नानें मजुरांना सुस्थिति प्राप्त होण्याची अगर मजुरांचा लढा भांडवलशाहीविरुद्ध निकरानें लढला जाण्याची शक्यताही मजुरांच्या निसर्गसिद्ध पुढाऱ्यांना वाटत नाहीं. याचें एकच प्रत्यंतर म्हणजे अहमदाबादच्या मजुरांना त्यांनीं केलेला उपदेश हें होय. १९३२ सालीं गांधींना अटक होण्यापूर्वीं कांहीं तास अहमदाबादच्या मजुरांना उद्देशून त्यांनीं गुजरातींत एक पत्र लिहिलें होतें. हें गांधींचें पत्र अहमदाबादच्या गिरणीमालकांनीं त्या पत्राचा ब्लॉक करून तेथील वृत्तपत्रांत प्रसिद्ध केलें, व जाहीर पत्रकें काढून वांटलें. या पत्रांत " मालकांचेंच ऐका, त्यांच्यावर विश्वास ठेवा, ते तुमचे कल्याणकर्ते आहेत " असा उपदेश होता. अहमदाबादच्या गिरणीमालकांची रखवालदारी गांधींनीं पत्करल्यामुळें गांधींच्या चळवळीमुळें त्यांचा भरपूर फायदा झाला, आणि त्यांचीं कुलंगडींही शाबूत राहिलीं; आणि हीं कुलंगडीं फॅक्टरी इन्स्पेक्टरनीं काढून मजुरांच्या हितरक्षणाचा धडा मालकांना शिकविला नसता तर तशींच कायम राहिलीं असतीं. गांधी संस्थानी प्रजेचेही हितकर्ते आहेत; पण भोपाळच्या नबाबांना त्यांनीं रामराज्याचें शिफारसपत्र देऊन ठेवलें आहे. रा. टे. परिषदेंत कै. गणपतराव अभ्यंकर व श्री. अमृतलाल शेठ हे संस्थानी प्रजेचे प्रतिनिधि संस्थानी प्रजेचें गाऱ्हाणें मांडण्यासाठीं गेले असतां गांधींनीं या पुढाऱ्यांना कसें वागविलें हें **सौराष्ट्र** पत्राच्या अंकांतून त्या वेळीं प्रकट झालेलेंच आहे. ब्रिटिश मुलांबाळांशीं खेळण्यांत गढल्यामुळें हे संस्थानी प्रतिनिधि गांधींच्या मुलाखतींनाही महाग झाले होते.

गांधी शांततावादी आहेत हें निर्विवाद आहे. पण शांततावादी प्रचंड चळवळीनंतर फुकट गेलेल्या त्यागाला, आणि गलितोत्साह झालेल्या तेजाला योग्य दिशा गांधींना दाखवून देतां न आल्यामुळें दांभिकपणालाच या चळवळीनें उत्तेजन मिळालें. गांधींचा राजकीय शांततावाद हा सांचलेल्या पाण्याप्रमाणें गतिशून्य आहे. आणि त्यामुळें चळवळीच्या उष्णतेनें हें पाणी सुकल्यावर त्या ठिकाणीं कृमिकीटक व मच्छरच घोंघावूं लागल्याचें दिसून आलें. Roads to Freedom या पुस्तकांत बर्ट्रांड रसेल लिहितो:

**"The revolt against law naturally leads except in those who are controlled by a real passion for humanity, to a relaxation of all the usually accepted moral rules, and to a bitter spirit of retaliatory cruelty out of which good can hardly come."**

गांधींच्या कायदेभंगाच्या चळवळीनंतर ह्याच उद्गारांची सत्यता अनुभवास आलेली नाहीं काय? बहुजनसमाजावर अशा चळवळींचा जो परिणाम होतो, त्याच प्रकारची प्रतिक्रिया स्वार्थी व लब्धप्रतिष्ठित पुढाऱ्यांवरही होते. अशा पुढाऱ्यांचें "*very useful to the police and the press, unsteady in intellect and of weak moral principle*" या शब्दांनीं व *purchasable* या विशेषणानें मि. वेल्हिंग्टन यांनीं वर्णन केलें असून तें गांधी-संप्रदायांतील छोट्या छोट्या अनेक पुढाऱ्यांना तंतोतंत लागू पडतें. गांधी-अर्विन कराराच्या वेळीं १९३१ च्या मार्च महिन्यांत सप्रू-जयकर हे शांतिदूत पुनः समेटाची खटपट करीत असतां वर्किंग कमिटींतील चर्चेची माहिती देण्यासाठीं ते लॉर्ड अर्विन यांच्याकडे गेल्यावर वर्किंग कमिटीच्या गुप्त सभेंत काय ठरलें हें सांगणाऱ्या तपशिलाचा कागद लॉर्ड अर्विन यांनीं सर तेजबहादूर सप्रू यांच्यासमोर धरून त्यांना चकित केलें होतें, हा प्रसंग पुष्कळ वाचकांच्या स्मरणांत असेल! वर्किंग कमिटींत झालेली 'गुह्यात गुह्यतरम्' अशा प्रकारची तपशिलवार चर्चा लॉर्ड अर्विन यांच्या टेबलावर कशी जाऊन पडली? या प्रश्नाचें उत्तर purchasable या शब्दानें देतां येईल! गांधींच्या विश्वासू सहकाऱ्यांच्या शीलाबद्दल व विश्वासपात्रतेबद्दल जेथें शंका घेण्यास अशा प्रकारच्या प्रसंगांनीं जागा मिळते, तेथें इतर शेंकडों भुरट्या पुढाऱ्यांच्या दानतीबद्दल तरी निर्वाळा कसा देतां येईल?

## गांधींचें कार्य

तथापि गांधींच्या प्रकृतिविकृतीचे हे अनेक गुणदोष कठोरपणें पारखले, तरी गांधींनीं बहुजनसमाजाला निर्भयपणाचे धडे शिकविले व उतावळ्या बंड-खोरांना अविचारापासून थोपवून धरण्यासाठीं पराकाष्ठा केली ह्याबद्दल कोणा-चेंही दुमत असणें शक्य नाहीं. गांधी-अर्विन करार करतांना गांधी लॉर्ड अर्विन यांच्या आहारीं गेले व चळवळीच्या यशावर त्यांनीं विरजण पाडलें, ह्याबद्दल त्यांच्या सहकाऱ्यांनीं त्यांना दोष दिला, तरी या करारानें प्रस्थापित झालेल्या शांततेला उपसर्ग पोंचूं नये म्हणून त्यांनीं निर्वाणीचे प्रयत्न केले हेंही तेवढेंच खरें. आत्यंतिक विचारसरणीच्या अनुयायांचें समाधान करण्यासाठीं आपल्या इच्छेविरुद्ध अधिक जहालपणा त्यांना धरावा लागला; पण हा जहाल-पणा स्वीकारल्यावांचून त्यांना स्वपक्षीयांतील दुफळी टाळतां आली नसती. अशी दुफळी उत्पन्न होण्याचा ताजा प्रसंग नव्या घटनेच्या प्रारंभींच आला होता; पण ती टाळण्यासाठीं गांधींना पेंचप्रसंग निर्माण करून या पेंचप्रसंगाचें वैय्यर्थ्य नंतर स्वतःच पटवून द्यावें लागलें. गांधींच्या अनेक हिमालया-एवढ्या चुकांची भरपाई मात्र या चतुरपणानें करून दिली आहे.

## हरिजनकार्य

गांधींच्या अनेकविध कार्यांपैकीं त्यांच्या कोणत्या कार्याची मुक्तकंठानें स्तुति करावयाची झाली, तर ती हरिजन–उद्धारासाठीं त्यांनीं केलेल्या प्रामा-णिक परिश्रमांचीच केली पाहिजे. हरिजनांचा उद्धार व अस्पृश्यतानिवारण हा प्रश्न डॉ. आंबेडकरांएवढाच गांधींनाही जिव्हाळ्याचा वाटतो. अस्पृश्यांचे आपणच एकमेव प्रतिनिधि आहों असा आग्रह गांधींनीं धरला व डॉ.आंबेड-करांच्या मार्गाशीं सहमत न होण्याचा दुराग्रह दाखविला, तरी त्यामुळें त्यांच्या प्रामाणिकपणाला बाध येत नाहीं. अस्पृश्यतानिवारणाला राजकीय महत्त्व येण्यापूर्वींपासूनच गांधींनीं अस्पृश्यांबद्दल सक्रिय सहानुभूति दाख-विण्यास प्रारंभ केला व अस्पृश्यांची मनोभावें सेवाशुश्रूषा केली. गांधींचें हें हरिजनप्रेम किती निर्मळ व अहंभावातीत आहे याचें एक सुंदर दृश्य बॅ. जयकर यांना गांधींच्या सत्याग्रहाश्रमांत दृष्टीस पडलें. गांधींच्या आश्रमां-

तील एक अस्पृश्य बालिका तोंडांत उकडलेला बटाटा घेऊन आली आणि "तुम्हाला हा बटाटा पाहिजे तर तुम्ही तोंडाबाहेर असलेला अर्धा भाग चावून काढा" असें ती त्यांना म्हणाली. गांधींना कोणत्याच प्रकारचा संकोच वाटला नाहीं. त्यांनीं त्या मुलीच्या बालिशपणाचें कौतुक करून तिच्या तोंडांतील भाग चावण्यासाठीं आपलें तोंड उघडलें आणि ते तो भाग चावणार असें दिसतांच ती मुलगी पळून गेली. एवढी सलगी व निःसंकोचवृत्ति प्रेमळ व निर्मळ अंतःकरणाखेरीज इतरत्र प्रतिबिंबित होणार नाहीं. गांधींच्या दौऱ्यामुळें आणि पुणेंकरारानंतर त्यांनीं स्थापन केलेल्या हरिजनसेवासंघानें अस्पृश्यतेच्या प्रश्नाला न भूतो न भविष्यति अशी चालना दिली व ही जागृति मात्र अल्पजीवि ठरली नाहीं. गांधी हे उच्चवर्णीय स्पृश्य पुढाऱ्यांपैकीं अस्पृश्यांचे एकच एक व खरेखुरे हितचिंतक आहेत. गांधींचें राजकारण कांहीं वर्षांनीं पुसट होईल, त्यांच्या खादी–चरख्याचें वेडही स्मृतिशेष होईल, पण त्यांच्या हरिजन–उद्धाराच्या कार्याला रसाळ फळें येऊन ह्या सेवेची स्मृतीच चिरकाल कायम राहील. स्वातंत्र्यदाता वीर या जयघोषापेक्षां दलित मानवजातीचा साहाय्यक व उपकारकर्ता हे धन्यवादच कोणाही महात्म्याच्या माहात्म्याला शोभादायक वाटणार नाहींत काय?

विविध वृत्त, ता. ३ ऑक्टोबर १९३७

म.ग्रं.सं. ठाणे.



# वल्लभभाई पटेल



" अगर अपनी तरफ के आदमी इस तरह घटते गये तो हमारा पक्ष बहुत कमजोर हो जायगा. मैं नहीं समझता की इस मंथन से क्या लाभ है ?"

**राजगुरु**—श्रीचंडिकेकी इच्छा ! मंथन के नामसे मुझे याद आया. पहिले जमानेमें एक बार समुद्र मथा गया था. उसका ध्यान करो. लढते लढते देवताओका पक्ष बहोत कमजोर हो गया था. कितनेही देवता बलिदान हो गये थे, फिर वे निराश नहीं हुए और समुद्रसे अमृत निकालनेकी बराबर कोशिश करते रहे. तो भाइयो ! हमे भी अपनी ताकद बढानेके लिये मंथन करनाही चाहिये. अमृत पीकर अमर होने की आशाने पहिले हलाहल पीनाही पडेगा. हमारे इस मंथनसे निश्चयही धर्म अमर हो जायेगा. श्रीचंडिकेकी इच्छा ऐसीही है. चिंता न करो ! "

प्रभातचा **अमृतमंथन** हा बोलपट पाहून आल्यानंतर माझा व माझ्या स्नेह्याचा या बोलपटावर कडाक्याचा वाद झाला. या बोलपटांतील राजगुरु हा खलपुरुष असून त्याचा नाश झाला तो अस्वाभाविकपणें झाला असें

माझ्या स्नेह्याचें मत होतें. माझें मत उलट होतें. राजगुरूची भूमिका ही खलपुरुषाची भूमिका नसून ती कर्मठ कार्यकर्त्याची भूमिका होती आणि राजगुरूला खलपुरुष अशी संज्ञा देणें खात्रीनें चुकीचें आहे असें मी म्हणत होतों. राजगुरूच्या चरित्रांतील दिव्य क्षण त्याच्या आत्मसमर्पणाच्या वेळेचाच होता. राजगुरु कारस्थानी होता, राजगुरु कठोरहृदयी होता, पण राजगुरु स्वार्थी नव्हता. राजगुरूबद्दल कोणाही विचारी व्यक्तीला सहानुभूति वाटेल असें त्याचें चित्र रेखाटण्यांत आलें आहे. राजगुरु अखेरच्या क्षणाला कालीमूर्तीच्या समोर जाऊन म्हणतो.

> " भगवती, आजतक जैसी बनी, तेरी सेवा की. कोई अपने स्वार्थ की इच्छा न की. धर्म की रक्षाके लिये न्याय-अन्याय कुछ न देखा-फिरभी अपयश ! अधर्मियों और नास्तिकों की विजय ?—नहीं अब अपनी ही बली दे कर तुझे संतुष्ट करता हूं. माता, अब जैसे भी हो—पर इन अधर्मियोंके पापी प्रयत्नोंका नाश कर."

—आणि हा बोलपट पाहिल्यानंतर ज्या ज्या वेळीं मला राजगुरूची आठवण होई, त्या त्या वेळीं **वल्लभभाई जव्हेरभाई पटेल** यांची मूर्ति माझ्या डोळ्यांसमोर उभी राही. कालीमातेच्या मंदिरांत आपल्या अनुयायांवर भेदक व तीक्ष्ण दृष्टीचा मारा करीत दगडी पुतळ्याप्रमाणें निश्चल राहून आपलें तत्त्वज्ञान सांगणारा कर्मठ राजगुरु आणि आपल्या अनुयायांना अर्धवट मिटलेल्या व धुंद डोळ्यांच्या जरबेंत वागविणारे वल्लभभाई या उभयतांमध्यें मला बरेंच साम्य आढळून येतें. अमृत मिळण्यासाठीं आधीं हलाहल घ्यावें लागतें आणि अमृतमंथनासाठीं चालणाऱ्या झगड्यांत स्वपक्षीय कामाला आले, तरी त्याबद्दल खेद करतां नये हें उभयतांचेंही आवडतें तत्त्वज्ञान ! उभयतांचाही आत्मविश्वास दांडगा. साधनापेक्षां साध्याकडेच उभयतांचेंही लक्ष जास्त. रूढीप्रिय हिंसक धर्माचा राजगुरूनें अभिमान धरला व त्यासाठीं आपलें सर्वस्व पणाला लावलें. गांधींच्या सत्य व अहिंसाप्रधान राजकारणाला वल्लभभाईंनीं स्वतःला संपूर्णपणें वाहून घेतलें आणि त्यासाठीं आपल्या विरोधकांचे मर्मभेदी घाव बेडरपणें सहन केले. आपल्या उपास्य दैवताचें मनोगत राजगुरूला कळून आलें नाहीं. आपल्या मगदुरा-

प्रमाणें या मनोगताचा अर्थ त्यानें लावला, त्याचा साक्षात्कार चुकला, पण वल्लभभाईंना आपल्या उपास्य दैवताची चांगली ओळख पटली आहे. या दैवताच्या अनुग्रहानें व अनुज्ञेनेंच त्यांचे सर्व व्यापार चालले, व चालू आहेत. राजगुरूला महात्मा म्हणतां येणार नाहीं; पण मी त्याला कर्मवीर हुतात्मा म्हणेन. गांधींनीं पांघरलेली कर्मवीरत्वाची शालजोडी वल्लभभाईंच्या-देखील अंगावर टाकतांना मला संकोच वाटत नाहीं.

## आजचे वल्लभभाई

पण वल्लभमाई पटेल हें नांव उच्चारतांच जी व्यक्ति डोळ्यांपुढें उभी राहते, तिला कांहीं फारसें आकर्षक व्यक्तित्व नाहीं. वल्लभभाईंच्या नामोच्चारानेंही स्नेहाची भावना मनांत उत्पन्न होत नाहीं. गांधींचें नांव उच्चारतांच कांहीं भाविकांचे दोन्ही हात एकत्र येतात. पं. मोतिलाल नेहरू यांच्या नांवाभोंवतींही एक प्रकारची अदृश्य मोहिनी होती. कै. देशबंधु दास यांच्या दिलदारपणाचें कौतुक वाटे. बॅ. जमनादास मेहतांच्या मिस्किलपणामुळें गुदगुल्या होतात. विठ्ठलभाई पटेलांच्या स्वभावांतील वक्रताही आकर्षक वाटत असे. पण वल्लभभाई पटेल या व्यक्तीमध्यें अथवा तिच्या नांवामध्यें अशी कोणतीच जादू नाहीं, कीं जिच्यामुळें लोकप्रियतेच्या करभारांतील थोडा तरी अंश तिच्याकडे ओढला जावा. वल्लभभाई हे लोकप्रिय नसलेले पुढारी आहेत आणि हिंदी राजकारणांत तर हें एक वदतो व्याघाताचेंच उदाहरण आहे. वल्लभभाई म्हणजे रूक्षपणा, वल्लभभाई म्हणजे संशय, वल्लभभाई म्हणजे कौटिल्य आणि वल्लभभाई म्हणजे दुःसह ताप. वल्लभभाईंच्या गोटांत राहून त्यांच्या नेतृत्वाखालीं वावरणें हें कोणालाही लोभनीय वाटणार नाहीं; पण असें असूनही वल्लभभाई म्हणजे एक प्रचंड शक्ति झालेली आहे ह्या गोष्टीकडेही कोणाला दुर्लक्ष करतां येणार नाहीं. लोकरंजनाचा कोणताही प्रयत्न न करणाऱ्या वल्लभभाईंसारख्या पुढाऱ्याला असें असाधारण महत्त्व कोणत्या गुणांच्या जोरावर संपादन करतां आलें? वल्लभभाई या नांवाभोंवतीं जो दरारा उत्पन्न झाला आहे त्याचें रहस्य काय? गांधींच्या मतांशीं व कार्यपद्धतींशीं ज्या पुढाऱ्याला उघड उघड विरोध दिसून येतो, त्या पुढाऱ्याला खुद्द गांधींच्याच प्रभावळींत मानाचें अत्युच्च स्थान मिळण्याचें कारण काय? या

प्रश्नाचें उत्तर देणें बरेंच अवघड आहे; पण विद्युत्शास्त्रांतील एका सिद्धांताकडे पाहिलें, म्हणजे या प्रश्नाचें गूढ उकललें नाहीं, तरी पटण्याजोगा खुलासा मात्र होऊं शकेल. ऋणविद्युत् व धनविद्युत् या दोहींच्याही संयोगानें विद्युतशक्ति निर्माण होते. एकीचा अपुरेपणा दुसऱ्या शक्तीच्या संयोगानें नाहींसा होतो व ती कार्यक्षम होते. गांधींची तात्त्विक विचारसरणी हा जर negative current म्हटला, तर वल्लभभाईंचा तिला प्रत्यक्ष पाठिंबा व सहकार्य हा positive current म्हणतां येईल. गांधींचें नांव व वल्लभभाईंचें कार्य यांची एकतानता गुजरातच्या राजकारणांत तरी अशा बेमालुमपणें झालेली आहे, कीं तेथें भिन्नत्व आढळून यावयाचें नाहीं. गांधींच्या माहात्म्यानें आकर्षित झालेल्या गुजरातच्या भोळ्या अक्षरशत्रु खेडुतांची श्रद्धा वल्लभभाईंनीं संघटनेसाठीं उपयोगांत आणली, कीं वल्लभभाईंच्या संघटनाचातुर्याला गांधींनीं आपल्या माहात्म्याची जोड मिळवून दिली, हें सांगतां येणार नाहीं. गांधींच्या माहात्म्यावर वल्लभभाईंनीं आपल्या कर्तबगारीचे इमले रचले आणि वल्लभभाईंच्या कौटिल्यानें गांधींच्या माहात्म्याच्या पदाला जरतारी गोंडे लागले !

## पातीदाराची परंपरा

वल्लभभाई स्वतःला खेडुतांचे ‘ सरदार ’ म्हणवितात. तथापि ही सरदारकी मात्र वल्लभभाईंकडे स्वाभाविकपणें आलेली आहे. गुजरातचा इतिहास पाहिला म्हणजे पातीदार समाजाचें स्थान व महत्त्व गुजरातच्या भूमींत केवढें आहे तें कळून येईल. गुजरातच्या खेडुतांचे निसर्गसिद्ध शास्ते, नायक व प्रभु म्हणजे गुजरातचे पातीदार. गायकवाडांनीं गुजरात जिंकला व आपल्या ताब्यांत राखला तो या बहुसंख्य सधन पातीदार समाजाच्या पाठिंब्यामुळेंच ! गुजरातच्या पातीदारांचें व्यक्तिवैशिष्ट्य वल्लभभाईंच्या स्वभावांत पूर्णपणें उतरलें आहे. पातीदार हा कोणाची मिंधेगिरी जाणत नाहीं. सुसंस्कृतपणाशीं त्याचा फारसा परिचय नाहीं. त्याचा लोभ व रोष हे दोन्ही सारखेच गुदमरून टाकणारे असतात. हुकूम करण्याची व या हुकमाच्या जोरावर दळें हालविण्याची त्याला विलक्षण हौस. पण ‘ विक्रमार्जित सत्त्वस्य स्वयमेव मृगेंद्रता ’ प्रकट करण्यासाठीं कष्ट, श्रम व धाडस करण्यांतही तो माघार

घेत नाहीं. चाबकाचे फटकारे मारून पातीदारांनीं खेडुतांना पूर्वीं शिस्त-पालनाचे धडे दिले होते; पण अहिंसेच्या काळांत चाबकांचा उपयोग करण्याची मुभा नसली, तरी पातळ व चपळ जिव्हेचा उपयोग अहिंसात्मक फटकाऱ्या-साठीं करण्याची बंदी झालेली नाहीं. वल्लभभाईंच्या स्वभावाची घडण या पातीदार परंपरेला शोभण्याजोगीच झालेली आहे. वल्लभभाईंनीं बारडोलीची प्रचंड चळवळ चालवून गुजरातमध्यें आपलें राज्य स्थापन केलें, पण तें स्वतःच्या एकट्याच्याच हिंमतीवर. वल्लभभाईंशीं पटवून घेणाऱ्या लोकांशींच त्यांचें पटलें. त्यांच्या टापूंत लुडबुड करणाऱ्या लोकांना त्यांनीं खड्यासारखें वेंचून उडवून दिलें! पातीदार वल्लभभाई एका गांधींशिवाय कोणापुढेंही वांकले नाहींत आणि प्रथम तरी त्यांनीं गांधींची कुचेष्टाच केली होती; पण गांधींपुढें वांकण्यांत त्यांनीं जो स्वत्वसंन्यास केला, त्याची केवढी तरी जबरदस्त किंमत त्यांनीं गांधींकडून मिळविली. इतरांपुढें वांकण्याचें अथवा न वांकल्यास मोडण्याचेंही भय त्यांना राहिलें नाहीं.

## स-त्या-ग्र-ही

वल्लभभाई पटेल यांच्या सत्याग्रही वृत्तीचे पाय पाळण्यांतच दिसून आले. वल्लभभाईंचा जन्म सामान्य स्थितींतील कुटुंबांत झाला. करमसद ही त्यांची जन्मभूमि. वल्लभभाईंच्या बालपणांतील बराचसा काळ उनाडक्या करण्यांत गेला व नडियादमधील शाळेंत त्यांना नंतर घालण्यांत आलें असतां तेथेंही पुंड म्हणूनच त्यांनीं कीर्ति संपादन केली. नडियादच्या शाळेंत वल्लभभाईंनीं पहिला सत्याग्रह व कायदेभंग केला. या शाळेंतील एका शिक्षकानें विद्यार्थ्यां-साठीं वह्या व पेन्सिली विकण्याचा एक जोडधंदा चालविला होता. शाळेंतील सर्व विद्यार्थ्यांनीं आपल्याकडूनच लेखनसाहित्य विकत घ्यावें असा त्याचा आग्रह असे. या शिक्षकाचें व वल्लभभाईंचें वितुष्ट आलें व त्या शिक्षकाविरुद्ध त्यांनीं सत्याग्रह पुकारून त्याच्याकडून लेखनसाहित्य घेण्याचें बंद केलें. शिक्षकानें या अपराधाबद्दल वल्लभभाईंना शिक्षा केली. तत्काळ वैयक्तिक कायदेभंगाचें पर्यवसान वल्लभभाईंनीं सामुदायिक कायदेभंगांत केलें व सर्व विद्यार्थ्यांचें नेतृत्व स्वीकारून शाळेवरच बहिष्कार घातला! ही शाळा सुमारें दीड महिना त्यांनीं ओस पाडली व अखेर शिक्षकांना वल्लभभाईंशीं

तडजोड करावी लागली. वल्लभभाईंच्या सत्याग्रहाचा धागा एवढ्या दूरवर पोंचतो! वल्लभभाईंचें नंतरचें शिक्षण बडोदा येथें झालें. मॅट्रिकपर्यंत जेमतेम त्यांच्या शिक्षणाचा गाडा रेटला; पण घरची स्थिति समाधानकारक नसल्यामुळें वल्लभभाईंना उच्च शिक्षणाचा नाद सोडून प्रपंचाकडे व चरितार्थाकडे वळावें लागलें. वल्लभभाई मुखत्यारीच्या परीक्षेला बसले, व या परीक्षेंत उत्तीर्ण झाल्यावर गोध्रा येथें जाऊन त्यांनीं आपली वकिली थाटली.

## कांहीं क्षण

गोध्रा येथें वकिलींत वल्लभभाईंचा हळू हळू चांगला जम बसूं लागला; पण सर्वसामान्य पांढरपेशांच्या यशस्वी जीवनक्रमापेक्षां त्यांच्या जीवनक्रमांत त्या वेळीं कांहीं निराळें वैशिष्ट्य आढळून आलें नाहीं; वल्लभभाईंचें लक्ष लोकसेवेकडे वळलें नव्हतें. पैशाची अनुकूलता नसल्यामुळें आपल्याला शिक्षण अर्धवट टाकावें लागलें ही जाणीव त्यांना इतर कोणत्याही गोष्टीपेक्षां अधिक त्रास देत होती आणि वकिलींतील सांठलेल्या पैशाच्या जोरावर विलायतेंत बॅरिस्टर होण्याच्या एकाच महत्त्वाकांक्षेच्यामागें ते लागले होते. पण सार्वजनिक कार्याशीं संबंध आला नाहीं, तरी त्यांच्या वैयक्तिक गुणांची कसोटी लागण्याचे कांहीं प्रसंग मात्र या काळांत आले नाहींत असें नाहीं. गोध्रा येथें वल्लभभाई वकिली करीत असतां तेथें प्लेगची सांथ आली. कोर्टाच्या नाझरच्या मुलाला प्लेग झाला. वल्लभभाईंनीं स्वतः या मुलाची निर्भयपणें शुश्रूषा केली; पण प्लेगनें त्या मुलाचा बळी घेतला. या मुलाचा अंत्यसंस्कार करून वल्लभभाई परत येतात, तोंच स्वतः त्यांना प्लेगनें घेरलें. त्यांच्या पत्नीला प्लेगनें आधींच पछाडल्यामुळें त्यांनीं तिची रवानगी करमसदला करून दिली व तेथून ऑपरेशनसाठीं तिची मुंबईला रवानगी करून देण्यांत आली. वल्लभभाई प्लेगच्या तडाक्यांतून बचावले. आजारांतून उठून ते खटला चालविण्यासाठीं कोर्टांत गेले, तोंच त्यांच्या हातीं एक तारेचा लिफाफा देण्यांत आला. या तारेंत पत्नीनिधनाची बातमी होती. वल्लभभाईंनीं मोठ्या धैर्यानें पत्नीनिधनाचें दुःख गिळून टाकलें व कोर्ट उठेपर्यंत खटल्याचें काम चालविलें. दुःख शोक पचविण्याचे असे आणखीही

कांहीं प्रसंग वल्लभभाईंच्या आयुष्यांत पुढें आले. असे प्रसंग इतरांच्याही आयुष्यांत येत नाहींत असें नाहीं; पण कोमल भावना संयमानें दडपून टाकण्याचा मनाचा खंबीरपणा अशा प्रसंगांखेरीज प्रकट होत नाहीं अगर कसोटीलाही उतरत नाहीं. वल्लभभाईंचे बंधु नरसीभाई यांचा त्यांच्या शेतांत खून झाला. वल्लभभाईंना ही बातमी समजली, त्या वेळीं ते अलाहाबाद येथें ऑ. इं. कॉं. कमिटीच्या बैठकीसाठीं जाण्याच्या तयारींत होते. प्रत्यक्ष भावाचा खून ! हा प्रसंग जेवढा शोकाचा होता, तेवढाच तो वल्लभभाईंसारख्या व्यक्तीच्या बाबतींत संतापानें खदिरांगार होण्याचा होता. शोकानें मनुष्य आंधळा होत नाहीं, पण संतापानें त्याची नजर फिरते व तो बेभान होतो. पण वल्लभभाईंनीं ह्या दुबळेपणावरही विजय मिळविला आणि गांवीं न जातां ते अलाहाबादला निघून गेले. शोककारक आपत्ति सहन करण्याला जो संयम लागतो, त्यापेक्षांही संताप व क्षोभजनक प्रसंगाच्या वेळीं चित्त शांत ठेवण्याला अधिक तयारी लागते. कठोर शिस्तीशिवाय ही गोष्ट शक्य नाहीं. हे लोखंडाचे चणे आहेत. ते खाऊन पचतील त्यालाच आपल्या मनाभोंवतीं अभेद्य व कणखर पोलादाचें आवरण उभें करतां येईल. संपूर्ण महात्मा गांधी ' मेणाहुनी मऊ आणि वज्राला भेदण्याएवढे कठीण'ही असतील. महात्म्याच्या संगतींत राहून अर्धवट महात्मा झालेल्या वल्लभभाईंसारख्या पुढाऱ्यानें वज्रभेदी काठिण्यापुरता जरी आपला अर्धा वांटा उचलला, तरी महात्म्याच्या प्रभावळींत त्याचें महत्त्व व त्यापेक्षांही त्याचा उपयोग कमी झालेला नाहीं.

## असाधारण यश !

बॅरिस्टर होण्यासाठीं वल्लभभाईंनीं आपल्या गंगाजळींत पै–पै सांठविली, आणि प्रयाणाची तयारीही अत्यंत गुप्तपणें चालविली. पण वल्लभभाईंचे थोरले बंधु विठ्ठलभाई यांना छोटया भाईच्या कारस्थानाचा सुगावा लागला होता. ' व्ही. जे. पटेल ' यांच्या इंग्लंडांतील शिक्षणाची, वास्तव्याची व प्रवासाची सर्व तयारी एका इंग्लिश कंपनीनें केल्यावर या कंपनीनें ' व्ही. जे. पटेल ' यांना पाठविलेलें पत्र घेऊन विठ्ठलभाई वल्लभभाईंकडे गेले. " मी थोरला भाऊ, मी आतां म्हातारा व्हायला आलों. मीच अगोदर बॅरिस्टर

होऊन येतों; तूं नंतर जा. तुझ्या तयारीचा व नांवाचा मला उपयोग करून घेऊं दे ” अशी विठ्ठलभाईंनीं वल्लभभाईंना गळ घातली! विठ्ठलभाईंनीं आपल्यावर मात केल्याचें पाहून वल्लभभाई सर्दच झाले! पण भ्रातृभावाला स्मरून त्यांनीं विठ्ठलभाईंना आपल्याऐवजीं जाऊं दिलें, आणि विठ्ठलभाई बॅरिस्टर होऊन परत आल्यावर वल्लभभाईंनीं विलायतेस प्रयाण केलें. आयुष्यांत कधींही दिसली नाहीं एवढी बुद्धिमत्ता वल्लभभाईंच्या बॅरिस्टरीच्या परीक्षेंत दिसून आली. ते या परीक्षेंत पहिल्या वर्गांत पहिले आले, ५० पौंडांची त्यांना शिष्यवृत्ति मिळाली आणि बरोबर ४ टर्म्सची माफीही मिळाली. त्यांनीं परीक्षेंत लिहिलेल्या कांहीं पेपरांत एवढी विद्वत्ता व सूक्ष्म चिकित्सक बुद्धि प्रकट केली होती कीं, परीक्षकांनीं त्या वेळचे चीफ् जस्टिस सर बेसिल स्कॉट यांना पत्र लिहून या हुशार तरुणाला न्यायखात्यांत मोठ्या हुद्द्याची जागा देण्याची शिफारस केली होती. विलायतेंत असतां वल्लभभाईंनीं अभ्यासाव्यतिरिक्त कोणत्याच गोष्टीकडे लक्ष दिलें नाहीं. रोज ११ मैल चालून मिडल टेंपल गांठावयाचें, तेथें अभ्यास व वाचन केल्यावर पुनः लायब्ररींत जाऊन कायद्याचीं इतर पुस्तकें वाचावयाचीं आणि पुनः घरीं जावयाचें, असा त्यांच्या उद्योगाचा खाक्या होता. कामाचा ध्यास घेऊन सारखे अष्टौप्रहर न थकतां काम करीत राहण्याची वल्लभभाईंची शक्ति असाधारण असल्यामुळेंच खेडा, बारडोली येथील चळवळींत स्वतः जातीनें ठिकठिकाणीं देखरेख ठेवून चळवळीच्या यंत्रांतील स्क्रू आणि बोल्ट पिळून त्यांना घट्ट बसवितां आले!

### गांधी–प्रभाव

बॅरिस्टर होऊन परत आल्यावर वल्लभभाईंनीं अहमदाबाद येथें आपली कचेरी थाटली आणि नव्या वकिलीला व सार्वजनिक कार्याला सुरुवात केली. वल्लभभाई टिळक–संप्रदायांत शिरले. मुंबईच्या कॅांग्रेसकमिटींत ते गुजरातचे प्रतिनिधि होते. टिळकांच्या पंथांत वल्लभभाईंनीं केलेली कामगिरी त्या वेळच्या टिळकानुयायांच्या कामगिरीपेक्षां वेगळी नव्हती. गुजरातेंतील मवाळांची वल्लभभाईंनीं केलेली कुचेष्टा हीच टिळकपंथाच्या राजकीय खजिन्यांत त्यांनीं घातलेली भर! कै. रमणभाई महिपतराम यांच्यावर त्यांनीं टीकास्त्र

सोडलें होतें. रमणभाईंनीं वल्लभभाईंची उपेक्षा केली. रमणभाईंवर वल्लभभाईंचा दांत होता; याचें कारण रमणभाई हे मवाळ होते एवढें एकच नव्हे, तर रमणभाई हे ‘ बॉमण’ होते व पातीदार पटेलबंधूंना ते आपले प्रतिस्पर्धि वाटत होते !

त्यानंतर १९१९ मध्यें अहमदाबाद येथें मार्शल लॉच्या अमदानींत मार्शल लॉच्या कैद्यांचा वल्लभभाईंनीं बचाव केला आणि ते जनतेसमोर अधिक ठळकपणें आले. पण पुनः अहमदाबादच्या गुजरात क्लबमध्यें ब्रिज खेळण्यांत ते मग्न झाले. याच क्लबमध्यें ‘ साबरमतीचा महात्मा ’ व ‘ गुजरातचा सरदार ’ यांची प्रथम भेट झाली. सरदारांनीं महात्म्याला प्रथम दिलेली सलामी अहिंसात्मक लष्करी शिस्तीची नव्हती. त्या वेळच्या या उभयतांच्या मुलाखतींत काय घडलें हें कळण्यास मार्ग नाहीं; पण गुजरातचा नवा इतिहास बनविण्याच्या कल्पनेनें मोहून वल्लभभाईंनीं गांधींच्या हातीं आपला हात दिला. रामदासांच्या शिष्यांमध्यें कल्याणस्वामीची भर पडली ! !!

## “ बाहेर फेकून देईन ! ”

गांधीपंथांत वल्लभभाईंचें आगमन झाल्याबरोबर वल्लभभाई गांधींचे उजवे हात बनले. वल्लभभाईंना येऊं लागलेलें महत्त्व पाहून गांधींचे इतर शिष्य वल्लभभाईंवर चरफडूं लागले. वल्लभभाईंचा प्रथमच कवि नानालाल यांच्याशीं खटका उडाला. कवि नानालाल हे सुप्रसिद्ध गुर्जर कवि दलपतराम यांचे चिरंजीव. राजकुमार कॉलेजमध्यें ते प्रोफेसर होते. गांधींच्या असहकारितेमध्यें भाग घेण्यासाठीं आपल्या प्रोफेसरशिपचा राजिनामा देऊन ते अहमदाबादला आले. गांधींनीं त्यांचें प्रेमानें आगतस्वागत केलें व तेथपर्यंत ठीक जमलें. पण गांधींच्या मसलतगारांत त्यांना प्रवेश मिळाला, तरी महत्त्व मिळेना. वल्लभभाई पटेल यांनींही प्रॅक्टिस सोडून असहकाराचा प्रचार सुरू केला. गांधींच्या गुजरात–विद्यापीठासाठीं झोळी घेऊन वल्लभभाईंनीं १० लक्ष रुपये गांधींच्या पदरांत टाकले. वल्लभभाईंची जनतेच्या मनापेक्षां धनिकांच्या खिशावर असलेली सत्ता पाहून गांधींना त्यांची दुहेरी कर्तबगारी पटली व गांधींचीं सूत्रें वल्लभभाईंच्याच हस्तें

हालूं लागलीं ! १९२१ सालीं कायदेभंगाच्या ठरावासाठीं अहमदाबादची कॅांग्रेस झाली. पुढील धोरण ओळखून या कॅांग्रेसच्या स्वागताध्यक्षाची माळ वल्लभभाईंच्या गळ्यांत टाकण्यांत आली. नानालाल विस्मयानें व वैषम्यानें वल्लभभाईंची ही प्रगति पाहत होते. कॅांग्रेसच्या अधिवेशनावेळीं व्यासपीठावर नानालाल यांना आसन देण्यांत आलें होतें. पण महाद्वारावर वल्लभभाईंच्या स्वयंसेवकांनीं त्यांच्याजवळ तिकिट मागितलें. नानालाल यांना हा अपमान वाटला. शीघ्रकोपी कवि संतापला ! या अपमानाच्या मागें वल्लभभाईच असावेत असा त्यांनीं ग्रह करून घेतला व वल्लभभाईंना जाब विचारला. पण वल्लभभाईंनीं उपहासपूर्वक हंसून नानालाल यांना जास्तच खिजविलें ! नानालालनीं वर्तमानपत्राचा आश्रय धरून वल्लभभाईंवर फैर धरली आणि रानटी, गांवढळ, असंस्कृत, नीच अशा शेलक्या शब्दांनीं वल्लभभाईंची संभावना केली. त्या वेळीं लहानसें वल्लभ-नरिमन प्रकरणच उपस्थित झालें असेंही म्हणावयास हरकत नाहीं. गांधींच्या विनंतीवरून तंटा मिटविण्यासाठीं नानालाल यांनीं वल्लभभाईंची भेट घेतली आणि समक्ष भेटींत पुन्हां वल्लभभाईंना निवडक विशेषणांचा खुराक चारला ! कवीची ही बाष्कळ बडबड बेताल होऊं लागल्याचें पाहतांच वल्लभभाई म्हणाले, "Look here Brahmin. I am a Patidar and I don't believe in non-violence. If you don't cease talking this nonsense, I will throw you out of the window."

कवि चरफडत जिना उतरले. वल्लभभाईंनीं खिडकींतून बाहेर न टाकतांदेखील त्यांनीं स्वतःच वैतागानें वल्लभभाईंचें कायमचें नांव टाकलें !

जी गत कवि नानालाल यांची झाली, तीच गत इंदुलाल याज्ञिक, सिंधचे गिडवानी आणि काका कालेलकर यांची झाली. हे तीन्ही पुढारी गांधींच्या प्रभावळींत मिरवले. पण लोखंडावर आपटून तांब्यापितळेच्या भांड्यांना पोंचे यावे त्याप्रमाणें वल्लभभाईंवर आघात-प्रत्याघात होऊन त्यांना पोंचे आले. इंदुलाल याज्ञिक यांनीं १९२२ नंतर गांधी तुरुंगांत असतां गांधींच्या खादी चरक्याला गुजरात प्रां. कॅा. कमिटीच्या बैठकींत विरोध केला; ही संधि वल्लभभाईंनीं साधली. "तुरुंगांत असतां त्यांच्याशीं द्रोह करून त्यांच्या पाठींत खंजीर खुपसणारा हा फितुर पहा," अशी ओरड त्यांनीं केली.

इंदुलालविरुद्ध रान उठविलें आणि इंदुलालचा पराभव झाला. इंदुलाल हे वल्लभभाईंचे जबरदस्त प्रतिस्पर्धि होते. त्यांच्या वाणींत जनतेला हालविण्याचें सामर्थ्य होतें. धनिकांच्या खिशावरही ते हुकमत गाजवीत असत. इंदुलालच्या नांवानें आणि प्रचाराच्या दौऱ्यानें गुजरात हालून गेला होता. पातीदार वल्लभभाईंच्या अधिकारलालसेला हा मोठाच शह होता; पण इंदुलाल यांनीं बुद्धिस्वातंत्र्याचें तेज अवेळीं व अस्थानीं प्रकट केलें. या तेजांत तेच स्वतः होरपळून निघाले. ' वल्लभभाई गुजरातेंत असेंपर्यंत गुजरातेंत पाणी पिणार नाहीं ' अशी भीष्मप्रतिज्ञा करून इंदुलाल याज्ञिक यांनीं अहमदाबादच्या स्टेशनवर तणतणत जाऊन मुंबईचें तिकिट काढलें ! याही प्रसंगीं उपहासाचें विकट हास्य वल्लभभाईंनीं केलें !

बारिकसारिक लढे

अहमदाबादच्या कॉंग्रेसनें कायदेभंगाचा ठराव पास केल्यानंतर पटेल-बंधूंच्या मदतीवर विश्वसून गांधींनीं शेतसारा न भरण्याबद्दलचा बारडोलीचा कायदेभंग मुक्रर केला. वल्लभभाईंनीं खेडुतांची संघटना केली. ऐक्याचे ठराव पास करण्यांत आले, बऱ्याच पातीदारांनीं राजिनामे दिले. अनत्याचाराच्या शपथा घेण्यांत आल्या. पण या सर्व तयारीवर गांधींनीं विरजण घातलें; दंगे व अत्याचार यांनीं विषण्णचित्त होऊन गांधींनीं बारडोलीचा लढा तहकूब केला. हा लढा लढण्याचा वल्लभभाईंचा आग्रह होता. गांधींच्या विचाराला त्यांनीं मोठ्या नाखुषीनें मान्यता दिली.

गांधी तुरुंगांत गेले. ठाणावर बांधलेल्या कोतवाली घोड्याप्रमाणें वल्लभभाई खुरांनीं जमीन उकरीत चळवळ करीत राहिले. कायदेभंगाची तयारी करून त्यांनीं नवें हत्यार हातीं घेतलें होतें; पण गांधींच्या हुकमानें तें त्यांना म्यान करावें लागलें. शस्त्र गंजूं नये ही वल्लभभाईंची इच्छा. त्याचें पाणी दाखविण्याचे कांहीं प्रसंग त्या वेळच्या निष्क्रियावस्थेंतसुद्धां अचानकपणें उद्भवले व त्यांचा फायदा वल्लभभाईंनीं घेतला. बोरसद येथें १९२२ सालीं बाबरदेव नांवाचा एक दरोडेखोर थैमान घालूं लागला. त्याला वठणीवर आणण्यासाठीं दुसऱ्या एका मुसलमान दरोडेखोराला विश्वासांत घेऊन सरकारनें त्याच्या दिमतीला पांच हत्यारबंद शिपाई दिले; पण हा दुसरा दरोडे-

खोरच सरकारला भारी झाला व चोराच्या हातीं जामदारखान्याच्या किल्ल्या दिल्याबद्दल सरकार पस्तावलें. बोरसदमध्यें होणाऱ्या अत्याचारांमागें खेडुत असावेत या कल्पनेनें बोरसदवर २–२।। लक्षांचा प्युनिटिव टॅक्स लादला. तालुक्यांत पडणाऱ्या दरोड्यांमागें सरकारी पोलिसच आहेत, असा वल्लभभाईनीं आरोप केला व तसें नसल्याचें सिद्ध करून देण्याबद्दल सरकारला आव्हान दिलें. तालुक्यांतील खेड्यांवर पाहारा ठेवण्यासाठीं स्वयंसेवकांचें पथक वल्लभभाईनीं उभारलें व जखमी लोकांच्या शरीरांतील गोळ्या काढून त्या सरकारी बंदुकींतूनच सुटल्याचें पुराव्यानें दाखवून दिलें. तालुक्याच्या संरक्षणासाठीं व करवसुलीसाठीं ठेवण्यांत आलेले शिपाई पाहारा न करतां संकटाची चाहूल ऐकून लपून राहात हें सिद्ध करण्यासाठीं तशा प्रसंगांचे फोटो घेण्यांत आले. करवसुली बंद पडली; तालुक्यांतील लोक रात्रीं घरें उघडीं टाकून बाहेर पडूं लागले. अशा प्रकारें बोरसद येथें हत्यारबंद शिपायांची नामुष्की करून त्यांच्या नाड्या आंखडण्यांत आल्यावर मुंबई सरकारच्या गृहमंत्र्यांनीं बोरसदला भेट दिली. वल्लभभाईनीं केलेल्या आरोपांची त्यांनीं चौकशी केली व नंतर प्युनिटिव्ह पोलिस परत बोलावण्यांत आले. शिस्त व संघटना यांच्या जोरावर वल्लभभाईनीं मिळविलेला हा पहिला विजय होय. या विजयाची बरीच जरब अधिकाऱ्यांवर बसली. बोरसदच्या विजयाचा परिणाम आनंद तालुक्यांतील दडपशाहीविरुद्ध झाला. या तालुक्यांतील लोकांनीं अधिकाऱ्यांच्या दडपशाहीविरुद्ध तक्रारअर्ज गुदरतांच लगेच त्यांचीं गाऱ्हाणीं दूर करण्यांत आलीं.

या सत्याग्रहामागोमाग पुढच्या वर्षीं नागपूरचा सुप्रसिद्ध झेंडा–सत्याग्रह चालू झाला. नागपूर येथें ‘ सिव्हिल लाइन्स ’ मध्यें राष्ट्रीय झेंड्याच्या मिरवणुकीला बंदी करण्यांत आली व ही बंदी मोडून सत्याग्रह करणाऱ्या स्वयंसेवकांना अटक होऊन शिक्षा देण्यांत आली. बजाजशेटजींनीं सत्याग्रह केला. त्यांना ३ हजार रुपये दंड होऊन त्यांची मोटर दंडवसुलीसाठीं जप्त करण्यांत आली. हें प्रकरण पेटलें. झेंडा–सत्याग्रह हा अखिल भारतीय स्वरूपाचा सत्याग्रह झाला. सत्याग्रहपटु वल्लभभाईंच्या हातीं या सत्याग्रहाचीं सूत्रें देण्यांत आलीं. ता. १८ जुलै १९२३ रोजीं वल्लभभाईंच्या नेतृत्वाखालीं सत्याग्रही झेंडा घेऊन बंदीच्या भागांतून निघाले. सत्याग्रहींना अटक करण्यांत

आली नाहीं. सत्याग्रह विजयी झाला. वल्लभभाईंच्या टोपींत आणखी एक पीस खोंवण्यांत आलें !

## 'शराब' पार्टी व 'चोरका' पार्टी !

स्वराज्यपक्षाचें राजकारण नंतर सुरू झालें. वल्लभभाई कट्टर नाफेरवाले होते. राजकारणांत पटेलबंधूंची परस्परांपासून येथेंच फारखत झाली. आणि त्यानंतर राजकारणाच्या सामान्य व्यासपीठावर कधीं ते एकत्रही आले नाहींत अथवा त्यांचें पटलेंही नाहीं. स्वराज्यपक्षाचे नेते नेहरू व दास यांची कुचेष्टा करण्यासाठीं या उभयतांच्या ' शराबभक्तीला ' अनुलक्षून स्वराज्य पक्षाचें 'शराब' पार्टी असें नामाभिधान करण्यांत आलें. स्वराज्यपक्षीयदेखील कांहीं कमी नव्हते. त्यांनीं उलट नाफेर चरखावाल्यांना 'चोरका पार्टी' ( चोरांचा ) पक्ष असा अहेर करून उट्टें फेडलें, व फंडगुंडी प्रकारांच्या उल्लेखानें डिवचलें. स्वराज्यपक्षीयांना शराब पार्टी म्हणून वल्लभभाईंच्या अनुयायांनीं हिणविलें, तरी वल्लभभाईंच्या रसग्रहणशक्तीबद्दल कोणीही गैरसमज करून घेण्याचें कारण नाहीं. दिल्ली येथें वल्लभभाईंचा १९२७ सालीं मुक्काम असतां वल्लभभाई व दुसरे एक स्वराज्यपक्षीय पुढारी खान्याच्या प्रसंगीं एका हॉटेलांत एकत्र आले होते. " सबजी ? " ( म्हणजे शाकाहारी ) असा प्रश्न वेटरनें वल्लभभाईंना विचारला. वल्लभभाईंनीं वेटरकडे एकवार खोंचून पाहिलें व ते म्हणाले, " सबजी नहीं, सब चीज लाव " आणि वेटरनें हजर केलेल्या सर्व आमिष पदार्थांचा त्यांनीं गंगाधरराव देशपांड्यांच्या रसिकपणानें आस्वाद घेतला ! वल्लभभाईंनीं स्वराज्यपक्षांत यावें म्हणून त्यांच्या स्नेह्यांनीं त्यांना आग्रह केला. पण वल्लभभाईंनीं उत्तर दिलें, " साबरमतीच्या सत्याग्रहामध्यें एक वेडपा आहे असें तुम्हीं म्हणतच आहांत; आम्हांलाही या वेड्याच्या जोडीला राहूं द्या ना ! " ह्या उत्तरांत स्वराजिस्टांचा वल्लभभाईंनीं उपहासच केला होता. वल्लभभाईंनीं आपलें लक्ष नंतर अहमदाबादच्या म्युनिसिपालिटीकडे वळविलें व १९२७-२८ मध्यें तिचें अध्यक्षस्थान मंडित करून शहरसुधारणा व सुव्यवस्था या दृष्टीनें महत्त्वाची कामगिरी बजावली.

## गुजरातचा महापूर

१९२७ सालीं गुजरातच्या महापुरांत वल्लभभाईंनीं बजावलेली कामगिरी, सोसलेले कष्ट आणि घेतलेली जिवापाड मेहनत गुजरातच्या कर्तबगारीची छाप कायमचीच ठेवण्यास कारणीभूत झाली. गुजरातचा हा महापूर म्हणजे रुद्रसृष्टीचें अक्राळविक्राळ स्वरूपच होतें; जुलैच्या शेवटच्या आठवड्यांत या पुरानें गुजरातवर आक्रमण करून कहर केला. गांवें वाहून गेलीं, रेल्वे रस्ते वाहून गेले, दळणवळण बंद पडलें, घरें पडलीं, ४ हजार खेड्यांतील लाखों लोक निराश्रित झाले, सर्व प्रदेश जलमय झाला; वल्लभभाई गुजरात प्रां. कॉं. कमिटीचे व अहमदाबाद म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष होते. एका रात्रींत त्यांनीं २ हजार स्वयंसेवकांचें पथक उभें केलें. ठिकठिकाणीं स्वयंसेवक पाठवून पावसांत भिजत रात्रंदिवस संकटग्रस्तांना मदत व निराश्रितांना आश्रय देण्याचें काम केलें. सरकारी अधिकाऱ्यांची जलप्रदेशांतून त्यांनीं सुटका करविली. अन्नसामग्रीचे व वस्त्रांचे डोंगर हां हां म्हणतां उभे केले. सहानुभूतीचा आणि पैशाचा पूर गुजरातकडे येऊं लागला. वल्लभभाईंनीं त्याचे कालवे काढून कृतज्ञतेचें पीक काढलें. कॉंग्रेसच्या व इतर संस्थांच्या मदतीचाच आंकडा ३० लक्ष रुपये होता. सरकारनेंही दुष्काळफंडांतून १॥ कोटीची रक्कम देवविली. वल्लभभाईंनीं तहानभूक म्हटली नाहीं, स्वतःच्या प्राणाची पर्वा केली नाहीं, श्रमांची कदर बाळगिली नाहीं. ते सारखे खपले आणि खेडुतांचे आश्रयदाते ठरले. वल्लभभाईंच्या चरित्रांत जर उज्ज्वल लोककार्याचा कोणता भाग असेल, तर तो हाच. शेतकरी व नागरिक पुनः नव्या घरांत नांदूं लागले. वल्लभभाईंनीं गुजरातमध्यें नवी सृष्टि व नव्या भावना निर्माण केल्या.

## बारडोली

पण मॅड्रिडच्या लोकांचे धन्यवाद मिळविले, तरी वेलिंग्टनला अजून वॉटर्लूची समरभूमि पाहावयाचीच होती. वल्लभभाईंनीं खेडुतांचे प्राण वांचविले, व स्वतःसाठीं त्यांनीं प्राण द्यावे अशी निष्ठा त्यांच्या मनांत उत्पन्न केली; पण वल्लभभाई आणि त्यांचे खेडुत या उभयतांच्या पराक्रमाची कसोटी बारडोलीच्या कुरुक्षेत्रावरच लागावयाची होती. १९२८ मध्येंच हा योग

आला. बारडोलींत झालेल्या सारावाढीचें निमित्त करून वल्लभभाईंनीं बारडोलींत सारा न देण्याची चळवळ आरंभिली. बारडोलीच्या तालुका रयत सभेनें वाढलेला शेतसारा न देण्याचा ठराव केला व नेतृत्व स्वीकारण्यासाठीं वल्लभभाईंना पाचारण केलें व वल्लभभाईंनीं खेडुतांच्या हाकेला ओ देऊन त्यांचें नेतृत्व स्वीकारलें. बारडोलीची चळवळ हाणून पाडण्यासाठीं सरकारच्या हातीं असलेले सर्व उपाय योजण्यांत येतील असा इशारा मुंबईचे त्या वेळचे गव्हर्नर सर लेस्ली विल्सन यांनीं कौन्सिलमध्यें जाहीरपणें दिला. वल्लभभाईंना त्यामुळें जास्तीच चेव आला. चळवळ सुरू झाली. शेतकऱ्यांच्या गुरांवर जप्त्या आल्या. विजेसारखे वल्लभभाई ठिकठिकाणीं तळपूं लागले. मोजक्या आणि खोंचक शब्दांत भाषणें करून त्यांनीं शेतकऱ्यांच्या निश्चयाला करारीपणाची धार चढविली. पठाण पाठविण्यांत आले. जमिनी जप्त होऊं लागल्या. खेडुतांच्या हालअपेष्टांच्या वर्णनांनीं वर्तमानपत्रांचे स्तंभ भरून जाऊं लागले. मुंबई–कौन्सिलच्या ४ सभासदांनीं निषेधप्रदर्शनासाठीं आपल्या जागांचे राजिनामे दिले. वल्लभभाईंची संघटना व शिस्त अपूर्व होती. दोषरहित यंत्राप्रमाणें या चळवळीच्या यंत्राची त्यांनीं उभारणी केली. कोठेंही खटका नाहीं. बारडोलींत स्वयंसेवकांचे आश्रम वल्लभभाईंनीं स्थापन केले. प्रत्येक आश्रमांत स्वयंसेवक ठेवले. स्वयंसेवकांच्या नायकांकडून वरचेवर रिपोर्ट करण्यांत येत. ताबडतोब वल्लभभाई गरजू अथवा डळमळणाऱ्या विभागांत जाऊन लोकांना धीर व उत्साह देत. " जमीन जाते म्हणून घाबरूं नका " " जमीन तो चालीनें तमारे घेर आवसे " अशी छातीठोक हमी वल्लभभाई शेतकऱ्यांना देत. या आश्वासनानें नवा उत्साह, नवचैतन्य खेडुतांना येई. सरकारी राज्ययंत्र बंद पडलें. अधिकाऱ्यांवर उपासमारीची पाळी आली. "बार्डोलींत राज्य कोणाचें ? " असे प्रश्न अँग्लोइंडियन पत्रें विचारूं लागलीं; पण लुल्या राज्ययंत्रांत हालचालीची शक्ति निर्माण करणें सरकारला अशक्य झालें. मुंबईचे त्या वेळचे गव्हर्नर सर लेस्ली विल्सन ह्यांनीं व्हाइसरॉयसाहेबांची भेट घेतली. सहा महिने लढा चालू राहूनसुद्धां खेडुत माघार घेण्याचीं चिन्हें दिसत नाहींत हें पाहून सुविचार मध्येंच डोकावला. वाढलेल्या साऱ्याची रक्कम अनामत ठेवल्यास चौकशी करण्याचें आश्वासन देण्यांत आलें. कै. रामचंद्र महादेव भट यांनीं सारावाढीची रक्कम अनामत देऊं

केली. लगेच ज. ब्रूमफिल्ड व मि. मॅक्स्वेल यांची एक चौकशी कमिटी नेमण्यांत आली. त्या कमिटीनें ६। टक्क्यांपेक्षां जास्त सारावाढ न करण्याची शिफारस केली. ऑगस्टमध्यें या शिफारशीला मान्यता देण्यांत आली. सत्याग्रही कैद्यांची मुक्तता झाली. जप्त झालेली मालमत्ताही खेडुतांना परत देण्यांत आली व कामावरून दूर केलेल्या पाटील तलाठ्यांनाही परत कामावर घेण्यांत आलें. विठ्ठलभाईंनीं सर्वशक्तिमान् सरकारशीं सहा महिने झुंज खेळून अभूतपूर्व यश मिळविलें. १९३१ च्या काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून भाषण करतांना "सत्य व अहिंसा यांच्या योगानें गरिबांना आपलें सामर्थ्य कळून आलें याबद्दल परमेश्वराचे आभार मानले पाहिजेत" असे उद्गार त्यांनीं काढले होते. या उद्गारांत परमेश्वरी इच्छेच्या गौरवाबरोबरच मानवी शक्तीचा आत्मविश्वासही वल्लभभाईंनीं प्रकट केला होता. या पराक्रमाबद्दल वल्लभभाईंना 'सरदार' ही पदवी देण्यांत आली.

**विचित्र योगायोग हा कीं, मुंबईत वल्लभभाईंचा सन्मान करून त्यांना थैली अर्पण करण्यासाठीं एक्सेल्शियर थिएटरांत जो समारंभ श्री. नरिमन यांच्या अध्यक्षतेखालीं करण्यांत आला, त्याच प्रसंगीं 'सरदार' ही पदवी वल्लभभाईंना देण्यांत आली व नरिमन यांच्या मुखानेंच तिचा उच्चार झाला! सरदारांच्या तलवारीशीं आपल्याला ६ वर्षांनीं झुंज खेळावें लागेल, अशी नरिमन यांना त्या वेळीं कल्पनाही नसेल आणि सरदारांनाही तसें स्वप्न पडलें नसेल!!!**

## सुखासीन

वल्लभभाईंच्या या कामगिरीनंतर त्यांच्या पुढील कामगिरीचा विचार करणें म्हणजे त्यांच्या जुन्याच कार्यक्रमपद्धतीचा पुनरुच्चार करणें आहे. कायदेभंगाची मोहीम १९३० मध्यें गांधींनीं जाहीर केल्यावर दांडीयात्रा काढली. सरकारनें गांधींना २४ दिवसांची यात्रा काढू देऊन त्यांचें कोडकौतुक केलें; पण वल्लभभाईंच्या बाबतींत विषाची परीक्षा घेण्याचें धाडस केलें नाहीं. वल्लभभाईंचें पाऊल कायदेभंगाच्या तयारीसाठीं बाहेर पडतें न पडतें, तोंच रास या गांवीं मार्चच्या पहिल्याच आठवड्यांत वल्लभभाईंना अटक करण्यांत आली व ४ महिन्यांची सजाही देण्यांत आली. वल्लभभाईंच्या नांवाची जादू

गांधींएवढीच गुजरातच्या लोकांवर कशी पडली होती, याचें उदाहरण म्हणजे त्यांना अटक झाल्यावर पाऊण लाख लोकांचा जमाव साबरमतीच्या वाळवंटावर जमला आणि या जमावानें वल्लभभाईंच्या पावलांवर पाऊल टाकून कायदेभंग करण्याची शपथ घेतली. कायदेभंगाच्या चळवळींत वल्लभभाईंनीं तुरुंगवासांतच आपला काळ घालविला आणि १९३१ च्या कराचीच्या कॅांग्रेसचें अध्यक्षस्थान त्यांना देण्यांत आल्यावर नंतर झालेल्या चळवळीच्या पुनरुज्जीवनप्रसंगीं गांधींबरोबर सरकारनें वल्लभभाईंनाही १८१८ च्या राजबंद्यांच्या कायद्याखालीं अटक करून त्यांचें माहात्म्य वाढविलें. वल्लभभाईंचें राजकारणांतील आसन आतां अचल व स्थिर झालें आहे. हें आसन प्राप्त करून घेण्यासाठीं वल्लभभाईंनीं केलेले परिश्रम केव्हांही प्रशंसनीय आहेत. वल्लभभाईंना मिळालें नाहीं असें कोणतेंही राजकीय महत्पद आतां शिल्लक राहिलेलें नाहीं आणि त्यांची कोठेंही स्थापना झाली अगर न झाली, तरी त्यांच्या महत्त्वाला यत्किंचितूही बाध येणार नाहीं.

६२३६४

## प्राणाधिक खेडुत

वल्लभभाईंची शक्ति म्हणजे गुजरातच्या खेडुतांवर असलेलें त्यांचें विलक्षण वजन! खेडुतांना दिलेलीं वचनें पार पाडण्यासाठीं वल्लभभाई झटले. गेल्या कायदेभंगाच्या दिवसांत गुजरातच्या खेडुतांचें जें नुकसान झालें तें भरून मिळण्याचें साधन एवढ्यापुरतेंच नव्या कॅांग्रेस राजवटीचें वल्लभभाईंना महत्त्व वाटतें. "शेतकऱ्यांना ज्यामुळें सुख मिळत नाहीं, तें स्वराज्य नाहीं" असें कॅांग्रेसच्या अध्यक्षपदावरून जाहीर करून त्यांनीं शेतकऱ्यांबद्दलचें प्रेम व्यक्त केलें. हें प्रेम शाब्दिक नसून अंतःकरणापासून उत्पन्न झालेलें आहे; पण शेतकरी आपल्या उपकारकर्त्यांच्या आधाराखेरीज स्वावलंबी व सुखी होऊं पाहील, तर मात्र हा अपमान सहन करण्याची वल्लभभाईंची तयारी नाहीं. मध्ययुगीन कालांतील उदारमनस्क जमीनदारांप्रमाणें वल्लभभाईंची परोपकारी पण ताठर मनोरचना आहे. लोकशाहीशीं ते या वृत्तीमुळें तदाकार होऊं शकत नाहींत. Benevolent despotism या शब्दांनीं ज्या वृत्तीचा बोध होतो, त्याच प्रकारची वल्लभभाईंच्या मनाची घडण झाली आहे. पण सुलतानी सुखावह झाली, तरी ती अखेर सुलतानीच. या सुलतानीचे फायदे वेळीं लोकशाहीपेक्षां

अधिक असले, तरी तत्त्वाच्या दृष्टीनें तिचा अंमल कोणीही मान्य करणार नाहीं, आणि असा विरोध होण्याचे जे प्रसंग उद्भवले त्याच वेळीं वल्लभभाईंच्या विकारांनीं त्यांचा विवेक झांकून टाकला.

गुण-दोष-वैशिष्ट्य

वल्लभभाईंना मित्रांपेक्षां शत्रू जास्त आहेत; पण त्यांनीं शत्रूंना कधींच भीक घातली नाहीं अगर शत्रु उत्पन्न होण्याचे प्रसंगही टाळले नाहींत. " गुजरातमध्यें तुमची मी डाळ शिजूं देणार नाहीं," अशी उघडउघड धमकी त्यांनीं सोशालिस्टांना दिली. पंडित जवाहरलाल यांचें नाक मुठींत घट्ट पकडून व वर्किंग कमिटींत त्यांच्यावर भुलाभाईंना लादून त्यांनीं पंडितजींचा नक्षा उतरला आणि १९३६ च्या नोव्हेंबरमध्यें लाहोर येथें काढलेल्या एका पत्रकांत आडवाटेला जाणाऱ्या कॉंग्रेस-अध्यक्षाला शिस्तींत धरलें. पंडितजींचा कम्युनिझमचा प्रचार त्यांनीं बंद पाडला. उद्यांच्या हरिपूरकॉंग्रेसच्या स्वागतमंडळाचे कार्यकर्ते निवडण्याच्या बाबतींतही वल्लभभाईंनीं लोक अगर लोकमत यांची पर्वा न करतां स्वागतमंडळाच्या सभेंत आगाऊ ठरविलेलीं अधिकाऱ्यांचीं नांवें वाचून दाखविलीं व ते निवडून आल्याचें जाहीर करून वल्लभभाई चालते झाले. " If you would govern men you must be superior to them or despise them " हा डिझरायलीचा उपदेश सामान्यांशीं वागतांना वरचढपणा दाखवून व बरोबरीच्या आणि ( गांधींना वगळून ) इतर श्रेष्ठ पुढाऱ्यांशीं वागतांना त्यांच्याबद्दल तुच्छता दाखवून ते कृतींत आणीत आले आहेत. फटकळपणांत व उद्धटपणांत ते जवाहरलालजींनाही हार जाणार नाहींत आणि दीर्घद्वेषीपणांत—हाय ! त्यांना प्रतिस्पर्धिच नाहीं ! त्यांची वृत्ति व कार्यपद्धति ही अशी अहंभावपूर्ण, बेपर्वाईची व तामसी आहे. वल्लभभाईंच्या कट्टया विरोधकांचेही आक्षेप सर्वस्वी अकारण नाहींत; पण वल्लभभाईंना त्यांची पर्वा वाटत नाहीं. वल्लभभाईंच्या एका चाहत्या अनुयायानें एकदां माझ्याजवळ असे उद्गार काढले होते कीं, "आम्ही वल्लभभाईंना सरदार म्हणतों; त्यांना महात्मा म्हणत नाहीं. " या उद्गारांतच मानवसहज गुणदोषांची मुभा त्यांना देण्याची तयारी त्यांच्या अनुयायांमध्येंही दिसून येते, आणि महात्माच जेथें स्वतः दोषपूर्ण व मानवी आहे, तेथें

वल्लभभाई हे अतिमानुष नाहींत, म्हणून त्यांना कसा दोष देतां येईल? वल्लभभाई महात्म्याच्या सान्निध्यांत असले, तरी पाव, अर्धा महात्मा अशा इतर डझन, अर्धा डझन महात्म्यांप्रमाणें ढोंगी महात्मा न बनतां ते खादीच्या वेषांत व्यवहारी पातीदार राहिले आहेत हेंच त्यांच्या गुणांचें वैशिष्ट्य आणि दोषांचेंही वैशिष्ट्य आहे. वल्लभभाईंनीं तत्त्वांचा अगर तत्त्वज्ञानाचाही फारसा उपयोग कधीं केला नाहीं. विश्वकुटुंबी व्यापकपणा न दाखवितां गुजरात-पुरती त्यांनीं आपली दृष्टि आकुंचित ठेवली व गुजरातसाठींच कार्य केलें. गुजरातच्या कल्याणासाठीं "मुंबईला आग लागली तरी" त्यांना त्याची पर्वा नाहीं. गांधींना अहिंसा हा धर्म वाटत असेल, तर वल्लभभाईंचा अहिंसेवर यशस्वी धोरण यापलीकडे फारसा विश्वास नाहीं. हिंसक क्रॉम्वेलनें जर आज अवतार घेऊन अहिंसेचें धोरण पाळलें, तर वल्लभभाईंपेक्षां अधिक यश त्याला मिळवितां यावयाचें नाहीं. Paint me as I am असें क्रॉम्वेलनें आपल्या चितार्‍याला सांगितलें होतें. वल्लभभाईंमध्येंही तो प्रांजलपणा निःसंशय आहे. कठोर शिस्तप्रियता, कणखर मन, धाडसी वृत्ति आणि स्वार्थनिरपेक्ष सेवा यांचा परिपाक म्हणजे वल्लभभाई ही व्यक्ति व तिचें कार्य. गांधींच्या राजकारणांत ज्या अनुयायांनीं आपल्या कर्तबगारीच्या इमारती उठविल्या, त्या इमारतींत ज्योत्स्नाप्रकाशांत खुलून दिसणारा ताजमहाल खुद्द गांधींनाही उठवितां आला नाहीं. गांधींचा ताजमहाल म्हणजे एप्स्टिनची कलाकृति; पण वल्लभभाईंनीं मात्र इतर अनुयायांच्या इमारतींमध्यें आपला लोहस्तंभ गुजरातच्या माळावर उभारला. तो भव्य आहे व सुंदरही आहे. पण त्याची भव्यता नयनरम्य नाहीं आणि सौंदर्यही रात्रीच्या वेळीं भीषण वाटतें. पण जयस्तंभ अगर कीर्तिस्तंभ या नात्यानें असलेलें त्याचें ऐतिहासिक महत्त्व नवगुजरातच्या इतिहासांत कमी होईल काय?

विविध वृत्त, ता. २४ ऑक्टोबर १९३७

## सर चिमणलाल सेटलवाड : : ७

शुक्रवार ता. ३ फेब्रुवारी १९२८ रोजीं मुंबईंत चौपाटीवर एक प्रचंड जाहीर सभा भरली होती. चौपाटीवर त्यापूर्वींही अनेक जाहीर सभा भरल्या होत्या व त्यानंतरही भरल्या. ही सभा इतर प्रसंगींच्या सभांपेक्षां आकारानें अधिक मोठी व प्रचंड होती असेंही नाहीं. पण या सभेला एक विशेष महत्त्व प्राप्त झालें होतें. हवा खाण्या-साठींही चौपाटीकडे सहसा न झुकणारी कांहीं बडी मंडळी या सभेला हजर राहिली होती ! चौपाटीवरील जाहीर सभा म्हणजे बहुजनसमा-जाला मंत्रदीक्षा देण्याची जागा; बहुजनसमाजाचे पुढारी अशा सभांत नेहमींच तळपतांना दिसतात; पण बहुजनसमाजाशीं कधींच जिव्हा-ळ्याचें नातें अगर संबंध नसलेलेही पुढारी या प्रचंड जाहीर सभेला हजर राहिले होते आणि त्यांच्यापैकीं एका प्रसिद्ध व्यक्तीनें थंडीचें निवारण करण्यासाठीं एका जाडजूड ओव्हरकोटानें आपलें अंग लपेटून घेऊन या सभेचें अध्यक्षस्थान मंडित केलें होतें. ती व्यक्ति **सर चिमणलाल सेटलवाड** ही होती. सभा झाली, भाषणें झालीं, सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्याचा ठराव या सभेंत अगदीं

प्र. ग्रं. सं. ठाणे.



एकमतानें पास झाला आणि सभेचें विसर्जनही झालें. सभेला जमलेल्या श्रोत्यांपैकीं दोघे तरुण घरीं परत जातांना आपापसांत बोलत होते.

" काय रे, सर चिमणलाल यांच्या सबंध आयुष्यांत एवढ्या मोठ्या सभेपुढें भाषण करण्याची संधि त्यांना कधीं आली होती काय ? "

" नसेल, मला नाहीं वाटत; आणि ही वस्तुस्थिति त्यांनीं आपण होऊनच कबूल नाहीं का केली ? मी तर त्यांना आजच प्रथम पाहत आहें. एवढे दिवस फक्त त्यांचें नांव आणि त्यांना मिळणाऱ्या शिव्याच तेवढ्या मी ऐकत होतों. वर्तमानपत्रांतील त्यांचे फोटोही पुष्कळ पाहिले आहेत; पण चिमणलाल यांना मीं प्रत्यक्ष पाहिलें नव्हतें. चिमणलाल बरें बोलतात, हातवारे वगैरे करीत नाहींत. "

" पण आतां ही मवाळ मंडळी पुढें काय करणार आहेत ? आज तर त्यांनीं भलताच जहालपणा दाखविला. ' साहेबां 'चा तर उघड उघड उपमर्द केला ! एवढा धीटपणा कसा काय या मंडळींनीं दाखविला ? "

" अरे बाबा, त्यावरूनच मी आतां चक्क सांगतों कीं सरकार चारी मुंड्या चीत होणार. मवाळसुद्धां रागावले ! मग आणखी काय पाहिजे ? You know, even a worm turns आणि तीच वेळ अरेराव, गर्वांध, मिजासखोर, लोकांना आणीबाणीची असते. उंटाच्या पाठीवर पडलेली ही शेवटची काडी आहे; आतां त्याची पाठ मोडणार ! "

—आणि झालेंही तसेंच ! प्रागतिकांनीं या वेळीं आपली बुद्धि सर तेजबहादूर सप्रू यांजपाशीं गहाण टाकली आणि त्यांच्या आग्रहावरून सायमनकमिशनवर बहिष्कार घालण्यांत पुढाकार घेतला ! या 'सर्व-सफेत' ( all white ) कमिशनच्या दौऱ्याची चांगलीच फजिती झाली. सर चिमणलाल सेटलवाड यांनीं या बहिष्कारांत पुढाकार घेतला होता व चौपाटीवरील या सभेचें अध्यक्षस्थानही त्यांनींच स्वीकारलें होतें. 'सायमन सप्तक' हिंदुस्थानांत आलें होतें आणि निराश होऊन तसेंच निघून गेलें. हिंदी

लोकमत आणि त्यापेक्षांही मूठभर प्रागतिकांचा निषेध यांचा प्रतिकार ब्रिटिश मुत्सद्द्यांना चांगलाच जाणवला. एकमुखी, एकसूत्री विरोधाच्या परिणाम-कारकपणाची खूण अलीकडच्या काळांत तरी या बहिष्कारप्रकरणाएवढी कोण-त्याच वेळीं ठळकपणें दिसून आली नसेल. हें वर्ष सर चिमणलाल सेटलवाड यांच्या आयुष्यांत बरेंच धांदलीचें गेलें. आपला वकिली व्यवसाय आणि प्रागतिकपक्षाची राखणदारी ही दोन्हीं कामें संभाळीत असतांनाच आयुष्यांतील नीरस संथपणा सोडून सर चिमणलाल मोकळ्या जगांत थोड्याफार स्वच्छंदानें असे याच वर्षी वावरले. अपरिचित अशा लोकप्रियतेनेंही त्यांच्याशीं चुंबा-चुंबी चालविली; पण हा चौपाटीवरील " रेवडीचा स्वाद "च सर चिमणलाल यांना बाधला असावा ! हातीं घेतलेलें कार्य सुरळीतपणें तडीस गेल्यावर, त्यानंतर पुनः म्हणून सर चिमणलाल यांनीं आपल्या कोषाबाहेर पाऊल टाकलें नाहीं ! त्यानंतर ३१ ऑक्टोबर १९२९ ची रात्र आली. रा. टे. परिषदेची घोषणा करणारें भाषण लॉर्ड अर्विन यांनीं केलें. या भाषणाचा विचार करण्यासाठीं ३१ ऑक्टोबरच्या मध्यरात्रीं सर चिमणलाल यांनीं मुंबईतील पुढाऱ्यांची एक तांतडीची सभा भरवून लॉर्ड अर्विन यांच्या भाषणाबद्दल समाधान व्यक्त करणारें पत्रक काढलें व स्वतःच्या आणि कॅांग्रेस-पक्षांत आजमितीला अग्रस्थानीं मिरवणाऱ्या व सभेला हजर असलेल्या पुढा-ऱ्यांच्या सह्यांसह तें दुसऱ्या दिवशीं वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केलें. दिल्ली येथील पुढाऱ्यांचें पत्रक प्रसिद्ध होण्यापूर्वी हें पत्रक प्रसिद्ध करण्यांत अथवा दिल्ली येथील आपल्या प्रागतिक सहकाऱ्यांचा विचार घेतल्याखेरीज हें १९ पुढा-ऱ्यांचें पत्रक प्रसिद्ध करण्यांत सर चिमणलाल यांनीं जी घिसाडघाई केली, तिनें त्यांचें गाडें मूळ पदावर आणून ठेविलें व पुन्हां सर चिमणलाल हे आपल्या स्वाभाविक राजकीय पार्श्वभूमीमध्यें ठळकपणें बसलेले दिसूं लागले. सर चिमणलाल सेटलवाड यांच्या राजकीय आयुष्यांतील हीं २–३ वर्षें वगळलीं, तर त्यांचा राजकीय व सार्वजनिक जीवनक्रम एकाच सातत्याच्या चाकोरींतून चालू राहिलेला आढळून येतो. सायमन कमिशनवर बहिष्कार घालतांना त्यांनीं पुढाकार घेऊन दाखविलेला खंबीरपणा व नंतरची त्यांची मुत्सद्देगिरी यांची वजाबाकी केल्यानंतर प्रारंभापासून आजच्या घटके-

पर्यंत सर चिमणलाल सेटलवाड यांच्या आयुष्यावर जर कोणत्या एकाच गोष्टीनें कायमचा पगडा ठेवलेला दिसत असेल, तर ती गोष्ट विचार—अतिविचार हीच होय. अतिविचाराबरोबरच निष्क्रियता आणि दीर्घसूत्रीपणा ही जोडी हातांत हात घालून येते, व या त्रिकुटाचें साहचर्य कधींही व कोणत्याही परिस्थितींत स्फूर्तिदायक झालेलें दिसून येत नाहीं. सर चिमणलाल सेटलवाड व गोपाल कृष्ण गोखले एकाच राजकीय गुरूचे-फेरोजशहा मेहतांचे शिष्य; एकाच राजकीय पक्षांतले, पण उभयतांच्या कार्यांत व कार्यपद्धतींत जमीन-अस्मानाचें अंतर त्यामुळें दिसून आलें आहे. “मुहूर्तं ज्वलितम्” आणि “धूमायितं चिरम्” ह्या दोन अवस्थांचीं प्रागतिकपक्षांतील हीं दोन प्रतीकें आहेत असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

गडद छाया

सर चिमणलाल यांच्या जीवनक्रमांतील हा संथपणा जन्मसिद्ध व स्वभावजन्यच आहे असें म्हणावें लागतें. परिस्थिति अगर विपरीत अनुभव यांच्यामुळें आयुष्यांतील उत्तरार्धांत अथवा आयुष्यांतील बदलणाऱ्या महत्त्वाच्या संक्रमणावस्थेंत शिरून तो दृढमूल झालेला नाहीं. उच्छृंखल तेजस्वीपणाचें कालांतरानें सौम्य सुविचारीपणांत रूपांतर झालें, तर त्याचें कौतुक केलें पाहिजे, अगर भुलाभाई देसाई यांच्यासारखा एखादा अपवाद ‘बुड्ढी घोडी लाल लगाम’ ह्या म्हणीचा दाखला पटवूं लागला, तर त्याची चिकित्सा केली पाहिजे; पण ज्याच्या कृतींत व उक्तींत असा कोठेंही कालसहज चमकदारपणा प्रकट झालेला नाहीं, तेथें त्याचा अभाव हा वृत्तिजन्य नाहीं असें कसें म्हणतां येईल? एवढेंच कशाला, १८६४ सालीं सर चिमणलाल यांच्याचबरोबर जन्मलेले प. वा. रॅम्से मॅक्डोनल्ड यांचें चरित्र पाहा. रॅम्से मॅक्डोनल्ड यांनीं दारिद्र्याशीं व बिकट परिस्थितीशीं झगडत राहून एका बलवान् अशा राजकीय पक्षाची प्रतिष्ठापना केली व या पक्षाला असाधारण महत्त्व व सत्ता प्राप्त करून दिली. परिस्थितीच्या आहारीं जाऊन त्यांनीं आपला मार्ग बदलला ही गोष्ट अलाहिदा आहे. पण त्यामुळें त्यांचें कर्तृत्व लोपत नाहीं. पण सर चिमणलाल यांना त्यांच्याहीपेक्षां अनुकूल परिस्थितीचा लाभ मिळून त्यांनीं काय केलें? सर फिरोजशहा मेहता यांचा तेजस्वीपणा, गोखल्यांची बुद्धिमत्ता

व कळकळ, तेलंगांची सूक्ष्म व सखोल विवेचक बुद्धि आणि पांडित्य व रानड्यांचें व्यापक धोरण आणि दूरदृष्टि हे सर्व सद्गुण त्यांच्या अंगीं प्रकर्षें-करून वसत होते; पण ही लाभलेली दौलत नीट जतन करून ठेवण्याएवढेंही कर्तृत्व, सर चिमणलाल यांना दाखवितां आलें नाहीं असें प्रांजळपणें व मोठ्या खेदानें म्हणावें लागतें! याचें कारण त्यांची कर्तव्यच्युति असें मी म्हणत नाहीं; तर हा त्यांच्या स्थितिनिष्ठतेचाच दोष आहे असें माझें मत आहे. त्यामुळेंच सर चिमणलाल यांचें स्वभावचित्र रेखाटतांना प्रकाशापेक्षां छायेच्या बाजूवरच अधिक लक्ष देऊन ती गडद करणें भाग पडतें.

बुद्धिमत्ता

सर चिमणलाल यांचा जन्म १८६४ सालीं जुलै महिन्यांत भडोच येथें एका सुखवस्तू कुटुंबांत झाला. सेटलवड हें वास्तविक या कुटुंबाचें खरें आडनांव. पण 'वड'चें 'वाड,' उच्चारसुकर नसलेल्या इंग्रजीच्या लिपीदोषा-मुळें झालें व तें सर चिमणलाल यांना प्रथम चिकटून नंतर कायमच राहिलें. अहमदाबाद येथें त्यांचें प्राथमिक शिक्षण झालें व नंतर उच्च शिक्षणासाठीं मुंबईंत येऊन त्यांनीं एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें प्रवेश केला. कॉलेजमध्यें असतांना त्यांची गणना होतकरू व हुशार विद्यार्थ्यांमध्यें होत असे; पण तल्लख बुद्धिमत्ता अथवा असाधारण ग्रहणशक्ति त्यांनीं दाखविली नाहीं. १८८४ मध्यें बी. ए. ची परीक्षा ते शेवटच्या वर्गांत पास झाले व नंतर तीन वर्षांनीं त्यांनीं वकिलीची परीक्षा दिली; पण तींतही त्यांचें तेज पडलें नाहीं. एल्फिन्स्टन कॉलेजचे प्रिन्सिपॉल डॉ. वर्ड्स्वर्थ यांचे मात्र ते आवडते विद्यार्थी होते व आपल्या या विद्यार्थ्याच्या आयुष्याची सुरवात सुप्रतिष्ठितपणें व्हावी म्हणून त्यांनीं प्रयत्नही केले. सरकारी न्यायखात्यांत त्यांना नोकरी मिळावी म्हणून डॉ. वर्ड्स्वर्थ यांनीं त्यांची तरफदारी केली व त्या वेळचे एक डि. जज्ज मि. वॉकर यांनीं त्यासाठीं त्यांची जोराची शिफा-रसही केली; पण स्टॅच्युटरी सिव्हिल सर्व्हिसमधील रिकाम्या जागीं खालच्या नोकरवर्गांतील उमेदवाराची बढती करण्याचें धोरण हिंदुस्थान सरकारनें स्वीकारल्यामुळें सर चिमणलाल यांच्या आयुष्याला धोपटमार्ग लाग-ण्याची ही संधि फसून ते वकिलीकडे वळले. १८८७ सालीं वकिलीची

परीक्षा पास झाल्यावर हायकोर्टांत सनद काढून त्यांनीं प्रॅक्टिस करण्यास सुरुवात केली.

यशस्वी वकील

चिमणलाल यांच्या बुद्धिमत्तेचें त्यांच्या विद्यार्थीदशेंत तेज पडलें नाहीं, तरी वकिली व्यवसायांत मात्र त्यांच्या अंगच्या चिकाटीनें त्यांना चांगलेंच यश मिळवून दिलें. वकिली व्यवसायांतील यशाला बुद्धिमत्तेपेक्षां चिकाटीचीच गरज जास्त असते व चिकाटी हा सर चिमणलाल यांच्या अंगचा मोठ्यांतला मोठा गुण आहे. सर चिमणलाल यांच्या वकिली व्यवसायाला गेल्या फेब्रुवारी महिन्यांत ५० वर्षें पुरीं झालीं. या दीर्घ कालांत मुंबईच्या हायकोर्टांत सर चिमणलाल यांनीं मिळविलेलें यश व प्रतिष्ठा अनन्यसाधारण आहे. या काळांत साधारणपणें असा एकही महत्त्वाचा खटला निघालेला नाहीं कीं ज्यामध्यें सर चिमणलाल यांना कोणत्या तरी एका बाजूचें वकीलपत्र मिळालेलें नाहीं. हायकोर्टाच्या बाहेर लौकिक व प्रसिद्धि मिळवून देतील असे खटले चालविण्याची संधि त्यांना लाभली नाहीं; परंतु तेवढ्यावरून या व्यवसायांतील यशःसिद्धीसाठीं त्यांनीं केलेल्या प्रयत्नांचें महत्त्व कमी ठरत नाहीं. हायकोर्टांतील गोऱ्या वकील बॅरिस्टरांची मिरासदारी मोडून तेथें आपला शिरकाव करणें व नंतर त्यांच्याशीं झुंज खेळत आपला प्रभाव पाडणें हें दिव्य त्या काळच्या हिंदी वकिलांना करावें लागत होतें. सर चिमणलाल यांची तुकडी अगदीं प्रारंभींचीच असल्यामुळें त्यानंतरच्या वकिलांच्या मानानें त्यांचें कामही अर्थात् जास्त बिकट झालें होतें. पण हें काम त्यांनीं मोठ्या खंबीरपणानें बजावलें व आपल्या कर्तबगारीची कायमची छाप पाडली. पहिलीं दहा वर्षें आपल्या वकिलीचा जम बसविण्यांत त्यांनीं घालविलीं व नंतर मागणीला पुरवठा करण्यासाठीं त्यांना अहोरात्र व्यवसायनिमग्न राहावें लागलें. प्रारंभींच्या काळांत सर चिमणलाल यांच्या कर्तृत्वाकडे लक्ष वेधण्याजोगी संधि सुप्रसिद्ध कॉकस प्रकरणाच्या खटल्यानें त्यांना आणून दिली. कॉकसच्या कटामुळें म्युनिसिपल निवडणुकींत सर फेरोजशहा मेहता पराभूत झाल्यामुळें ही निवडणूक बेकायदेशीर ठरविण्यासाठीं हायकोर्टांतील त्या वेळचे एक सुप्रसिद्ध सॉलिसिटर श्री. भाईशंकर नानाभाई यांनीं हायकोर्टांत दावा केला होता व

या दाव्यांत त्यांनीं आपलें वकीलपत्र सर चिमणलाल यांना दिलें होतें. सर चिमणलाल यांचे प्रतिस्पर्धी म्हणून सुप्रसिद्ध बॅरिस्टर मि. इन्व्हेरॅरिटी हे उभे राहिले होते. या खटल्याकडे सर्व इलाख्याचें लक्ष वेधून राहिलें होतें. मुंबई हायकोर्टाचे त्या वेळचे प्रख्यात चीफ जस्टिस सर लॅरेन्स जेंकिन्स व न्या. मू. बॅटी यांच्यापुढें हा खटला सुनावणीला निघाला. खटल्याचें काम चार दिवस चाललें होतें. खटला संपल्यावर उभय न्यायमूर्तींनीं सर चिमणलाल यांना खटल्याचें काम उत्कृष्टपणें चालविल्याबद्दल भर कोर्टांत धन्यवाद दिले व त्यांना आपल्या चेंबरमध्यें मुद्दाम बोलावूनही नंतर खासगी रीतीनें त्यांच्या कौशल्याची मुक्तकंठानें तारीफ केली. 'बॅ. इन्व्हेरॅरिटी हे तुमच्या जागीं असते, तर त्यांनादेखील तुमच्यापेक्षां अधिक चांगल्या रीतीनें काम चालवितां आलें नसतें' असा अभिप्राय त्यांनीं बोलून दाखविला. बॅ. इन्व्हेरॅरिटी यांच्या तोलाचा कायदेपंडित मुंबईंत त्या वेळीं दुसरा नव्हता; अर्थात् ही स्तुति कोणाही हिंदी वकिलाला अभिमान वाटण्याजोगीच होती. सार्वजनिक महत्त्व प्राप्त झालेला असा सर चिमणलाल यांनीं चालविलेला दुसरा एक उल्लेखनीय खटला म्हणजे हॉर्निमन विरुद्ध सुरजमल हा होय. श्री. सुरजमल हे हायकोर्टाचे सॉलिसिटर होते व हॉर्निमन यांच्यावर त्यांनीं क्रॉनिकल पत्रांतील टीकेची बाब पुढें करून अब्रू-नुकसानीची फिर्याद केली होती. खालच्या कोर्टांत हॉर्निमन दोषी ठरले होते. क्रॉनिकल पत्राचे मालक इंडियन न्यूजपेपर्स कंपनी यांचे सर चिमणलाल हे त्या वेळीं सर फेरोजशहा मेहता यांच्यानंतर चेअरमन होते, व त्यांनीं हॉर्निमन यांचें वकीलपत्र घेऊन हायकोर्टांत अपील केलें. अपिलाच्या सुनावणीनंतर अपील ऐकणारे न्यायमूर्ति चीफ जस्टिस सर बेसिल स्कॉट व न्या. मू. सर जॉन हीटन यांचा निर्णय परस्परविरोधी होऊन सर बेसिल स्कॉट यांनीं हॉर्निमन ह्यांना निर्दोषी ठरविलें व सर जॉन यांनीं खालच्या कोर्टाचा निर्णय कायम केला. खटल्याचा निर्णय असा मतभेदाच्या गोंधळांत पाडणारा झाला, तरी कायद्यांतील कमकुवतपणा व रूढि यांचें सर चिमणलाल यांना मार्मिक ज्ञान असल्यामुळें त्यांनीं एकदम जणूं स्फूर्ति झाल्याप्रमाणें चटकन् उठून न्यायमूर्तींना कोंडींत पकडण्याचा प्रयत्न केला व मतभेदाच्या वेळीं जाणत्या (सीनियर) न्यायाधीशाचाच निर्णय कायम करण्यांत येतो या शिरस्त्यावर

बोट ठेवलें ! सर चिमणलाल यांनीं केलेली ही अडवणूक सर बेसिल यांच्या लक्षांत आली; पण त्यांनींही उलट डाव टाकला, व कधींही न हंसणाऱ्या या न्यायमूर्तींनीं आधीं पोटभर हंसून घेऊन, “ सीनियर जज्जाचा निर्णय, तिघां न्यायमूर्तींच्या फुलबेंचपुढें हा खटला चालावा असा आहे ” असें सांगून सर चिमणलाल यांच्यावर बाजू उलटविली. नंतर हा खटला फुलबेंचसमोर चालून हॉर्निमन हे निर्दोषी ठरून सुटले. वकिलींतील पांडित्यांतच सर चिमणलाल हे तरबेज आहेत असें नसून या व्यवसायांतील इतर आयुधांचेंही ज्ञान त्यांना भरपूर आहे आणि प्रसंगीं भांबावून न जातां त्याचा उपयोग करण्याची समयसूचकताही त्यांच्या अंगीं चांगलीच आहे हें दाखवून देण्यासाठीं या प्रसंगांचा मीं हा उल्लेख केला आहे.

फावल्यावेळचें राजकारण !

वकील व सार्वजनिक कार्य यांचें नातें निकटचें व परस्परपोषक असल्यामुळेंच सर चिमणलाल हेही सार्वजनिक कार्यांत ओढले गेले; पण आपली वकिली ही मुख्य भूमिका मात्र ते केव्हांही विसरले नाहींत,–नव्हे, त्यांना विसरतां आली नाहीं. हिंदुस्थानांतील अनेक सुप्रसिद्ध वकील पुढाऱ्यांनीं सार्वजनिक कार्याला हौसेनें वाहून घेतलें व नंतर सार्वजनिक कार्य हाच आपला मुख्य व्यवसाय करून वकिलीकडे जरी पूर्णपणें दुर्लक्ष केलें नाहीं, तरी या व्यवसायाला अवास्तव महत्त्व दिलें नाहीं; पण सर चिमणलाल यांना आपल्या वकिलीचा मोह केव्हांच आवरतां आला नाहीं. सार्वजनिक कार्य, राजकारण, शिक्षणव्यवसाय व सरकारी अधिकाराच्या जागा यांच्याशीं त्यांचा संबंध आला; पण सार्वजनिक कार्याची हौस अथवा सरकारी मान्यता व सत्ता यांचा हव्यास त्यांनीं धरला नाहीं. हायकोर्ट जज्जाची जागा त्यांना देण्यांत आली; पण वकिलीच्या मोहानें कांहीं दिवसांनीं त्यांनीं ती सोडून दिली, व ते सेंट्रल लेजिस्लेटिव् ॲसेंब्लीत शिरले. पण तेथें गेल्यावरही मुंबईचे माजी गव्हर्नर सर जॉर्ज (लॉर्ड) लॉयड यांच्या आग्रहामुळें मुंबईसरकारच्या कार्यकारी मंडळाचे सभासद होण्यासाठीं त्यांनीं ॲसेंब्लीच्या सभासदत्वाचा राजिनामा दिला. कार्यकारी मंडळांतही त्यांनीं सशर्त प्रवेश केला. कार्यकारी मंडळाच्या सभासदत्वाची पूर्ण मुदत भरेपर्यंत आपण काम करणार नाहीं

अशी अट त्यांनीं घातली व त्याप्रमाणें २॥ वर्षांनीं निम्मे मुदत भरतांच ही जागा सोडून ते पुनः वकिलीकडे वळले. चरितार्थाच्या संपन्न व्यवसायावर कोणत्याही महत्त्वाकांक्षेची, सत्तालोलुपतेची अगर हौसेची मात्रा त्यांनीं चालू न दिल्यामुळें सर चिमणलाल यांचें राजकारण हें एक फावल्या वेळचें राजकारण झालें ! आपल्या वैशिष्ट्याचा असा ठसा त्यांना कोणत्याच कार्यक्षेत्रांत उठवितां आला नाहीं, अगर जनतेचें मन आपल्याकडे आकर्षून घेतां येईल अशी कामगिरीही त्यांना करून दाखवितां आली नाहीं. सर चिमणलाल ह्यांना हाताशीं धरून त्यांच्याकडून लोककार्य करून घेण्याच्या इच्छेनें सर फेरोजशहा मेहतांनीं आपल्या इतर तरुण अनुयायांप्रमाणें सर चिमणलाल यांच्याही सार्वजनिक जीवनक्रमाचा कार्यक्रम आंखला व १८९२ मध्यें त्यांना मुंबई कॉर्पोरेशनच्या निवडणुकीसाठीं उभें केलें. या निवडणुकींत सर चिमणलाल पहिल्या जागीं निवडून आले. कॉर्पोरेशनमध्यें प्रवेश झाल्यानंतर मध्यंतरींचा तीन वर्षांचा काळ वगळल्यास ते १८९२ पासून पुढें सतत २५ वर्षे कॉर्पोरेशनचे सभासद होते आणि या सभासदत्वापैकीं १५ वर्षें त्यांनीं स्कूल्स कमिटीचे अध्यक्ष या नात्यानें शहरांतील प्राथमिक शिक्षणाचें कार्य केलें. १८९२ सालीं त्यांनीं १८९२ च्या कायद्यान्वयें अस्तित्वांत आलेल्या इलाख्याच्या कायदेमंडळांतही प्रवेश केला, पण पुनः वकिलीसाठीं, नव्या निवडणुका लढविण्याच्या भरीस न पडतां कायदेमंडळाच्या राजकारणांतून अंग काढून घेतलें. १९०३ मध्यें मुंबई-युनिव्हर्सिटीतर्फे ते पुनः कायदेमंडळाच्या निवडणुकीसाठीं उभे राहिले व यशस्वी झाले व १९१५ पर्यंत या मंडळावरील आपलें आसन त्यांनीं कायम राखलें, व गोखल्यांच्या निधनानंतर मुंबई-कायदेमंडळाचे प्रतिनिधि म्हणून इंपीरियल कौन्सिलमध्यें प्रवेश केला. सर फिरोजशहा मेहता व ना. गोखले यांनीं इंपीरियल कौन्सिलमधील आपलें सभासदत्व आपल्या वक्तृत्वानें, जोरदार विरोधानें व अडवणुकीच्या नाना प्रकारांनीं गाजविलें; पण त्याच आसनावर अधिष्ठित झालेले सर चिमणलाल यांना वेळप्रसंगीं आपला सौम्य विरोध व निषेध व्यक्त करण्यापलीकडे कोणतीही महत्त्वाची अशी कामगिरी बजावतां आली नाहीं. नाहीं म्हटल्यास माजी भारतमंत्री मि. मॅँटेग्यू यांच्याकडून मात्र त्यांनीं एक शिफारसपत्र मिळविलें. मि. मॅँटेग्यू यांनीं आपल्या १९१७ सालच्या दौऱ्यांत ज्या हिंदी पुढाऱ्यांच्या

मुलाखती घेतल्या, त्यांमध्यें सर चिमणलाल यांचीही दोन वेळां मुलाखत घेतली व त्या वेळीं १९१६ ची कॉंग्रेसलीग स्कीम पुढें मांडून सर चिमणलाल यांनीं त्या योजनेच्या स्वीकारासाठीं जोराची तरफदारी केली. सर चिमणलाल यांचा उल्लेख मॅंटेग्यूंनीं आपल्या सुप्रसिद्ध रोजनिशींत " This extremely clever lawyer and a very nice fellow who argued extra-ordinarily well." या वाक्यानें केला आहे.

## घातकी धोरण व विपर्यास

मॅंटफर्ड-सुधारणांच्या वेळचा व नंतरचा काळ पूर्वीपेक्षांही अधिक धका-धकीचा व कार्यव्यग्र करणारा होता. अर्थातच सर चिमणलाल यांच्या व्यव-सायमग्न वृत्तीला तो झेपणारा नव्हता. पण हाच काळ कॉंग्रेस व नेमस्त यांच्या राजकीय ऐक्याचे अखेरचे प्रयत्न फसल्यामुळें नेमस्त पक्षाच्या भावी अस्तित्वाच्या दृष्टीनें जास्त महत्त्वाचा होता व खंबीर पुढाऱ्याच्या मार्गदर्श-कत्वाची व संघटनेची त्याला निदान मुंबई इलाख्यांत तरी मोठीच आवश्य-कता भासत होती. सर चिमणलाल यांच्या हातीं, मुत्सद्देगिरी व तीव्र बुद्धि या दोन्ही कारणांनीं, या पक्षाचें नेतृत्व गेलें; पण त्यामुळेंच तें निःसत्त्व व चैतन्य-हीन झालें ! जोरदार भाषणें, तीव्र निषेध आणि सालाबादच्या मागण्या व ठराव यांचा काळ जाऊन चढाईचा, प्रत्यक्ष कृतीचा व धडाडीच्या राज-कारणाचा नवा काळ युद्धोत्तर परिस्थितीनें उत्पन्न केला; पण बदलत्या काळाचीं लक्षणें ओळखून त्याप्रमाणें जुन्या कार्यक्रमांत फेरफार करण्याचें धोरण अगर तत्परता सर चिमणलाल अगर त्यांचे सहकारी पुढारी यांनीं दाखविली नाहीं. पक्षाची संघटना करण्यासाठीं आपल्या कर्तृत्वाचा उपयोग करण्याऐवजीं सरकारी कमिट्या व अधिकाराच्या जागा यांचा स्वीकार करून लोकहित साधण्याचें सौम्य धोरण प्रागतिकांनीं स्वीकारलें. आणि सर चिमणलाल हे अर्थातच या धोरणाला अपवाद राहणें शक्यच नव्हतें. १९१८ मध्यें मुंबईला प्रागतिक पक्ष स्थापन झाला. मॅंटफर्ड सुधारणांचा मार्ग या पक्षानें सुकर केला. या सुधारणांतील सोपींव खात्याचे विभाग व मतदानाचे अधिकार ठरविण्यासाठीं नेमलेल्या साउथबरो कमिटीवर सर चिमणलाल यांना नेमण्यांत आलें. त्यानंतर सुप्रसिद्ध जालियनवाला बाग प्रकरण उद्भवलें व

त्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठीं नेमलेल्या हंटर कमिटीवर सर चिमणलाल यांची नेमणूक झाली. सर चिमणलाल व त्यांचे दोघे हिंदी सहकारी यांनीं कमिटीच्या रिपोर्टाला भिन्नपतपत्रिका लिहून आपल्या नेमणुकीचें चांगलेंच चीज केलें. पण ‘ सैतानी ’ ठरलेल्या सरकारच्या गोटांत वावरून सरकारला शह देणाऱ्या हिंदी पुढाऱ्यांच्या कार्याची जाणीव बाळगण्यासरखी धंदेवाईक पुढाऱ्यांची व जनतेची मनःस्थिति नसल्यामुळें प्रागतिकांच्या प्रामाणिकपणाचा विपर्यास होण्यास त्या वेळेपासून सुरुवात झाली. सर चिमणलाल यांना लोकनिंदेंतील आपला वांटा उचलावा लागला; पण प्रत्युत्तर अथवा शंकानिरसन यांच्या खटाटोपांत ते पडले नाहींत. लोकमतापासून अलग व फटकून राहण्याच्या या घातकी धोरणामुळेंच सर चिमणलाल यांचें कार्यक्षेत्र संकुचित झालें व त्यामुळेंच विपर्यस्त स्वरूपांत दिसणारे आजचे सर चिमणलाल उत्पन्न झाले. सर जॉर्ज लॉयड यांच्या कार्यकारी मंडळांतील मंत्री या नात्यानें गांधींच्या अटकेची जबाबदारी सर चिमणलाल यांच्यावर व त्यांचे सहकारी डॉ. परांजपे यांच्यावर टाकण्यांत येते. या दोन्ही मंत्र्यांनीं आजच्या काँग्रेस-मंत्र्यांची नीति लक्षांत धरून गांधींच्या अटकेला मान्यता दिली असती, तर त्यांत कांहींच गैर नव्हतें. काँग्रेस-मंत्री व काँग्रेस सोशालिस्ट चळवळे यांच्यांतील नात्यापेक्षां प्रागतिक पक्ष व बेकायदेशीर काँग्रेस-चळवळे यांचें नातें खात्रीनें जास्त जिव्हाळ्याचें नव्हतें व गांधी व त्यांची चळवळ यांच्याबद्दलचीं आपलीं मतें व मतभेद प्रागतिकांनीं स्पष्टपणें जाहीर केलेलीं होतीं; पण एवढें असूनही गांधींच्या अटकेच्या धोरणाशीं सहमत होण्याचें या दोन्ही प्रागतिक मंत्र्यांनीं नाकारलें व सर जॉर्ज लॉयड यांनीं स्वतःच्या जबाबदारीवरच गांधींना अटक केली; ही वस्तुस्थिति आतां स्पष्ट झालेली आहे. मुंबईच्या कार्यकारी मंडळांत सक्कर धरणाची योजना तडीला नेण्यांत सर चिमणलाल यांचेच परिश्रम कारणीभूत झाले. या योजनेमुळेंच मुंबई सरकारच्या दिवाळखोरीला प्रारंभ झाला; पण त्याबद्दल सर चिमणलाल यांना दोष देतां येत नाहीं.

## नेमस्त

यापुढें सर चिमणलाल यांचें राजकारण पूर्णपणें नेमस्त वृत्तीचें म्हणजे लोकानुनयाकडे लक्ष न देतां वैयक्तिक कर्तृत्वावर भर टेवून एकाकीपणें कार्य

करीत राहणें ह्या नेमस्त वृत्तीच्या लौकिक अर्थाला पोषक असें झालें. सायमन कमिशनवरील बहिष्कार ही एकच उल्लेखनीय घटना राजकारणांतून जन्माला आली. ही घटना वगळली, तर नंतर पहिल्या दोन रा. टे. परिषदांमध्यें सर चिमणलाल यांनीं घेतलेला भाग व फेडरेशनला केलेला विरोध यांपलीकडे वैयक्तिक कर्तृत्वाची शिदोरी त्यांच्या पदरीं बांधतां येत नाहीं. मुंबई-युनिव्ह-सिटीचे व्हाइस चॅन्सलर या नात्यानें १२ वर्षांच्या कारकीर्दींत मुंबई-युनिव्ह-सिटीची गंगाजळी काटकसरीच्या धोरणानें ३० लाख रुपयांच्या रकमेनें फुगविणें व युनिव्हर्सिटी रिफॉर्म्स् कमिशनचे अध्यक्ष या नात्यानें युनिव्हर्सि-टीची घटना अधिक विस्तृत व व्यापक करणें या कामगिरीचें सर्व श्रेय मात्र सर चिमणलाल यांना दिलें पाहिजे. एल्एल्.डी.ची डिग्री त्यांना अर्पण करून त्यांच्या या कामगिरीचें फळ युनिव्हर्सिटीनें त्यांच्या पदरांत टाकलें आहे.

व्यक्ति

सुदैवी, सुखासीन, दीर्घ विचारी, निर्भीड, प्रामाणिक व पापभीरु पुढारी या स्वरूपांत सर चिमणलाल यांची व्यक्ति माझ्या डोळ्यांसमोर उभी राहते. सर चिमणलाल यांच्या वृत्तींत त्याग आणि महत्त्वाकांक्षा, तडफ आणि भांडखोर झुंजारपणा या गुणांचें मिश्रण झालें असतें, तर लोकप्रियतेच्या शिखरावर आरूढ होऊन हिंदुस्थानांतील सर्वश्रेष्ठ पुढाऱ्यांच्या मालिकेंत त्यांना बसतां आलें असतें. पण ते गुण अंगीं नसल्यामुळें मूठभर बोलक्या बुद्धिवंतांचे अनुयायीहीन पुढारी हें लांछन त्यांना इतर प्रागतिक पुढाऱ्यां-प्रमाणेंच चिकटलें आहे. सर चिमणलाल म्हणजे रूक्ष व तर्ककर्कश विचार-सरणी, आणि फाजिल सावधानता यांचा एकत्रित झालेला परिपाक आहे. त्यांच्या सान्निध्यांत स्फूर्तीची आशा करावयास नको. खळबळ नाहीं, गोंगाट नाहीं आणि चैतन्य नाहीं; त्यामुळें त्यांच्या सान्निध्यांत येणें म्हणजे अंधाऱ्या जागेंत एखाद्या पंचरशी धातूच्या पुतळ्यासमोर जाऊन उभें राहण्याप्रमाणें वाटतें ! भाविकपणानें कोणी वाटल्यास हात जोडावे अगर भीतीनें दचकून माघारें यावें; पण ही प्रागतिकांची निश्चल देवता नमस्कारानंतर आशीर्वादा-साठीं ओठाच्या पाकळ्या उघडणार नाहीं, अथवा पाठ फिरविल्यामुळें अप-मानित होऊन आपले अर्धोन्मीलित नेत्रही विस्फारित करणार नाहीं. उपहास

च विपर्यास यांच्यामुळें सर चिमणलाल यांच्या वृत्तीला काठिण्य आलें आहे. मानवसुलभ विकारांच्या आधीन ते सहसा होणार नाहींत; आणि प्रसंग आलाच तर त्या प्रसंगाचें गांभीर्य अथवा महत्त्व किंचित्‌ही विचारांत न घेतां निर्भीड-पणें आपलें मनोगत बोलून दाखविण्यास ते कचरणार नाहींत. या त्यांच्या मनोवृत्तीचें एक नमुनेदार उदाहरण मला आठवतें. १९३२ सालीं गांधींनीं येरवड्याच्या तुरुंगांत ज्ञातीय निवाडा बदलण्यासाठीं प्राणांतिक उपोषण सुरू करून खळबळ उडवून दिली व गांधींचे प्राण वांचविण्यासाठीं सगळीकडे एकच धांवाधांव झाली. राजकीय मतभेद अंतर्धान पावून गांधींना वांचविणें हेंच एक कार्य पुढाऱ्यांच्या नजरेसमोर उभें राहिलें! तां. १९ सप्टेंबर रोजीं इंडियन मर्चंटस् चेंबरच्या दिवाणखान्यांत हिंदु पुढाऱ्यांची एक सभा भरली होती. या सभेत डोळ्यांत आंसवें आणून भावनाविवश होऊन सर्व पुढा-ऱ्यांनीं भाषणें केलीं. पण या भाषणांत रोखठोक असें भाषण करून फक्त एकट्या सर चिमणलाल यांनींच गांधींच्या आततायीपणाला दोष दिला व राज्यघटनेचा कायदा पास होण्यापूर्वींच करार बदलून घेण्याचें बिनहिशेबी धोरण हास्यास्पद असल्याचें सांगितलें. सर चिमणलाल यांच्या स्पष्टवक्तेपणा-मुळें त्यांच्यावर इतर हिंदु पुढारी क्षुब्ध झाले व सर चुनिलाल मेहता यांनीं तर त्यांची जागच्या जागीं भरपूर निर्भत्सनाही केली; पण त्या भयंकर दाहक आंचींतही सर चिमणलाल यांची कठोर विचारसरणी वितळली नाहीं!

### भाविक भक्त

पण भावनेच्या केव्हांही आहारीं न जाणारी ही उग्र पाषाणमूर्ति भाविक-पणानें पाझरून 'देव देव' करीत भक्तिभावानें एका महापुरुषाच्या कृपेची करुणा भाकीत असते असें सांगितलें तर त्यावर कोणाचा विश्वास बसेल काय? ही अविश्वसनीय गोष्ट सर चिमणलाल यांच्या दैनंदिन कार्यक्रमाचा एक अत्यावश्यक भाग होऊन राहिली आहे. सर चिमणलाल हे अक्कल-कोटच्या स्वामींचे निस्सीम उपासक असून स्वामीमहाराजांचें चिंतन करून त्यांच्या तसबिरीचें दर्शन घेतल्याशिवाय त्यांचा एकही दिवस जात नाहीं. सर चिमणलाल यांनीं वकिलीला प्रारंभ करून कांहीं दिवस झाले नाहींत तोंच ते विषमज्वरानें आजारी पडले व सर्व उपचार निष्फळ ठरून त्यांची आशा

त्यांच्या नातेवाइकांनीं सोडली. अक्कलकोटच्या स्वामीमहाराजांच्या कांदेवाडीतील मठांतल्या पुजाऱ्यानें शेवटचा उपाय म्हणून स्वामींचें तीर्थ घेण्याचा आग्रह केला व हें तीर्थ घेतांच सर चिमणलाल यांना गुण पडून ते आजारांतून उठले. त्या वेळेपासून अक्कलकोटच्या महाराजांवर त्यांची भक्ति जडली व ते महाराजांची भाविकपणें उपासना करूं लागले. महाराजांच्या मठासाठीं व समाधीसाठीं त्यांनीं भरपूर आर्थिक साहाय्य केलें आहे. कांहीं वर्षांपूर्वी सोलापूर येथें एका प्रांतिक परिषदेसाठीं ते गेले असतां मुद्दाम वेळांत वेळ काढून ते अक्कलकोट येथें गेले व तेथें त्यांनीं स्वामींच्या समाधीचें दर्शन घेतलें. सर चिमणलाल यांच्या स्वभावचित्रांतील हा एक लहानसाच प्रकाशमय कवडसा कोणाला हृद्य वाटणार नाहीं ?

## शेवटचा प्रागतिक

प्रागतिक पक्ष, पक्ष या नात्यानें आतां संपुष्टांत आलाच आहे. या पक्षाच्या भवितव्याचें कांहीं दिवसांपूर्वी अलाहाबाद येथें ना. शास्त्री यांनीं लॉर्ड लादियन यांना दिलेल्या खान्याच्या वेळीं केलेलें भाकित खरें ठरलें, तर त्याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. त्यागाचें व्यासपीठ नसलेल्या भूमीवरून केलेला परोपदेश जनतेच्या मनांत मूळ धरणार नाहीं; आणि परोपदेशक पर्यंकपंडितांनाही केवळ तत्त्वज्ञ म्हणून मान राहणार नाहीं, लाठ्यांचे तडाखे बसून डोकीं फुटत असतां कायदेभंगाच्या दिवसांत मुंबईत सर चिमणलाल सेटलवाड सरकारी दडपशाहीचा तीव्र निषेध करण्यासाठीं वेस्टर्न इंडिया लिबरल ॲसोसिएशनतर्फे पत्रकामागून पत्रकें काढीत होते. सरकारी ऑर्डिनन्सचा दुरुपयोग करण्यांत येऊं नये म्हणून स्वतःचें कायदेशीर मत देऊन व तें पूर्वग्रहदूषित दिसूं नये म्हणून स्वतःच्या जोडीला बॅ. वेलिणकर व ॲ. एच्. सी. कोयाजी यांचीं मतें जोडून त्यांनीं हिंदुस्थानसरकारकडे हीं मतें पाठविलीं व दडपशाहीचें स्वरूप सौम्य करण्याचे प्रयत्न केले होते. पण पत्रकें, निषेध अगर समजावणीचे क्षुल्लक प्रयत्न यांनीं कृतिशून्य राजकारणांतील उणीव भरून काढतां येणार नाहीं. राजकारणाचें नेतृत्व बुद्धिवंत समाजाकडे असावें हें खरें असलें, तरी बहुजनसमाज ही या नेत्या समाजाची खरी शक्ति आहे. सर चिमणलाल यांनीं बुद्धिवंत समाजासाठींच बुद्धिवंतांचें

राजकारण केलें व तेंही मुलुखगिरीच्या हौसेनें न करतां राखणदारीच्या बुद्धीनेंच केलें. अर्थात् नामशेष होण्यापलीकडे दुसरें सार्थकत्व त्याला नाहीं. या राजकारणांतील सर चिमणलाल हे शेवटचे प्रागतिक पुढारी आहेत. "Though we are so weak, we seem to cling to life with great tenacity" या शब्दांनीं प्रागतिकांच्या चिवटपणाचें स्वरूप ना. शास्त्री यांनीं दाखविलें आहे. स्वाध्यायमग्न राहून चिवटपणानें व चिकाटीनें राजकारण चालविणें हा गौरव असेल, तर या गौरवाचा बराच मोठा वांटा मुंबई इलाख्यांतील प्रागतिकांच्या राजकारणांत डॉ. सर चिमणलाल हरिलाल सेटलवाड यांना दिला पाहिजे.

विविध वृत्त, ता. २ जानेवारी १९३८



# बॅ. मु. रा. जयकर : : ८

"तुम्ही खालीं उतरा!"

"पण—"

"पणबीण कांहीं नाहीं; खालीं उतरा अगोदर! तुम्ही असल्या भानगडींत पडूं नका. या भानगडींत आपले हात घालण्याचा तुम्हांला काय अधिकार? तुम्ही कोणाच्या वतीनें ही मध्यस्थी करीत आहांत?"

"मी कोणाही पक्षातर्फे आपल्याकडे आलों नाहीं. तरुणांचा मी प्रतिनिधि आहें, आणि तरुणांना काय वाटतें तें सांगण्यासाठीं व त्याप्रमाणें शक्य असल्यास आपल्या मार्फत घडवून आणण्यासाठींच मी येथें आलों आहें!"

"ठीक, ठीक; तरुण मनुष्या, तुझ्या सद्धेतूबद्दल मला आनंद होतो. पण आजचें राजकारण म्हणजे लेंकरांनीं लुडबुड करण्याच्या गोष्टी नाहींत. नुसत्या सद्भावनांनीं कलह मिटत नसतात. एखाद्या पक्षाच्या राजकारणांत गळ्यापर्यंत बुडण्याचा प्रसंग तुझ्यावर पुढेंमागें आला, म्हणजे तुलाही माझ्या शब्दाचा अनुभव येईल. तूं जा आतां."

"बरं तर; गुड बाय्!"

१९१७ सालची ही गोष्ट: हें संभाषण ज्या दोन व्यक्तींमध्यें झालें, त्या व्यक्तींपैकीं "तरुणांचा प्रतिनिधि" येत्या शुक्रवारीं नव्या फेडरल कोर्टाचा एक न्यायाधीश म्हणून सिमला येथें अधिकाराची शपथ घेणार आहे. दुसरी व्यक्ति आज हयात नाहीं ! सर दिनशा एद्लजी वाच्छा व नेक ना. डॉ. मुकुंद रामराव जयकर यांच्यामध्यें हें भाषण झालें. बॅ. जयकर त्या वेळीं नुकतेच राजकारणांत भाग घेऊं लागले होते.

देशाच्या राजकारणाकडे त्यांनीं ज्या दृष्टिकोणानें पाहिलें, त्या दृष्टिकोणाची कल्पना येण्यासाठीं वरील संभाषणभागाचा थोडा इतिहास सांगणें अवश्य आहे. त्या वेळच्या राजकारणांत होमरूल लीगमध्यें जहाल-मवाळ तट असे दोन भाग पडले होते आणि ॲनी बेझंट यांच्या होमरूल लीगशीं टिळकांच्या होमरूल लीगची स्पर्धा चालू होती. १९०७ च्या सुरतेच्या कॉंग्रेसपासून जहाल व मवाळ अशी जी दुफळी कॉंग्रेसमध्यें निर्माण झाली होती, ती १९१६ च्या लखनौ कॉंग्रेसनें नष्ट करून जहाल-मवाळ, हिंदु-मुसलमान हे पक्षभेद तात्पुरते नाहींसे केले होते. होमरूल लीगच्या चळवळीवरच देशाचें राजकारण केंद्रीभूत होत होतें. या चळवळीनें पुन: जुन्या भेदभावनांना व कलागतींना जन्म देऊं नये व झालेला समेट विसकटूं नये म्हणून दोन्ही होमरूल लीगचें एकीकरण व्हावें आणि जहाल-मवाळ कायमचे एकत्र व्हावे यासाठीं सर दिनशा वाच्छा यांजमार्फत खटपट करण्यासाठीं बॅ. जयकर त्यांच्या घरीं गेले होते. जयकरांच्या युक्तिवादाला व सदिच्छेला सर दिनशा यांनीं त्या वेळीं उत्पन्न झालेल्या अनेक कारणांमुळें वाटाण्याच्या अक्षता लावल्या व त्यांना निरोप दिला; पण एका प्रसंगामुळें राजकारणाला प्रारंभ करतांनासुद्धां जयकरांच्या मनावर कोणती प्रतिक्रिया झाली हें दिसून येतें. या प्रसंगामुळें बॅ. जयकर यांच्या स्वभावाचें एक वैशिष्ट्य प्रगट झालें. हें वैशिष्ट्य म्हणजे त्यांची शांतिदूताची मनोवृत्ति हेंच होय. बॅ. जयकर शांतिदूत म्हणून कायदेभंगाच्या चळवळींत आणि अलीकडच्या राजकारणांत प्रकट झाले; पण तसें पाहावयाचें झाल्यास शांतिदूताची भूमिका स्वेच्छेनें आपल्याकडे घेऊनच त्यांनीं राजकारणांत प्रवेश केला.

सर दिनशा यांच्या प्रश्नाला उत्तर देतांना त्यांनीं आपण "तरुणांचें प्रतिनिधि" असल्याचें मोठ्या ऐटींत सांगितलें खरें; पण तारुण्यांच्या ताज्या रक्ताला आणि तडफेला सुविचार अगर दूरदृष्टि यांच्यांतून प्रादुर्भूत होणारी अगर प्रौढावस्थेशीं संलग्न होणारी वरील शिष्टाईची मनोवृत्ति कितपत मानवेल? उत्साहानें, आवेशानें, एवढेंच नव्हे, तर किंचित् त्वेषानेंही आपल्या पंथाला आणि मतांना चिकटून राहण्याचा सरसहा सर्वच तरुणांच्या वृत्तींत आढळणारा एककल्लीपणा कुठें, आणि योग्यायोग्यतेच्या, हितानहिताच्या विचाराची मतांवर आणि कार्यांवर सावट पडून उत्पन्न झालेली बॅ. जयकरांसारख्या तरुणाची विचारसन्मुखता कुठें? अविचारीपणा शोभून दिसण्याच्या काळांत जयकरांच्या वृत्तींत विचारीपणाचा शिरकाव झालेला होता. या उपाधीचें कारण काय आणि त्याचा परिणाम काय झाला? ह्या उपाधीचें कारण बालपणापासून जयकर ज्या परिस्थितींत वाढले व लहानाचे मोठे झाले, त्या परिस्थितीनें त्यांच्या मनावर व विचारपद्धतीवर घडवून आणलेले संस्कार हेंच आहे. ज्या परिस्थितींत ते वाढले, तींत बेछूटपणाचा शिरकाव झालेला नव्हता; हाणामारी, कलह, असंतोष, यांच्यापासून जयकरांचें लहानसें जग अलिप्त होतें. उच्च प्रकारची संस्कृति, समाधान, संतोष, सुख आणि संथपणा यांच्या वातावरणांत ते वाढल्यामुळें भावी आयुष्यांत कोणत्याही प्रश्नाकडे अगर कार्याकडे दुरून पण तटस्थपणें पाहण्याची खोड त्यांच्या स्वभावांत उत्पन्न झाली आणि या स्वभावामुळेंच आजचे जयकर निर्माण झाले. स्वाति नक्षत्राच्या पावसांत समुद्रांतील मोत्यांचे शिंपले उघडावेत, त्याप्रमाणें जयकरांच्या राजकारणाला योग्य बरसात होतांच सुरुवात झाली. या शिंपल्यांत राजकारणाचा एक कण घुसला. या परक्या वस्तूला आत्मसात् करून टाकण्यासाठीं जयकरांनीं त्याच्याभोंवतीं आपल्या मौक्तिकरसाचीं पुटें चढविण्यास प्रारंभ केला आणि पुटांवर पुटें आणि रसावर रस चढवून एक गोळीबंद आणि पाणीदार मोतीं त्यांनीं निर्माण केलें. हिरा स्वयंप्रकाशी असतो, पण खडबडीत असतो. त्याला पैलू पाडावेत तसतसें त्याचें तेज फांकत जातें; पण मोतीं निसर्गसिद्धच असतें. हिंदी राजकारण हा एक जामदारखाना आहे आणि हिंदी पुढारी हीं या जामदारखान्यांतील रत्नें आहेत अशी कल्पना केली, तर या जामदारखान्यांतील जडजवाहिर

लालांमध्यें मुंबईच्या किनाऱ्यावर सांपडलेलें एक पाणीदार मोतीं म्हणून जयकरांना एका मखमली पेटींत ठेवून दिलें आहे असें आढळून येईल.

'मॅक'चें शिक्षण

बॅ. जयकर यांचा जन्म पाठारे प्रभू ज्ञातींतील सुप्रसिद्ध जयकर कुटुंबांत झाला. त्यांचे आजोबा रावसाहेब वासुदेव जगन्नाथ कीर्तिकर हे रानडे-तेलंगाच्या पिढींतील एक कार्यकर्ते होते. जयकरांच्या जन्मकाळींच त्यांचे वडील निवर्तले, त्यामुळें आपल्या एकुलत्या मुलीचा हा एकुलता एक अंकुर नीट जोपासना करून वाढविण्याची अत्यंत नाजुक जबाबदारी त्यांच्या आजोबांवर पडली. त्यांच्या प्रेमळ मातेनेंही अत्यंत धैर्यानें पतिनिधनाचें दुःख गिळून आपल्या अपत्याचें संगोपन हेंच आपलें जीवितकार्य ठरविलें. आपल्या प्रेमळ मातुःश्रीची आठवण झाली कीं अजून जयकरांचा कंठ सद्गदित होतो. "I owe a good deal to my mother and grandfather. My mother fills a very big place in my life, indeed" असे उद्गार त्यांनीं आपल्या मातेच्या निधनानंतर मजपाशीं काढले होते. जयकरांचे आजोबा मोठे करारी व बाणेदार गृहस्थ होते. आपल्या नातवाचें शिक्षणसंगोपन निर्दोष व्हावें. पण फाजिल लाडानें तो बिघडूं नये म्हणून अगदीं बारकाईनें त्यांनीं लक्ष पुरविलें. ते स्वतः उत्तम संस्कृतज्ञ होते. शास्त्रीपंडित व विद्वान् यांना त्यांच्या ठाकुरद्वार येथील घरीं मुक्तद्वार होतें. या विद्याप्रेमी वातावरणांत जयकरांची वाढ झाल्यामुळें त्यांच्यावर झालेले विद्याव्यसनाचे संस्कार जेवढे आनुवंशिक, तेवढेच परिस्थितिजन्य होत असें म्हणावयास हरकत नाहीं. जयकरांना त्यांचे आजोबा प्रेमानें "मॅक" या नांवानें संबोधीत. 'मॅक' इंग्रजी शिकूं लागला, तेव्हांपासून मॅकचे इंग्रजी उच्चार सफाईदार असावेत, त्याचें इंग्रजी निर्दोष असावें, आणि तो उत्कृष्ट इंग्रजी पंडित व्हावा म्हणून त्याच्या आजोबांनीं कटाक्षपूर्वक काळजी घेतली. जयकर सेंट झेवियरमधून रोमन हिस्टरी, जनरल ज्युरिसप्रूडन्स व रोमन लॉ हे विषय घेऊन बी. ए.ची परीक्षा दुसऱ्या वर्गांत उत्तीर्ण झाले. श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधि, श्री. बाबासाहेब कामत व बेळगांवचे वकील सुप्रसिद्ध चिकित्सक पत्राचे संपादक कै. मंगेश-

राव तेलंग हे त्यांचे समकालीन पदवीधर होते. नंतर दोन वर्षांनीं एल्फिन्स्टन कॉलेजमधून इंग्लिश व संस्कृत हे विषय घेऊन ते दुसऱ्या वर्गांत एम्. ए.ची परीक्षा पास झाले आणि १९०२ मध्यें त्यांनीं एल्‌एल्. बी. ची परीक्षा दिली. मुंबईहायकोर्टाचे सरकारी वकील व माजी हंगामी जज्ज दिवाणबहादूर पद्मनाभ भास्कर शिंगणे आणि सर चुनिलाल मेहता हे बॅ. जयकर यांच्याबरोबर वकिलीची परीक्षा पास झाले. पण दि. ब. शिंगणे व जयकर यांनीं वकिलीला प्रारंभ करण्यापूर्वींच आपलें एक निराळें कार्यक्षेत्र आंखून घेतलें होतें. या सुमारास म्हणजे १८९७ सालीं त्यांनीं आर्यन एज्युकेशन सोसायटी स्थापन करून त्या सोसायटीतर्फे एक शाळा सुरू केली. कै. गोपाळराव देवधर या शाळेचे प्रिन्सिपॉल होते. समाजकार्याची अथवा लोककार्याची सुरुवात शिक्षण-प्रसारासाठीं शिक्षणसंस्था स्थापन करून करावयाची हा कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या कालापासून लोकाग्रणींनीं पत्करलेला मार्गच त्या काळीं तरु-णांच्या महत्त्वाकांक्षेला पटत होता. जयकर, शिंगणे, देवधर यांनीं तोच मार्ग पत्करला व " माझ्या आयुष्यांतली महत्त्वाकांक्षा म्हणजे उत्तम शिक्षक होणें ही होती, आणि एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें प्रोफेसर होणें ही माझ्या महत्त्वाकांक्षेची उडी होती " अशी कबुली जयकरांनीं एकदां दिली होती. राजकारणांतील अथवा वकिलींतील यश हा आपल्याला झालेला एक ' अपघात ' असें जयकर म्हणतात आणि बॅरिस्टरीसाठीं त्यांना धरून बांधून कसें तयार करावें लागलें, ह्या प्रसंगाचा मनोरंजक इतिहास पाहिला, तर ह्या ' अपघाता'ची सत्यता केव्हांही पटण्याजोगी आहे. आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या शाळेंत जय-करांनीं चार वर्षें शिक्षक म्हणून काम केल्यावर शाळेंतील कार्यकर्त्यांच्या व्यवसायाची दिशा बदलली. शिंगणे वकिलीकडे वळले, व देवधर कै. गोख-ल्यांच्या नव्या भारतसेवक समाजाला मिळाले. जयकरांनीं या समाजाला मिळावें म्हणून देवधरांनीं खटपट केली व गोखल्यांची व जयकरांची भेटही घडवून आणली; परंतु राजकारणाची मोहिनी जयकरांवर त्या वेळीं तितकीशी न पडल्यामुळें भारतसेवक होण्याच्या संधीचा फायदा त्यांनीं घेतला नाहीं. जयकरांनीं बॅरिस्टर होऊन यावें असा आग्रह त्यांच्या मित्रांनीं धरला व जयकरांनाही ही कल्पना आवडली. पण बॅरिस्टर होण्यासाठीं विलायतेला जाणें म्हणजे केवढें दिव्य होतें ! नातवाची आणि आपली ताटातूट होईल

म्हणून जयकरांचे आजोबा अस्वस्थ झाले. प्रेमळ मातेला सोडून दूर राहावें लागणार या कल्पनेनें जयकरांचें मन खालींवर होऊं लागलें; पण मोठ्या मिनतवारीनें त्यांनीं आजोबांची परवानगी मिळविली आणि माय-लेंकरांनीं एकमेकांना धीर दिला. वरकरणीं हंसत त्यांनीं आजोबांचा व मातेचा निरोप घेऊन बोटींत तर पाऊल ठेवलें; पण मुंबईचा किनारा नजरेआड होतांच त्यांचा जीव कासावीस झाला. अंतःकरणांत कालवाकालव सुरू झाली. विलायतेचा प्रवास जेमतेम निभावला, पण विलायतेंत जाऊन पोंचल्यावर त्यांच्या अंतःकरणानें ठाव सोडला. घरच्या आठवणींनीं त्यांना हैराण केलें. त्याचप्रमाणें आजारानेंही ते हैराण झाले. कै. वामन रामचंद्र जोशी व जयकर यांना योगाभ्यासाचें वेड लागलें होतें. दूध व फळें खाऊन ते राहत. बोटीवर व विलायतेंत शाकाहार न मिळाल्यामुळें व मांस खाण्याची संवय मोडलेली असल्यामुळें जयकरांचा आजार बोटीवर सुरू झाला व विलायतेंत राहणें त्यांना अशक्य झालें. घरीं परत जाण्याची त्यांच्या मनाला लागलेली विलक्षण ओढ व हा आजार यांच्यामुळें अखेर डॉक्टरांचा सल्ला घेऊन ते परत निघाले! बॅरिस्टर होण्यासाठीं निघाल्यापासून दीड वर्षांच्या आंत आजारी होऊन लहान मुलाप्रमाणें ‘ आई, आई ’ करीत जयकर घरीं परत आले !

## पण बॅरिस्टर झाले !

तथापि आपल्या या कमकुवतपणाची नंतर त्यांची त्यांनाच लाज वाटली. त्यांचें पुनरागमन हा थोडा चेष्टेचा विषय झाला. त्यांच्या हळव्या मनाचें मातृदर्शनानें समाधान झाल्यानंतर दीड वर्षानें ते पुनः बॅरिस्टर होण्यासाठीं विलायतेला गेले आणि या वेळीं मात्र अपूर्व मनःसंयमन करून बॅरिस्टर झाल्यानंतरच ते परत आले. विलायतेंत असतांना जयकरांनीं वक्तृत्वकलेचा कसून अभ्यास केला होता. बॅरिस्टर झाल्यानंतर जयकरांनीं हायकोर्टांत प्रॅक्टिस करण्यास सुरुवात केली. त्यांना लहान लहान कामें मिळत, पण त्यांची व्यवसायावर पडावी तशी छाप प्रारंभींच पडली नाहीं. ते बॅरिस्टर म्हणून पहिल्यानेंच चमकण्यास कै. टिळकांशीं संबंध आलेला ताईमहाराजांचा सुप्रसिद्ध खटलाच कारणीभूत झाला. त्या वेळचे हायकोर्टांतील सुप्रसिद्ध बॅरिस्टर व नंतर पंजाबांतील मार्शल लॉच्या वेळीं हिंदुस्थान सरकारचे कायदेमंत्री

सर जॉर्ज लाउंड्स् यांचे मदतनीस म्हणून या खटल्यांत त्यांनीं काम केलें. हायकोर्टांत ताईमहाराजांचा खटला अपिलांत सुरू झाल्यावर सर जॉर्ज हे गैरहजर राहिल्यामुळें खटल्याची तहकुबी मागण्यासाठीं न्या. चंदावरकर व न्या. हीटन या बेंचपुढें जयकर उभे राहिले. पण तेवढ्या कारणासाठीं अपिलाचें काम पुढें ढकलावें हें न्यायमूर्ति चंदावरकर यांना पसंत पडलें नाहीं.

"या खटल्यांत ज्यूनियर कोण आहे?" न्या. मू. चंदावरकरांनीं विचारलें.

"मी आहें," असें उत्तर जयकरांनीं दिलें.

"मग तुम्हीच काम चालविण्यास सुरुवात करा," चंदावरकर म्हणाले, "तुम्हांला तरी स्वतंत्रपणें काम चालविण्याची संधि कधीं मिळणार? मी खटला तहकूब ठेवीत नाहीं. तुम्ही काम सुरू करा."

आणि चंदावरकर यांनीं जयकरांना पुढें येण्यासाठीं दिलेल्या या संधीचा उपयोग जयकरांनींही उत्कृष्ट प्रकारें करून घेतला. त्यांनीं टिळकांच्या विरुद्ध काम चालविण्यास सुरुवात केली. हिंदु लॉसारख्या किचकट व वादग्रस्त प्रकरणाशीं संबंध असलेल्या या महत्त्वाच्या अपिलांत जयकरांनीं एवढ्या जबाबदार रीतीनें, मुद्देसूदपणें व हुशारीनें काम चालविलें कीं प्रॅक्टिस करण्यास प्रारंभ करून पांचच वर्षें झालेल्या या ज्युनियर बॅरिस्टरची हुषारी व ज्ञान पाहून सर जॉर्ज यांच्याप्रमाणेंच न्यायमूर्तींनाही आश्चर्य वाटलें. या 'गोड अपघाता'मुळेंच हिंदु लॉवरील एक विद्वान् कायदेपंडित अशी जयकरांची कीर्ति झाली व ते आकस्मिकपणें पुढें आले. त्यांच्या प्रॅक्टिसचा तेव्हांपासून चांगलाच जम बसला व हजारांनीं कमाई करण्यास त्यांनीं सुरुवात केली. या यशाचा जेवढा वांटा जयकरांकडे जातो, तेवढाच वांटा जयकरांच्या पत्नी कै. सौ. सुशीलाबाई यांच्या प्रेरणेकडे जातो. व्यक्तीच्या आयुष्यांत ज्या कांहीं अद्भुतरम्य गोष्टी घडून येतात, त्यांपैकीं सुशीलाबाईनीं जयकरांना वकिली व्यवसायांत परिश्रमानें यश मिळविण्यास दिलेली प्रेरणा ही घटना जयकरांच्या आयुष्यांत जमा होईल. एकदां येथील लॉ कॉलेजमध्यें भाषण करतांना त्यांनीं स्वतःच हें रहस्यकथन केलें होतें.

राजकारण

जयकरांच्या सार्वजनिक कार्याबद्दल लिहावयाचें झाल्यास ते या कार्यांत –विशेषतः राजकारणांत–स्वतः होऊन पडण्याऐवजीं या कार्यांत ते ओढले गेले असें म्हणणेंच अधिक उचित दिसेल. शिक्षणप्रसार व सामाजिक सुधारणा यांखेरीज त्यांच्या वृत्तीला विशेष आवडणारी अशी दुसरी कोणतीच गोष्ट नव्हती. १९१७ मध्यें नाशिक येथें भरलेल्या सामाजिक सुधारणा परिषदेचे ते अध्यक्ष झाले. अर्थात् समाजसुधारक या नात्यानें त्यांनीं आपल्या सार्वजनिक जीवनक्रमाला प्रारंभ केला. मुंबईच्या कॉर्पोरेशनमध्यें ते शिरले नाहींत असें नाहीं; पण जयकर नगरपिते होते ही गोष्ट आज डोक्याला बराच शीण दिल्याखेरीज कांहीं आठवणार नाहीं. शिक्षणप्रसार व समाजसुधारणा या दोनच गोष्टी त्यांना इतर गोष्टींपेक्षां किती जिव्हाळ्याच्या वाटत हें दाखवावयाचें झाल्यास त्यांची आर्यन एज्युकेशन सोसायटी, युनिव्हर्सिटी सिनेटमधील कार्य, महाराष्ट्रविद्यापीठाची कल्पना आणि समाजसुधारणेसाठीं शारदा कायद्याच्या वेळीं पक्षाच्या विरुद्ध त्यांनीं उघड उघड पुकारलेली बंडखोरी या गोष्टी पुढें ठेवतां येतील. गांधींच्या असहकारितेच्या राजकारणांत ते पडले, तेसुद्धां या राजकारणाचा मोह पडल्यामुळें पडले असें नसून गांधींच्या कार्यप्रणालींतील राष्ट्रीय शिक्षणाच्या अभिनव कल्पनेची जबर मोहिनी पडल्यामुळेंच पडले. या दोन गोष्टींव्यतिरिक्त त्यांनीं जें जें कार्य केलें, अथवा ज्या ज्या संस्थांशीं त्यांत संबंध आला, त्यांत उपयुक्त कार्यांत आपली भागीदारी व संबंध असावा ही त्यांची परोपकारी व सत्कार्यपुरस्काराची मनोवृत्तीच कारणीभूत झाली. लोणावळापरिषदेचे अध्यक्ष म्हणून टिळकांनीं त्यांना राजकारणांत ओढलें. पण व्यवसाय सोडून राजकारणाकडे अधिक निकट असे ते पंजाब-प्रकरणानंतरच आले. टिळकांच्या होमरूल लीगच्या कार्यांत जयकरांच्या आर्जवी वक्तृत्वाची टिळकांना चांगली मदत झाली. स्वपक्षीयांचें इंग्रजी वक्तृत्वांतील दैन्य टिळकांना चांगलेंच जाणवत होतें! त्यामुळें या नव्या व होतकरू तरुणाच्या इतर कोणत्याही गुणापेक्षां त्याच्या वक्तृत्वाचें त्यांना विशेष आकर्षण वाटलें व त्याच्याकडे ते आशेनें पाहूं लागले. टिळकांच्या प्रेमाची जयकरांनींही भक्तिपूर्वक जाणीव बाळगली, व त्यांच्याबद्दल

अभिमान धरला. मुंबईंत लॉर्ड विलिंग्डन यांच्या कारकीर्दींत गाजलेल्या टाउन हॉलमधील सभेनंतर १३ जून १९१८ रोजीं वॉर लोन जमविण्यासाठीं लॉर्ड विलिंग्डन यांच्या अध्यक्षतेखालीं जी सभा भरली, त्या सभेंत ऐन वेळीं झालेल्या फाटाफुटीचा अंदाज नसल्यामुळें बॅ. जयकर यांचें नांव या सभेंतील वक्ता म्हणून आगाऊ ठरविलेल्या कार्यक्रमानुसार नोंदण्यांत आलें होतें. पण पहिल्या सभेंत टिळकांचा अपमान झाल्यामुळें जयकरांनींही आपलें भाषण रद्द केलें आणि या सभांचे त्या वेळचे चिटणीस व सध्यांचे मुंबईचे शेरिफ मि. ए. जी. ग्रे यांना तसें कळविलें. ऐन वेळीं आलेल्या या नकारामुळें होमरूल लीगशीं त्याच दिवशीं संबंध तोडून फितुर झालेले व आजचे कॉंग्रेसभक्त श्री. भुलाभाई देसाई यांची योजना जयकरांच्या जागीं करण्यांत आली व भुलाभाईंनीं या सभेंत आपलें **विविध वृत्तां**तून वरचेवर गाजविण्यांत आलेलें तें कुप्रसिद्ध भाषण केलें ! टिळकांच्या कार्याशीं जयकर कसे समरस झाले होते, हें दाखविण्यासाठींच ही आठवण येथें मुद्दाम दिली आहे.

१९१९ च्या ऑक्टोबर महिन्यांत पंजाब-प्रकरणाची चौकशी करण्यासाठीं सरकारनें हंटर कमिटीची नेमणूक केली; पण या कमिटीवर कॉंग्रेसनें बहिष्कार घालून बॅ. अब्बास तय्यबजी यांच्या अध्यक्षतेखालीं स्वतःची स्वतंत्र चौकशी-कमिटी नेमली. या कमिटीवर मुंबईतर्फे जयकरांची नेमणूक करण्यांत आली होती. या कमिटीनें पंजाबमध्यें तीन महिने फिरून दोन हजार लोकांच्या जबान्या घेतल्या व १९२० च्या मार्चमध्यें आपला एकमताचा रिपोर्ट प्रसिद्ध केला. या दौऱ्यांत जो अनुभव आला, त्या अनुभवामुळेंच बॅ. जयकर यांनीं राजकारणांत जिव्हाळ्यानें भाग घेण्यास सुरुवात केली व त्यांच्या राजकारणाचा श्रीमन्महा येथूनच झाला.

## २५ हजारांचा चेक

असहकाराची चळवळ गांधींनीं सुरू केल्यानंतर बॅ. जयकर यांनीं गांधींचे अनुयायी म्हणून चळवळींत भाग घेतला. टिळक स्वराज्य फंडासाठीं गांधींनीं विनंति करतांच २५ हजारांचा चेक त्यांनीं गांधींना तत्काळ फाडून दिला, गांधी टोपी डोक्यावर ठेवली, वकिली तर आधींच सोडली होती. आपापल्या मगदुराप्रमाणें लोकजागृतीचें व तिहेरी बहिष्काराचें कार्य पुढाऱ्यांनीं

आपापल्या शिरावर घेतलें होतें. जयकरांनीं आपल्या आवडीच्या शिक्षण-कार्याचा भार स्वतःवर घेण्याचा संकल्प केला. मुंबईंत राष्ट्रीय शिक्षण देण्यासाठीं एक मोठें कॉलेज काढावें व त्यामध्यें उत्कृष्ट व तज्ज्ञ शिक्षकांचा समावेश करावा या कल्पनेनें त्यांनीं एक योजना आंखली. पाटणा-युनिव्हर्सिटींतील इतिहासाचे अध्यापक व सुप्रसिद्ध लेखक श्री. ग. स. भाटे या आपल्या मित्राला मुंबईला निघून येण्यासाठीं तार ठोकली; पण हें आदर्श कॉलेज अनेक कारणांमुळें वस्तुस्थितींत न उतरतां टिळक विद्यापीठच स्थापन झालें. शिक्षण-कार्याची कल्पना ढांसळली तरी त्यांना वैषम्य वाटलें नाहीं. इतर व्याख्यानादि लोकजागृतीच्या कार्यांत त्यांनीं भाग घेतला आणि राष्ट्रोपयोगी संस्थांना सढळ हातानें मदत केली. जयकर अंतर्बाह्य बदलून गेले. ' गांधीवाक्यं प्रमाणम् ' अशी त्यांची स्थिति होती. गांधींच्या ते किती आहारीं गेले होते, याचें एक लहानसें उदाहरण द्यावयाचें झाल्यास ता. १७ नोव्हेंबर (१९२०) रोजीं युवराजांच्या आगमनाच्या दिवशीं एल्फिन्स्टन रोडवर झालेल्या परदेशी कापडाच्या होळीचें देतां येईल.

**" तुमच्या संग्रहांतील उंचींत उंची असलेली वस्तु द्या " अशी मागणी गांधींनीं करतांच जयकरांनीं आपल्या पत्नीचा २ हजार रुपये किंमतीचा भरजरी शालू गांधींना दिला. तो होळी करण्यासाठीं दिला नव्हता हें लक्षांत ठेवलें पाहिजे. पण हा मौल्यवान् स्वदेशी शालू परदेशी समजून एल्फिन्स्टन रोडवरील होळांत जाळून टाकण्यांत आला !**

## स्वराज्यपक्षाचे पहिले बंडखोर

असहकाराची चळवळ गांधींनीं मागें घेतल्यावर कौन्सिलवरील बहिष्कार उठवून कौन्सिलांत सरकारची अडवणूक करण्यासाठीं गया येथें दास-नेहरूंनीं स्वराज्यपक्ष स्थापन केला. असहकाराची निष्फलता जयकरांना कळून चुकली होती व स्वराज्यपक्षाची कल्पना दास-नेहरू यांना सुचण्यापूर्वीं प्रथम जयकरांनींच १९२१-२२ सालीं पुणें येथील आपल्या एका व्याख्यानांत असहकाराचें अपयश बोलून दाखवून नव्या कार्यक्रमाची मागणी केली होती. स्वराज्यपक्ष स्थापन झाल्यावर या पक्षाच्या मुंबई इलाख्याच्या राजकारणाची

धुरा जयकरांनीं आपल्या खांद्यावर घेतली. १९२३ मध्यें मुंबई इलाख्याच्या कौन्सिलची नवी निवडणूक झाली. ह्या निवडणुकीसाठीं ते मुंबई युनिव्ह-र्सिटीतर्फें उमेदवार म्हणून उभे राहिले आणि आपले प्रतिस्पर्धि व मुंबई सरकारचे शिक्षणमंत्री डॉ. परांजपे यांचा पराजय करून कौन्सिलांत निवडून आले. मुंबईच्या कायदेमंडळांत स्वराज्यपक्षाचे पुढारी या नात्यानें १९२३ ते १९२६ पर्यंत त्यांनीं आपल्या प्रभावी वाक्पटुत्वानें व मुत्सद्दीपणानें चांगलीच छाप पाडली; पण स्वराज्य पक्षाच्या रुसव्या पद्धतीनें देशाच्या राजकारणाची प्रगति मंदावली असल्याचें आढळून आल्यामुळें व स्वराज्यपक्षांतही तांबे यांच्या अधिकारस्वीकारामुळें दुफळी पडल्यामुळें जयकरांनीं स्वराज्यपक्षाचा राजिनामा देऊन केळकर, बॅप्टिस्टा यांच्या सहकार्यानें अकोला येथें १९२६ च्या मार्चमध्यें प्रतिसहकार पक्षाची स्थापना केली. स्वराज्यपक्षाचे हातपाय सर्व देशभर पसरल्यामुळें प्रांतिक पुढाऱ्यांनीं आपापले प्रांत संभाळले होते. पण इवल्याशा प्रतिसहकारपक्षाचें बल व संख्या अल्प असल्यामुळें आपल्या कार्यपद्धतीचें वैशिष्ट्य प्रकट करण्यासाठीं प्रांताऐवजीं मुख्य ठाण्याकडेच मोर्चा वळविणें या पक्षाच्या पुढाऱ्यांना अवश्य वाटलें. या धोरणाला अनु-सरून बॅ. जयकर १९२६ च्या ॲसेंब्ली-निवडणुकीसाठीं मुंबईतर्फें उभे राहिले व अग्रभागीं निवडून आले. बॅ. जयकर यांच्या बंडखोरीमुळें मोती-लाल नेहरू यांचा त्यांच्यावर व त्यांच्या पक्षावर रोष झाला होता. या पक्षाचें त्यांनीं " स्वराज्यपक्षाचा कुजका अवयव " या जळजळीत शेलक्या शब्दांनीं नामकरण केलें! जमनादास मेहता यांनीं त्यांना 'लंबक' ही पदवी बहाल केली!! त्या वेळीं ललकाऱ्या पुकारीत राहिलेले हॉर्निमन यांनीं आपल्या इंडियन नॅशनल हेरल्ड या पत्रामार्फत जयकरांवर अनेक प्रकारचे असभ्य व अकारण आरोप करून त्यांची पारध सुरू केली, व त्यांच्या सहकाऱ्यांचें मनही त्यांच्याविरुद्ध कलुषित करण्याचें पुण्यकार्य आरंभिलें; पण हे सर्व प्रहार जयकरांनीं धीरोदात्तपणें सहन केले. सार्वजनिक आयुष्यक्रमांत हेतुविप-र्यासामुळें होणाऱ्या मनस्तापाचा अनुभव त्यांना या वेळीं बराच आला व एका वेळीं तर आपली उमेदवारी मागें घेण्याची त्यांनीं तयारी दर्श-विली; पण मुंबईनें त्यांच्या प्रामाणिक कार्यनिष्ठेचा योग्य तो बोज ठेवून त्यांच्या लोकप्रियतेचें भरपूर माप त्यांच्या पदरांत घातलें. प्रतिसहकारपक्षानें

ॲसेंब्लींत बॅ. जिन्हांच्या नॅशनॅलिस्ट पक्षाशीं सहकार्य केलें. बॅ. जयकर या पक्षाचे उपाध्यक्ष झाले. स्वराज्यपक्षांत असतांनाच कै. विठ्ठलभाई पटेल यांची व जयकरांची कुरबुर झाली होती. ॲसेंब्लींत जयकरांनीं आपल्या वक्तृत्वानें आणि मार्मिक युक्तिवादानें जरी आपला प्रभाव पाडला, तरी अध्यक्ष विठ्ठल-भाईंचा डोळा त्यांच्या डोळ्याशीं भिडण्याचा योगायोग वरचेवर न येतां क्वचित् व कारणपरत्वेंच आल्यामुळें जयकरांच्या उत्साहाचे व स्फूर्तीचे बरेच क्षण व्यर्थ गेले असें म्हणतां येईल. नॅशनॅलिस्ट पक्षाचे उपाध्यक्ष म्हणून जयकर १९३० पर्यंत ॲसेंब्लींत होते. ॲसेंब्लींतून कॉंग्रेसपक्ष निघून गेल्यामुळें ॲसेंब्लीच्या सिमला येथील अधिवेशनांत विरोधी पक्षाचे पुढारी होण्याचा मानही त्यांना मिळाला होता.

### अणे विरुद्ध जयकर

जयकरांच्या या कारकीर्दींत त्यांच्या प्रतिसहकार पक्षांतही दुफळी होण्याचा प्रसंग घडून आला व त्यामुळें जयकरांनीं या पक्षाचा राजिनामा देऊन अण्यांच्या भाषेंत ते ' एकांडे शिलेदार ' झाले. हा प्रसंग सारडा बिलामुळें उत्पन्न झाला व रा. टे. परिषदेच्या घोषणेला जयकरांनीं मान्यता दिल्यामुळें तो चिघळून जगजाहीर झाला. १९२९ च्या सप्टेंबरमध्यें सारडा बिल ॲसेंब्लीमध्यें आलें असतां प्रतिसहकार पक्षांतील सनातनी घटकांनीं सनातन्यांना खूष करण्यासाठीं या बिलासंबंधानें विरोधी धोरण स्वीकारलें. हें बिल लांबणीवर टाकण्यांत यावें म्हणून श्री. एम्. के. आचार्य यांनीं सूचना आणली असतां नेहरू, जिन्हा व जयकर यांनीं या सूचनेला विरोध केला. नरसोपंत केळकरांनीं ही सूचना उचलून धरली. अणे व मुंजे यांनीं तटस्थ-पणाचें धोरण स्वीकारलें. त्याचप्रमाणें १९२९ च्या ऑक्टोबरमध्यें अस्पृश्यांनीं पुण्याच्या पर्वतीपुढें सत्याग्रह सुरू केला असतां केळकरांनीं अस्पृश्यांच्या चळवळीबद्दल विरोध प्रगट केला, पण जयकरांनीं मुंबईच्या दसरा-संमेलनांत अस्पृश्यांना सामील करून घेऊन आपली अस्पृश्यांबद्दल वाटणारी सहानुभूति कृतीनें प्रकट केली. ह्या दोन्ही प्रसंगांमुळें राष्ट्रीय पक्षाचे चिटणीस अणे जय-करांवर संतप्त झाले होते. त्यांतच ता. ३१ ऑक्टोबर रोजीं लॉर्ड आर्विन यांनीं रा. टे. परिषदेच्या योजनेची घोषणा केली. ही घोषणा झाल्यानंतर त्याच

रात्रीं मुंबईंत सर चिमणलाल सेटलवाड यांनीं मुंबईंतील सर्वपक्षीय पुढाऱ्यांची सभा भरवून या घोषणेला मान्यता देणारें पत्रक प्रसिद्ध केलें. या पत्रकावर सर चिमणलाल यांच्याखेरीज सरोजिनी नायडू, भुलाभाई देसाई, जयकर, जिन्हा, सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास, सर चुनिलाल मेहता यांनीं सह्या केल्या होत्या. जयकरांची सही पाहिल्यावर अण्यांनीं त्यांच्याविरुद्ध पक्षद्रोहाचें काहूर उठविलें व " सायमन साहेबांबरोबर बसण्यास मिळालें नाहीं म्हणून रुसलेले खूष झाले " अशी केळकरांनींही केसरींत टीका करून जयकरांना टोला हाणला! अण्यांनीं एक पत्रक प्रसिद्ध करून जयकरांचें मत हें वैयक्तिक मत असल्याचा इशारा दिला व त्यांची एकांडे शिलेदार या पदवीनें संभावना केली. या कोंडमाऱ्यामुळें मात्र जयकरांचा संयम सुटला व त्यांनींही अत्यंत मर्मभेदक शब्दांत अण्यांच्या विशेषणांची परतफेड केली. जयकरांचें हें उत्तर त्यांच्या त्या वेळच्या मनःस्थितीचें चांगलेंच प्रतिबिंब आहे. या उत्तरांत जयकर म्हणतातः

> **" सामाजिक प्रश्नांत कूपमंडूक वृत्तीनें वागणाऱ्या व राजकीय बाबतींत क्षुल्लक मतभेदामुळें चिडून एकदम कुजकट वृत्ति धारण करणाऱ्या सहकाऱ्यांशीं सहकार्य करीत डोकें टेंकून राहण्यापेक्षां हें पुष्कळ बरें. सारडा बिलापासून प्रतिसहकारपक्षांत जी खंवखव सुरू झाली, ती एकदांची पुरी करण्याचें श्रेय अण्यांना मिळालें. वैद्यकशास्त्र सांगतें, कीं कित्येक रोगांचीं बीजें अगोदरपासून कित्येक महिने शरीरांत वावरत असतात आणि मनुष्याची जीवनशक्ति जेव्हां क्षीण होते तेव्हांच तीं त्याच्यावर हल्ला करतात. अण्यांनीं त्याचप्रमाणें केलें आहे. लोकप्रियतेच्या बॅरोमिटरमध्यें माझा पारा खालीं उतरला असावा असें वाटतांच इतके दिवस वाट पाहत टपून बसलेल्या अण्यांनीं हा हल्ला केला आहे. त्यांनीं ही चूक केली आहे, हें काळच दर्शवील."**

## शांतिदूत

जयकरांनीं प्रतिसहकारपक्षाशीं संबंध तोडून टाकल्यानंतर त्यांना चुचकारण्याचा व स्वतःस सांवरण्याचा केळकर-मुंज्यांनीं प्रयत्न केला. पण कारस्थानीपणामुळें वैतागलेल्या जयकरांनीं पक्षविशिष्ट राजकारणाकडे पुनः न वळतां

अनाहूतपणें गळ्यांत पडलेल्या 'एकांडे शिलेदार' या विशेषणाला कवटाळून आपलें कार्य केलें. हें कार्य त्यांच्या नांवाबरोबर सर तेजबहादूर सप्रू यांच्या नांवाशीं संलग्न झालेलें आहे. कायदेभंगाच्या चळवळींत त्यांनीं शांतिदूताचें कार्य केलें. कायदेभंगाच्या चळवळीमुळें दंगेधोपे सुरू झाले व सरकारच्या दडपशाहीनेंही उग्र स्वरूप धारण केलें. चळवळीची क्रिया व दडपशाहीची प्रतिक्रिया त्यांच्या मनोवृत्तीला मानवेना. रा. टे. परिषदेला योग्य असें वातावरण निर्माण होणें दुरापास्त दिसल्यामुळें ही परिषद् म्हणजे एक "odious apparition" झाली आहे असें सर ए.पी. पॅट्रो यांना जयकरांनीं पाठविलेल्या पत्रांत म्हटलें होतें. हट्टाला पेटलेले दोन्ही पक्ष माघार घेत नाहींत असें दिसतांच **कै. मोतीलाल नेहरूंच्या खास विनंतीला मान देऊन** त्यांनीं कॉंग्रेस व सरकार यांच्यामध्यें समेट घडवून आणण्याचे प्रयत्न सुरू केले व १३ जुल १९३० रोजीं सप्रू-जयकरांनीं लॉर्ड अर्विन यांना समेट घडवून आणण्याची संधि आपल्याला देण्याविषयीं पत्र लिहिलें. लॉर्ड अर्विन यांनीं समेटाच्या प्रयत्नांना परवानगी दिली व त्याप्रमाणें २३ जुलै रोजीं सप्रू-जयकरांनीं येरवड्याला जाऊन गांधींची भेट घेतली. जयकरांवर जामातनिधनाचा प्रसंग ओढवला; पण मोठ्या धैर्यानें तें दुःख गिळून चोवीस तासांच्या आंतच त्यांनीं शिष्टाईसाठीं पुण्याला प्रयाण केलें. हा समेट निष्फळ झाला हें खरें; पण त्यासाठीं जयकरांनीं केलेले श्रम व दाखविलेली कार्यतत्परता वाखाणण्याजोगी होती.

समेट फिसकटल्यानंतर जयकर रा. टे. परिषदेला गेले. तीन्ही परिषदांमध्यें त्यांनीं बजावलेली कामगिरी अभिनंदनीय आहे. या परिषदेमध्यें आपल्या सौजन्यानें, युक्तिवादानें व पांडित्यानें त्यांनीं ब्रिटिश प्रतिनिधिमंडळावर वजन पाडलें आणि आपल्याबद्दल आदर उत्पन्न केला. सर तेजबहादूर सप्रू यांचा अल्पसंख्याक कमिटीच्या कार्यपद्धतीबाबत मतभेद झाल्यामुळें त्यांनीं या कमिटींतून अंग काढून घेतलें, त्यामुळें जयकरांवरची जबाबदारी अधिकच वाढली. १९३० च्या डिसेंबरमध्यें देवधर, नटराजन् व सर लल्लूभाई सामळदास यांनीं जयकरांना तार करून हिंदुस्थानच्या ऐक्याला बाध येईल अशी योजना घडून न येण्याबद्दल दक्षता घेण्याचा जो इशारा दिला, त्यावरून जयकरांच्या कार्याकडे हिंदी पुढाऱ्यांचे व विशेषतः हिंदु पुढाऱ्यांचे

डोळे कसे लागून राहिले होते, हें लक्षांत येईल. या परिषदांत आपल्यांतील मतभेद व दैन्य शक्य तों कमी दिसावें व स्वाभिमानाला कमीपणा येऊं नये म्हणून जयकरांनीं करतां येईल तेवढी खटपट केली, आणि रा. टे. परिषदेचें तारूं निराळयाच दिशेनें झुकत चालल्याचें आढळून आल्यावर त्यांनीं १९३२ च्या जुलै महिन्यांत सप्रू यांच्यासह सल्लागारकमिटीवरील आपल्या जागेचा राजिनामा दिला. लॉर्ड विलिंग्डन यांच्याकडे हा राजिनामा पाठवितांना ब्रिटिश मुत्सद्द्यांनीं व सरकारनें वेळोवेळीं केलेल्या वचनभंगाचा पाढा वाचून त्याचें पर्यवसान म्हणून हा राजिनामा आपण दिल्याचें त्यांनीं जाहीर केलें.

## व्यक्ति व वैशिष्ट्य

येथपर्यंतच्या जयकरांच्या जीवनक्रमावरून त्यांच्या सार्वजनिक कार्याची कल्पना करतां येईल; पण त्यांच्या व्यक्तीची पुसट कल्पनादेखील त्यामुळें होणार नाहीं. जयकरांच्या व्यक्तीचा त्यांच्या कार्यावर ठसा उमटलेला आहे खरा, पण राजकारणी पुढाऱ्यांच्या आयुष्यांत तो जेवढ्या ठळकपणें उमटतो, तेवढा जयकरांच्या आयुष्यांत उमटलेला नाहीं. त्यांत एकतानतेपेक्षां अलगपणाच अधिक आढळून येतो. जयकर हे व्यवसायानें वकील असले, तरी या व्यवसायानें अथवा त्यांतील यशानें त्यांचा रसिकपणा, सौजन्य, अथवा सहृदयपणा नष्ट केलेला नाहीं. ललितकलाप्रेम, उच्च अभिरुचि, सुसंस्कृति, सौंदर्यदृष्टि व सौंदर्याभिलाषा यांच्यामुळें जयकरांचें आयुष्य ही स्वतःच एक रम्य अशी ललितकृति झालेली आहे. त्यांच्या प्रत्येक हालचालींत, बोलण्यांत, चालण्यांत, इतकेंच काय पण पदन्यासांत देखील लालित्य निर्माण झालेलें आढळतें. संगीताची आणि आतिथ्याची त्यांना विलक्षण आवड ! मनानें ते अत्यंत हळवे व भावनाशील आहेत. उत्तररामचरित्रांतील रामाच्या तोंडीं भवभूतीनें घातलेल्या श्लोकाप्रमाणें " जीवत्सु तातपादेषु नवे दारपरिग्रहे । मातृभिश्चिन्त्यमानानाम् " अशा प्रकारें प्रेमळ छत्राखालीं व स्नेहशील वातावरणांत त्यांचें बरेंचसें आयुष्य व्यतीत झालें. त्यामुळें त्यांच्या स्वभावांतही या वातावरणाची शीतलता व सौंदर्य उत्पन्न झालेलें आहे. राजकारणाच्या धकाधकीच्या मामल्यांत दुःसह असें स्वयंप्रकाशी तेज त्यांनीं दाखविलें नाहीं ही गोष्टसुद्धां त्यांच्या या स्वभावधर्माला पोषकच ठरते. चंद्राप्रमाणें राज-

कारणांत परप्रकाशी ठरले असें कोणीं म्हटलें, तरी वनस्पतींच्या सृष्टीला जीवन व रस देण्याचें चंद्राच्या ठिकाणीं असलेलें सामर्थ्य खात्रीनें कमी ठरत नाहीं. दुसरी उपमा त्यांना द्यावयाची झाल्यास ती आम्रवृक्षाची देतां येईल. या आम्र-वृक्षाच्या छायेंत पांथस्थ आश्रय घेतात, वसंतांत कोकिलांचें कूजन त्यावरून ऐकूं येतें, मंजिऱ्यांचा मादक सुवास वातावरण सुगंधित करतो, फलभारानें तो लवून जातो, त्याच वेळीं त्याचें वैभव " सुरतरूहि चित्तीं थिजो " अशा प्रकारें खुलून दिसतें. " शतेषु जायते शूरः सहस्रेषु च पंडितः । वक्ता दश-सहस्रेषु दाता भवति वा न वा" या सुभाषितांत वर्णन करण्यांत आलेले संकेत जरी जयकरांच्या बाबतींत लागू करून पाहण्यांत आले तरीही ते सर्व संकेत त्यांच्या बाबतींत सार्थच ठरल्याचें आढळून येतें. कारण जयकर तत्त्वनिष्ठेच्या दृष्टीनें शूर आहेत, गाढे पंडित आहेत, अभिजात आणि अव्वल दर्जाचे वक्ते आहेत आणि सुभाषितकारांनीं ज्याविषयीं संशय व्यक्त केला आहे, त्या दातृत्वानें तर त्यांच्या त्यागाला शोभा आणली आहे.

## शूर, पंडित, वक्ता, दाता

जयकरांचें शौर्य तत्त्वनिष्ठेंत व स्वत्वसंरक्षणांत दिसून आलें व त्यासाठीं प्रसंगीं त्यांनीं अत्यंत निंद्य आरोपही शांतपणें सहन केले. हिंदु पुढाऱ्यांच्या लाचारीमुळें हिंदूंच्या स्वाभिमानाला कमीपणा येत येत आहे असें दिसतांच हिंदुसंघटनेसाठीं ते हिंदुसभावादी झाले. १९२९ सालीं मुंबईंत झालेल्या दंग्याची चौकशी करण्याठीं मुंबईसरकारनें जी कमिटी नेमली, त्या कमिटीपुढें साक्ष देतांना सर शंकरन् नायर यांच्या पुस्तकांतील उतारे देऊन व मुसल-मानांच्या वरचढपणाचे अनेक दाखले देऊन त्यांनीं शौकतअल्लींचा माज जिरविला. स्वाभिमान व स्वत्वरक्षण यांचा ज्या ज्या वेळीं प्रश्न आला, त्या त्या वेळीं जयकरांची वीरवृत्ति प्रकट झालेली आहे. जयकरांचें आयु-ष्यही असेंच नाहीं काय ? मुंबईची प्रतिष्ठा व भूषण म्हणूनच जयकरांकडे मुंबईचे नागरिक पाहत आलेले आहेत. कोणत्याही सभासमारंभाला जय-करांचें आगमन म्हणजे प्रतिष्ठितपणाचें शिक्कामोर्तबच. कोणत्याही सत्का-र्याचें गणेशपूजन जयकरांच्या हस्तें झालें अथवा त्यांच्या हातचा आंकडा पडला, कीं भावी यशाबद्दल कार्यकर्त्यांची खात्री झाली. राजकारणांत

जयकरांचीं मतें कोणतींही असोत. त्या मतांकडे न पाहतां मुंबईकर जनता जयकर या व्यक्तीकडेच पाहत आलेली आहे. ह्या व्यक्तीनेंच तिच्या मनांत आदर व आपलेपणाचें स्थान मिळविलेलें आहे. त्यांच्या वकिलीच्या व्यवसायांतही असाच स्वाभिमानी बाणा प्रकट झाल्याचा एक प्रसंग मला ठाऊक आहे. १९२५ मध्यें सुप्रसिद्ध स्वामीनारायण खटल्यांत त्यांनीं वकीलपत्र घेतलें होतें. दिवाणबहादूर राव त्यांना मदत करीत होते. धार्मिक कार्यासाठीं केलेलें दान धर्मशास्त्र व रूढि यांना अनुसरून कधींही मागें घेतां येत नाहीं, तें कायमच होतें, हा मुद्दा खटला ऐकणारे न्यायमूर्ति सर अँबरसन मार्टिन व ज. प्रॅट यांच्यापुढें मांडतांना धार्मिक ग्रंथ व उपनिषदें यांच्यांतील उल्लेख जयकर नमूद करीत होते. हे उल्लेख ऐकतांना सर अँबरसन यांनीं "I don't care" असे दोनतीन वेळां उद्गार काढले ! हे उद्गार ऐकल्यावर पुढ्यांतील सर्व कागदपत्रें गुंडाळून जयकर म्हणाले, "माझ्या अशीलाला योग्य न्याय मिळावा व त्याची बाजू उत्तम प्रकारें पुढें मांडावी म्हणून हें वकीलपत्र मीं घेतलें; पण माझ्याशीं योग्य तो सहकार करण्याची न्यायमूर्तींची इच्छा दिसत नसल्यामुळें मी माझ्या अशीलाच्या हितसंबंधांचें रक्षण करण्यास अपात्र ठरत आहें. म्हणून मी पुढील काम चालविणें बंद ठेवतों." आणि असें म्हणून जयकरांनीं गुंडाळलेले कागदपत्र दि. ब. राव यांच्या हवालीं केले. जयकरांच्या या तडफदार निषेधानें सर अँबरसन मार्टिन ताबडतोब वरमले आणि त्यांनीं जयकरांची समजूत घालून त्यांना पुढें काम चालविण्याची विनंति केली.

जयकरांचें पांडित्य कायद्यांतच दिसलें नाहीं, तर त्यांच्या आजोबांनीं लिहिलेल्या वेदांतविषयक ग्रंथाला प्रस्तावना लिहून त्यांनीं केलेल्या या ग्रंथाच्या संपादनांतही दिसून आलेलें आहे. त्यांचें सुप्रसिद्ध वक्तृत्व सर्वांच्या परिचयाचेंच आहे. सफाईदार व शुद्ध इंग्रजीचा डौल, अस्खलितपणा, परिणामकारक व्यक्तिमत्व, विषयप्रतिपादनाची ठसकेदार व मोहक हातोटी आणि मार्मिक व सूक्ष्म विनोदाची गुलाबी झांक यांच्यामुळें त्यांचें वक्तृत्व मोठें चित्तवेधक वाटतें. सुरेल आवाजीच्या खानदानी गवयाचें खास बैठकींतील गाणें व जयकरांचें वक्तृत्व गोडींत सारखेंच ! जयकरांच्या आत्मप्रकटीकरणाचें हें बहुमोल साधन त्यांच्या यशाला व लोकप्रियतेला बरेंचसें कारणीभूत झालेलें आहे, यांत शंका नाहीं. "ॲसेंब्लींतील वक्त्यांत आजकाल

कोणाचा अनुक्रम पहिला लागेल ? ” असा प्रश्न १९३० सालीं विठ्ठलभाई पटेल यांना मुंबईत स्टूडंट्स ब्रदरहुडच्या एका सभेंत विचारण्यांत आला असतां, “ हा मान मुंबईच्या प्रतिनिधीच्या वांट्यास जातो ” असें उत्तर देऊन त्यांनीं जयकरांच्या वक्तृत्वाची तारीफ केली होती. जयकरांचें दातृत्वही असेंच वैशिष्ट्यनिदर्शक आहे. जयकरांनीं अनेक संस्थांना देणग्या दिल्या. अनेक उपयुक्त कार्यांना प्रारंभ करण्याची सूचना आपली देणगी जाहीर करूनच त्यांनीं दिली आहे. त्यांचें दातृत्व संकुचित वृत्तीनें दूषित झालेलें नाहीं. फ्री प्रेसचे सदानंद यांच्या पत्रासाठीं त्यांनीं १०–१५ हजारांची झीज सोसली. आपल्या स्वतंत्र राजकारणासाठीं २५ लक्ष रुपयांचें भांडवल राजे-महाराजांच्या मदतीनें गुंतवून ‘फेडरल टाइम्स’ हें पत्र काढण्याचा त्यांचा व सर तेजबहादूर सप्रू यांचा १९३५ सालापासून अपुरा राहिलेला एक मनोदय आहे. हा मनोदय सिद्धीला गेला असता, तर त्यांच्या दातृत्वाला एक संधि मिळाली असती. पण दुर्दैवानें ती सध्यां तरी फुकट गेलेली आहे. दातृत्वा-मुळें त्यांनीं जसा इतरांसाठीं त्याग केला, तसा तो तत्त्वनिष्ठेमुळें स्वतःसाठींही केला. असहकारितेच्यापूर्वीं १९१९ पासून १९२४ पर्यंत पांच वर्षें हजारों रुपयांच्या प्रॅक्टिसवर त्यांनीं पाणी सोडलें. १९२७ मध्यें मुंबई-हायकोर्टाचे चीफ जज्ज सर अॅंबरसन मार्टिन यांनीं त्यांना हायकोर्ट जज्जाची जागा पहिले हिंदी चीफ जस्टिस नेमण्याचें अश्वासन देऊन, देऊं केली होती. पण केळकरांच्या सल्ल्यामुळें त्यांनीं ती नाकारली.

**एवढेंच कशाला? १९३५ मध्यें लॉर्ड विलिंग्डन यांनीं त्यांना K. C. S. I. ही पदवी देऊन ‘ सर ’ होण्याबद्दल गळ घातली होती; पण सरकारी अधिकारी नसलेल्या कार्यकर्त्यानें ही पदवी स्वीकारणें योग्य नाहीं, हें कारण देऊन जयकरांनीं हा मान साभार नाकारला.**

व्यवसाय पावित्र्याबद्दल कटाक्ष

गेल्या मार्चमध्यें फेडरल कोर्टाचे जज्ज म्हणून त्यांची नेमणूक ज्या दिवशीं जाहीर झाली, त्याच दिवशीं त्यांनीं वकिलीचा व्यवसाय सोडला. जय-करांच्या या नेमणुकीनंतर त्यांच्या नव्या नेमणुकीचा आपल्या यशासाठीं फायदा करून घेण्याच्या इच्छेनें दोघां संस्थानी धनिकांनीं त्यांना आपलें वकील-

पत्र स्वीकारण्याची विनंति करून अनुक्रमें ४० व ३५ हजार रुपये देऊं केले होते; पण घरीं चालून आलेले हे पाऊण लाख रुपये स्वतःच्या प्रतिष्ठेसाठीं व व्यवसायांतील शिष्टाचारासाठीं जयकरांनीं स्वीकारले नाहींत. याच्या उलट मुंबई हायकोर्टाचे माजी हंगामी जज्ज श्री. गोविंदराव ठाकोर यांचें उदाहरण दाखविण्याचा मोह मला अनावर होतो. श्री. ठाकोर यांची नेमणूकही याच सुमारास जाहीर झाली होती; पण या नेमणुकीमुळें आपल्या-वर पुढील वकीलपत्रें न स्वीकारण्याचें नैतिक बंधन पडतें ही गोष्ट लक्षांत न घेतां त्यांनीं नव्या जागीं हजर होईपर्यंत वकीलपत्रें घेतलीं व दावे चालविले. नैतिक बंधनें व शिष्टाचार यांची सार्वजनिक जीवनक्रमांत सतत जाणीव जयकर ठेवीत आल्याचीं अशीं किती तरी उदाहरणें दाखवितां येतील. फेडरल कोर्टाचे न्यायमूर्ति म्हणून झालेली त्यांची नेमणूक जाहीर होण्यापूर्वी ही बातमी एक आठवडा अगोदर अमृतबझार पत्रिकेच्या सिमला येथील खास बातमीदारानें प्रसिद्ध केली होती. या बातमीच्या खरेखोटेपणाबद्दल मीं जयकरांना टेलिफोन-वर विचारलें, त्या वेळीं आपल्याला कांहींच माहित नाहीं असें त्यांनीं उत्तर दिलें. ही बातमी अधिकृत रीत्या जाहीर झाल्यानंतर पुनः मीं त्यांना टेलिफोन केला व एका आठवड्यापूर्वीच्या संदिग्धपणाचा खुलासा विचारला. माझ्या प्रश्नाला उत्तर देतांना जयकर म्हणाले, "हें पाहा, अधिकृत रीत्या बातमी प्रसिद्ध होईपर्यंत कोणाजवळही तिची वाच्यता न करण्याचें नैतिक बंधन माझ्यावर होतें व म्हणून मी कोणाजवळ कांहींच बोललों नाहीं. अमृत-बझारच्या बातमीदारानें कुठून बातमी मिळविली तें मला माहित नाहीं; पण ती माझ्यामार्फत मिळाली नाहीं, एवढें नक्की!"

याच शिष्टाचारप्रियतेमुळें जयकरांनीं आपल्या सार्वजनिक जीवनक्रमा-बद्दलच्या लिहिलेल्या अनेक मनोरंजक आठवणी एका इंग्रजी पुस्तक प्रकाशक कंपनीनें भरपूर मोबदला देण्याचें कबूल केलें असतांही प्रसिद्ध करण्यास पर-वानगी दिलेली नाहीं. ह्या आठवणी मीं चाळलेल्या आहेत व त्या प्रसिद्ध झाल्या, तर अनेक हयात व प्रसिद्ध व्यक्तींचीं चरित्रें सत्यस्वरूपांत प्रकट होतील. पण जयकरांच्या नकाराचेंही कारण तेंच आहे. त्यामुळें ह्या आठवणी लवकर प्रकाशित होण्याचा संभव दिसत नाहीं. गांधी, दास, नेहरू यांचीं जयकरांनीं रंगविलेलीं चित्रें अत्यंत मार्मिक आहेत.

डॉ. जयकर यांच्या गुणांना अनुरूप अशी मानाची नवीन जागा त्यांना आतां प्राप्त झालेली आहे. स्वतंत्र हिंदुस्थानचे परराष्ट्रांतील वकील ही भूमिका जयकरांच्या स्वभावगुणांना अधिक खुलून दिसली असती. आपल्या राष्ट्राच्या उच्च संस्कृतीची ओळख करून देऊन सदिच्छा, सद्भावना व परस्पर विश्वास यांची देवघेव परराष्ट्राच्या दरबारीं करण्यास जयकरांपेक्षां दुसरी लायक व्यक्ति क्वचितच सांपडली असती. पण हें मनोराज्य आज तरी कल्पनासृष्टींतलेंच आहे. फेडरल कोर्टाच्या न्यायाधीशाची जागा देऊन जयकरांचा जो गौरव करण्यांत आलेला आहे, त्याबद्दल महाराष्ट्राला अभिमान वाटतो. ह्या अभिमानाचें एक प्रमुख कारण म्हणजे फेडरल कोर्टाचा न्यायाधीश म्हणून सरकारी वळणांत न रुळलेला व जनतेच्या विश्वासास पूर्णपणें पात्र असलेला हिंदी न्यायाधीश म्हणून ज्या कायदेपंडितांची नेमणूक करणें सरकारला भाग पडलें, त्या नेमणुकीसाठीं जयकरांची निवड करण्यांत आली. फेडरल कोर्टाच्या न्यायाधीशाच्या जागेसाठीं अनेक नांवें सुचविण्यांत आलीं. मद्रासनें तर ही जागा मद्रास सरकारचे ॲडव्होकेट जनरल सर अल्लादी कृष्णस्वामी यांच्या गळ्यांत बांधूनही टाकली; पण शेवटीं हा मान जयकरांकडेच आला. घटनाकायद्यांतील वादग्रस्त कलमांचा व मुद्द्यांचा लोकशाहीच्या कार्यपद्धतीला पोषक होईल अशा रीतीनें अन्वय लावण्याची महत्त्वाची जबाबदारी या न्यायमंदिरांतील आसनावर बसणाऱ्या न्यायमूर्तींवर येऊन पडलेली आहे. या जबाबदारीसाठीं हिंदु कायदेपंडितांतून जयकरांचीच योजना व्हावी या एकाच गोष्टीमुळें त्यांची योग्यता व विश्वासपात्रता व्यक्त होते. ही जबाबदारी उत्कृष्ट रीतीनें पार पाडण्यास परमेश्वरानें जयकरांना उदंड आयुष्य द्यावें व हिंदुस्थानच्या प्रगतींत त्यांच्या या नव्या स्थानावरील कार्यानें हातभार लावावा, अशी मी अंतःकरणपूर्वक इच्छा प्रकट करतों.

विविध वृत्त, ता. २६ सप्टेंबर १९३७



## बॅ. जिन्हा

## : : ९

१९२० सालीं नागपूर येथें भरलेली कॅाँग्रेस अनेक दृष्टींनीं अत्यंत महत्त्वाची गणली जाईल. कॅाँग्रेसच्या त्या अधिवेशनाला १४५८२ प्रतिनिधि आले होते, त्यांपैकीं मुसलमान प्रतिनिधींचीच संख्या सुमारें १०५० एवढी होती. कॅाँग्रेसच्या कोणत्याही अधिवेशनाला त्यापूर्वीं किंवा त्यानंतर इतक्या प्रामुख्यानें मुसलमानांची हजेरी लागली नव्हती ही घटना लक्षांत ठेवण्यासारखी आहे. मुसलमानांच्या हजेरीचें कारण त्यांजमध्यें झालेली राजकीय जागृति हें नसून त्या वेळीं मुसलमानांना खूष करण्यासाठीं गांधींनीं चालविलेलें खिलाफतीचें खूळ, हें होय. शिवाय सव्वाकोटी रुपयांचा टिळक स्वराज्य फंड हाही त्या वेळीं हरणाच्या चपळाईनें लाखलाख रुपयांच्या उड्या मारीत होता—त्याच कॅाँग्रेसच्या अधिवेशनांत **महमदअली जिन्हा, बॅरिस्टर-ॲट-लॉ,** यांचे कर्तृत्व, उत्कृष्ट राजकीय दूरदृष्टि व उच्च प्रतीची मुत्सद्देगिरी हे गुण दिसून आले.

काँग्रेसच्या विषयनियामक मंडळांत असहकारितेच्या ठरावावर चर्चा चालू होती. कलकत्ता येथें १९२० च्या सप्टेंबरमध्यें भरलेल्या काँग्रेसच्या जादा अधिवेशनांत असहकारितेला मान्यता देण्यांत आली होती; पण ही मान्यता पुन: एकदां नक्की करून असहकाराला लोकमताचा भरभक्कम पाठिंबा मिळवून घेण्याची गांधींची इच्छा होती. काँग्रेसचें राजकीय ध्येय व असहकारितेची चळवळ यांचा अर्थाअर्थी संबंध नव्हता आणि कलकत्त्याच्या जादा अधिवेशनाचे अध्यक्ष कै. लाला लजपतराय यांनीं असहकारितेच्या यशाबद्दल आपल्या भाषणांत निराशा व्यक्त केली होती. खिलाफतीचा अन्याय व पंजाब प्रकरण यांची दाद लावून घेण्यासाठींच फक्त गांधींनीं सुरू केलेल्या ह्या चळवळीला, स्वराज्यप्राप्तीचें एक साधन असें स्वरूप प्राप्त करून देणें हें या अधिवेशनाचें प्रमुख कार्य असल्यामुळेंच तत्त्वाचा मोठा प्रश्न उपस्थित झाला होता. या अधिवेशनाला जमलेल्या सर्व प्रमुख हिंदी पुढाऱ्यांचा असहकारितेच्या या सर्वव्यापि तात्त्विक ठरावाला विरोध होता आणि फक्त कै. पं. मोतिलाल नेहरू हेच तेवढे गांधींच्या बाजूचे होते. नागपूर काँग्रेसमध्यें असहकाराला अटीतटीचा विरोध करून ठराव हाणून पाडण्याच्या ईर्ष्येनें दासबाबू बंगाल व आसामच्या २५० प्रतिनिधींचा एक तांडा स्वत:च्या खर्चानें नागपूरला घेऊन आले होते. दासबाबूंना या राजकारणासाठीं ३६ हजार रुपये खर्चावे लागले होते ! बंगाल व महाराष्ट्र या हिंदी राजकारणाच्या अग्रभागीं असलेल्या दोन्ही प्रमुख प्रांतांचा असहकाराला तीव्र विरोध असल्यामुळें विषयनियामक मंडळांत या ठरावाविरुद्ध दास, लजपतराय, जयकर, बॅप्टिस्टा, मालवीय यांनीं असहकारितेवर फैर धरून त्याच्या कशा चिंधड्या उडविल्या असतील याची कल्पनाच केली पाहिजे ! या प्रसंगीं एक किरकोळ शरीरयष्टीचा पुढारी ताठ मान करून या ठरावाविरुद्ध भाषण करण्यास उभा राहिला आणि त्यानें तर लोकप्रिय पुढाऱ्यांना आदरार्थी बहुवचन वापरण्याचे शिष्टाचारही झुगारून दिले ! गांधींना 'महात्मा' न म्हणतां त्यानें त्यांचा ' मिस्टर गांधी ' असा उल्लेख केला, व मौलाना महमदअल्ली यांचीही ' मि. महमदअल्ली ' या अभिधानावरच संभावना केली ! "महात्मा गांधी म्हणा, महात्मा गांधी म्हणा," अशी कांहीं सभासदांनीं ओरड केली असतां ओरड करणाऱ्या सभासदांकडे

त्यानें एकदां तुच्छतापूर्वक दृष्टिक्षेप केला. पण महमदअल्लींनाही 'मौलाना' ही पदवी लावण्याचा आग्रह जास्ती आरडाओरड करून या सभासदांनीं धरल्यामुळें मात्र हा पुरुष खवळला. तो चिडून उद्गारला: **"I refuse to be dictated by you. I am entitled to use my discretion to call a man by whatever designation I choose, provided it is parliamentary. I do not recognise Mr. Mahomed Ali's claim to be a Maulana."** खणखणीत स्वरांत बाणेदारपणें फेंकून देण्यांत आलेलें हें उत्तर ऐकतांच सभा एकदम तटस्थ झाली!

**हा कोण संप्रति नवा पुरुषावतार**
**वाटे जया न बहु भार्गवराम वीर**

अशा शंकेच्या कुतूहलानें व आश्चर्यानें मात्र ही स्तब्धता उत्पन्न झाली नाहीं. वर्मीं झोंबणारें उत्तर देऊन प्रतिपक्षाला गप्प बसविण्याचा या पुरुषाचा लौकिक सभाजनांच्या परिचयाचा होता. अशा प्रकारच्या उत्तरानें त्यांना आश्चर्य वाटलें नाहीं; पण आपल्या या लौकिकाला जपण्याची संधि कोणत्याही प्रसंगीं तो वाया जाऊं देत नाहीं हें पाहून त्यांना नवल मात्र वाटल्यावांचून राहिलें नाहीं. गांधींच्या ' महात्मा ' या पदवीबद्दल विशेष आस्था न दाखविणारा आणि गांधींच्या नाकांतील बाल होऊन राहिलेल्या महमदअल्लींचा तर उघड व बेमुर्वतखोरपणें अधिक्षेप करणारा हा वीर कोण? महमदअल्लींचा उघडपणें पाणउतारा करण्याचा त्याला अधिकार काय?

—पण तसा अधिकार त्या पुढाऱ्याला निःसंशय प्राप्त झाला होता. बॅ. महमदअल्ली जिन्हा या नांवानें हिंदुस्थान त्याला चांगल्या प्रकारें ओळखूं लागलें होतें, आणि त्याच्या वक्तृत्वपूर्ण व जहाल जिव्हेनें आणि त्याहीपेक्षां त्याच्या अंगच्या ताठर खंबीरपणामुळें त्यानें आपल्याबद्दल आदर व भीति या दोन्ही भावना सुशिक्षित हिंदी समाजांत निर्माण केल्या होत्या. हिंदी राजकारणाच्या क्षितिजावर गांधी नुक्तेच कोठें चमकूं लागले होते; इस्लामी चंद्रकोरीवरील चांदणीप्रमाणें अल्लीबंधूंची चांदणी गांधींच्या प्रकाशानें लुकलुकत होती. पण जिन्हांची स्थिति तशी नव्हती. लालसर प्रकाशानें अलग राहून चमकणाऱ्या

मंगळाचें स्थान त्यांना राजकीय नभोमंडळांत प्राप्त झालें होतें व ह्या मंगळाचें तेज दिवसेंदिवस उग्र होत चाललें होतें. मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांच्या राशीला हा उग्र मंगळ आल्यामुळें दोनच वर्षांपूर्वी मुंबईत भरलेल्या टाउन हॉलमधील सभेंत लॉर्ड विलिंग्डन यांच्या चेहऱ्यावर लज्जामिश्रित संतापाची काळोखी त्यानें चढविली होती. रौलट ॲक्टचा निषेध करण्यासाठीं "I feel that under the prevailing conditions, I can be of no use to my people in the Council, nor consistantly with one's self-respect is co-operation possible with a government that shows such an utter disregard for the opinion of the representatives of the people at the Council chamber and the feelings and the sentiments of the ·people outside." अशा सडेतोड शब्दांचें पत्र हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड यांच्याकडे पाठवून इंपीरियल कौन्सिलचा राजिनामा देऊन ते एकच वर्षापूर्वी बाहेर पडले होते. जिन्हा हें नांव दरारा या शब्दाला प्रतिशब्द होऊं लागलें होतें. नागपूरच्या कॉंग्रेसमध्यें जिन्हांच्या 'नागरिक स्वातंत्र्यावर' दडपण घालून आपल्या इच्छेप्रमाणें त्यांच्या तोंडून शब्द उमटविण्याचा कांहीं सभासदांनीं हा जो प्रयत्न केला, त्याला जिन्हांनीं ठोकर हाणावी याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. बडे मियां शौकतअल्ली हे मात्र या अपमानानें क्षुब्ध झाले होते. छोटे मियांचा अपमान तो आपला अपमान आणि मौलाना या पदवीला जिन्हांनीं मान्यता दिली नाहीं हा आपणां उभयतांचाही किंबहुना इस्लामचाच अपमान या जाणीवेनें त्यांचा संताप धुमसत होता. याच बैठकींत जिन्हांवर बडगा उगारून बडे मियां त्यांच्या अंगावर धांवून गेले. त्यांच्या हातून त्या वेळीं जर कांहीं अधिकउणें झालें असतें, तर आज या बड्या भाईनाच पुढारी राहिला नसता व ते अनाथ झाले असते! पण शौकतअल्ली व जिन्हा या उभयतांचेंही सुदैव म्हणूनच अहिंसेची मध्यस्थी यशस्वी झाली व आज १८ वर्षांनीं जिन्हांच्या छत्राखालीं आल्यामुळें कॉंग्रेसमान्य झालेली शौकतअल्लींची मौलाना ही पदवी अप्रत्यक्ष रीत्या जिन्हांनाही मान्य करावी लागली!

राष्ट्रीय जात्यंध

हिंदी राजकारणांत कधींही प्राप्त झालें नव्हतें असें महत्त्व आज जिन्हांना प्राप्त झालें आहे. राजकारणांतील एकांडे शिलेदार या नांवानें कालपरवांपर्यंत जिन्हांना संबोधण्यांत येत असे. पण आज ते शिलेदाराचे सुलतान होऊन उपद्रव देणारी सुलतानी गाजवूं लागल्यामुळें हिंदुस्थानांतील एकमेव राजकीय पक्ष असें बिरूद मिरविणाऱ्या पक्षाचे अधिकृत व अनधिकृत असे सुभाष-गांधींसारखे पुढारी त्यांची खुशामत करून बरोबरीच्या नात्यानें त्यांच्याशीं तहनाम्याच्या अटी ठरविण्यासाठीं त्यांच्या वाड्यावर घिरट्या घालूं लागले. जिन्हा जात्यंध आहेत, त्यांची महत्त्वाकांक्षा आसुरी आहे, त्यांच्याशीं वाटाघाट करण्यासाठीं त्यांना चुचकारून त्यांच्या मागण्या मान्य करणें म्हणजे जात्यंधतेच्या हिंस्र व्याघ्राला रक्ताची चटक लावून अधिक क्षुधित करण्यासारखें आहे, असे आक्षेप घेण्यांत येतात. हे आक्षेप खरे असोत अगर खोटे असोत, पण जिन्हांनीं आज सार्वभौमत्वाच्या तोऱ्याला नमविलें आहे हें खास. जिन्हाखेरीज दुसरा कोणताही मुसलमान पुढारी हें कार्य आज तरी करूं शकला नसता.

जिन्हा जात्यंध आहेत; कबूल. जिन्हा अराष्ट्रीय आहेत-खरोखरच जिन्हा अराष्ट्रीय आहेत काय?

जात्यंधतेबरोबर अराष्ट्रीयत्वाचा आरोप ज्या वेळीं जिन्हांवर करण्यांत येतो, त्या वेळीं केवळ जात्यंध म्हणूनच जिन्हांना अराष्ट्रीय समजावयाचें कीं अराष्ट्रीयत्वाचा विषार अंगांत भिनल्यामुळेंच ते जात्यंध झाले आहेत, असा प्रश्न उपस्थित होतो. जिन्हांचें जात्यंधत्व त्यांच्या अराष्ट्रीय वृत्तींतून निर्माण झालें आहे असा आरोप करणें हा विपर्यास होईल; कारण अराष्ट्रीयत्वाच्या कक्षेंत जात्यंधतेखेरीज इतरही अनेक दुर्गुणांचा समावेश होतो. राष्ट्राच्या हितावर निखारे ठेवण्याकडे कल असणाऱ्या व्यक्तीचें अंतःकरण ज्ञातीपुरतें तरी कितपत इमान बाळगील ह्याची शंकाच वाटेल. वैयक्तिक स्वार्थ, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा यांच्या आहारीं जाऊन जात्यंधतेशीं किंचित्‌ही नातें न सांगणाऱ्या अगर नसणाऱ्या अनेक उदार-चरितांनीं महत्पदप्राप्तीच्या आशेनें देशद्रोह केल्याचीं उदाहरणें दाखवितां

येतील, व त्यांपैकीं बरेचसे आज काँग्रेसच्या राजकारणांत धिंगाणा घालीत आहेत ! त्याचप्रमाणें प्रसंगीं राष्ट्रीयत्वाचा गिलावा शाबूत ठेवून अत्यंत हीन व तिरस्करणीय अशा प्रकारची आकुंचित व जात्यंध मनोवृत्ति प्रकट करणारे राष्ट्रीयत्वाचे आधारस्तंभही कोसळून खालीं पाडतां येतील व त्यांचाही आज काँग्रेसमध्यें दुष्काळ नाहीं. देवाणघेवाणाची व वांटणीची बाब पुढें आली असतां व्यापारी धोरणानें सौदा पटवून राष्ट्रीयत्वाचा मुलामा कायम ठेवण्याचा प्रयत्न करणें हें पुढारीपणाचें तंत्र आहे आणि या कामीं ज्याला यश येतें तो यशस्वी व लोकप्रिय पुढारी होतो. जिन्हा सांप्रत कट्टर जात्यंध पुढारी झाले आहेत; पण अराष्ट्रीय विचारसरणी व कृत्यें यांच्या चाकोरींतून त्यांनीं हा पल्ला गांठलेला आहे असें त्यांच्या कट्टया शत्रूलाही म्हणतां येणार नाहीं. हिंदुस्थानच्या मुसलमान समाजांतील सर्व जात्यंध प्रतिगामी विचारसरणीचे बारगीर व बाजारबुणगे त्यांच्या झेंड्याखालीं जमा झाले आहेत; पण त्यांना कह्यांत घेऊन त्यांच्या जमावांत वचक निर्माण करण्याचें सामर्थ्य जिन्हांएवढें आज दुसऱ्या कोणाही मुसलमान पुढाऱ्यामध्यें नाहीं. जिन्हांच्या मनासारखें झालें, तर आपला तांडा शिस्तीच्या मार्गानें प्रगतिपथावर आणून पुढें चालविण्याची धमक त्यांच्या अंगीं निःसंशय आहे. जिन्हांचें महत्त्व आहे तें याच गोष्टीमुळें आणि हें त्यांचें सामर्थ्य ओळखूनच ‘ श्री. जिन्हा ’ यांना कौल लावण्यांत आला आहे ! जिन्हा जात्यंध आहेत, पण ते राष्ट्रीय जात्यंध आहेत आणि जिन्हांशीं बरोबरीच्या नात्यानें तडजोडीचीं बोलणीं करण्यांत हिंदुस्थानच्या राष्ट्रीयत्वाचा पूर्ण मक्ता घेतलेल्या जहाल-मवाळ पुढाऱ्यांचा दंभ दुखावला तरी मुस्लिम लीगच्या वतीनें अलीकडे संयुक्त प्रांतांत लढविण्यांत आलेल्या निवडणुकांत काँग्रेसला पाणी पाजण्याची संघटना ज्या जिन्हांनीं कांहीं महिन्यांत करून दाखविली व नामशेष आणि निर्माल्यवत् झालेल्या मुस्लिम लीगमध्यें नवचैतन्य निर्माण केलें, त्यांच्या राष्ट्रीयत्वाचा भरपूर फायदा मिळवून घेण्यासाठीं एवढी किंमत देणें जरूर आहे हेंही त्यांनीं पुरतें ओळखलें आहे.

दैवदुर्विलास !

तथापि शंभर टक्के राष्ट्रीय असा लौकिक प्राप्त झालेला जिन्हांसारखा पुढारी

जात्यंधतेच्या आहारीं जावा हा एक दैवदुर्विलासच नव्हे काय ? फिरोजशहा मेहतांच्या तालमींत तयार झालेल्या, त्यांच्या उदारमतवादित्वाच्या परंपरेंत वाढलेल्या जिन्हांसारख्या पुढाऱ्याचा असा अधःपात कां व्हावा ? ह्या प्रश्नाचें एकच निश्चित असें कारण देतां येणार नाहीं. जिन्हांच्या मनोवृत्तीची विशिष्ट घडण, देशाच्या राजकीय परिस्थितीमध्यें वरचेवर होत गेलेले फेरबदल, गांधी-युगांतील आध्यात्मिक राजकारणांत उत्पन्न झालेली धरसोड, ब्रिटिश मुत्स-द्दयांनीं ' भेदा व नांदा ' या राजनीतीसाठीं प्रारंभापासून मुसलमान समाजाला हाताशीं धरून चालविलेल्या धोरणाचा सर्व मुसलमान समाजावर कमी अधिक प्रमाणांत बसलेला पगडा आणि बरेचसे सकारण अथवा अकारण निर्माण झालेले दूषित पूर्वग्रह या सर्व कारणांचा सामुदायिक प्रभाव पडून, जिन्हा कट्टर जात्यंधतेकडे झुकत गेले असें म्हणतां येईल. असहकारितेच्या चळवळीपर्यंत जिन्हा कट्टर राष्ट्रीय व कॉंग्रेसवाले होते, व त्यांच्या राजकारणाची भूमिका ज्ञातिनिष्ठेपासूनच सर्वस्वीं अलिप्त होती.

**१९०६ सालीं हिंदुस्थानचे व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो यांच्या मुलाख-तीला ना. आगाखान यांच्या नेतृत्वाखालीं जें हिंदी मुसलमानांचें शिष्टमंडळ ज्ञातीय मतदारसंघाची पहिल्याप्रथम मागणी करण्यासाठीं सरकारच्याच गुप्त प्रेरणेमुळें गेलें, त्या शिष्टमंडळांत समाविष्ट होण्याचें जिन्हांनीं नाकारलें. मौ. महमदअल्ली हे त्या शिष्टमंडळांत होते, व स्वतंत्र मतदारसंघाच्या कल्पनेचे ते एक जनक होते ही गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी आहे.**

"Command Performance" या शब्दांनीं या शिष्टमंडळाचे दरवेशी कोण होते हेंही महमदअल्लींनीं असहकारितेच्या चळवळींत उघड करून सांगितलें. सरकारी प्रेरणेनें उभ्या केलेल्या कळसूत्री बाहुल्यांच्या या शिष्टमंड-ळांत जिन्हा गेले नाहींत एवढेंच नव्हे, तर १९१० सालीं अलाहाबाद येथें भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनांत ज्ञातीय प्रतिनिधित्वाचा निषेध करणारा ठराव मांडून त्यांनीं त्या ठरावावर जोरदार भाषण केलें. मुस्लिम लीग व कॉंग्रेस एकाच राजकीय पातळीवर आणून राजकीय चळवळ संयुक्तपणें चालविण्याची प्रेरणा ज्या मुसलमान पुढाऱ्यांनीं १९१३ च्या कराची कॉंग्रेस-

मध्यें मुसलमान बहुजनसमाजाला दिली, त्यामध्यें जिन्हा हे प्रमुख होते व १९१५ सालीं मुंबई येथें मझरूल हक्क यांच्या अध्यक्षतेखालीं मरीन लाइन्सवर भरलेल्या मुस्लिम लीगच्या परिषदेंत झालेल्या भाडोत्री पठाणांच्या दंग्याला भीक न घालतां त्यांनीं लखनौ येथील ऐक्याची प्रस्तावना करणारा ठराव, परिषद् उधळल्यावर ताजमहाल हॉटेलमध्यें दरवाजे बंद करून रात्रीं भरलेल्या निवडक प्रतिनिधींच्या बैठकींत पास करून घेतला. लखनौ पॅक्टमुळें चिरस्मरणीय झालेल्या १९१६ च्या कॉंग्रेस अधिवेशनांत हिंदु–मुसलमान व जहाल–मवाळ यांचें ऐक्य होऊन खिलापतीच्या चळवळीचा अस्त होईपर्यंत जिन्हांची ज्ञातीनिष्ठा कोठेंही डोकावली नाहीं. खिलापतीच्या चळवळींत जिन्हांनीं इतर मुसलमान पुढाऱ्यांप्रमाणें भाग घेतला नाहीं ही एकच गोष्ट धार्मिक राजकारणाची पकड त्यांच्या विचारसरणीवर बसूं शकत नव्हती, अशा चळवळीबद्दल ते उदासीन होते, हें सिद्ध करण्यास पुरेशी आहे. हिंदी स्वातंत्र्याची चळवळ ही हिंदूंची आहे व खिलापतीची चळवळ ही मुसलमानांची आहे असा दृष्टिकोण खिलाफतीच्या चळवळीसाठीं कॉंग्रेसचा पाठिंबा मिळवून राष्ट्रीय चळवळींत सामील झालेल्या मुस्लीम लीगच्या पुढाऱ्यांनीं प्रकट केला होता व कॉंग्रेस ही राष्ट्रीय संस्था होती तरी ती हिंदूंची संस्था असल्याचें त्या पुढाऱ्यांच्या नकळत त्यांच्या भाषणांतून ध्वनित होत होतें. या अलगपणाचें एक नमुनेदार प्रत्यंतर म्हणून १९२१ सालीं मौलाना हजरत मोहानी यांनीं मुस्लिम लीगचे अध्यक्ष या नात्यानें केलेल्या भाषणांतील एक उतारा पुढें करतां येईल. मौलाना हजरत मोहानी या भाषणांत म्हणाले,

"In my opinion the pressing necessity of Hindusthan is the immediate conclusion of a definite compact between the Congress and the League. The Congress should not enter into any negotiations with the Government concerning Swaraj (1) until the minimum Muslim demands with regard to the Khilafat are satisfied; (2) on the other hand, the Muslims should definitely bind themselves that even when their demands with regard to the Khilafat are satisfied, the Mussal-

mans of India will stand to the last by the side of their Hindu brethren for the attainment and preservation of Indian Independence."

मुसलमानांच्या धार्मिक प्रश्नाला राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नाचें स्वरूप देणाऱ्या कॉंग्रेसचे हातपाय बांधून टाकण्याची ही अराष्ट्रीय व वरचढपणाची वृत्ति हिंदुमुसलमानांच्या ऐक्यानेंही झांकली नाहीं व त्यामुळेंच हें ऐक्य दिखाऊ होतें, हें खिलाफतीची चळवळ फसल्यानंतर आपोआपच कळून चुकलें. खिलाफतीच्या चळवळींतही अराष्ट्रीय वृत्ति न विसरणारे कॉंग्रेसमान्य मुसलमान हे राष्ट्रीय समजण्यांत येत असतां या चळवळीपासून फटकून असलेले जिन्हाच तेवढे आज अराष्ट्रीय कसे ठरतात ?

इतर कारणे

खिलाफतीच्या अपयशामुळें निराश झालेल्या आणि कॉंग्रेसमधील दुहीमुळें संशयग्रस्त झालेल्या मुसलमान पुढाऱ्यांचा कॉंग्रेसवरील विश्वास उडाल्यामुळें दोन दिवसांचें सख्य विसरून ते पुनः आपल्या सवत्या सुभ्याकडे वळले व असहकारितेच्या चळवळीमुळें दिसून आलेली राष्ट्रव्यापि जागृति ही हिंदूंच्या वाढत्या संघटनेचें व शक्तीचें स्वरूप आहे अशी कल्पना करून ते भीतिग्रस्त झाले; कॉंग्रेसमध्यें फूट पडल्यामुळें व हिंदूंबद्दल मनें साशंक झाल्यामुळें जे ज्ञातीय दंगे हिंदु-मुसलमानांत सुरू झाले, त्या दंग्यांवर राष्ट्रीय तोडगा म्हणून संयुक्त मतदार संघाचा प्रचार सुरू झाला व बंगालमध्यें दासबाबूंनीं बंगाल पॅक्ट करून प्रांतिक कायदेमंडळांत लोकसंख्येच्या प्रमाणांत हिंदु-मुसलमानांचें प्रतिनिधित्व मान्य करून सरकारी नोकऱ्यांत मुसलमानांना ५५ टक्के जागा देण्याचें कबूल केलें; पण कोकोनाडा कॉंग्रेसमध्यें हा करार धुडकावून लावण्यांत आला. १९२४ ते १९२६ पर्यंत जिन्हा या परिस्थितींत भ्रमण करून हेलकावे खात होते व त्यांच्या मनाचा कल हळूहळू मुस्लिम संघटनेकडे झुकत होता असें या काळांतील परिस्थितीचें बारकाईनें अवलोकन केल्यास म्हणतां येईल. संयुक्त मतदार संघाचा आग्रह हा मुसलमानांवर वरचष्मा ठेवण्याचा डाव असावा या कल्पनेनें पछाडल्यामुळें १९२४ पासून पुढें मुस्लिम लीगनें स्वतंत्र मतदार संघ कायम ठेवण्याचाच हट्ट धरला व १९२६

सालीं जिन्हांनीं मुस्लिम लीगच्या अधिवेशनांत केलेल्या भाषणांतून आपलें मतांतर व ज्ञातिनिष्ठा उघडपणें व्यक्त केली. या भाषणांत जिन्हा म्हणाले,

"There is no escaping from the fact that communalism does exist in the country. By mere time and sentiment it could not be removed. Nationalism could not be created by having mixed electorates."

याच भाषणानंतर १९२७ च्या मार्च महिन्यांत जिन्हांनीं आपले सुप्रसिद्ध १४ मुद्दे बाहेर काढले व या मुद्द्यांचे जनक म्हणून जिन्हांचा अधिक्षेप होऊं लागल्यामुळें आपल्या ताठर व भांडखोर वृत्तीला अनुसरून जिन्हा जात्यंधतेच्या आहारीं जात जात कडवे व कट्टर जात्यंध बनले.

दुराग्रह

पण जिन्हांच्या मतांची अशी घसरगुंडी होऊन त्यांचें धोरण प्रतिगामी झालें ह्याचें खापर सर्वस्वीं त्यांच्या ताठर मनोवृत्तीवर व हेकेखोरपणावर फोडतां येणार नाहीं. पं. मालवीयजींच्या दुराग्रही धोरणाकडेही त्याचा कांहीं वांटा जातो. जिन्हांचे १४ मुद्दे कोणत्या परिस्थितीमुळें जन्माला आले, याचा इतिहास अज्ञात व अप्रसिद्ध आहे; पण या प्रसंगीं तो सांगणें जरूर आहे. १९२७ च्या प्रारंभीं ॲसेंब्लीचें बजेटचें अधिवेशन सुरू झालें असतां ज्ञातीय प्रश्नाची संयुक्त मतदार संघाच्या पायावर तडजोड घडवून आणण्याची इच्छा जिन्हांनीं प्रदर्शित केली व ॲसेंब्लींतील २८ मुसलमान सभासदांच्या सह्या गोळा करून त्यांनीं **संयुक्त मतदार संघा**च्या तत्त्वावर अधिष्ठित केलेल्या मागण्यांचा एक खर्डा गांधींना सादर केला. गांधी, पं. मोतिलाल नेहरू, मालवीय व आपण स्वतः अशा चौघांनीं देशभर दौरा काढून या तडजोडीचें महत्त्व जनतेच्या मनावर ठसवावें व जनतेकडून या तडजोडीला मान्यता मिळवावी अशीही इच्छा त्यांनीं प्रदर्शित केली. गांधींनीं या कल्पनेला तत्काळ संमति दिली. पं. नेहरू हेही थोडे आढेवेढे घेऊन तयार झाले; पण पं. मालवीयजींनीं खर्ड्यांतील तपशील पाहिल्यावर तो खर्डा झुगारून दिला व आहे त्या स्थितींत तो मान्य करण्याचें नाकारलें. जिन्हांची कल्पना व खर्डा ही तेथेंच विराम पावलीं व ते असंतुष्ट व निराश होऊन परतले. त्यानंतर दोनच महिन्यांनीं जिन्हांनीं

आपले मुद्दे जाहीर केले. जिन्हांसारख्या खंबीर व कर्तबगार मुसलमान पुढाऱ्याचें सहकार्य मिळवून राष्ट्रीय चळवळींत हुकमाचें पान कायमचें हाताशीं ठेवण्याची ही संधि दवडण्यापूर्वी " अर्धं त्यजति पंडितः " ह्या धोरणाचा विनाशकालप्रमाणें भावी लाभकालाकडेही दृष्टि ठेवून उपयोग करतां येईल हें जाणण्याची दूरदृष्टि पंडित मालवीयजींनीं दाखविली नाहीं ही खेदाची गोष्ट आहे.

## एकांडा शिलेदार

जिन्हा हे ज्ञातिनिष्ठ नाहींत हें दाखविण्यासाठींच ते परिस्थितीच्या प्रवाहांत सांपडून कारणपरत्वें जात्यंध कसे बनत गेले याचा किंचित् विस्तारानें ऊहापोह केला आहे. जिन्हांच्या स्वभावाची विशिष्ट घडण हेंही त्यांच्या प्रतिगामीत्वाचें एक कारण असल्याचें वर सांगितलें आहे. आणि जिन्हांच्या राजकीय व व्यावसायिक क्षेत्रांत " स्वभावो मूर्ध्नि तिष्ठते" असा प्रत्यय आल्यामुळें परिस्थितीएवढाच त्यांचा स्वभावगुण हाही त्यांच्या चरित्राला वळण लावण्यास कारणीभूत झाला आहे असें म्हणतां येईल. कालपरवांपर्यंत जिन्हा हे लोकनायक नव्हते. ते फक्त एक पुढारी होते. अनुयायांच्या बळावर आपली प्रतिष्ठा मिरविणें व अनुयायांची संख्या पणाला लावून राजकारणाचे डाव खेळणें या गोष्टीकडे ते दुर्लक्ष करीत आले. आपलें अस्तित्व त्यांनीं स्वतःपुरतेंच राखलें आणि देशाच्या व ज्ञातीच्या राजकारणांत कोणाही नेत्यापुढें मान न वांकवितां उलट आपल्या सहकारानें त्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे अशा ऐटदार आविर्भावांत त्यांनीं आपलें वैशिष्ट्य मिरविलें. हिंदी राष्ट्रीय पुढारी अगर ना. आगाखान यांच्यासारख्या मुसलमान समाजाचे सरकारमान्यता मिळालेले बडे पुढारी यांना जिन्हांचा आपल्या अनुयायांमध्यें समावेश करण्याचें समाधान लाभलें नाहीं. तो मान फक्त एकटे सर फिरोजशहा मेहता यांनांच तेवढा मिळालेला आहे. कराचीच्या एका सुखवस्तू मुसलमान कुटुंबांत ता. २५ डिसेंबर १८६६ सालीं जन्मलेला एक मुलगा वयाच्या अवघ्या १९ व्या वर्षी बॅरिस्टर होऊन आल्यानंतर त्यानें कराचीचे प्रसिद्ध वकील कै. हरचंदराय विशनदास यांच्याकडे उमेदवारी करण्याची इच्छा प्रदर्शित केली; पण हरचंदराय यांनीं त्याला तेथें थारा न

दिल्यामुळें तो मुंबईला आला, व कै. दादाभाई नौरोजी यांचा प्रायव्हेट सेक्रेटरी झाला. १९०२–३ च्या सुमारास जिन्हा मुंबईला आले, त्या वेळीं नुकताच बॅरिस्टर होऊन आलेला एक मुसलमान तरुण यापलीकडे कोणत्याही लौकिक कमाईवर त्यांची मालकी नव्हती; पण जिन्हांची हुषारी व बुद्धिमत्ता फेरोजशहांच्या गुणग्राहक व सर्वसंग्राहक दृष्टीला पडून त्यांनीं जिन्हांना आपल्या पंथांत दाखल करून घेतलें व जिन्हाही फेरोजशहांच्या व्यक्तित्वाकडे आकर्षित झाले. फेरोजशहांचें अनुयायित्व स्वीकारल्यानंतर त्यांच्या उत्तेजनानें जिन्हांनीं केलेली प्रगति व अत्यंत अल्प कालांत त्यांना लाभलेली मान्यता जिन्हांच्या कर्तबगारीची उत्कृष्ट साक्ष पटविते. १९०७ च्या कॉकस प्रकरणामुळें उद्भवलेलें म्युनिसिपल निवडणुकीचें प्रकरण कोर्टात गेल्यावर कॉकसच्या कटवाल्यांविरुद्ध आपल्यातर्फें काम चालविण्यासाठीं मेहतांनीं जिन्हांची नेमणूक केली. स्मॉल कॉज कोर्टात हा खटला ४० दिवस चालू होता. या खटल्यानें जिन्हांना पुढें आणलें व त्यांनीं या खटल्यांत बजावलेल्या कामगिरीबद्दल मुंबईत त्यांचा जाहीर गौरव करण्यांत आला. १९०५ सालच्या मेमध्यें फेरोजशहांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईला भरलेल्या जाहीर सभेंत हिंदी लोकांच्यीं गाऱ्हाणीं व मागण्या विलायतेंत जाऊन मांडण्यासाठीं जें शिष्टमंडळ पाठविण्याचा ठराव पास करण्यांत आला, त्या शिष्टमंडळांत कै. गोखल्यांच्याबरोबर फेरोजशहांनीं जिन्हांची निवड केली होती. कांहीं कारणांमुळें जिन्हांना विलायतेस जातां आलें नाहीं; तथापि जिन्हांची निवड करण्यांत फेरोजशहांनीं त्यांच्या कर्तबगारीबद्दल जो विश्वास प्रकट केला, त्याचें मोल कमी ठरत नाहीं आणि त्यानंतर पांचच वर्षांनीं इंपीरियल कौन्सिलच्या निवणुकीसाठीं जिन्हांना उभें करून व त्यांना तेथें पाठवून फेरोजशहांनीं पुनः एकदां जिन्हांवरील विश्वास प्रकट केला व त्यांच्या राजकीय आयुष्यक्रमाला प्रारंभ करून दिला. जिन्हा व फेरोजशहा यांचे स्नेहसंबंध फेरोजशहांच्या मृत्यूपर्यंत कायम होते व तोंपर्यंत ते फेरोजशहांचे एकनिष्ठ अनुयायी होते. फेरोजशहांच्या अवसानानंतर मात्र जिन्हांची भूमिका एकांड्या शिलेदाराची झाली.

## राजकारण

पक्षाच्या राजकारणापासून जिन्हा अलिप्त राहिले तरी होमरूल लीग, कॉंग्रेस

स्वतंत्रपक्ष, नॅशनॅलिस्ट पार्टी इत्यादि पक्षांच्या छावण्यांत निरनिराळ्या वेळीं शिरून त्यांनीं त्या त्या पक्षाच्या राजकारणाचा कायदेमंडळांत पुरस्कार केला. ज्या राजकीय पक्षाशीं आपलीं मतें जुळलीं, त्या पक्षाला मदत करावयाची या बाण्यानें गेल्या २८ वर्षांत मध्यवर्ति कायदेमंडळांत जिन्हांनीं पक्षकार्य न करतां देशकार्य केलें आहे. होमरूल लीगच्या चळवळींत जिन्हा मिसेस बेझंट यांच्या होमरूल पक्षाला मिळाले व त्या पक्षाचे अध्यक्ष झाले. असहकार संमत नसल्यामुळें त्यांनीं असहकारितेला विरोध केला, पण असहकारितेची चळवळ मागें घेण्यांत आल्यावर खिलाफतवाल्या मुसलमानांनीं पुनः ब्रिटिश सरकारच्या भेदनीतीच्या मोहजालांत घुसून माघार घेण्याचें जें धोरण स्वीकारलें तें धोरण जिन्हांना मानवलें नाहीं. गया-कॉंग्रेस नंतर कायदेमंडळांत सरकारला संघटित विरोध करण्यासाठीं निघालेल्या दासबाबूंच्या स्वराज्यपक्षानें आपलें कार्यक्षेत्र व्यापक करून कॉंग्रेसबाहेरील स्वतंत्र वृत्तीच्या पुढाऱ्यांचा या पक्षांत समावेश करून घ्यावा म्हणून मुंबईला जे प्रयत्न करण्यांत आले, त्यांत जिन्हांनीं प्रामुख्यानें भाग घेतला; पण हा प्रयत्न फसल्यामुळें १९२६ सालीं जिन्हांच्या मदतीनें मुंबईत नॅशनॅलिस्ट पार्टीचा जन्म झाला. १९२६ सालीं या पक्षानें मुंबईत निवडणुकी लढविल्या. जिन्हांनीं स्वतंत्र मतदार संघाचा पुरस्कार केल्यामुळें त्यांना जात्यंध ठरवून त्यांचा पाणउतारा करण्याचा डाव स्वराज्यपक्षानें टाकला; पण हा डाव स्वराज्यपक्षीयांच्याच अंगावर उलटवून जिन्हांनीं नॅशनॅलिस्ट पक्षांतील सभासदांना ज्ञातीय धोरणावर स्वातंत्र्य देऊन ॲसेंब्लींतील मुसलमान सभासदांचा स्वतंत्र पक्ष स्थापन केला व मुसलमान सभासदांप्रमाणें या पक्षामध्यें सर पुरुषोत्तमदास ठाकूरदास व हरि सर्वोत्तम राव या दोन हिंदु सभासदांचाही समावेश करून विघ्नसंतोषी प्रतिस्पर्ध्यांना फजित केलें ! ज्ञातिविषयक धोरणापुरतें वैयक्तिक स्वातंत्र्य ठेवून इतर राष्ट्रीय प्रश्नांवर एकवाक्यता व संघटना करण्यासाठीं जिन्हांनीं स्वीकारलेलें हें धोरण जेवढें सहिष्णु होतें, तेवढेंच तें मुत्सद्देगिरीचेंही होतें, व त्या धोरणामुळें जिन्हांच्या राष्ट्रीयत्वाला उठावच मिळाला हें नाकबूल करून चालणार नाहीं. मतदार संघाच्या ज्ञातीय मुद्द्यावर जिन्हांचें धोरण प्रतिगामी असलें, तरी या मतभेदाचा फायदा जिन्हांनीं साम्राज्यशाहीच्या हस्तकांना घेऊं दिला नाहीं हें सायमन कमिशनवरील

बहिष्काराच्या वेळीं मुस्लिम लीगमध्यें फूट पाडण्याची पाळी येऊं देऊनही जिन्हांनीं आपले मतभेद विसरून कट्टर जात्यंधांना जो विरोध केला, त्यावरूनही दिसून येईल. ऑल इंडिया मुस्लिम कॉन्फरन्सचें नाटक करून सायमन कमिशनला मुसलमानांचा विरोध नाहीं असा देखावा निर्माण करण्याचा प्रयत्न ना. आगाखान व सर इब्राहिम रहिमतुल्ला यांनीं केला; पण लाहोर व कलकत्ता येथें दोन प्रतिस्पर्धी मुस्लिम लीग्स् निर्माण झाल्याचें दृश्य दाखवून ना. आगाखान यांच्याही प्रतिष्ठेखालीं सुरुंग लावण्यास जिन्हांनीं कमी केलें नाहीं. गेल्या एप्रिल महिन्यांत गव्हर्नरांकडून आश्वासनें मागण्याच्या पोरकट मुद्द्यावर मंत्रिमंडळ बनविण्याचें कॉंग्रेसनें नाकारलें असतां मुंबईत राज्यकारभार हातीं घेण्यासाठीं उत्सुक असलेल्या आपल्या अनुयायांशीं चार तास युक्तिवाद करून त्यांच्याकडून गव्हर्नरला नकार देऊं लावण्यांत जात्यंध जिन्हांनीं आपलें राष्ट्रीयत्व व राष्ट्रीयत्वाचा लौकिकच निष्कलंक राखण्याचें धोरण स्वतःपुढें ठेवलें होतें.

## व्यक्ति

१९१८ च्या जून महिन्याच्या ११ व्या तारखेला मुंबईत टाउनहॉलमध्यें भरलेल्या प्रचंड जाहीर सभेंत लॉर्ड विलिंग्डन यांच्याशीं दोन हात करून जिन्हांनीं त्यांचा जो नक्षा उतरला, त्या प्रसंगानें जिन्हा ही काय चीज आहे हें कळून आलें. राजनिष्ठेचा ठराव सुखासुखीं पास होऊं न देतां एका उपसूचनेच्या द्वारा हिंदी आकांक्षांचें प्रतिबिंब या ठरावांत मांडण्याचा होमरूल लीगच्या पुढाऱ्यांचा गुप्त बेत एका प्रसिद्ध कॉंग्रेसवाल्याच्या फितुरीमुळें गव्हर्मेंट हाउसमध्यें कळला व त्याप्रमाणें लॉर्ड विलिंग्डन यांचें भाषण बदलण्यांत येऊन हिंदी पुढाऱ्यांच्या धोरणावर, तो बेत ओळखून, टीका करणारी लहानशी दुरुस्ती या भाषणांत करण्यांत आली. या टीकेला उत्तर देण्यास टिळक उभे राहिले; पण त्यांचा उपमर्द झाल्यामुळें ते सभेंतून निघून गेले. त्यांच्या इतर अनुयायांनींही त्यांचेंच अनुकरण केलें. जिन्हांनीं मात्र गोंगाट व विरोध यांना भीक न घालतां मागें राहून विलिंग्डनसाहेबांच्या भाषणांत हिंदी पुढाऱ्यांवर केलेल्या टीकेचा जाब विचारला. भाषणांतील दुरुस्तीची कल्पना नसल्यामुळें आक्षिप्त भाग दाखवून देण्याचें लॉर्ड विलिंग्डन यांनीं

आव्हान देतांच जिन्हांनीं तावडतोब तो प्यारा वाचून दाखवून लॉर्ड विलिंग्डन यांना निरुत्तर केलें. या प्रसंगानें जिन्हा विलक्षण लोकप्रिय झाले, आणि त्यांचा विलक्षण दराराही बसला. आणीबाणीच्या प्रसंगीं न डगमगतां प्रति-स्पर्ध्यावर निर्दयपणें हल्ला चढवून त्याची त्रेधा उडवून देण्याची निर्भय वृत्ति आणि बेगुमान उद्दामपणा जिन्हांच्या रोमरोमांत भिनला आहे. त्यांचा निर्भीड-पणा व चिवट लढाऊ वृत्ति दाखवून देणारे असे अनेक प्रसंग जिन्हांच्या आयुष्यांत उत्पन्न झाले आहेत. १९१५ सालीं मरिन लाइन्सच्या मैदानांत मुस्लिम लीगची सभा भाडोत्री पठाणांनीं उधळून लावली असतां तेथें जिन्हांनीं शेवटपर्यंत निश्चल उभें राहून आपली जागा सोडली नाहीं. लॉर्ड विलिंग्डन यांना मुंबईच्या नागरिकांतर्फे मानपत्र देण्याचा ठराव करण्यासाठीं १९१८ च्या नोव्हेंबरमध्यें लॉर्ड विलिंग्डन यांच्या चाहत्यांनीं भरविलेल्या टाउन हॉलमधील सभेंत जिन्हांनीं पुन: एकदां विरोधाची जबरदस्त चिकाटी दाखवून आपले प्राणही धोक्यांत घातले व त्यांच्या या शौर्याचें स्मारक करण्या-साठींच जिन्हा हॉल बांधण्याची कल्पना निघाली. अशाच प्रसंगाची एक आवृत्ति १९२६ मध्यें मुंबईच्या मारवाडी विद्यालयांत जिन्हांच्या अध्यक्षते-खालीं रँ. परांजपे यांच्या झालेल्या व्याख्यानप्रसंगीं निघाली. नेमस्त व प्रति-सहकारवादी यांचीं मतें पसंत न पडल्यामुळें त्यांची सभा श्रोत्यांनीं उधळून लावली असा डांगोरा पिटण्यासाठीं जमनादास मेहता यांच्या निवडणुकीचीं पत्रकें वांटणाऱ्या एका धंदेवाईक कॅांग्रेस गुंडानें ६ नोव्हेंबर रोजीं भरलेल्या या सभेंत दंगा सुरू केला असतां जिन्हांनीं आपला पोषाखी रुबाब विसरून या गुंडाबरोबर दोन हात करण्यास कमी केलें नाहीं व त्याला हाताला पकडून बाहेर हांकून लावलें. विद्यालयाबाहेर फटाक्यांच्या माळा लावून बाहेरचे कॅांग्रेसवाले आंतल्या दंगलीला साथ देत होते व श्री. वैकुंठ मेहता व बॅ. पुरुषोत्तमदास त्रिकमदास यांनींही आंत घुसून दंगेखोरांचा कैवारही घेतला. पोलिसांनाही पाचारण करण्यांत आलें; पण जिन्हांनी गुंडाचे कॅांग्रेसवाले कैवारी व पोलिस सार्जंट या उभयतांचीही मात्रा चालूं न देतां त्यांना सभागृहांतून निघून जाण्यास फर्माविलें व दंगल मोडून सभेचें काम नेटानें पार पाडलें. प्रतिपक्षाचा विरोध हाणून पाडण्याच्या कामीं शाब्दिक प्रहारानें कार्यभाग होत नाहीं असें दिसून येतांच अस्तन्या वर सारण्याची जिन्हांची तयारी असते.

केवढीही प्रतिष्ठित व्यक्ति असो, उलट टोला हाणण्याचा प्रसंग येतांच तिची मुर्वत जिन्हांनीं कधींही बाळगलेली नाहीं अथवा या उद्दामपणाचा काय परिणाम होईल याचाही विचार त्यांनीं केला नाहीं. हायकोर्टांतील एक यशस्वी कायदेपंडित असा लौकिक जिन्हांनीं संपादन केला आहे; पण हें यश कायदेपांडित्यांतील सूक्ष्म पळवाटांच्या व कायद्याच्या चिकित्सक ज्ञानाच्या बळावर संपादन न करतां भांडून व झगडूनच त्यांनीं तें मिळविलें आहे. सर दिनशा दावर यांच्या कोर्टांत पक्षकाराचे वकील या नात्यानें हजर राहण्यास जिन्हा व सर दिनशा यांचे चिरंजीव बॅ. जहांगिर दावर यांना विलंब लागल्यामुळें, सर दिनशा जिन्हांना 'वकिलांचीं कर्तव्यें' या विषयावर एक लहानसें व्याख्यान ऐकवीत असतां, "महाराज, २५ वर्षें मी वकिलीचा धंदा करीत आहें. वकिलांचीं कर्तव्यें काय असतात हें मला शिकविण्याऐवजीं ज्यांच्या हेकटपणामुळें हा विलंब लागला, त्या आपल्या चिरंजीवांनाच हा उपदेश करा" असें उत्तर देऊन जिन्हांनीं ज. दावर यांना आपल्या फटकळपणाची चुणुक दाखविली. "तुम्ही कनिष्ठ कोर्टांतल्या कनिष्ठ जज्जासमोर भाषण करीत नाहीं हें विसरूं नका" असें ज. कॅंप यांनीं जिन्हांना एकदां बजावलें असतां, "तुमच्यासमोरही लुंगासुंगा बॅरिस्टर उभा राहिलेला नाहीं हें तुम्हीं लक्षांत ठेवा" असा रोखठोक जबाब जिन्हांनीं दिलेला आहे. भुलाभाईप्रमाणें अजीजी व खुशामतखोरपणा जिन्हांना ठाऊक नाहीं. मुसंडी मारून अल्प श्रमांत कार्यभाग साधण्याचेंच धोरण त्यांच्या स्वभावाला जास्त मानवतें. राजकारणांत काय अगर व्यवसायांत काय, जिन्हा कधींही कोणाचे मिंधे नसल्यामुळें ताठरपणानें वर मान करून फिरण्याची त्यांची ऐट त्यांच्या वैयक्तिक रुबाबांत भर घालते. हायकोर्टांत प्रतिष्ठित कायदेपंडितांनीं अशीलपत्रासाठीं लुटीच्या वांटण्या घालून आपल्या गटाची मक्तेदारी निर्माण करण्याचा जो पद्धतशीर घाट घातला होता, त्याची चौकशी चालू असतां अनेक बड्या धेंडांचीं नांवें या मक्तेदारीचे घटक म्हणून बाहेर आलीं; पण जिन्हांच्या नांवाचा कोणी उच्चारही केला नाहीं. जिन्हा रंगेल आहेत आणि बेमुर्वतखोर आहेत, म्हणूनच ते उपयोगांत आणीत असलेल्या साधनाच्या सफाईदारपणाकडे लक्ष देण्याची जरूरी त्यांना भासली नाहीं. हा खडबडीत आडमुठेपणा जिन्हांच्या अगदीं खासगी व्यव-

हारांतही प्रत्ययाला आला आहे. सर दिनशा पेटिट यांच्या कन्येला इस्लामची दीक्षा देऊन तिच्याशीं जिन्हा विवाहबद्ध झाल्यामुळें पारशी जातींत केवढी तरी खळबळ उठली होती, आणि जिन्हांना खुनाच्याही धमकीचीं पत्रें येत असत. या नाजुक बाबींतही जिन्हांनीं तडकाफडकीच्या धोरणानें आपला कार्य-भाग साधून घेतला. चार कल्हईचीं भांडीं व एक काजी एवढ्या सामग्रीवर जिन्हांच्या चेंबरमध्यें मिसेस जिन्हांचें धर्मांतर व विवाहविधि हे दोन्ही समा-रंभ उरकून घेण्यांत आले. या विवाहानें ८ लक्ष रुपयांचें स्त्रीधन घरीं चालून येण्याचा लाभ सुशिक्षित व सुसंस्कृत पत्नीबरोबर जिन्हांच्या पदरीं पडला, तरी त्यापूर्वीं हें विवाह–प्रकरण हायकोर्टांत जाऊन जिन्हांना त्यासाठीं बराच त्रास सहन करावा लागला होता. 'हिंदुमुस्लिम ऐक्याचे वकील' अशी जिन्हांना पदवी देणाऱ्या सरोजिनी नायडू यांनीं या नवदांपत्याच्या मार्गांतील कायदे-शीर अडचणी दूर करण्यासाठीं जी खाजगी मध्यस्थी केली, तिचा निर्देश मात्र या प्रसंगीं अवश्य केला पाहिजे.

### स्वार्थनिरपेक्ष

जिन्हांच्या ज्या स्वभावगुणांनीं त्यांच्या स्वभावचित्राची खुलावट उठावदार होते, त्यांमध्यें त्यांच्या निर्भयपणाएवढेंच त्यांच्या स्वार्थनिरपेक्षवृत्तीलाही महत्त्व देणें क्रमप्राप्त आहे. हिंदी राष्ट्रीयत्वाचे जिन्हा मारेकरी आहेत हा कांगावा करतांना अशा कांगवखोरपणाची दुसरी बाजू म्हणून ज्या आमिषावर साम्राज्यशाहीच्या हस्तकांनीं अराष्ट्रीयत्वाचा सौदा केला, त्या आमिषांना जिन्हांच्या बाबतींत कितपत यश आलें याचाही विचार केला पाहिजे. पण ही दुसरी बाजू जिन्हांच्या चरित्रांत कोरीच सांपडते. हायकोर्ट जज्जाची जागा व हिंदुस्थानसरकारच्या कार्यकारी मंडळांत कायदेमंत्र्याचें स्थान हीं दोन आमिषें लॉर्ड रीडिंग यांनीं जिन्हांपुढें टाकलीं होतीं. नाइटहूडही त्यांनीं जिन्हांना देऊं केली होती व ती त्यांनीं स्वीकारावी म्हणून एका उपवन–संमेलनप्रसंगीं मिसेस जिन्हा यांना उद्देशून "Don't you wish to be Lady Jinnah ?" असा प्रश्न लॉर्ड रीडिंग यांनीं विचारला होता. "जर जिन्हा नाइटहूड स्वीकारतील तर मी त्यांच्याशीं घटस्फोट करीन" असें उत्तर मिसेस जिन्हांनीं लॉर्ड रीडिंग यांना दिलें होतें ! क्षुद्र वस्तु तुच्छतेचा आविर्भाव करून झिडकाराव्या,

त्याप्रमाणें हीं आमिषें जिन्हांनीं झिडकारलीं. ॲसेंब्लीमध्यें एका चर्चाप्रसंगीं मुसलमानांना वड्या सरकारी जागा देण्यांत येत नाहींत अशी तक्रार करण्यांत आली असतां सर बेसिल ब्लॅकेट यांनीं अशा जागांना पात्र असलेले लायक मुसलमान सांपडत नाहींत असें कारण पुढें केलें. जिन्हांनीं "Search and you will find" असें बसल्या जागेवरून उत्तर दिलें. या उत्तराच्या मागें कांहीं तरी गर्भित सूचना असावी या कल्पनेनें सर बेसिल ब्लॅकेट यांनीं ताबड-तोब जिन्हांची भेट घेऊन त्यांच्या वशिल्याच्या इसमाला कोणतीही बडी जागा देण्याची तयारी दाखविली; पण आपल्या खिशांत असा उमेदवार नसल्याचें सांगून, स्वतःला उपकृत करून ओशाळें करण्याची ही संधि त्यांनीं सर बेसिल यांना मिळूं दिली नाहीं. पिछलेपन करण्याची आवश्यकता असलेलें लहानसेंही छिद्र जिन्हांच्या चारित्र्यांत सांपडलें असतें, तरी त्या दोषाचा फायदा जिन्हांच्या हितशत्रूंनीं घेतला असता व जिन्हांच्या तुफानी शिडांतील वारा काढून घेण्यासाठीं त्याचा उपयोग केला असता. पण तसा कमकुवतपणा जिन्हांच्या चारित्र्यांत आढळून आला नाहीं. ह्याच कारणामुळें कट्टर कॉंग्रेस-वाल्यांच्या रोषाला जसे जिन्हा पात्र झाले, त्याचप्रमाणें सरकारच्या सावली-लाही ते अपात्र ठरले. तिसऱ्या रा. टे. परिषदेच्या वेळीं जिन्हा लंडनमध्यें असतां तिसऱ्या रा. टे. परिषदेंतून व जॉ. पार्लमेंटरी कमिटींतून त्यांना वगळून त्यांच्याऐवजीं बंगालचे प्रतिनिधि मि. गझनवी यांची तेथें वर्णी लावण्यांत जिन्हांना त्यांच्या जहालपणाचेंच प्रायश्चित्त देण्याचें धोरण होतें हें न सांगूनही समजण्याजोगें आहे. जिन्हांच्या अज्ञात स्वार्थनिरपेक्षतेप्रमाणें त्यांचा ज्ञात स्वार्थत्यागही तेवढाच महत्त्वाचा असून स्वार्थनिरपेक्षतेच्या पार्श्वभूमीवर तो ठळकपणानें मांडल्याखेरीज हें चित्र पुरें होत नाहीं. मुडिमन कमिटी, स्कीन कमिटी या दोन कमिटयांवर जिन्हांची नेमणूक झाली असतां दोन्ही कमिटयां-बरोबर देशभर व इंग्लंडमध्यें साक्षी घेत सुमारें अडीच वर्षेंपर्यंत फिरून हजारों रुपयांची प्रॅक्टिस सोडून त्यांनीं जो स्वार्थत्याग केला, तो उपेक्षणीय म्हणतां येईल काय ?

### वाङ्मयचौर्य

ताठर, मानी, व्यक्तिनिष्ठ, भांडखोर, उद्दाम, रंगेल अशा वृत्तींच्या जिन्हां-

सारख्या पुढाऱ्याला आपल्या मोठेपणांत अगर रुबाबांत यत्किंचित्‌ही वैगुण्य उत्पन्न झालेलें खपणार नाहीं. जिंकण्याची शक्यता दिसेल तेथेंच अशा वृत्तींच्या व्यक्ति तोऱ्यानें मिरवितांना दिसतील व अप्रिय अशा वातावरणाचा संपर्कही आपल्याला त्या लागूं देणार नाहींत. लॉर्ड विलिंग्डन यांचें हिंदुस्थानचे व्हाइसरॉय या नात्यानें आगमन झाल्यावर हिंदुस्थानांतून आपली चीजवस्त व गाशा गुंडाळून जिन्हांनीं लंडनमध्यें आपला प्रपंच कां थाटला व लॉर्ड विलिंग्डन यांची मुदत भरत आल्यावर त्यांचें हिंदुस्थानांत आगमन कां झालें, ह्या गोष्टीचेंही रहस्य जिन्हांच्या या स्वभाववैशिष्ट्यांत लपलेलें आहे. नेहरू रिपोर्टानंतर आपल्या मागण्या काय आहेत हें Dear Mr. Prime Minister अशा मायन्याचें बरोबरीच्या नात्यानें मि. रॅम्से मॅक्डोनल्ड यांना पत्र लिहिणाऱ्या जिन्हांनीं लॉर्ड विलिंग्डन यांच्या आगमनामुळें डोक्यांत राख घालून घेण्यास उद्युक्त व्हावें हा त्यांचा हीनगंड आहे, कीं प्रतिस्पर्ध्याच्या प्रतिष्ठेचा अवमान करण्याचा तो एक आविर्भाव होता हें सांगतां येणार नाहीं. पण जिन्हांच्या ताठरपणालाही खालीं पहावयास लावण्याजोगा एक प्रसंग अभावितपणें त्यांच्या चरित्रांत एकदां घडून आला एवढें मात्र खरें, आणि त्या प्रसंगाची आठवण झाल्यावर आजही जिन्हा लज्जित होतील यांत शंका नाहीं. हा प्रसंग १९१५ सालीं ऑक्टोबरमध्यें घडून आला. अहमदाबाद येथें त्या वर्षी मुंबई इलाखा प्रांतिक परिषदेचें अधिवेशन भरलें होतें व जिन्हा या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. १९११ सालीं सर विल्यम वेडरबर्न यांच्या नेतृत्वाखालीं लॉर्ड हॉर्डिंज्‌ यांच्या भेटीला कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांचें जें शिष्टमंडळ गेलें होतें, त्या शिष्टमंडळानें प्रांतिक स्वायत्ततेची मागणी केली होती व २५ ऑगस्ट १९११ रोजीं हिंदुस्थान सरकारनें ब्रिटिश सरकारला जो खलिता पाठविला होता, त्या खलित्यांतही ही मागणी न्याय्य असल्याचें मत देऊन भावी सुधारणा कायद्यांत तिचा अंतर्भाव करण्याची सूचना लॉर्ड हार्डिंज यांनीं केली होती. लॉर्ड हॉर्डिंज यांच्या खलित्यांतील या मुद्द्यावर भाष्य करतांना भारतमंत्री लॉर्ड क्र्यू यांनीं प्रांतिक स्वायत्ततेचा अर्थ मध्यवर्ती सरकारच्या अधिकारांचा कांहीं भाग प्रांतिक सरकारकडे सोंपविणें असा करून जबाबदार प्रांतिक स्वराज्याच्या कल्पनेला खो घातला; तथापि प्रांतिक स्वायत्ततेच्या स्वरूपावर एकमत झालें तर ती पदरांत पडण्याचीही

बरीचशी शक्यता विलायतेंत पडद्याआड चालविण्यांत आलेल्या प्रयत्नांनीं उत्पन्न झाली होती. प्रांतिक स्वायत्तता व भावी राज्यघटना यांची रूपरेखा जाहीर रीतीनें मांडून तिला मान्यता मिळविणें जरूर होतें व जिन्हांनीं अहमदाबाद येथील भाषणांत ही योजना स्पष्ट केली. जिन्हांच्या भाषणांतील हा भाग गोखल्यांच्या सुप्रसिद्ध राजकीय मृत्युपत्राचा अक्षरशः अनुवाद होता व जिन्हांच्या या भाषणानंतर टाइम्समध्यें पत्र लिहून सर होर्मसजी वाडिया यांनीं तसें दाखवून देतांना जिन्हांवर वाङ्मयचौर्याचा आरोप केला. गोखल्यांनीं मृत्यूच्या आदल्याच रात्रीं अखेरची निरवानिरव करतांना डॉ. देव यांच्या सल्ल्यालाही न जुमानतां क्षीण झालेल्या सर्व शक्ति एकवटून हा मसुदा लिहून ठेवला व त्याची एक प्रत सर फिरोजशहा मेहता यांच्याकडे व दुसरी प्रत ना. आगाखान यांच्याकडे पाठवून दिली. सर होर्मसजी वाडिया यांनीं केलेल्या आरोपामुळें व पुढें गोखल्यांची योजना प्रसिद्ध झाल्यामुळें जिन्हांचें नांव बद्‌ झालें व त्यांना आपल्यावरील आरोपाचा इन्कार करण्यास कोणत्याच बाजूनें पळवाट राहिली नाहीं. हें लेखनचौर्य कसें घडून आलें ह्याचा इतिहास मनोरंजक आहे; पण जिन्हांचा या चौर्यप्रकरणीं मुळींच हात नव्हता हेंही खरें आहे. लॉर्ड विलिंग्डन यांच्या टाउनहॉलमधील भाषणांत होमरूल लीगच्या पुढाऱ्यांवर टीका करणारा भाग जसा त्यांना नकळत समाविष्ट झाला, तसाच कांहींसा प्रकार, आपल्या भाषणांत आपण पुरस्कृत करीत असलेली योजना गोखल्यांच्या लेखणींतून बाहेर पडली आहे याचें ज्ञान नसल्यामुळें, जिन्हांच्या बाबतींत घडून आला. पण कांहींही असलें, तरी जिन्हांना या आरोपांतून आपली मुक्तता करून घेणें शक्य झालें नाहीं व तेवढ्यापुरता त्यांना मानभंग सहन करून गप्प बसावें लागलें. जिन्हांच्या सार्वजनिक नैतिक चारित्र्याबद्दल संशय उत्पन्न करणारा फक्त हा एवढाच प्रसंग वगळला, तर त्यांचें सार्वजनिक चारित्र्य शुद्ध व निष्कलंक असल्याची हमी देतां येईल.

### कार्सनची आवृत्ति ?

अशा प्रकारच्या आपल्या प्रभावी व वैशिष्ट्यपूर्ण कारकीर्दीला विशिष्ट वळण लावून जिन्हांनीं आपल्या ज्या नव्या भूमिकेचें सत्यस्वरूप नंगेपणानें दाखविलें; ज्या भूमिकेला शोभण्यासाठीं नेहरू रिपोर्टांतील योजना मान्य असूनही

आपल्या गैरहजेरींत ती निर्माण झाली व मुस्लिम लीगच्या प्रतिनिधींच्या धोरणाला ती मान्य नाहीं या सबबीवर ती जिन्हांनीं झिडकारली; कायदेमंडळांतील मुसलमानांच्या पक्षाला जातीय अभिधानानें संबोधण्यांत येऊं नये ह्यासाठीं कटाक्षपूर्वक जपणाऱ्या जिन्हांनीं ज्या आपल्या भूमिकेचें महत्त्व प्रस्थापित करण्यासाठीं या पक्षाला मुस्लिम लीगच्या नांवाची टिळाटोपी चढविली; जिच्यासाठीं इस्लामचें झेंडावंदन, बैलांच्या जोड्या जुंपलेल्या गाड्यांतून मिरवणुका असले स्वत:ला अप्रिय असलेले अनुकरणाचे प्रकार कॉंग्रेसच्या पावलावर पाऊल ठेवून जिन्हांनीं सुरू केले आहेत, ती त्यांची भूमिका भावी राजकारणांत यशस्वी होऊन त्यांचा लौकिक वाढविण्यास कारणीभूत होईल काय? ही नवी भूमिका घेतल्यापासून जिन्हांनीं स्वीकारलेलें धोरण संशयास्पद व धरसोडीचें होऊं लागलें आहे, व म्हणून मला त्याबाबत संशय वाटतो. फेडरेशनच्या कल्पनेची रा. टे. परिषदेंत आरति केल्यावर तिला पुढें कट्टा विरोध करणारे जिन्हा आणि आतां पुनः मुस्लिम लीगच्या ध्येयांत फेडरेशनला मान्यता देणारा बदल करून घेणारे जिन्हा या दोन भिन्न जिन्हांच्या धोरणाची मला तर्कशुद्ध संगति लावतां येत नाहीं. कॉंग्रेसच्या जन्माच्या वेळेपासून मुसलमानांस कॉंग्रेसपासून अलिप्त ठेवण्यासाठीं भेदनीतीचा अवलंब करण्याचा सल्ला देणाऱ्या ब्रिटिश मुत्सद्द्यांना Irish feeling of discontent appearing in India in the form of the Indian National Congress will develope into National Leage अशीं दु:स्वप्नें भेवडावीत होतीं. आयर्लंडमध्यें उत्पन्न झालेल्या असंतोषाच्या खाईतून आयर्लंडचें स्वातंत्र्य तावून सुलाखून बाहेर पडलें; पण लाडावलेल्या अल्स्टरचा अपशकुन या स्वातंत्र्याला होत राहून आयर्लंडच्या संपूर्ण एकीकरणाला त्यानें बाध आणला! अल्स्टरचे कैवारी लॉर्ड कार्सन हे लिबरल पक्षांतून फुटून अल्स्टरचा लढा लढण्यास बंडखोरीचें निशाण उभारून उभे राहिले. हिंदुस्थानची संपूर्ण राष्ट्रीय संघटना होण्याच्या मार्गांतही पाकिस्तानच्या कल्पनेनें वेडावलेल्या जात्यंध मुसलमानांनीं धोंड आणून टाकली आहे, व कार्सनप्रमाणेंच जिन्हांसारखा कडवा पुढारी त्यांना

लाभलेला आहे. कार्सन व जिन्हा यांच्यामध्यें बरेंचसें साम्य आहे. कार्सनचें स्वभावचित्र रेखाटतांना मि. गार्डिनर यांनीं त्यांच्याबद्दल काढलेले

"Now whether Sir Edward Carson is a good or a bad hero, I leave for the moment. But that there is the quality of heroism about him is undeniable. Without him the cause of Ulster would be contemptible; with him it is almost formidable. His figure emerges from the battle with a certain sinister distinction and loneliness. He is fighting for a bad cause but he is fighting as men fight who count nothing of the cost."

हे उद्गार जिन्हांनाही तंतोतंत लागू पडत नाहींत काय? पण जिन्हा हे एकाकी नाहींत आणि जिन्हांच्या प्रामाणिकपणावर विश्वास ठेवावयाचा असेल, तर त्यांचा हेतूही उच्च व दलितोद्धाराचा आहे. जिन्हांच्या नव्या भूमिकेचें भावी यशापयश त्यांच्या ह्या अत्यंत वादग्रस्त असलेल्या प्रामाणिकपणावरच अवलंबून आहे. साधनें व मार्ग यांच्यामुळें गैरसमज झाला, तरी हेतु शुद्ध असला तर जिन्हांची ही नवी भूमिकाही अंतिम राष्ट्रहिताला हातभारच लावील.

विविध वृत्त, ता. २९ मे १९३८



## वि. ना. चंदावरकर

: : १०

"........*Be bold, since you are determined to do your best. Be resolute, courageous, self-confident, patient and calm.........*"

१९०८ सालीं केंब्रिज येथें विद्याभ्यासासाठीं असलेल्या एका हिंदी विद्यार्थ्याची दृष्टि आपल्या प्रेमळ पित्याकडून आलेल्या पत्रांतील ओळींवरून झरझर फिरत होती; शब्दन् शब्द अंतःकरणांत भाविकपणें सांठविला जात होता; मायेचे, धीराचे व उपदेशाचे बोल मनाच्या पडद्यावर कायमचा ठसा उठवीत होते; व त्या प्रत्येक ठशागणिक त्या मनाची घडण होत होती. कांहीं क्षण ही दृष्टि मध्येंच स्थिरावली; वरील ओळी त्या ठिकाणीं तिला सांपडल्या; मनाची घट्ट पकड त्या ओळींनीं घेतली; अंतःकरणावर त्या कोरून निघाल्या; आणि आयुष्यांतील प्रत्येक विचार-आचार त्या ओळींनीं निर्माण केलेल्या चाकोरींतून बाहेर पडूं लागले.

मुंबई विद्यापीठाचे व्हाइस चॅन्सलर विठ्ठल नारायण चंदावरकर यांच्या जीवनचरित्रांतील ठळक चित्रें एकामागून एक माझ्या डोळ्यांसमोर उभीं राहिलीं कीं, त्याच वेळीं हें वरीलही चित्र माझ्या नजरेपुढें उभें राहिल्या-

शिवाय राहत नाहीं. कोणताही प्रसंग घेतला तरी त्या प्रसंगींच्या चंदावरकरांच्या वर्तनाचा उगम वरील ओळींतच झालेला दिसून येईल; अगदीं गेल्या वर्षीचाच जनतेच्या स्मरणांत अजूनही ताजा असलेला 'मॅट्रिकच्या कत्तली' बाबत त्यांच्यावर चढविण्यांत आलेल्या हल्ल्याचा प्रसंग घ्या! हा हल्ला त्यांच्या कृतीवर अथवा विचारांवरच नव्हे, तर खुद्द त्यांच्या शरीरावरही चढविण्यापर्यंत त्यांच्या कांहीं टीकाकारांची मजल गेली होती. त्यांच्याविरुद्ध जंगी काहूर माजविण्यांत आलें होतें. नाहीं तसले आरोप त्यांच्या अंगाला चिकटविण्यांत आले होते; त्यांच्याविरुद्ध वातावरण क्षुब्ध करून टाकण्याच्या प्रयत्नांत एकही शस्त्र त्यांच्या टीकाकारांनीं शिल्लक ठेविलें नव्हतें. सौ. हंसा मेहतांनीं त्यांना सुलतानपदावर चढविलें, तर पुरुषवर्गांतील त्यांच्या इतर सहकाऱ्यांनीं त्यांच्याहीपुढें जाऊन स्त्रियांवर कडी करण्याचा आपला पुरुषी हक्क या बाबतींत गाजविला होता. या दारू भरून ठेवलेल्या सुरुंगाला ता. १५ जून रोजीं सेनेटची बैठक सुरू होण्याच्या वेळीं बत्ती लावण्यांत आली; सभागृहाच्या दाराशीं विद्यार्थ्यांच्या नांवावर खपणारे अनेक उपटसुंभ जमा झाले. आंत प्रवेश करण्याच्या धामधुमींत सभागृहाच्या खिडक्यांच्या कांचाही त्यांनीं फोडून टाकल्या; आणि या साऱ्या अवधींत या उपटसुंभांच्या एका 'दादा'नेंच म्हटल्याप्रमाणें, 'निश्चल पुतळ्याप्रमाणें' बसलेल्या चंदावरकरांच्या नांवानें शिमगाही केला!

**पण अखेरशेवटीं हा वार फुसका ठरला! एवढेंच नव्हे, तर 'बूमरँग'-प्रमाणें तो चंदावरकरांच्या प्रतिपक्षीयांवरच उलटला; आणि चंदावरकरांचें उदार अंतःकरण जर याच वेळीं आडवें आलें नसतें, तर 'बूमरँग'नें आपलें कामही त्या वेळीं करून टाकलें असतें!**

### दुसरा प्रसंग

चंदावरकरांच्या याच धैर्याची व निश्चयीपणाची प्रचीति ते मुंबई कॉर्पोरेशनचे १९३२ सालीं मेयर असतांनाही दिसून आली. मेयर होऊन अवघे दोनच महिने झाले नाहींत, तोंच हिंदु-मुसलमानांच्या दंग्यानें मुंबईत अकस्मात् पेट घेतला. चंदावरकरांच्या कसोटीची ही वेळ होती; कॉर्पोरेशनमध्यें उतरून, किंबहुना सार्वजनिक कार्यांत पडून त्यांना पुरतीं सहाही वर्षें लोटलीं

नव्हतीं. इतरांच्या दृष्टीनें ते अजूनही सार्वजनिक आयुष्यांतील धकाधकीच्या मामल्याला नवशिके होते; कांहींनीं तर चंदावरकरांवर त्या वेळीं पडलेली ती कठीण जबाबदारी त्यांच्या हातून कशी काय पार पडते याविषयीं शंकाही व्यक्त करण्यास कमी केलें नव्हतें. पण हातीं घेतलेल्या कार्याशीं समरस होऊन तें यशस्वी करण्यासाठीं आपली पराकाष्ठा करावयाची, धीरगंभीरपणें व निश्चयी वृत्तीनें आलेल्या प्रसंगाला तोंड द्यावयाचें ही जी शिकवण त्यांनीं आत्मसात् केली होती, त्या शिकवणीनें त्यांना या वेळींही हात दिला आणि चंदावरकर या कसोटीला पुरे उतरले. नागरिकांची शांतता–कमिटी स्थापून दंगा शमविण्यासाठीं त्यांनीं केलेल्या जिवापाड मेहनतीला कसें यश आलें हें नव्यानें सांगण्याची गरज नाहीं. पण चंदावरकरांच्या अंगचा निर्भयपणा व्यक्त होण्यास जे अनेक प्रसंग या वेळीं कारण झाले, त्यांतील एका प्रसंगाची आठवण येथें उद्धृत केल्याशिवाय मला राहवत नाहीं. शांतता–कमिटीची बैठक त्या वेळीं भरली होती; **फ्री प्रेस जर्नल**मध्यें, खिलाफत व्हालंटियरां-जवळ रक्तानें माखलेले सुरे सांपडल्याची बातमी प्रसिद्ध झाली होती आणि या बातमीवर वडे भाई शौकतमियां आणि सर पुरुषोत्तमदास यांच्यामध्यें खडाजंगी माजून राहिली होती. वड्या भाईंची स्वारी रागानें इंगळासारखे डोळे करून तावातावानें बोलत होती. अध्यक्षस्थानीं बसलेल्या चंदावरकरां-वरही आग पाखडण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं; पण वड्या भाईंच्या या क्रोधाला चंदावरकरांनीं मुळींच भीक न घालतां ताडकून उठून त्यांना उत्तर दिलें कीं:

> **“ मीं हिंदु मेयर आहें हें सुदैव म्हणा, अगर दुर्दैव म्हणा, पण मी तसा आहें खरा; आणि हिंदु म्हणवून घेण्यांत मला अभिमानच वाटतो. ”**

वड्या भाईंना हें उत्तर अधिकच झोंबलें आणि ते आपल्या एकुलत्या एका अनुचरासह सभेंतून उठून बाहेर पडले ! बाकीच्या मुसलमान सभासदांची चंदावरकरांच्या निःपक्षपातीपणाविषयीं खात्री झालेली होतीच; चंदावरकरां-वरील विश्वास प्रकट करून व त्याप्रमाणें स्वतः ठराव मांडून त्यांच्यातर्फें सर सुलेमान मिठा यांनीं तो व्यक्तही करून दाखविला.

## कॉर्पोरेशनमध्यें

अंगीकृत कार्याला पुरें वाहून घ्यावयाचें, जो विषय हातीं घेतला त्याचा पुरा कीस पाडावयाचा, सखोल अभ्यास करावयाचा, त्यांतील सांगोपांग ज्ञान मिळवावयाचें हा चंदावरकरांचा गुण त्यांच्या कॉर्पोरेशनमधील कामगिरीनें प्रकट केला आहे. कॉर्पोरेशनमध्यें त्यांनीं प्रवेश केला, पण तो मानासाठीं नसून जनहितासाठीं होता आणि हें जनहित साधण्यासाठीं कॉर्पोरेशनच्या कार्याचा जो अभ्यास करणें आवश्यक होतें, तो करण्याचेही त्यांनीं पूर्ण परिश्रम घेतले. कॉर्पोरेशनच्या आर्थिक बाजूचें व त्याचप्रमाणें लॉ व प्रोसीजरच्या बाबतींतील त्यांच्याइतकें सूक्ष्म ज्ञान कॉर्पोरेशनच्या थोड्याच सभासदांना असेल. या त्यांच्या सूक्ष्म ज्ञानामुळेंच इंप्रुव्हमेंट ट्रस्ट कॉर्पोरेशनमध्यें समाविष्ट करून घेण्याचें बिल ज्या वेळीं मुंबई कायदेमंडळांत आलें, त्या वेळीं कॉर्पोरेशनची बाजू पुढें मांडण्यासाठीं त्यांची नेमणूक झाली होती. कॉर्पोरेशनचे दुसरे सभासद मि. हुसेनअल्ली रहिमतुल्ला हेही त्यांच्याबरोबर होते; पण त्या वेळचे मुंबई सरकारचे फिनॅन्स मेंबर सर गुलाम हुसेन हिदायतुल्ला यांच्याशीं दोन हात करण्याची पाळी येई, त्या वेळीं पुढें सरसावत असत ते चंदावरकरच ! या प्रसंगीं दोघांची खूप खडाजंगी उडाली आणि चंदावरकरांच्या ज्ञानाबरोबर त्यांचें वादविवादपटुत्वही जनतेच्या ठळकपणें नजरेला पडलें. कॉर्पोरेशनच्या खर्चांत काटकसर सुचवितांना त्यांनीं केलेल्या सूचनांमध्येंही त्यांची हीच सूक्ष्म दृष्टि प्रत्ययाला आलेली आहे.

## एक आठवण

कॉर्पोरेशनचें कार्य, स्थानिक स्वराज्यसंस्थांची प्रगति, हाच विषय चंदावरकरांच्या तोंडीं नेहमीं घोळत असावयाचा ! १९२९ सालीं पं. जवाहरलाल नेहरू यांना बॉम्बे प्रेसिडेन्सी ॲसोसिएशनच्या कांहीं सभासदांतर्फे लंच देण्यांत आलें होतें. त्या वेळच्या प्रसंगाची मला येथें आठवण होते. त्या वेळीं केंब्रिज येथें असलेल्या जुन्या मित्रांच्या गांठीभेटी होण्याचा योग आला. चंदावरकर हे पंडितजींचे सहाध्यायी त्या वेळीं हजर होतेच, पण त्याखेरीज क्रॉनिकलचे माजी संपादक श्री. एल्. जी. खरे व टाटा कंपनींत

कलकत्ता येथें सध्यां बड्या अधिकाराच्या जागेवर असलेले मि. दोराव ड्रायव्हर हेही त्यांचे इतर दोघे सहाध्यायी त्या वेळीं उपस्थित होते. सर्वांच्या गप्पांना साहजिकच ऊत येत होता, पण पंडितजींचा बहुतेक वेळ मात्र चंदावरकरांनींच खाऊन टाकला! आणि या त्यांच्या गप्पांचा विषय एकच होता आणि तो म्हणजे पंडितजी त्या वेळीं ज्याचे अध्यक्ष होते तो अलाहाबाद डिस्ट्रिक्ट बोर्ड व मुंबई कॉर्पोरेशन यांचा कारभार हा! चंदावरकरांच्या या विषयांवरील गप्पांना खंड पडेना, तेव्हां क्रॉनिकलचे श्री. ब्रेलवी माझ्याकडे वळून हंसत म्हणाले, 'पंडितजींशीं बोलण्याची संधि आम्हांला हा गृहस्थ देणार कीं नाहीं?' एल्. जी. खरे यांनीं तर विनोदानें असेच उद्गार काढले कीं 'काय बुवा हा विठ्ठल, आपल्या बायकोशींही बोलतांना कॉर्पोरेशनच्याच गप्पा मारीत असेल काय?'

## दोन सहाध्यायी

चंदावरकर पं. जवाहरलाल यांचे सहाध्यायी; पण दोघांच्याही आयुष्याला अगदीं परस्पर भिन्न असेंच वळण लागलेलें दिसून येतें. कदाचित् त्यांच्या परस्पर भिन्न परिस्थितीचाही हा परिणाम असूं शकेल. 'तोंडीं चांदीचा चमचा घेऊन' दोघेही जन्माला आले. दोघांनाही आपल्या नामवंत व थोरपदाला चढलेल्या पित्यांच्या प्रेमळ छायेखालीं वाढण्याचें सुख लाभलें. आपले पुत्र उत्कृष्ट नागरिक व्हावे ही दृष्टि दोघांही पित्यांनीं ठेविली होती व त्यांच्या पुत्रांनीं त्यांची ही इच्छा पुरीही करून दाखविली; मात्र ही गोष्ट दोघांनीं वेगवेगळ्या मार्गांनीं तडीला नेली, आणि येथेंच त्यांच्या वेगवेगळ्या परिस्थितीचा अथवा वातावरणाचा प्रश्न उद्भवतो. प. वा. सर नारायणराव चंदावरकर यांनीं आपल्या पुत्राला उच्च शिक्षणासाठीं केंब्रिजला पाठविलें खरें; पण प्रत्येक बारीकसारीक गोष्टींतही आपल्या मुलाचे वागण्याचे नियम कसे असावेत याविषयीं सल्ला देण्याची ते तत्परता बाळगीत. साहजिकच नियमांचें थोडेंबहुत बंधन यामुळें चंदावरकरांच्या भोंवतीं उत्पन्न झाल्यास त्यांत नवल नव्हतें. पित्यानें घालून दिलेले हे नियम चंदावरकरांनींही तितक्याच तत्परतेनें व आज्ञाधारकपणें पाळले; इतके कीं, नाटकास जावयाचें त्यांच्या मनांत आलें, तेव्हांदेखील प्रथम आपल्या पित्याची परवानगी मिळाल्या-

खेरीज ही साधी गोष्ट त्यांनीं केली नाहीं ! पण यामुळें चंदावरकरांना शिस्तीच्या कडक वरवंट्याखालीं विद्यार्थीदशेंत वागावें लागत होतें असें मुळींच नव्हे. आपल्या पुत्राचा मनोविकास व्हावा व तो अशा रीतीनें व्हावा कीं, भावी आयुष्यांत यश मिळण्यास त्याला कसलीही अडचण पडूं नये असाच हेतु सर नारायण यांच्या उपदेशामागें होता. आणि यासाठीं त्यांनीं जरी बंधनें घालून दिलीं होतीं, तरी आवश्यक तें स्वातंत्र्यही नाकारलें नव्हतें. पण या बाबतींत मुख्य लक्षांत घेण्यासारखी गोष्ट म्हणजे स्वतः चंदावरकरांनीं हीं बंधनें पाळण्यांत मुळींच कसूर केली नाहीं ही होय. पित्याच्या उपदेशापलीकडे वागणें त्यांना अशक्य होतें असें नव्हे, तर त्यांनीं स्वतःच तें स्वतःसाठीं अशक्य ठेवण्याची शिस्त स्वतःला लावली होती. यामुळें चंदावरकर विद्यार्थीदशेंत आदर्श विद्यार्थी आदर्श पुत्र झाले; एवढेंच नव्हे, तर आदर्श व्यक्तीचेही गुण त्यांच्यांत उतरले. सारासारविचार करण्याची संवय त्यांना लागली; निग्रही-पणा त्यांच्या अंगीं बाणला; कोणतेंही विधायक कार्य करण्यास लागणारी चिकाटी व दूरदृष्टि त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न झाली. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे त्यांची मनोरचना विधायक कार्यास जशी हवी तशीच बनली आहे. जवाहरलाल व चंदावरकर या दोघांच्या मनोरचनेंतील अतिशय मोठा फरक तो इथेंच आढळून येण्यासारखा आहे. निराळ्या शब्दांत किंवा पंडित-जींच्या आवडत्या शब्दांतच सांगावयाचें तर असेंच म्हणतां येईल कीं पंडित-जींची मनोरचना क्रांतिवाद्याची बनलेली आहे, तर चंदावरकरांची मनो-भूमिका सुधारणावाद्याची आहे.

## प्रागतिकांची परंपरा

आणि याच फरकामुळें पंडितजी विलायतेहून परत आल्यावर थोड्याच अवधींत राजकारणाच्या आखाड्यांत उतरण्यास उद्युक्त झाले, तर चंदावर-करांनीं आपल्या राजकीयच नव्हे, तर सार्वजनिक आयुष्यालाही प्रारंभ कर-तांना बरींच वर्षें वाट पाहिली. किंबहुना त्याचें राजकारणी आयुष्य अजूनही सुरू झालेलें नाहीं असेंच म्हणतां येईल; कारण, स्थानिक स्वराज्याच्या क्षेत्रा-पलीकडे पुढची उडी त्यांनीं अद्याप मारलेली नाहीं. एक गोष्ट मात्र स्पष्ट आहे, ती ही कीं, त्यांचीं राजकारणांतील मतें त्यांच्या विशिष्ट मनोरचनेला

साजेशींच बनलेलीं आहेत. याही बाबतींत त्यांनीं आपल्या पित्याची शिकवण ग्रहण केली आहे. " प्रागतिक म्हणवून घेण्यांत मला फार अभिमान वाटतो; प्रागतिकांची परंपरा दादाभाई नौरोजी, रानडे यांच्यापूर्वीं राजा राममोहन रॉय यांच्यापर्यंत जाऊन पोंचलेली आहे " अशा अर्थाचे उद्गार त्यांनीं मेयर झाल्यानंतर गौरवार्थ भरलेल्या एका सभेंत काढले होते.

### यशस्वी कारखानदार

चंदावरकर आय्. सी. एस्. साठीं विलायतेला गेले आणि बॅरिस्टर होऊन परत आले. परत आल्यावर एल्फिन्स्टन कॉलेजांत त्यांनीं कांही दिवस इतिहासाच्या अध्यापकाचें काम स्वीकारलें व त्यानंतर हायकोर्टांत प्रॅक्टिसही केली. पण या दोन्ही अथवा तीन्ही बाबतींत त्यांना जें यश मिळालें नाहीं अथवा त्यांच्या गुणांचा पडावा तसा प्रकाश या बाबतींत पडला नाहीं, तो कारखानदाराचा पेशा त्यांनीं पत्करल्यानंतर पडला. याचेंही कारण वर उल्लेखिलेल्या त्यांच्या मनोरचनेंत सांपडण्यासारखें आहे. व्यवस्थितपणा, काटकसरी स्वभाव, निश्चयी बाणा, चिकाटी, दूरदृष्टि, कोणत्याही गोष्टींतील मर्म विचारपूर्वक आकलन करून घेण्याची हातोटी, वगैरे त्यांचे विशिष्ट गुण या व्यवसायाला जितके अनुकूल आहेत, तितके ते इतर व्यवसायांना नाहींत; आणि यामुळेंच चंदावरकर बॅरिस्टर किंवा प्रोफेसर म्हणून यशस्वी होण्यापेक्षां कारखानदार म्हणून अधिक यशस्वी झाले. दक्षिणी व्यक्ति यशस्वी कारखानदार म्हणून पुढें आल्याचीं उदाहरणें फारच थोडीं आणि त्यांतही मिलओनर्स ॲसोसिएशन-सारख्या गुजराती, मारवाडी व पारशी गिरणीवाल्यांनीं भरलेल्या संस्थेच्या अध्यक्षांची जागा एखाद्या दक्षिणी व्यक्तीला मिळाल्याचें उदाहरण जवळ जवळ नाहींच. पण हीच गोष्ट चंदावरकरांच्या बाबतींत शक्य झाली. चंदावरकरांमुळें दक्षिणी कारखानदारांचा प्रतिनिधि मिलओनर्स ॲसोसिएशन-सारख्या संस्थेंत बसूं शकला आहे.

### सुदैवी योजना

आणि व्हाइस चॅन्सेलरची त्यांची कारकीर्द इतकी यशस्वी झाली, त्याचेंही श्रेय त्यांच्या याच गुणांना दिलें पाहिजे. चंदावरकर १९३३ सालीं व्हाइस चॅन्सेलर झाले, त्या वेळीं बहुतेकांना विस्मयाचा धक्काच बसला! त्यांच्या

चाहत्यांना हा विस्मयाचा धक्का संतोषदायक वाटला, पण त्यांच्या टीकाकारांच्या जिभा वळवळूं लागल्या! व्हाइस चॅन्सेलरच्या पदावर आरूढ झालेल्या त्यांच्यापूर्वींच्या व्यक्ति एक तर शिक्षणक्षेत्रांत लौकिक दृष्ट्या बराच अनुभव संपादन केलेल्या व विद्वत्तेचीं अनेक बिरुदें अंगावर चढलेल्या होत्या किंवा इतर क्षेत्रांत बरीच मोठी कीर्ति मिळविलेल्या होत्या. पण चंदावरकर विद्यापीठाचे कुलगुरु झाले, त्या वेळीं मुंबई कॉर्पोरेशनमधील त्यांची मेयरची त्याच वेळीं नुक्तीच संपलेली यशस्वी कारकीर्द याखेरीज त्यांजवळ म्हणण्यासारखें विशेष कांहीं नव्हतें. पण जें होतें, तें मात्र अगदीं उत्कृष्ट प्रकारचें होतें व मुंबई विद्यापीठामधील त्या स्थानाला ज्या गोष्टींची त्या वेळीं तीव्र आवश्यकता भासत होती, त्याच गोष्टी चंदावरकरांनीं तोंपर्यंत मिळविलेल्या लौकिकांत सांपडण्यासारख्या होत्या. त्यावेळचे गव्हर्नर व विश्वविद्यालयाचे चॅन्सेलर सर फ्रेडरिक साइक्स यांच्या लक्षांत ही गोष्ट अचूक आली आणि त्यांनीं इतरत्र नजर न फेंकतां चंदावरकरांना आग्रह करून त्या स्थानावर त्यांची योजना केली. ही योजना किती सुदैवी होती, किती अचूक होती, हें चंदावरकरांच्या गेल्या चार वर्षांतील कारकीर्दीकडे पाहणारांना सहज दिसून येणार आहे. या चार वर्षांत झपाट्यानें प्रगति करीत असलेली मुंबई-विद्यापीठाची टेक्नॉलॉजी इन्स्टिटयूट म्हणजे चंदावरकरांच्या कर्तृत्वाची मूर्तिमंत साक्षच आहे. ॲकॅडमिक शिक्षणाबरोबरच धंदेशिक्षण देणेंही या कालांत अत्यंत जरूरीचें झालें असून विद्यापीठाच्या कार्यांपैकीं तें एक महत्त्वाचें कार्य असलें पाहिजे ह्या गोष्टीची जाणीव चंदावरकरांनीं अधिक करून दिली; आणि इतकेंच करून ते थांबले नाहींत; तर या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्याचे प्रयत्न त्यांनीं केले व अजूनही ते करीत आहेत. पण या नवीन प्रयत्नांना हात घालतांना विद्यापीठाची आर्थिक बाजू चोख कशी राखतां येईल याकडे मात्र त्यांनीं मुळींच दुर्लक्ष केलें नाहीं. हा आर्थिक पाया दृढ करून मगच त्यावर पुढील प्रयत्नांची इमारत उभारावयाची ही त्यांची धंदेवाईक दृष्टि या ठिकाणींही दिसून आली व उपयोगीं पडली. चंदावरकरांच्या पात्रतेचें प्रत्यंतर अशा प्रकारें मिळाल्यामुळें, त्यांच्या दुसऱ्या वेळेच्या नेमणुकीसमयीं त्यांच्या टीकाकारांनीं कुरकूर केली, पण पहिल्या वेळेइतकें

तोंड सोडावयाला मात्र त्यांना जागाच राहिली नाहीं. आणि आतां तर हीं तोंडें तोंडांत बसल्याप्रमाणें चूप झालीं आहेत !

योगायोग

एका मोठ्या थोर व्यक्तीच्या पोटीं जन्मास येण्याचें भाग्य चंदावरकरांना लाधलें; असें भाग्य ज्यांना लाधतें, त्यांना त्याचा फायदाही होतो; पण कित्येक वेळां एक प्रकारें त्यांची कुचंबणाही होते; पित्याच्या कर्तृत्वाच्या मापानें पुत्राच्या कर्तृत्वाचें मोजमाप घेण्याकडे अशा बाबतींत जनतेची प्रवृत्ति होते. शिवाय हें मोजमाप करतांना पित्याच्या पुण्याईनें पुत्राला कितपत हात दिला आहे, हेंही हुडकण्यांत येत असतें. या नियमाला चंदावरकरही अपवाद नाहींत. स्वतःच्या बाबतींतील हें पितृऋण चंदावरकर संधि मिळतांच प्रांजल-पणें कबूल करतात, ही गोष्ट त्यांचें सच्छील दर्शविते. परंतु एवढें मात्र खरें कीं, पित्याच्या पुण्याईपेक्षां स्वतःच्याच कर्तृवाच्या जोरावर चंदावरकर अधिक पुढें आले. पित्याच्या निधनानंतर दोन वर्षांनीं त्यांनीं सार्वजनिक जीवनास आरंभ केला ही एक गोष्ट ह्या विधानाची सत्यता पटविण्यास पुरेशी आहे. चंदावरकरांनीं ही सुरुवात बऱ्याच उशिरां केली. पण अल्पावधींतच त्यांनीं यशाचा बराच पल्ला गांठला. येथें आणखीही एक गोष्ट चटकन् लक्षांत येण्यासारखी आहे. प. वा. सर नारायण यांच्यामागून त्यांच्या पुत्रानें जसें त्यांचें स्थान अल्पावधींत पटकावलें व कायम राखलें, तसें सर नारायण यांच्या पिढींत होऊन गेलेल्या महाराष्ट्रांतील इतर अग्रणींच्या पुत्रांनीं राख-लेलें नाहीं. सर फेरोजशहा मेहता यांच्या मुलांनीं हें कर्तृत्व दाखविलें नाहीं; न्या. मू. रानड्यांच्या दत्तक पुत्रालाही ही गोष्ट साध्य झाली नाहीं; कै. शंकर पांडुरंग पंडितांच्या मुलांना हें जमलें नाहीं; तेलंग, टिळक यांच्याही बाबतींत तीच दशा झाली; फक्त चंदावरकरच या गोष्टीला अपवाद ठरले. मात्र या बाबतींत चंदावरकरांना महाराष्ट्रांत तोड मिळालेली नसली, तरी बंगालमध्यें ती मिळालेली आहे. ही तोड सर नारायण यांना समकालीन असलेले व त्यांच्याप्रमाणेंच विद्यापीठाचें कुलगुरुपद भूषविलेले बंगाल्यांतील एक थोर प्रागतिकाग्रणी प. वा. सर अशुतोष मुकर्जी यांचे चिरंजीव श्री. श्यामाप्रसाद मुकर्जी यांनीं पुरविली आहे. चंदावरकरांप्रमाणेंच आपल्या पित्याच्या मागून

त्यांच्या स्थानावर येण्याचा मान त्यांनींही मिळविला. येत्या मंगळवारीं मुंबई-विद्यापीठाच्या पदवीदानसमारंभप्रसंगीं ह्या दोन्ही व्यक्ति यजमान व पाहुणे या नात्यांनीं एकत्र उभ्या राहणार आहेत हा एक मजेदार योगायोगच नव्हे काय ?

शिस्तीची धार

चंदावरकर इतक्या झपाट्यानें पुढें आले कीं त्या तेवढ्याच कारणामुळें त्यांनीं आपल्याभोंवतीं अनेक शत्रु निर्माण करून ठेवले. चंदावरकरांचें हें हेवा वाटण्याजोगें यश कांहींकांना साहवलें नाहीं; वैषम्याची भावना त्यांच्या अंतःकरणांत मूळ धरून राहिली आणि चंदावरकरांविषयींच्या गैरसमजांचें गरळ तेथून बाहेर पडूं लागलें. चंदावरकरांविषयीं अनेक तऱ्हेचे गैरसमज या लोकांनीं पसरवून दिले आहेत; वस्तुस्थिति विकृत स्वरूपांत मांडण्यांत आली आहे. पण इतकेंही असून चंदावरकरांची स्वतःची त्यांच्याशीं असलेली सरळ वागणूक मात्र बदललेली नाहीं; आणि यामुळें वरकरणी चांगल्या दिसणाऱ्या लोकांकडून आपली फसवणूक करून घेण्याचेही कैक प्रसंग त्यांना अनुभवावे लागले आहेत. आपल्या वागणुकींत एवढेंदेखील न्यून सांपडूं नये ह्या आपल्या इच्छेनें त्यांनीं स्वतःला तर अत्यंत कडक शिस्तींत ठेविलेंच आहे; पण इतरांनाही याच शिस्तीच्या धारेवर धरून त्यांचा कटुपणाही त्यांनीं आपल्या अंगावर ओढवून घेतला आहे. आणि त्यांचा जितका जवळचा आप्त अथवा स्नेही असेल, तितकी त्यांच्या ह्या शिस्तीची धार अधिक तीव्र होत असते.

याप्रमाणें हा शिस्तीचा गुण-अथवा केव्हां केव्हां अतिरेक होऊन झालेला अवगुण म्हणा !-सोडून दिल्यास, चंदावरकरांच्या स्वभावाची घडण त्यांच्या इतर मनोरचनेला पोषक अशीच झाली आहे. त्यांच्या स्वभावाविषयीं लिहितांना त्यांच्या परमपूज्य वडिलांनीं असे उद्गार काढले होते कीं:

**"तुझी नेहमींची सभ्यवृत्ति, मूळचाच विनय व नम्रता, या गुणांमुळें तूं जिकडे जाशील तिकडे प्रिय झाल्यावांचून राहणार नाहींस."**

आपल्या मुलाच्या स्वभावाची इतकी अचूक पारख कोणत्याही पित्यानें कधीं केली नसेल. चंदावरकरांच्या या स्वभावाची पारख कै. ना. गोखल्यांनींही अशीच केली होती; "Gokhale was much impressed by your intelligence, good sense, and propriety of behaviour"

असें गोखल्यांचें चंदावरकरांविषयीं झालेलें मत सर नारायण यांनीं आपल्या एका पत्रांत लिहून ठेवलें आहे. चंदावरकरांचा हा विद्यार्थीदशेंतील स्वभाव आजमितीलाही तसाच कायम आहे. हास्यमुखानें, खेळीमेळीनें वागण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळें आपल्याशीं तीव्र मतभेद असलेल्या पक्षांतही त्यांनीं पुष्कळ मित्र जोडून ठेवले आहेत. अर्थात् अजातशत्रूच्या वर्गांत त्यांना घालतां येणार नाहीं हें खरें; पण त्यांना जे शत्रु उत्पन्न झाले आहेत, ते त्यांच्या स्वतःच्या दोषांपेक्षां त्यांच्याविषयीं व्यर्थ गैरसमज करून घेणाऱ्या त्यांच्या शत्रूंच्या विकृत दृष्टीमुळेंच झाले आहेत, हेंही तितकेंच खरें होय.

विठ्ठल नारायण चंदावरकर ज्या स्थानावर आज उभे आहेत, तें स्थान म्हणजे त्यांच्या यशोमंदिराचा एक टप्पा आहे; आपल्या यशोमंदिराचें शिखर त्यांनीं अद्यापिही गांठलेलें नाहीं. त्यांच्या अंगच्या अनेक गुणांकडे पाहिल्यास त्यांचें खरें स्थान अजूनही पुढचें आहे असेंच मला म्हणावेंसें वाटतें. मात्र सध्यांच्या राजवटींत स्वतंत्र बाण्याच्या अनेक बुद्धिमान् व्यक्तींची जेथें कुचंबणा चालली आहे, तेथें चंदावरकरांच्याही मार्गांत अडथळे उत्पन्न झाल्यावांचून राहणार नाहींत, अशी ग्वाही देणें कठीण आहे. त्यांचें कार्यक्षेत्रही निराळ्या तऱ्हेचें आहे, आणि त्यांचे संघटनाचातुर्यादि गुणही ह्या इतर व्यक्तींपेक्षां श्रेष्ठ प्रतीचे आहेत. यामुळें इतर व्यक्ति मागें पडल्या, तरी चंदावरकर आपला मागें ओढलेला पाय पुढें खेंचून भविष्यकाळांत स्वतेजानें चमकून राहतील यांत मला मुळींच संदेह वाटत नाहीं.

विविध वृत्त, ता. १५ ऑगस्ट १९३७

# श्री. जमनादास मेहेता



**श्री. जमनादास मेहता** यांचा वाढदिवस गेल्या आठवड्यांत होता. ता. ३ ऑगस्ट रोजीं जमनादास मेहता यांना ५३ वर्षें पूर्ण होऊन ५४ वें वर्ष लागलें. वयाचीं पंचावन्न वर्षें ही सरकारी नोकरींत सेवेची कमाल वयोमर्यादा समजण्यांत येते. जमनादास मेहता यांचा उभ्या आयुष्यांत सरकारी नोकरीशीं प्रत्यक्ष संबंध आला नाहीं; पण या वर्षी ते स्वतःच "मुंबई सरकार" झाले होते. औट महिन्यांची कारकीर्द मोठ्या तडफेनें गाजवून त्यांनीं आपली फडनिशी संपविली. आतां बऱ्याच जणांना असा प्रश्न पडला आहे कीं, "जमनादास मेहता यांचें पुढें काय? ते पेन्शनींत निघाले असेंच समजावयाचें कीं कसें? जमनादासांना आतां उजळ माथ्यानें वावरण्याची आशा नाहीं. ते पक्के कॅांग्रेस-द्रोही ठरले आहेत. आतां कॅांग्रेसचेंच राज्य झालें. जमनादास यांचें आतां कसें होणार?"

—आणि या संशयात्म्यांच्या कुतर्कांना पुष्टि येण्याजोगी धमकी खुद्द जमनादास यांनींच कांहीं दिवसांपूर्वी दिली. ब्राह्मण सभेंत पंधरा दिवसांपूर्वीं टिळकसप्ताह साजरा करण्यांत आला. त्या वेळीं जमनादास म्हणाले:—



" I would not be slave to the will of others and would rather retire from public life, holding independent opinions and go into political wilderness—would take to the study of Literature and the Music."

पण राजकारणसंन्यास घेण्याची धमकी देतांना बॅ. जमनादासांनीं, हा गांभीर्याचा घुटका प्रमाणापेक्षां अधिक कडवट होत आहे असें पाहून आपण साहित्यसेवक व कवि होणार, असा इषारा देऊन विनोदाचें सायूरपच घातलें अशी माझी कल्पना आहे. आतां 'या' वयांत पन्नाशी उलटल्यावर जमनादास साहित्यसेवक व कवि होतील ह्यावर जेवढा विश्वास ठेवावयाचा तेवढाच ते राजकारणसंन्यास घेतील, यावरही ठेवला पाहिजे. 'राजकारण-संन्यास' या शब्दाचा हिंदी राजकारणांत जो अर्थ होतो, त्या अर्थानें जमनादास जर राजकारणसंन्यास घेणार असतील, तर त्यांचा प्रपंच आहे त्यापेक्षांदेखील किती तरी पटींनीं तो वाढण्याची भीति वाटते ! 'मी संन्यास घेईन' असें सांगतांना ह्याच अर्थानें जमनादास यांनीं कदाचित् आपल्या नेहमींच्या खोडकर मिस्किलपणानें आपले डोळे मिचकावलेही असतील ! " राजकारण कीं कविता ? " असा पेंचप्रसंग जमनादासांवर जर खरोखरच आला, तर देशबंधु दास, महमद इकबाल, सरोजिनी नायडू यांच्या फोटोंकडे पूर्वीपेक्षांही अधिक भीतीनें पाहत, तोंडांत एक लठ्ठ चिरूट शिलगावून एखाद्या व्याख्यानाची आठवण झाल्यासारखें दाखवून ते पळ काढतील. एखाद्या व्यंग्यचित्रकारानें ह्या कल्पनाचित्राचा जरूर फायदा घ्यावा. जमनादास यांच्या राजकारणसंन्यासाकडे ज्यांचे आतुरतेनें डोळे लागले असतील, त्यांना मी एवढेंच सांगूं शकतों कीं, जमनादास कविताही करणार नाहींत, आणि राजकारणसंन्यासही एवढ्यांत घेत नाहींत. जमनादासांना जडलेलें राजकारणाचें व्यसन आतां दुसरी अवस्था संपवून तिसऱ्या अवस्थेंत गेलें आहे. आतां राजकारणाला जमनादास आणि जमनादासांना राजकारण–कोणीच एकमेकांना सोडणें शक्य नाहीं. त्यांच्या राजकारणाचें अधिष्ठान भावनाशीलता हें नसून बुद्धिनिष्ठा हेंच आहे.

आणि म्हणूनच टिळकसप्ताहांत त्यांनीं केलेल्या भाषणांत इतरांच्या मतांचा आपण गुलाम होणार नाहीं, तत्त्वच्युत होणार नाहीं असें ठासून बजावलें आहे.

बॅ. जमनादास मेहता यांनीं तत्त्वनिष्ठेसाठीं आपल्या राजकीय जीवनाच्या प्रवाहाला अनेक वळणें लावलीं. त्यांच्या राजकीय जीवनप्रवाहाचा उगम सह्याद्रीच्या खडकाळ डोंगरांत झाला. हा प्रवाह असहकारितेच्या प्रचंड लाटेंत सांपडला. तेथून उसळी घेऊन तो स्वराज्यपक्षाच्या संगमांत हितगुज करण्यासाठीं गेला. आणि पुन: वळण घेऊन परत अरबी समुद्राकडे आला. पण वर जातांना अथवा परत येतांना वाटेंत साबरमतीच्या प्रवाहांत मिसळून या प्रवाहाशीं एकजीव होण्याचें त्यानें दक्षतापूर्वक टाळलें. जमनादास मेहता यांच्या अशा या अनैसर्गिक व चमत्कृतिपूर्ण वळणावळणांमुळें ते साबरमती-तीरस्थ पंड्यांच्या रोपाला पात्र झाले; पण या रोषाची पर्वा त्यांनीं कधींच केली नाहीं. राजकारणाला प्रारंभ करण्यापूर्वींच त्यांच्यावर एकदां आपल्या स्वतंत्र मतासाठीं आर्थिक नुकसान सोसण्याची पाळी आली होती. राष्ट्रीय सभेचे एक संस्थापक प. वा. सर दिनशा एदलजी वाच्छा यांच्या निधनाबद्दल दु:खप्रदर्शन करण्यासाठीं टाउनहॉलमध्यें शेरिफनें बोलावलेली मुंबईच्या नागरिकांची सभा गेल्या वर्षीं भरली होती. या सभेंत भाषण करतांना त्यांनीं ही आठवण सांगितली. सर फेरोजशहा मेहता यांच्याविरुद्ध मुंबईच्या कॉर्पोरे-शनमधील कांहीं सभासदांनीं कट करून त्यांना निवडणुकींत हाणून पाड-ण्याचें कारस्थान केलें होतें. हें कारस्थान ‘ कॉकस ’ या नांवानें प्रसिद्ध आहे. सर दिनशा हे सर फेरोजशहांचे उजवे हात. कटवाल्यांचा डोळा सर फेरोज-शहा यांच्याबरोबर सर दिनशा यांच्यावरही होताच. फेरोजशहा–दिनशा यांना निवडणुकींत हाणून पाडूं पाहणाऱ्या कटवाल्यांपैकीं एका प्रमुख कटवाल्याच्या घरीं जमनादास मेहता हे शिकवणुकीचे मास्तर होते. “ जमनादास, तुम्ही कोणाला मत देणार ?” असा मालकानें मास्तरला प्रश्न केला. आपण दिनशा वाच्छा यांना मत देणार असें मास्तरांनीं सांगितलें. त्याबरोबर हे मालक संतप्त झाले. ते उसळून म्हणाले, “ जमनादास, याद राखा ! दिनशा वाच्छा यांना तुम्हीं मत दिलेंत, तर तुम्हांला तुमच्या नोकरीला मुकावें लागेल. ” हा इतिहास सांगून त्याची फलश्रुति सांगतांना जमनादास म्हणाले, “ आणि अशा रीतीनें माझी शिकवणी गेली ! ”

मतासाठीं व तत्त्वासाठीं लोखंडाचे चणे खाण्याची तरुणपणापासूनच संवय झालेल्या जमनादासांच्या मतांना या खुराकामुळें पुढें तिखट धार चढली

व आपला घोडा व आपलें हत्यार घेऊन सैन्यांत नोकरी करणाऱ्या मराठा शिलेदाराप्रमाणें एकांडे शिलेदार होऊन जमनादास वेगवेगळ्या गोटांत आपल्या स्वतंत्र मतांसह वावरतांना दिसले तर यांत आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. जमनादासांना दिलेली ही शिलेदाराची उपमा इतर बारगिरांहून त्यांचें स्थान व दर्जा कसा वेगळा आहे हें दाखविण्यासाठीं उपयोगीं पडेल आणि मला वाटतें हीच उपमा त्यांना एरवींही सार्थत्वानें लागू पडते; कारण जमनादासांच्या कर्मभूमीशींही शिलेदार-बारगिरांचाच संबंध निकटपणें आलेला आहे. शिलेदार बारगीर ह्या अस्सल मराठी संस्था आहेत.

पाटील–कुळकर्णी

जमनादास हे जातीनें गुजराती; पण गुजरातशीं आडनांवापेक्षां त्यांचा अधिक संबंध नाहीं आणि नातेंही नाहीं. जमनादासांच्या प्रतिस्पर्ध्यांमध्यें त्यांच्या जातभाईंचाच भरणा जास्त आहे. जमनादासांकडे ते संशयानें पाहतात; पण महाराष्ट्रीय दक्षिणी समाज हा जमनादासांचा चाहता समाज आहे आणि या समाजांत एक कौटुंबीय म्हणून जमनादासांना मानण्यांत येतें. महाराष्ट्रानें ज्या दोन गुजरात्यांना पचवून पूर्ण आत्मसात् केलें, त्या गुजरात्यांपैकीं जमनादास हे दुसरे गुजराती; पहिले गुजराती विठ्ठलभाई पटेल. टिळकांच्या राजकारणांत त्यांनीं पाटिलकी केली, आणि टिळकही "आमचा पाटील काय म्हणतो?" अशी कोणत्याही राजकीय प्रश्नाबाबत प्रेमानें त्यांच्याजवळ पृच्छा करीत. या पाटलाबरोबर कुळकर्णीही पाहिजे आणि हा कुळकर्णी म्हणजे जमनादास मेहता हे होत. ही पाटील-कुळकर्ण्यांची जोडी टिळकांच्या राजकारणांत, त्यांच्या स्वराज्याच्या, होमरूल लीगच्या चळवळींत महाराष्ट्रांत मानानें मिरवली. जमनादास यांचा अर्थव्यवहाराच्या राजकारणाशीं आलेला संबंध टिळकांच्या राजकारणांतील विधायक अंगानें दिलेली प्रेरणा होय असें म्हणतां येईल. मात्र अर्थव्यवहारांत पारंगतता मिळविण्याचा उपदेश त्यांना विठ्ठलभाई पटेल यांनीं केला. इतिहास व अर्थशास्त्र हे विषय घेऊन जमनादास पदवीधर झाले. ह्याच विषयांचा अभ्यास पुढें चालू ठेवण्याचा आग्रह त्यांना विठ्ठलभाईंनीं केला. त्या उपदेशाप्रमाणें टाटा कंपनीचे सुप्रसिद्ध आर्थिक तज्ज्ञ मि. बेजनजी मादन यांच्याजवळ जमना-

दासांनीं अर्थव्यवहारशास्त्राचे धडे घेतले आणि या ज्ञानामुळेंच जमनादासांना त्यांचीं कवचकुंडलें प्राप्त झालीं.

चरित्र व राजकारण

जमनादास मेहता यांचा जन्म ३ ऑगस्ट १८८४ रोजीं झाला. त्यांचें शिक्षण जामनगर, जुनागड व मुंबई येथें झालें आणि बॅरिस्टरीसाठीं त्यांनीं लंडनही गांठलें. त्यांच्या सार्वजनिक कार्याचा प्रारंभ १९२२ सालीं मुंबई-कार्पोरेशनमधून झाला. बॅरिस्टर होऊन आल्यानंतर जमनादासांनीं पहिलीं सात-आठ वर्षें वकिली व्यवसाय केला; पण ह्या व्यवसायांत त्यांना यावें तसें यश आलें नाहीं. वकिली सोडून ते राजकारणाकडे व व्यापाराकडे वळले. टिळकांच्या होमरूल लीगचे ते कट्टे पुरस्कर्ते होते. या चळवळीनें जमनादासांना पुढें आणलें; पण त्याचबरोबर त्यांच्या स्वभावांतील झुंजार वृत्तीलाही सैल सोडलें. या चळवळीमुळें राजकारणाच्या आखाड्यांत ते उतरले खरे, पण तेथें मित्रांपेक्षां त्यांनीं शत्रूच अधिक संपादन करून घेतले. या चळवळींत त्यांच्याशीं संबंध येऊन निष्प्रभ ठरलेले कांहीं पुढारी आज कॉंग्रेसच्या प्रभावळींत मिरवीत आहेत. या पुढाऱ्यांचीं मतें व मतांतरें यांच्यावर आज जमनादासांनीं प्रकाश पाडला, तर बऱ्याच जणांच्या नाकाला मिरच्या झोंबतील. गांधींच्या असहकारितेच्या चळवळींत जमनादासांनीं असहकारिता पुकारली. त्यानंतर फेर-नाफेर वाद सुरू झाला. जमनादासांची चळवळी वृत्ति व अंगांतील वावदूकपणाचा व अडवणुकीचा जोम, असहकारितेमुळें उत्पन्न झालेल्या निष्क्रियावस्थेंत त्यांना चैन पडूं देईनात. फेर पक्षाचे ते कट्टे पुरस्कर्ते झाले. मोतीलाल नेहरू, दास यांच्या प्रयत्नानें जन्माला आलेल्या स्वराज्य पक्षांत ते सामील झाले आणि १९२३ मध्यें पहिल्यानेंच ॲसेंब्लींत शिरले. स्वराज्य पक्षाचे एक दमदार नेते पुढारी म्हणून मोतीलाल नेहरूंच्या उजव्या बाजूला राहून त्यांनीं १९२३ पासून १९२९ पर्यंत ६ वर्षं ॲसेंब्ली गाजविली, वादविवादांच्या वावटळी निर्माण केल्या, 'वॉक आउट'चीं नाटकें रंगविलीं, प्रतिसहकारपक्षावर फैर धरली आणि बॅप्टिस्टाकाकांचे जळफळाट घेतले. जमनादास मेहता हे जर आपल्या पूर्ण स्वरूपांत केव्हां अवतीर्ण झाले असतील तर ते याच कालांत. नृत्यकलेचें आद्य दैवत

श्रीशंकर हें मानण्यांत येतें. त्याचें जनानी व नाजुक असें लास्य नृत्य चित्त-वेधक वाटतें; पण हातांत डमरू घेऊन भीषण चीत्कार करीत शंकरानें तांडव नाचण्यास प्रारंभ केल्यावर प्रलयकालाचा भास होऊं लागतो! जमनादास ह्यांनीं असेंच तांडव त्या काळांत आरंभिलें होतें; किंबहुना जमनादास म्हणजे स्वराज्य पक्षाचा कालभैरव असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. आणि या काम-गिरीमुळेंच त्यांची छाप हिंदी राजकारणावर कायमची पडली आहे. बॅ. जयकर यांनीं प्रतिसहकार पक्ष स्थापन केल्यावर या पक्षावर जमनादासांनीं हल्ले चढविले, व बॅ. जयकरांवर बोंचक व छद्मी असे विनाकारण आघात करून त्यांनीं बॅ. जयकर यांचा भ्रुकुटिभंग केला. त्याचप्रमाणें तेरसीशेटजींचे कठोर व निकराचे हल्लेही निधडेपणानें छातीवर पेलले. जमनादास यांचे आजचे मित्र तेरसीशेट यांनीं जयकरांच्या वतीनें जमनादास यांच्यावर सुदर्शन धरलें नसतें तर त्यांचा चौखूर सुटलेला वारु आणखीही किती उधळला असता याचा नेम सांगतां येत नाहीं. या काळांत जमनादास मोकाट सुटले होते. शत्रूंच्या गोटांची अडवणूक करीत मातबर स्वजनांशीं झगडत राहून त्यांनीं आपली तिखट जीभ स्वैर सोडली होती. आदर व भीति या संमिश्र भावनेनें त्यांचे शत्रु-मित्र त्यांच्याकडे पाहूं लागले. सर बेसिल ब्लॅकेट यांनीं भर ॲसेंब्लींत " उद्यांच्या स्वतंत्र हिंदी सरकारचे फडणीस " हा किताब त्यांच्या गुणांवर भाळून त्यांना बहाल केला. कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटींतील ते मानकरी झाले, मोतीलाल नेहरू यांच्या दरबारीं जमनादास करील ती पूर्व असें वजन त्यांना प्राप्त झालें आणि वैयक्तिक महत्त्वाकांक्षेच्या, दिमाखाच्या, वैभवाच्या शिखरावर नसले, तरी उच्च पदावर अशा प्रकारें जमनादास बसले असतां कायदेभंगाची छाया सर्व देशावर आणि त्यांच्यावर पडली व ॲसेंब्लींतून जमनादास बाहेर पडले. मुंबई प्रांतिक कॉंग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदावर १९२९ मध्यें त्यांची स्थापना झाली; पण कॉंग्रेसच्या राजकारणानें चुकलेल्या इतिहासाची पुनरावृत्ति केल्यामुळें कॉंग्रेसशीं त्यांचें त्या वेळीं जें बिनसलें, तें पुन: कांहीं जमलें नाहीं. ॲसेंब्लींतील कॉंग्रेस--सभासदांनीं आपल्या सभासद-त्वाचे राजिनामे द्यावे असा ठराव लाहोर-कॉंग्रेसनें केल्यामुळें जमनादास यांनीं ॲसेंब्लींतील सभासदत्वाचा राजिनामा दिला खरा, पण आपणच रिकाम्या केलेल्या जागीं स्वतंत्र सभासद म्हणून १९३० सालीं जानेवारी

महिन्यांत पोटनिवडणुकींत ते पुन: उभे राहिले. पण या निवडणुकींत सर कावसजी जहांगिर यांनीं त्यांचा पराभव केला. १९३० मध्यें त्यांनीं मुंबई प्रांतिक काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षत्वाचा राजिनामा दिला. तथापि १९३० सालीं ठाणें जिल्ह्यांत अर्नाळा येथें त्यांनीं मिठाचा कायदेभंगही केला व ६ महिन्यांचा तुरुंगवास भोगला. १९३१ पासून ऑ. इं. काँग्रेस कमिटीशींही त्यांचा संबंध तुटला आणि १९३४ मध्यें सर कावसजी जहांगिर व डॉ. देशमुख हे असेंब्लींत निवडून आल्यामुळें असेंब्लीचा त्यांचा मार्गही खुंटला. अशा रीतीनें काँग्रेसशीं त्यांचे सर्व बंध तुटत गेले. फक्त काँग्रेसशीं ४ आणे सभासदत्वापुरताच त्यांचा संबंध आतां राहिलेला आहे.

## खिंडींत सांपडले

बॅ. जमनादास मेहता ह्यांची स्थिति ह्या वेळेपासून खिंडींत सांपडलेल्या योद्ध्यासारखी झाली. युद्धकंडूमुळें स्फुरण पावणारे बाहू लुटूपुटूच्या लढाईच्या खेळांत भाग घेण्यास तयार होईनात; दुखणाईत सिंहाच्या भेटीला येऊन त्याचा उपहासानें समाचार घेणाऱ्या श्वापदांप्रमाणें जमनादासांनीं दुखवलेले, ओरबडलेले जीवजिवाणू त्यांच्यावर उलटले. कायदेभंगाच्या लाटेनें त्यांना किनाऱ्यावर आणून टाकलें; चळवळीच्या तुफानांत त्यांच्या युक्तिवादाकडे व बुद्धिवादाकडे लक्ष देण्यास कोणालाच सवड मिळाली नाहीं. या तुफानांत लोकशाही पक्षाचें जहाज घट्ट नांगरून हेलकावे खात पडलें होतें. जमनादास त्या जहाजावर चढले आणि तेथेंच वरवा करून राहिले. जमनादास वर्किंग कमिटींत असल्यापासून कामगार चळवळीशीं त्यांचा संबंध आला होता. तो त्यांनीं या काळांत अधिक बळकट केला व कामगार चळवळींत अधिक लक्ष घालून ते कामगारांचे व मजुरांचे एक प्रमुख पुढारी बनले. जी. आय्. पी. रेल्वे अकाउंट्स स्टाफ युनियन, ऑल इंडिया रेल्वेमेन्स फेडरेशन, ट्राम्वेमेन्स युनियन, पोर्ट ट्रस्ट एम्प्लॉइज युनियन, ऑल इंडिया सॅलरीड एम्प्लॉइज फेडरेशन इत्यादि संस्थांच्या अध्यक्षपदाचा व्याप त्यांच्याभोंवतीं पडला. जिनेव्हा येथें १९३४-३५ मध्यें भरलेल्या आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेला कामगारांचे प्रतिनिधि म्हणून ते गेले. मुंबई-कॉर्पोरेशनमधील कामानेंही त्यांच्या अस्वस्थ चित्ताला कार्यमग्न केलें.

पुनः उसळी

—आणि एका सुप्रभातीं जमनादास मेहता नव्या घटनेनें निर्माण केलेल्या मुंबईच्या नव्या अॅसेंब्लींत रेल्वे-मजुरांचे पुढारी म्हणून बिनविरोध निवडून आले व पुनः त्यांनीं दंड थोपटले. हा इतिहास अगदीं ताजा आहे. अधिकारग्रहण करून लोकहितासाठीं घटना राबविण्याचा ठराव जमनादासांच्या लोकशाही पक्षानें केल्यानंतर जमनादास अगदीं निःसंकोचपणें मंत्रिमंडळांत शिरले. सरकारजमा कॉंग्रेसद्रोही अशा व्यक्तीही कॉंग्रेसचें बळ लक्षांत आणून तिला मिळाल्यामुळें पुनर्जन्माचें सुख अनुभवीत असतां, तुम्ही एका काळचे कट्टर कॉंग्रेसभक्त प्रतिगामी, संधिसाधु मंत्रिमंडळाला मिळून स्वतःच्याच हातानें आपल्या राजकीय आयुष्याची गर्ता अविचारानें कां खणीत आहां, असे प्रश्न जमनादासांना त्यांच्या चाहत्यांनीं व स्नेह्यांनीं विचारले; पण भावी कालाची भीति बाळगून आपलीं तत्त्वें विसरण्याचा भेकडपणा त्यांनीं दाखविला नाहीं. भावी काल आपली काळजी वाहण्यास समर्थ आहे असें मानून जमनादास आपल्या पक्षाचा कार्यक्रम घेऊन मंत्रिमंडळांत बेडरपणें गेले आणि तेथें त्यांनीं स्वतःचेंच ' जमनादास सरकार ' निर्माण केलें. मुंबईचें कूपर मंत्रिमंडळ म्हणजे एकटे जमनादास. या मंत्रिमंडळामध्यें जमनादास नसते, तर महाराष्ट्राच्या कॉंग्रेसगोटांत जी एवढी खळबळ उडाली ती उडाली नसती. या मंत्रिमंडळांत जमनादास नसते, तर महाराष्ट्रांतील कॉंग्रेसवाल्यांनीं या मंत्रिमंडळावर जो जळजळीत शिव्याशापांचा वर्षाव केला, तो न करतां उपहासाच्या हास्यानें त्यांनीं त्याचा निषेध केला असता. पण जमनादास म्हणजे एक खंबीर शक्ति आहे, राजकीय डावपेंचांच्या विद्येंत ती पूर्ण पारंगत आहे, तिच्या भात्यांत लोकहितकारी अशा कार्यक्रमाचा एक अमोघ बाण आहे, हें त्यांना ठाऊक असल्यामुळें उपहासानें हंसून साजरा करण्याजोगा हा प्रसंग नाहीं हें कॉंग्रेसवाल्यांनीं ओळखलें. म्हणूनच राष्ट्रपतीच्या आज्ञेची अवज्ञा करूनही जमनादासांना काळीं निशाणें दाखविण्यांत आलीं, त्यांच्या नांवानें सर्वत्र पांचजन्य वाजूं लागले, शिव्यांचा सगळा कोश त्यांच्यासाठीं रिता करण्यांत आला. जमनादासांच्या गुणांचा, त्यांच्या खऱ्या योग्यतेबद्दल कॉंग्रेसवाल्यांना वाटत असलेल्या भावनेचा हा गौरवच होता असें मी

म्हणतों. जमनादास विरोधाच्या देखाव्यानें लज्जित होणारे, गांगरून जाणारे, बिचकणारे नाहींत हें पनवेल येथें कॉंग्रेसवाल्यांच्या परिषदेंत जाऊन जमनादासांनीं केलेल्या भाषणानें दिसून आलें आणि हंगामी मंत्रिमंडळाचें बजेट सरकारी पत्रकांच्या द्वारें जाहीर करून आपल्या बौद्धिक व विधायक शक्तीचीही चुणुक त्यांनीं दाखविली. जमनादासांनीं सादर केलेला बजेटाचा आराखडा हा लोकहितकर कारभारांतील अखेरचा शब्द आहे. यापुढें उडी मारण्याची इच्छा असली, तरी तसें करण्याची कॉंग्रेससरकारचीही ताकद नाहीं. 'जमनादास यांनीं फडणिशी स्वीकारूनही कॉंग्रेसवाल्यांचा जेवढा रोष संपादन केला नाहीं, तेवढा रोष ह्या बजेटाच्या योजनांनीं त्यांनीं संपादन केला आहे' असे उद्गार एका राजकारणी पुढाऱ्यानें कांहीं दिवसांपूर्वीं माझ्याजवळ काढले होते.

## व्यक्ति

फटकळ जिभेचा, विनोदी खेळकर वृत्तीचा, आनंदी, भांडकुदळ असा एक बुद्धिवान् पुरुष असें जमनादासांचें वर्णन करतां येईल. जमनादासांच्या फटकळ जिभेचे प्रयोग अनेकांवर अनेक प्रसंगीं झाले. सर तेजबहादूर सप्रू व बॅ. जयकर यांची संभावना जमनादासांनीं एकदां two touts of British Imperialism या शेलक्या शब्दांनीं केली होती; पण हाच अहेर जमनादास यांच्या खिशांत पडण्याचा समय आणून परिस्थितीनें त्यांच्यावर आपला सूड उगविला !!! कॉंग्रेसनें लाथाडलेलें मंत्रिमंडळ जमनादासांनीं जवळ केलें, त्या वेळीं ब्रिटिश भांडवलशाहीचे हस्तक हा दोषारोप त्यांच्यावरही होण्यास चुकला नाहीं. पण अशा प्रकारच्या देवाणघेवाणाला जमनादासांची तयारी असते. फटकळ जिभेनें केलेल्या जखमा विनोदाचें व 'क्षमा करा आणि विसरा,' या विनंतीचें मलम लावून भरून काढण्याजोगा स्वभावांतील दिलदारपणाही जमनादासांजवळ भरपूर आहे. आडदांड खोडकर मुलाच्या खोडीनें राग येतो खरा, पण त्याचा खोडकरपणा दुष्टस्वभावमूलक नाहीं हें समजल्यावर तो विसरून जातांनाही कांहीं वाटत नाहीं. जमनादासांच्या खोडकरपणानें दुखावलेल्या व्यक्ति त्यांच्या पारिपत्याची संधि केव्हां येईल म्हणून वाट पाहात बसल्या असतील,तर या व्यक्तींच्या दीर्घद्वेषी मनोवृत्तींचीच मी कींव करीन. पक्ष आला कीं तेथें पक्षप्रेम हें उत्पन्न व्हावयाचें आणि पक्षप्रेम

उत्पन्न झालें कीं सैल जिभेचा अविचारही थोड्याफार प्रमाणांत व्हावयाचाच; त्याबद्दल दंश धरून झिजत झुरत राहणें निरोगीपणाचें लक्षण मानतां येणार नाहीं. विसदृश व अप्रिय अशा इसमाशीं सामान्य साध्यासाठीं मिळतें घेण्याचे प्रसंग राजकारणांत तर वरचेवर येत असल्यानें नित्यव्यवहारांतील न्याय तेथें कधींही उपयोगीं पडत नाहींत. राजकारणांत गांभीर्य पाहिजे; पण काँग्रेसच्या राजकारणांतील गांभीर्याला सुतकीपणाची कळा मारत असल्यामुळें खेळकरपणाऐवजीं एककल्लीपणा व सहिष्णुतेऐवजीं अहंभावयुक्त आग्रहीपणा या राजकारणांत उत्पन्न झाला आहे. काँग्रेसचा राष्ट्रकार्यमग्न गंभीर पुढारी मोकळेपणानें हंसतो हें सध्यां तरी वदतोव्याघाताचें उदाहरण झालें आहे. तथापि आग्रहीपणाचीं भांडणें आवेशानें भांडूनही मोकळ्या मनानें हंसण्याची जमनादासांची शक्ति नष्ट झालेली नाहीं. चिरनेर गोळीबाराची चौकशी काँग्रेसतर्फे चालू असतां चिरनेरच्या खेडवळांनीं दिलेल्या साक्षीपुराव्यापेक्षां जमनादास मेहता यांच्या विनोदी वृत्तीचे साक्षीपुरावेच तेथें मला अधिक पाहावयास सांपडले. श्री. गुंजाळ हे या चौकशीकमिटीवर एक सभासद होते. रोज न चुकतां "या सरदार" असें म्हणत जमनादास त्यांना उत्थापन देत, खुर्चीवर आसनमांडी घालून बसून निद्रावश होणाऱ्या गुंजाळांना मधून मधून जाग आणीत, खेडवळ साक्षीदारांना गंमतीचे प्रश्न विचारीत. कोट्या करीत जमनादासांनीं चालविलेलें तें चौकशीचें काम जर शंकरराव देवांनीं पाहिलें असतें, तर काँग्रेसची इभ्रत गेल्याबद्दल त्यांनीं हाय खाल्ली असती !

कांहीं नमुने !

चमत्कृतीची जमनादासांना आवड आहे आणि हजरजबाबीपणाबद्दल त्यांचा लौकिक आहे. जमनादासांनीं आपल्या हजरजबाबीपणानें ॲसेंब्लींत सरकारी सभासदांना निरुत्तर केलें आहे; पण पं. जवाहरलाल नेहरू यांनाही त्यांनीं एकदां हंसत हंसत गंमतीचा टोला मारला होता. १९२८ सालीं ब्लॅव्हाट्स्की लॉजच्या गच्चीवर मुंबईच्या युवक संघातर्फे पं. जवाहरलाल यांचा जमनादास यांच्या अध्यक्षतेखालीं सन्मान करण्यांत आला होता. त्या प्रसंगीं जमनादास यांना उद्देशून पंडितजी म्हणाले,

"Jamnadas Mehta is a great man."

त्यावर जमनादासांनीं हंसत उत्तर दिलें, "But Pandit Jawaharlal Nehru is three times greater than myself. He is born great, he is made great and greatness is thrust upon him also."

या प्रत्युतरामुळें पंडितजी चमकले,पण त्यांनीं स्मित केलें. आपल्या भाषणांतही चमत्कृतिपूर्ण दृष्टांत अथवा शब्दयोजना करण्याची जमनादासांना विलक्षण हौस आहे. माजी उपभारतमंत्रि अर्ल रसेल यांनीं १९३० सालीं हिंदी पुढाऱ्यांबद्दल अपमानकारक प्रलाप काढून नंतर आपला आवडता कुत्रा मेल्यामुळें क्षुब्ध मन:स्थितींत आपण हें भाषण केलें अशी सारवासारव केली होती. अर्ल रसेल यांचा निषेध करण्यासाठीं भरलेल्या जिन्हा हॉलमधील सभेंत ह्या भाषणाचा संबंध मेलेल्या कुत्र्यामुळें उत्पन्न झालेल्या मन:स्थितीशीं पोंचतो, कीं इतर कोणत्या परिस्थितीशीं पोंचतो, याबद्दल आपला तर्क सांगतांना जमनादास म्हणाले, "The British House of Lords largely consists of ancient bandits, medæval bastards and modern brewers." मेलेल्या कुत्र्याच्या भट्टीपेक्षां दारूच्या भट्टीशींच या उद्गारांचा संबंध अधिक पोंचतो हा अर्थ त्यांनीं मार्मिकपणें व खोंचक शब्दांत व्यक्त केला.

त्यांच्या मार्मिक उपहासाची दुसरी एक आठवण मला आठवते. अहमदाबाद येथें १९२५-२६ सालीं ऑ. इं. कॉ. कमिटीची सभा भरली होती. या सभेपुढें दिवाणगिऱ्यांबाबत एक ठराव मांडण्यांत आला होता; प्रतिसहकारपक्षाची समजूत काढण्याच्या उद्देशानें तो तयार करण्यांत आला होता, तरी या ठरावांत हिंदी घटना-कायद्याचें अज्ञान प्रकट करणारी एक चूक राहून गेली होती. या ठरावाला जमनादासांनीं जोराचा विरोध केला व ठरावांतील अज्ञानमूलक चूक दाखवून दिली. ह्या चुकीचा मोठ्या गंभीरपणें खुलासाही करण्यास ते विसरले नाहींत. " गांधींच्या आश्रमांत हा ठराव करण्यांत आला त्यामुळें ही चूक झाली. " ते म्हणाले, "या आश्रमांत इतर सर्व कांहीं मिळालें, तरी घटना-कायद्याची प्रत तेथें मिळणें शक्य नाहीं हें विसरून चालणार नाहीं. " हा टोमणा या ठरावाला हात लावणाऱ्या पं. मोतीलाल नेहरूंनाही जाणवल्यावांचून राहिला नाहीं.

तथापि यापेक्षांही सायमन कमिशनच्या निषेधासाठीं सर कावसजी जहांगिर हॉलमध्यें भरलेल्या सभेंत गोऱ्या ख्रिश्चन समाजाचा त्यांनीं केलेला उपहास

अधिक मर्मभेदक होता. गोरे खिश्चन किती धार्मिक मनोवृत्तीचे व परोपकारी आहेत हें वर्णन करून सांगतांना जमनादास म्हणाले,

"They pray on their knees on Sundays and prey on their neighbours on other days."

चमत्कृति व शाब्दिक कोटी या दोन्ही दृष्टींनीं हा टोमणा अत्यंत मार्मिक असून जमनादास यांचा कोणाही कोटिबाज वक्त्याला त्याबद्दल हेवा वाटेल. लॉर्ड विंटरटन ह्यांनीं बंगालच्या राजबंद्यांसंबधीं अद्वातद्वा काढलेले उद्गार चुकीचे आहेत असें सरकारच्या पक्षानेंही ॲसेंब्लींत कबूल केलें, त्या वेळीं "Is the noble Lord ever right in any matter that matters?" असें विचारून जमनादासांनीं मॅटर या शब्दावर केलेली कोटी बरीच प्रसिद्ध आहे. पण त्यांत वरील कोटीसारखा सहजपणा व आकर्षकपणा नाहीं.

पुढे काय ?

एवंगुणविशिष्ट अशा जमनादासांचें भावी राजकीय आयुष्य विस्मरणाच्या पडद्याआड नामशेष होईल ही कल्पनाच मला हास्यास्पद वाटते. जमनादास मेहता यांचें अर्थव्यवहाराचें सखोल ज्ञान, नव्या घटनाकायद्याचा त्यांनीं केलेला सूक्ष्म अभ्यास, दलितांबद्दल व शेतकरी मजुरांबद्दल त्यांना वाटणारी तळमळ, तहान–भूक यांची पर्वा न करतां सतत चोवीस तास राबत राहण्याची तयारी व ताकद हे त्यांचे गुण कधींही आणि कोणत्याही परिस्थितींत दबून राहणें शक्य नाहीं. 'जमनादास यांचें काय होणार ?' या प्रश्नापेक्षां 'त्यांचें काय करावें ?' हाच प्रश्न मला वाटतें, सध्यां बऱ्याच जणांना भेवडावीत असेल ! जमनादासांसारखा खंबीर योद्धा, काँग्रेस वर्किंग कमिटीचा एका काळचा सभासद, राजव्यवहारांत मुरलेला तांत्रिक, आणि पेंचप्रसंग निर्माण करण्याच्या शास्त्रांतील तज्ज्ञ विरोधी पक्षांत बसलेला असणें ही परिस्थिति जमनादासांच्या भवितव्यापेक्षांही जास्त अस्वस्थ करणारी आहे. लॉयड जॉर्ज यांचें १९३३ सालीं नॅश या नियतकालिकांत स्वभावचित्र रेखाटतांना रॉबर्ट बार्नेस यांनीं असे उद्गार काढले होते कीं,

**" ट्रेझरी बेंचवरील सरकारी सभासद हे स्पीकरला उद्देशून भाषण करीत आहेत असें एखाद्या त्रयस्थाला न वाटतां लॉयड जॉर्ज यांनाच उद्देशून**

**त्यांनीं त्यांची खुशामत चालविलेली आहे कीं काय असा भास होईल. लॉयड जॉर्ज खुषींत दिसले, तर प्रधानांच्या अंगावर मूठभर मांस चढतें, त्यांच्या कपाळावर आंठी चढली, कीं त्यांची घालमेल होऊं लागते.''**

जमनादास काय अगर डॉ. आंबेडकर काय–या दोघांच्याही अस्तित्वानें कॉंग्रेस-सरकारची तशीच अवस्था झाली, तर मला आश्चर्य वाटणार नाहीं. कूपरमंत्रिमंडळ स्थापन झाल्यावर जमनादास स्वतःबद्दल बोलतांना विनोदानें म्हणाले होते कीं " आमचें मंत्रिमंडळ प्रातिनिधक व परिपूर्ण झालें आहे. लोकशाही पक्षाचा मी सभासद असल्यानें टिळकांच्या दक्षिणी ब्राह्मणांचा मी प्रतिनिधि आहें, जन्मानें गुजराती असल्यामुळें गुजराती समाजाच्या वतीनें मला बोलतां येईल, गांधीटोपी घालतों म्हणून मी कॉंग्रेसवालाही आहें. ब्राह्मणेतरांबद्दल मला सहानुभूति वाटते म्हणून मी त्यांच्या हितसंबंधांचा रक्षक आहें आणि मजुरांनीं तर मला निवडूनच दिल्यामुळें मी त्यांचा कायदेशीरच प्रतिनिधि ठरतों. त्याशिवाय आमच्या मंत्रिमंडळांत पारशी आहे व मुसलमानही आहे. आणखी काय पाहिजे ? " हा विनोद घटकाभर बाजूला ठेवला, तरी मी एवढें सांगूं शकतों कीं कोणत्याही पक्षाच्या, संस्थेच्या अथवा समाजाच्या वतीनेंही जरी जमनादास बोलले नाहींत, तरी देशाच्या सामुदायिक हिताच्या दृष्टीनें बोलण्याचा त्यांचा हक्क कोणालाही हिरावून घेतां येणार नाहीं. आणि ही दृष्टि ठेवून जेव्हां ते बोलतील अथवा सूचना करतील, त्या वेळीं त्यांच्या सूचनांकडे दुर्लक्ष करणें खात्रीनें धोक्याचें ठरेल. जमनादास मेहता यांच्या भावी कार्याचें मीं काढलेलें चित्र आशाजनक आहे. जमनादास नामशेष झाले अशीं कल्पनाचित्रें कोणीं कितीही रंगवोत. या संशयात्म्यांना विन्स्टन चर्चिल यांच्या बाबतींत गार्डिनर यांनीं काढलेल्या उद्गारांची मी जमनादासांच्या वतीनें आठवण देतों. गार्डिनर अशा संशयात्म्यांना उद्देशून म्हणतात,

"What is the use of insisting that he is dead when you know that to-morrow he will be so flagrantly, so impudently alive ?"

विविध वृत्त, ता. ८ ऑगस्ट १९३७



## ज्योतिबा फुले

: : १२

गेल्या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत शनिवार ता. २७ नोव्हेंबर रोजीं पुण्यांत शनिवारवाड्यासमोर कॅांग्रेसतर्फे ज्योतिराव फुले यांची पुण्यतिथि साजरी करण्यांत आली. ४८ वर्षांपूर्वीं याच पुण्यांत सालअखेर एका शनिवारीं अशीच एक सभा भरली होती. ह्या सभेबद्दल पुण्यांतील बहुजनसमाजाला विशेष कौतुक वाटत होतें. खंडेराव तरवडे नांवाच्या एका गृहस्थाच्या घरासमोरील विस्तीर्ण पटांगणांत ही सभा भरली होती आणि जाहीर झालेल्या वेळाच्या पूर्वींच लोकांनीं गर्दी करून तोबा उडवून दिला होता! ह्या सभेला '**निषेधपर सभा**' असें साधेसुधें नांव देण्यांत आलें होतें. सभेचें अध्यक्षस्थान कोणत्या पुढाऱ्यानें मंडित केलें होतें तें कळण्यास मार्ग नाहीं; पण त्या वेळच्या कॅांग्रेसच्या झाडून सर्व चालकांना व पुढाऱ्यांना या सभेला हजर राहण्याचीं आमंत्रणें पाठविण्यांत आलीं होतीं. या पुढाऱ्यांपैकीं कोणीही पुढारी त्या प्रसंगीं हजर नव्हता. सभेचें काम सुरू झाल्यावर ज्या वक्त्यांनीं या सभेंत भाषणें केलीं, त्या वक्त्यांमध्यें साठी उलटून गेलेल्या एका वृद्ध

वक्त्याचें भाषण अत्यंत परिणामकारक झालें. या वक्त्यानें आपल्या खणखणीत शब्दांत सांगितलें कीं :

" राष्ट्राच्या नांवाखालीं पैशाच्या व शिक्षणाच्या जोरावर राष्ट्रीय सभावाल्यांनीं वाटेल तो गोंधळ घालावा; पण मूठभर शिक्षित लोकांना बहुजनसमाजाचे प्रतिनिधि म्हणून मिरवितां येणार नाहीं. या देशांतील बहुजनसमाज हा शेतांत राबणारा, अशिक्षित, अज्ञ, भोळा, असा शेतकरी समाज आहे. शेतकरी वर्ग हा या देशाचा बहुजनसमाज आहे व शेती हा या देशाचा मुख्य धंदा आहे. शेतकऱ्यांचा एकही प्रतिनिधि जोंपर्यंत राष्ट्रीय सभेंत समाविष्ट झालेला नाहीं, तोंपर्यंत राष्ट्रीय सभा ही बहुजन समाजाची प्रतिनिधि होत नाहीं."

—आणि अशा रीतीनें या वृद्धानें या सभेंत राष्ट्रीय सभेचा निषेध केला!

राष्ट्रीय सभेचा पुण्यांत जाहीर सभा भरवून निषेध करणारा हा म्हातारा आणि पुण्यांत राष्ट्रीय सभेनें ज्यांची पुण्यतिथि अधिकृत रीत्या साजरी केली तो पुरुष या दोन्ही एकच व्यक्ति होत! राष्ट्रीय सभेचा निषेध करणाऱ्या या पुढाऱ्याच्या तत्त्वज्ञानाचें विजयचिन्ह म्हणजेच राष्ट्रीय सभेनें जाहीरपणें साजरी केलेली त्याची ही पुण्यतिथि असें म्हणतां येईल. हा विजय संपादन करण्यास या पुढाऱ्याच्या सांप्रदायिकांना बरोबर तीन तपांचा अवधि खर्चीं घालावा लागला. सत्यस्वरूप काँग्रेस व सत्यशोधक समाज या उभय संस्थांच्या 'सत्यां'चें हें मीलन दिखाऊ आहे कीं चिरकालीन ठरणारें आहे हें दाखवून देण्याचें सामर्थ्य लगतच्या भविष्यकाळामध्यें नाहीं; पण ज्या समाजानें शेतकरी समाजामध्यें जागृति करून या समाजाला स्वत्व, स्वाभिमान व शिक्षण यांची ओळख करून दिली, त्या—बहुजन समाजाशीं विग्रह करून चालणार नाहीं, त्याच्याशीं संधि करण्याचेंच धोरण आपल्या कार्यासाठीं अवश्य आहे याची जाणीव राष्ट्रीय सभेला झाली व राष्ट्रीय सभेच्या सत्यानें 'प्रयोगासाठीं आवश्यक फेरफार' करून सत्यशोधकांना आपल्या व्यासपीठावर जागा दिली हें या मीलनानें ठळकपणें लोकनिदर्शनास आणून दिलें. काँग्रेसच्या

पडाऊ अहिंसात्मक सत्यावर सत्यशोधक समाजाच्या चढाऊ पौरुषयुक्त सत्याचें हें यशस्वी आक्रमण असेल काय ?

तत्त्व आणि व्यवहार यांची बेमालूम सांगड घालून तत्त्वप्रयोगाच्या व्यवहारांत तत्त्वशुद्धता बावनकशी राखण्याची सिद्धि कोणाही नवतत्त्वप्रवर्तकानें साधलेली नाहीं, आणि नवतत्त्वप्रवर्तकाच्या तत्त्वज्ञानाचे सांप्रदायिक निर्माण झाल्यावर या सांप्रदायिकांच्या मानसिक पातळीप्रमाणें या तत्त्वज्ञानाच्या प्रयोगाची उच्चनीचता प्रकट झालेली आहे. अहिंसाप्रसारक बौद्ध धर्माच्या प्रचारासाठीं अशोकादि बौद्धधर्मीयांनीं युद्धांत केलेली हिंसा, तलवारीच्या जोरावर झालेला इस्लामी बंधुभावाचा प्रसार, यांच्या इतिहासाकडे पाहिल्यावर या प्रयोगांची भ्रष्टता लक्षांत येते; तथापि या प्रयोगावरूनच तत्त्वज्ञान पारखण्याकडे सामान्यांचा कल होतो अथवा त्याबद्दल भलेबुरे ग्रह निर्माण होतात. परंतु एखाद्या नवयुगप्रवर्तकाच्या कार्याचा अथवा त्याच्या तत्त्वज्ञानाचा आढावा घेण्याची वेळ जेव्हां येते, तेव्हां या पूर्वग्रहांनीं त्याच्याकडे पाहणें निःपक्षपाती दृष्टीला योग्य ठरत नाहीं. अंधश्रद्धा व द्वेषांधता या उभयतांचा सुवर्णमध्य साधून कार्याचें योग्य मोजमाप ठरविणें अशा वेळीं भाग असतें. ज्योतिबा फुले यांच्या चरित्राचें व कार्याचें सार काढण्याचा समय आज ४८ वर्षांनंतर वरील प्रसंगानें आणून दिला आहे. अशा वेळीं ज्योतिबांच्या नांवानें सेतुबंधन करण्याचा अजागळपणा जसा उपयुक्त होणार नाहीं, त्याचप्रमाणें त्यांच्या सांप्रदायिकांच्या सत्यशोधकी अनाचारांनीं घायाळ झालेली क्षुब्ध व हिंस्र वृत्तीही त्यांच्या कार्याचें योग्य सार काढण्यास लायक ठरणार नाहीं. काल व परिस्थिति या दोन भिंगांतूनच ज्योतिबांच्या चरित्राकडे पाहिलें पाहिजे.

## ज्योतिबांचें माहात्म्य

ज्योतिबा फुले हे एक लोकोत्तर पुरुष होऊन गेले. ज्योतिबांना त्यांच्या हयातींतच 'महात्मा' ही पदवी देण्यांत आली होती. ह्या बहुमानाला ते निःसंशय लायक होते; पण ज्योतिबांचें माहात्म्य त्यांच्या आयुष्यांतील सिद्धींत नसून त्यांच्या द्रष्टेपणांत होतें; ज्योतिबांच्या हयातींत त्यांच्या कर्तृत्वाला कृतकार्यत्वाचें समाधान मिळालें नाहीं, परंतु त्यांच्या कार्याला बहुजनसमाजाची

मान्यता मिळाली आणि भविष्यकाळांतील ज्या भव्य इमारती त्यांच्या दृष्टीला दिसल्या, त्यांची मुहूर्तमेढही त्यांच्याच परिश्रमानें बळकट अशी रोवण्यांत आली. ज्योतिबांच्या कार्याची भरपूर माहिती करून देणारें त्यांचें चरित्र आज उपलब्ध नाहीं. त्यांच्या शतसांवत्सरिक उत्सवानिमित्त लिहिण्यांत आलेलें असें एकच एक चरित्र आज उपलब्ध आहे; पण तेंही अपुरें व एककली आहे. या चरित्रांत चरित्रनायकाचे विचार प्रकट होण्याऐवजीं चरित्रलेखकाचींच मतें गोळा झालेलीं दिसतात ! परंतु या अपुऱ्या चरित्रांतूनही ज्योतिबांचें जें चित्र चितारण्यांत आलेलें आहे, त्यांतूनही ज्योतिबांच्या व्यक्तित्वाचा भव्यपणा लपत नाहीं. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रांतील सुधारणांचा आद्य प्रवर्तक, निःस्पृह व बाणेदार कार्यकर्ता, बुद्धिवंतांच्या उपहासानें व छळानें कच न खाणारा दलितप्रेमी व खराखुरा दलितोद्धारक अशा वेषांत ते प्रकट झालेले आहेत. ज्योतिबांनीं आपल्याभोंवतालच्या ज्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशीं झुंजार वृत्तीनें टक्कर दिली, ती उग्र परिस्थिति पाहिली असतां ज्या सुधारणांसाठीं त्यांनीं परिश्रम केले, त्या सुधारणांची कल्पना तरी त्यांच्या मनाला कशी शिवली याचेंच अधिक आश्चर्य वाटतें ! कोणत्याच प्रकारची पूर्वपरंपरा पाठीशीं नसतां स्वतः शिक्षणसंपन्न होऊन आपल्या समाजबांधवांना सुशिक्षित व संघटित करण्याच्या प्रयत्नांत ज्योतिबांनीं संकुचित मनोवृत्ति न दाखवितां ब्राह्मणेतरांच्या व अस्पृश्यांच्या उन्नतीसाठीं शाळा स्थापन करून आपल्या दलित बांधवांच्या उद्धाराचें कार्य कसें आरंभलें व त्यांच्या आर्थिक परावलंबित्वाचा विचार करून अत्यंत स्वार्थत्यागपूर्वक हें दैन्य दूर करण्यासाठींही कसे परिश्रम केले हें पाहिल्यावर त्यांच्या थोरवीची व बुद्धीच्या चौरसपणाची कल्पना करतां येईल.

## परिस्थिति

पेशवाईचें वैभव नष्ट होऊन पुरतीं १० वर्षेंही लोटलीं नव्हतीं अशा काळीं ज्योतिबांचा जन्म झाला. पूर्ववैभवाची व सत्तेची अस्वस्थ करून टाकणारी जीवंत स्मृति, व इंग्रजांच्या आक्रमणाबद्दल व नव्या राजसत्तेबद्दल अंतर्यामीं वाटणारा द्वेष, यांच्या कोंडमाऱ्यांत पिचत राहण्याची पाळी आल्यामुळें पूर्ववैभवाशीं संलग्न असणाऱ्या गुणदोषांना कृपणाप्रमाणें घट्ट पकडून राहण्याची

झालेली नाजुक मनोवृत्ति, व गेलेलें स्वातंत्र्य व वर्चस्व पुनः मिळविण्यासाठीं धडपडणारी सुप्त महत्त्वाकांक्षा, यांच्या दाबानें पुणेकर ब्राह्मण समाज त्या काळीं चिंतातुर, क्षुब्ध व उद्विग्न झालेला होता. ही क्षुब्ध परिस्थिति नव्या सुधारणांना तर पोषक नव्हतीच; पण कोणत्याही सामाजिक सुधारणेला अत्यंत प्रतिकूल अशी परिस्थितीदेखील यापेक्षां वेगळी सांपडणें शक्य नाहीं. स्मशानशांततेच्या आवरणाखालीं धुमसत असलेल्या राजकीय असंतोषाचा अग्नि कोणत्या वेळीं पेट घेईल याचा नेम सांगतां येत नव्हता; अर्थात् क्रांतिकारक नवविचाराला अवसर मिळण्याचें तर दूरच राहिलें. पण कोणत्याही अशिष्ट विचारांची नुसती फुंकरदेखील राखेखालीं लपलेल्या अग्नीला चेतवून केव्हां जिभल्या चाटावयास लावील हें सांगतां येत नव्हतें. ब्राह्मणांच्या विद्येवर गंडांतर आलें होतें व इंग्रजी शिक्षणाचा गंधही फारच थोड्या महत्त्वाकांक्षी पांढरपेशा सत्ताहीन ब्राह्मणांना लागलेला होता. फुलें वेंचलीं तेथें वृत्तिच्छेद झाल्यामुळें गोंवऱ्या वेंचण्याची वेळ आल्यामुळें जळफळणाऱ्या उच्चवर्णीयांच्या मानसिक विकृतीची प्रतिक्रिया राजसत्तेबरोबरच समाजपुरुषाची अनियंत्रित सत्ताही नष्ट होऊं नये म्हणून धडपडत होती. अशा या परिस्थितीनें कोणाही उच्चकुलोत्पन्न सुधारणाप्रेमी व्यक्तीच्या मनाचा थरकांप उडविला असता; मग ज्योतिबांसारख्या शूद्रकुलोत्पन्न तरुणाच्या ती प्राणावर उठली तर त्यांत नवल नाहीं. या परिस्थितींत ब्राह्मण विद्यार्थ्यांच्या बरोबरीनें उच्च इंग्रजी शिक्षण संपादन करण्याचें दिव्य ज्योतिबांना करावें लागलें व शिक्षणसंपन्न झाल्यावर याच परिस्थितींतून आपल्या क्रांतिकारक चळवळींना हात घालावा लागला. ‘ इंग्रजी शिक्षण संपादन करणारे पुण्यांतील आद्य ब्राह्मणेतर तरुण ’ हा मान जसा ज्योतिबांनीं मिळविला, तसा इंग्रजी शिक्षणानें खुल्या करून दिलेल्या वैयक्तिक उन्नतीच्या व समृद्धीच्या साधनांचा स्वार्थासाठीं उपयोग न करतां आपल्या हजारों ब्राह्मणेतर बांधवांसाठीं झटून त्याग करण्याचा बहुमानही ज्योतिबांनींच संपादन केला.

### मुलींची शाळा

ज्योतिबांनीं आपल्या कार्याचा प्रारंभ स्त्री-शिक्षणापासून केला. बुधवार पेठेतील भिड्यांच्या वाड्यांत ज्योतिबांनीं आपली मुलींची शाळा १८४८ मध्यें

स्थापन केली. महाराष्ट्रांतील ही पहिली मुलींची शाळा होय. स्त्री-शिक्षणासाठीं परिश्रम करणारे ब्राह्मण सुधारक आगरकर यांचा ज्या पुण्यांत छळ झाला, तेथें खुद्द आगरकरांच्या जन्मापूर्वी ही शाळा स्थापन करून भ्रष्टाकार करणाऱ्या ज्योतिबांचा किती छळ झाला असेल याची कल्पनाच केली पाहिजे! या शाळेपासून अर्थप्राप्ति करून घेण्याची ज्योतिबांची इच्छा नव्हती हें सांगण्याचें कारण नाहींच. या शाळेसाठीं त्यांनीं स्वतः पदरमोड केली. या शाळेसाठीं ते स्वतः विनावेतन खपूं लागले. पण पैशापेक्षांही त्यांना मनुष्यबळाचीच जरुरी अधिक वाटूं लागली. त्यांच्या शाळेंत मोफत काम करण्यास कोणीही शिक्षक न मिळाल्यामुळें त्यांनीं आपल्या पत्नी सावित्रीबाई यांचें या कार्यासाठीं सहकार्य मिळवून त्यांची या शाळेंतील दुसरा शिक्षक म्हणून योजना केली. ज्योतिराव व त्यांच्या धर्मपत्नी या उभयतांनींही या प्रसंगीं दाखविलेलें नीतिधैर्य अत्यंत उच्च कोटींतील व प्रशंसनीय होतें. स्त्रियांचें शिक्षण हा शब्दच जेथें महाभयंकर पातकाप्रमाणें वाटत होता, तेथें हें शिक्षण स्वतः घेऊन इतर स्त्रियांना तें देण्यासाठीं जाहीरपणें रस्त्यांतून जाणारी एक शूद्र स्त्री किती पुण्यात्म्यांच्या क्रोधाचा विषय बनली असेल याची कल्पनाच केलेली बरी! सावित्रीबाईंचा उच्चवर्णीय गुंडांनीं तर छळ केलाच; पण त्यांच्या ज्ञातींतील रूढिप्रिय धर्मभोळ्या गुंडांनींही त्यांना सळो कीं पळो करण्यास कमी केलें नाहीं! अभद्र व अश्लील शिव्यांचा खुराक त्यांना मिळूं लागला; पण तेवढ्यानेंही हें दांपत्य न बधल्यामुळें सावित्रीबाईंवर चिखल व खडे यांचा माराही भररस्त्यांत होऊं लागला. तथापि, या छळालाही सावित्रीबाईंनीं अथवा ज्योतिबांनीं दाद दिली नाहीं. सावित्रीबाईंबरोबर एक शरीररक्षक देण्यांत आला व त्याच्या सोबतीमुळें हा उपद्रव बराच कमी झाला. पण या पापाचरणाचें प्रायश्चित्त ज्योतिबांना मिळाल्याशिवाय मात्र राहिलें नाहीं. मुलाच्या व सुनेच्या 'दुर्लौकिका'चा पाढा सतत वाचून ज्योतिबांचे वडील गोविंदराव यांचें मन त्यांच्या ज्ञातिबंधूंनीं कलुषित करून ठेवलें व शेवटीं गोविंदरावांकडून घरांतून बाहेर काढण्याची धमकी ज्योतिबांना देवविली! ज्योतिबांनीं ह्या प्रसंगालाही शांतपणें तोंड दिलें व घरांतून पत्नीसह बाहेर पडून त्यांनीं घराचा संबंध तोडून टाकला. या अनुभवानें ज्योतिबा खचले नाहींत. उलट त्यांचा उत्साह मात्र दुणावला

आणि घरांतून बाहेर पडल्यावर त्यांनीं ब्राह्मणेतर विद्यार्थ्यांसाठींही आणखी एक दुसरी शाळा त्याच वर्षी बुधवारांत सुरू करून स्त्रीशिक्षणाच्या कार्याला ज्ञातिबांधवांच्या शिक्षणकार्याची जोड मिळवून दिली. ज्योतिबांच्या शिक्षण-कार्याला जो विरोध करण्यांत येऊं लागला, त्या विरोधानेंच त्यांची जाहिरात झाली व ज्योतिबांच्या शिक्षणकार्याकडे सरकारचें लक्ष वेधलें. याच वर्षी दक्षिणा प्राइझ कमिटी स्थापन झाली व या कमिटीनें ज्योतिबांनीं स्थापन केलेल्या मुलींच्या शाळेला दरमहा ७५ रुपयांची मदत सुरू केली. ज्योतिबांनीं मुलींच्या आणखी दोन शाळा स्थापन करून त्या कमिटीच्या ताब्यांत दिल्या. मुंबई इलाख्याच्या बोर्ड ऑफ एज्युकेशनचे अध्यक्ष सर अर्स्किन पेरी यांनीं ज्योतिबांना उत्तेजन दिलें व त्यांचा गौरव करण्याची विनंति मुंबई सरकारला केली. १८५२ सालीं पुण्यांत विश्रामबागेंत गव्हर्नरसाहेबांनीं एक दरबार भरवून ज्योतिबांचा गौरव केला व २०० रुपये किंमतीची एक शाल त्यांना बक्षिस दिली. या प्रसंगीं ज्योतिबांनीं एक भाषण करून स्त्री-शिक्षणाकडे सरकारनें लक्ष द्यावें अशी विनंति केली आणि या विनंतीप्रमाणें स्त्री-शिक्षणाची एक योजना सरकारनें आंखून त्याप्रमाणें नव्या शाळा सुरू केल्या. कमिटीच्या हवालीं केलेल्या आपल्या शाळाही ज्योतिबांनीं या योजनेमुळें सरकारच्या हवालीं केल्या.

### अस्पृश्यांची शाळा

पण ज्योतिबा अल्पसंतुष्ट व अल्प यशानें हुरळून इतिकर्तव्यतेचें समाधान मानणारे कार्यकर्ते नव्हते. त्याचप्रमाणें दलितोद्धाराची त्यांची कळकळही मर्यादित व आकुंचित नव्हती. शिक्षणकार्यांतील आपल्या प्रारंभींच्या परि-श्रमाचें चीज होऊं लागल्याचें पाहतांच त्यांनीं ह्याच कार्यक्षेत्राच्या मर्यादा वाढविल्या व एका क्रांतिकारक व कल्पनागम्य अशा नव्या योजनेचा श्रीगणेशा केला. हें त्याचें कार्य म्हणजें ज्योतिबांनीं काढलेली अस्पृश्यांची पहिली शाळा होय. ही शाळा १८५१ सालीं नानाच्या पेठेंत उघडण्यांत आली. ८६ वर्षां-पूर्वी म्हणजे पुढारलेल्या हिंदुसमाजांतील व्यापक व उदारमतवादी व्यक्तींच्या मनांत ज्या विचारांचा उदयही होण्याची शक्यता ज्या काळीं नव्हती, त्या काळीं ब्राह्मणापेक्षांही जास्त कडवेपणें रूढिप्रधान धर्माचें पालन करणाऱ्या

ब्राह्मणेतर समाजांतील पंचविशी उलटून न गेलेल्या एका तरुणानें पूर्णपणें अंधारांत खितपत पडलेल्या व समाजाच्या सहानुभूतीलाही पारखा झालेल्या अस्पृश्यांच्या उद्धाराची इच्छा बाळगावी व त्यासाठीं क्रांतिकारक व अधार्मिक असा एक प्रयोग करून पाहण्यास सुरुवात करावी हें केवढें प्रचंड साहस होतें ! अस्पृश्यतेविरुद्ध तयार झालेल्या लोकमतानें आज सर्व देश हादरून सोडला असतांही ज्या इष्ट सुधारणेशीं कृतीनें सहानुभूति दाखविण्यास खेड्या-पाड्यांतील कर्मठ संस्कार अजूनही कचरत आहेत, त्या सुधारणेला कर्मठ-पणाच्या व रूढिप्रेमाच्या बालेकिल्ल्यांत पाऊण शतकापेक्षांही पूर्वी एका तरुणानें उचलून धरून सक्रिय सहानुभूति दाखविली, ह्या गोष्टीबद्दल कौतुक वाटण्यापेक्षांही आज अधिक आश्चर्य वाटतें. उदारमतवादित्व व समता हे मनोविकासाशीं सहचर असणारे शब्द परिचयाचे झाल्यानंतर त्या शब्दांशीं संबद्ध होणाऱ्या कल्पना व सुधारणा पुष्कळ सुचवितां येतील व त्याबद्दल भरपूर वाचाळपणाही करण्यास हरकत नाहीं; पण मनोविकास करणाऱ्या उच्च शिक्षणाचीच ज्या काळीं वानवा होती, त्या काळीं ज्योतिबांनीं अस्पृ-श्यांची शाळा काढून समतेचा व समशिक्षणाचा पुरस्कार करावा ही गोष्ट प्रकृतिसिद्ध उदारवृत्तीखेरीज संभवत नाहीं. ज्योतिबांच्या माहात्म्याचें रहस्य या वृत्तींत आहे आणि त्यांच्या प्रामाणिक टीकाकारांनाही हें माहात्म्य नाकारतां येणार नाहीं. एवढ्या क्रांतिकारक सुधारणेचें दिव्यही ज्योतिबांना तेवढ्याच जाज्वल्य कसोटींतून पार पाडावें लागलें. कर्मठांनीं ज्योतिबांचा अनन्वित छळ केला आणि ज्योतिबांवर मारेकरीही घातले अशी आख्यायिका आहे. क्षुल्लक मतभेदाचें पर्यवसान दंगल व अत्याचार यांमध्यें होणाऱ्या आजच्या दिवसांत, ज्योतिबांच्या बंडखोरीला मारेकऱ्यांच्या तलवारीचें पातें पाहण्याचा प्रसंग त्या काळीं आला असेल याबद्दल संशय वाटण्याचें कारण नाहीं व म्हणूनच ही आख्यायिका खोटी असेल असें म्हणतां येत नाहीं.

### समाज–जागृति

अस्पृश्यांची ज्योतिबांनीं काढलेली पहिली शाळा आजही भोकरवाडींत चालू आहे. ज्योतिबांनीं या शाळेनंतर आणखीही दोन शाळा स्थापन केल्या व झीज सोसून त्या चालू ठेवल्या. सरकारकडून या शाळांचा

पुरस्कार होऊं लागल्यावर त्या त्यांनीं १०-१२ वर्षांनंतर म्युनिसिपालिटीच्या हवालीं केल्या व त्यानंतर ज्योतिबा समाज-जागृतीच्या व्यापक कार्याकडे वळले. अस्पृश्यांशीं त्यांनीं ठेवलेला हा संबंध त्यांच्या शिक्षणापुरताच अपुरा न ठेवतां समतेचें हें तत्त्व त्यांनीं सामाजिक व्यवहारांतही उतरविण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्यांशीं रोटीव्यवहार करण्याची आपली तयारी असल्याची जाहीर घोषणा ज्योतिबांनीं वृत्तपत्रांतून केली. " जे ( शूर ) अगर कोणीही आपल्या उत्पन्नकर्त्यास मानून नीतीस अनुसरूनच व स्वच्छ उद्योगधंदा करण्याचा निश्चय करून त्याप्रमाणें आचारण करीत आहेत, अशी त्यांजविषयीं माझी खात्री झाल्याबरोबर मी त्यांस केवळ आपल्या कुटुंबांतील बांधवांप्रमाणें समजून त्यांजबरोबर अन्नव्यवहार करीन. मग ते कोणत्याही देशांतील असोत." या शब्दांनीं आपला हा निश्चय त्यांनीं जाहीर केला होता आणि पुढें अस्पृश्यांना पाणी भरण्यासाठीं आपल्या वाड्यांतील विहीर व हौदही खुला केला !

अस्पृश्यांची शाळा सुरू केल्यावर ज्योतिबांना जे अनुभव आले, त्या अनुभवानें समतेचें तत्त्वज्ञान त्यांच्या वृत्तींत चांगलेंच भिनलें आणि समता-विरोधी विषमता ज्या ज्या ठिकाणीं त्यांना दिसली, त्या त्या ठिकाणीं तिला विरोध करून आपल्या विचारांचे व कार्याचे सुरुंग पेरण्यास त्यांनीं प्रारंभ केला. उच्चवर्णीयांतील वैवाहिक विषमता, परावलंबित्वामुळें स्त्रीवर्गाला जाचक होणारी विषमता, नेहमींच्या व्यवहारांत उच्चनीचतेच्या कल्पनांनीं उत्पन्न झालेली धार्मिक व सामाजिक विषमता यांवर व विषमतेच्या निरनिराळ्या ठिकाणीं दिसून आलेल्या अवस्थांवर ज्योतिबांनीं आघात केले. वैवाहिक विषमता नष्ट व्हावी म्हणून त्यांनीं जठरकुमारीविवाहाचा निषेध करून पुनर्विवाहाचा प्रचार केला. पुरुषांच्या जुलमाला व मोहाला बळी पडलेल्या विधवांच्या आयुष्याचा कायमचा खेळखंडोबा होऊं नये म्हणून अनीतिकारक संबंधानें उत्पन्न झालेल्या विधवा स्त्रियांच्या अर्भकांची जबाबदारी घेण्यासाठीं एक अनाथालय स्थापन केलें. १८६३ सालीं ज्योतिबांनीं आपल्या घराशेजारीं एक वाडा बांधून त्यांत हें अनाथालय स्थापन केलें. " कोणा विधवेचें अज्ञानपणानें वांकडें पाऊल पडून ती गरोदर झाली तर तिनें रा. जोतीरावांनीं स्थापन केलेल्या गृहांत गुप्तपणें येऊन बाळंत होऊन जावें " अशा जाहिराती शहरांत लावून एकच खळबळ उडवून दिली. अशा प्रकारचें महाराष्ट्रांतील

हें पहिलेंच अनाथालय होतें. पंढरपूर येथें प्रार्थना समाजातर्फे स्थापन झालेलें अनाथलय या अनाथालयानंतर स्थापन करण्यांत आलें. आपल्या याच अनाथालयांतील एका बालकाला ज्योतिबांनीं दत्तक घेऊन आपल्या सामाजिक सुधारणेबद्दलच्या कळकळीला ढळढळीत असें मूर्त स्वरूप दिलें. औरस संतति होत नाहीं म्हणून वंश चालण्यासाठीं आप्तस्वकीय व प्रत्यक्ष श्वशुर दुसऱ्या विवाहाची गळ घालीत असतां ज्या तत्त्वप्रेमासाठीं ज्योतिबांनीं द्वितीय संबंध करण्यास कबुली दिली नाहीं, त्याच तत्त्वप्रेमाला लखलखीत असा उजाळा देण्यासाठीं त्यांनीं एका विधवेच्या जारज अपत्याला पुत्रवत् मानून त्याला दत्तक घेतलें. आपलीं मतें प्रामाणिकपणें व निर्भयपणें कृतींत उतरविण्याचा ज्योतिबांनीं हा दाखविलेला मनाचा खंबीरपणा केवळ अलौकिक व अनन्य-साधारणच म्हटला पाहिजे.

सत्यशोधक समाज

पण ज्योतिबांच्या समतातत्त्वांच्या प्रचाराला खरें व मोठें कार्यक्षेत्र त्यांच्या सत्यशोधक समाजानेंच मिळवून दिलें. विषमता नष्ट करण्यासाठीं ज्योतिबांनीं जे प्रयोग केले, त्या प्रयोगांत भिक्षुकशाहीच्या जुलूमामुळें आणि स्वार्थी ब्राह्मणांच्या लोभीपणामुळें दरिद्री नारायण शेतकरी बहुजनसमाज कसा अधोगतीला लागला आहे हें चांगल्याच प्रकारें दिसून आलें. या बहु-जनसमाजाचा उद्धार होण्यासाठीं त्यांना रूढ कल्पना व संस्कार यांच्या कचाट्यांतून सोडवून निर्भय बनविलें पाहिजे अशी खूणगांठ ज्योतिबांनीं मनाशीं बांधली. हें कार्य शिक्षणप्रसाराशिवाय होणार नाहीं हें त्यांनीं जाणलें व शेतकरी समाजाची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नति करण्यासाठीं आपल्या सुप्रसिद्ध सत्यशोधक समाजाची २३ सप्टेंबर १८७३ रोजीं स्थापना केली.

( १ ) ईश्वर एक असून तो सर्वव्यापी, निर्विकार, निर्गुण व सत्यरूप आहे व सर्व मनुष्यप्राणी त्याचीं प्रिय लेंकरें आहेत.

( २ ) ईश्वराची भक्ति करण्याचा प्रत्येक मानवास पूर्ण अधिकार आहे. आईला संतुष्ट करण्यास अगर आपाला विनविण्यास जशी त्रयस्थ दलालाची जरूर नसते, त्याप्रमाणें सर्वसाक्षी परमेश्वराची भक्ति करण्यास भट-दलालाची आवश्यकताच नाहीं.

(३) मनुष्य जातीनें श्रेष्ठ ठरत नसून तो गुणानें श्रेष्ठ ठरतो.

ह्या तीन ब्रीदवाक्यांवर सत्यशोधक समाजाची व त्याच्या तत्त्वज्ञानाची उभारणी करण्यांत आली. या समाजानें ब्राह्मणेतरांमध्यें शिक्षणप्रसार होण्या-साठीं शाळा घातल्या; विद्यार्थ्यांना पाटया, पेन्सिली, पुस्तकें मोफत पुर-विलीं; त्यांच्यासाठीं शिष्यवृत्त्या सुरू केल्या व विद्यार्थ्यांना उत्तेजन मिळावें म्हणून धनिक ब्राह्मणेतरांचें मन वळवून त्यांना आर्थिक सहाय्य केलें. माग-सलेल्या समाजांतील विद्यार्थ्यांना सरकारी शाळांतून फीची माफी मिळावी म्हणूनही ज्योतिबांनीं या समाजामार्फत खटपट चालविली व देशांत सरसहा सक्तीचें व मोफत प्राथमिक शिक्षण व्हावें अशी जोराची मागणी करून त्यासाठीं अखंड चळवळ चालू ठेवली. शिक्षणाच्या क्षेत्रांतील पांढरपेशा समा-जाचें वर्चस्व झुगारून देण्यासाठीं नव्या समताप्रेमी धर्माची घोषणा केली व परान्नपुष्ट भिक्षुकांच्या भिक्षुकशाहीला शह दिला. लग्नसोहळे, दक्षिणा व व्रतवैकल्यें यांच्या रूपानें शेतकऱ्यांच्या घरांतून वाहणाऱ्या द्रव्यप्रवाहाला बांध घालण्यासाठीं ज्योतिबांनीं नवा लग्नविधि निर्माण केला, खर्चिकपणाला फांटा दिला व अशा रीतीनें भिक्षुकशाहीच्या गोटांत एक नवा स्फोटक बॉंबगोळाच टाकून दिला! बहुजनसमाजाला आलेली मानसिक व बौद्धिक ग्लानि दूर कर-तांना ज्योतिबांनीं त्यांच्या आर्थिक उन्नतीकडेही लक्ष पुरविलें व शेतकऱ्यांच्या शेतीसुधारणेसाठींही परिश्रम घेतले. हिंदुस्थानांतील व विलायतेंतील शेतीच्या धंद्याची तुलना करून हिंदुस्थानांतील शेतीच्या धंद्यांत सुधारणा सुचविण्या-साठीं ज्योतिबांच्या सत्यशोधक समाजानें ब्राह्मणेतरांकडून निबंध मागविले व दोघां उमेदवारांचे निबंध बक्षिसपात्र ठरवून या दोघां उमेदवारांना प्रत्येकीं २५ रुपयांचीं बक्षिसेंही दिलीं. ज्योतिबांनीं व्याख्यानें दिलीं, दौरे काढले, परिषदा भरविल्या. आणि सोप्या साध्या भाषेंत संवादात्मक पुस्तकें लिहून, पोवाडे कटाव रचून जागृतीचीं हीं सर्व साधनें भरपूर प्रमाणांत उपयोगांत आणलीं. प्रपंचाचा व्याप संभाळून ज्योतिबा हें सर्व कार्य करीत होते हें लक्षांत ठेवलें पाहिजे आणि प्रपंचाचा भारही त्यांनीं बहुजनसमाजजागृतीचा परमार्थ साधण्यासाठींच वाहिला. चरितार्थासाठीं खपावें लागत असतांही समाजकार्या-साठीं पदरचा पैसा खर्चून ज्योतिबांनीं प्रचारकांचीं कुटुंबें पोसलीं. बहुजन-

समाजामध्यें जागृति उत्पन्न करण्याचें, या समाजानें व समाजाच्या प्रेरणेनें निघालेल्या ' दीनबंधु ' पत्रानें, केलेलें कार्य अपूर्व होतें.

प्रकाशासाठीं पेटविलेल्या ज्योतीचा आगलावें कोलित म्हणून उपयोग करण्यांत यावा तसा या समाजातर्फें झालेल्या जागृतीचा उपयोग समाजाच्या सांप्रदायिकांनीं ज्ञातिद्वेषाचा वणवा पेटविण्यासाठीं केला. त्यांच्या कृत्याची काळोखी ज्योतिबांसारख्या उदारधी पुरुषाच्या कार्यावर चढविणें चुकीचें होईल. सत्यशोधक समाज ज्योतिबांच्या मृत्यूनंतर अत्याचारी, हिंस्र व दहशतवादी बनला, तरी त्याची कारणमीमांसा करतांना भ्रष्ट तत्त्वज्ञान हे शब्द वापरतां येणार नाहींत. शतकानुशतकें बौद्धिक व मानसिक दडपणाखालीं चेपलेल्या मनोवृत्तीचा अचानकपणें घडून आलेला अनावर स्फोट असेंच या बीभत्स अनाचाराचें निदान करतां येईल. सत्यशोधक समाजाचा पवित्र ग्रंथ मानण्यांत येणाऱ्या ज्योतिबांच्या ' गुलामगिरी ' या पुस्तकामध्यें विषयप्रतिपादनाच्या आवेशांत युयुत्सु वृत्तीची जी तळमळ व्यक्त झालेली आहे, त्या तळमळीलाच अविचारी सांप्रदायिकांनीं दिलेलें प्रत्यक्ष कृतीचें स्वरूप अशी सत्यशोधक समाजाच्या पुढील कार्याची व्याख्या होते. पण लोकजागृतीच्या उत्साहांत आणि जोरदार आंदोलनामुळें घडून आलेल्या संक्रमणकालांत सत्यशोधक सांप्रदायिकांनीं केलेल्या अनाचारासारखे अनाचार घडून येणें अपरिहार्यच असतें.

### व्यापक दृष्टिकोन

ज्योतिबांच्या सत्यशोधक समाजानें घडवून आणलेल्या विचारक्रांतीचें पर्यवसान अविचारी अत्याचारांत झालें, तरी खुद्द ज्योतिबांनीं आपली विचारी भूमिका मात्र कधींही सोडली नाहीं. ज्योतिबांनीं भिक्षुकांच्या शास्त्र-पुराणांवर झोड उठविली व पांडित्यप्रदर्शनाच्या खटाटोपांत कपोलकल्पित असे कांहीं हास्यास्पद शोधही प्रसिद्ध केले; पण आपल्या अनुयायांनीं आत्मोद्धाराची हुंडी परजातीच्या जाळावर शिजवून घ्यावी असें प्रतिपादन केलें नाहीं. 'सार्वजनिक सत्य धर्म' या आपल्या एका पुस्तकांत त्यांनीं बंधुभाव व समता यांचाच पुरस्कार केलेला आहे व मतांच्या आग्रहीपणामुळें उत्पन्न होणाऱ्या ज्ञातिमत्सराचा निषेध केला आहे. ज्योतिबांनीं सत्यशोधक समाजस्थापनेनंतर ब्राह्मण पुढाऱ्यांशीं जे संबंध ठेवले व सार्वजनिक कार्यांतही त्यांच्याशीं

जें सहकार्य केलें, त्यावरूनही ज्योतिबांच्या व्यापक दृष्टिकोणाची खात्री पटते. ज्योतिबांच्या चाहत्यांमध्यें कै. न्यायमूर्ति रानडे यांच्यासारख्या थोर ब्राह्मण पुढाऱ्याची गणना होते. सत्यशोधक समाजाच्या झेंड्याची मिरवणुक १८८५ सालच्या एप्रिल महिन्यांत पुण्यांत निघाली असतां या मिरवणूकींत ज्योतिबां-बरोबर पायीं चालून रानड्यांनीं भाग घेतला होता. ज्योतिबांच्या अनाथालयाचें अनुकरण करूनच रानडे व लालशंकर उमियाशंकर यांनीं पंढरपूरच्या अनाथाश्रमाची स्थापना केली. लोकहितवादी व डॉ. भांडारकर हे पुढारीही ज्योतिबांचें सहाय्यकर्ते होते. ज्योतिबांनीं ब्राह्मण पुढाऱ्यांची सहानुभूति मिळविली, त्याचप्रमाणें ब्राह्मण पुढाऱ्यांनाही सक्रिय सहानुभूति दाखविली. सातारकर छत्रपतींची बाजू घेतल्यामुळें टिळक–आगरकरांवर जो खटला झाला, त्या खटल्यांत या पुढाऱ्यांचा १० हजारांचा जामीन ज्योतिबांच्या शब्दामुळें नरवणे या धनिक ब्राह्मणेतर पुढाऱ्यानें भरला आणि या खटल्यांत शिक्षा भोगून टिळक–आगरकर पुण्याला आले असतां ज्योतिबांनींच सत्यशोधक समाजाची सभा भरवून या सभेंत शेलापागोटें, हारतुरे देऊन त्यांचा गौरव केला. आपल्या कार्याला ज्ञातिद्वेषाची बाधा ज्योतिबांनीं कशी होऊं दिली नव्हती हें या उदाहरणांवरून दिसून येईल.

## चिपळूणकर व ज्योतिबा

ज्योतिबांच्या सांप्रदायिकांचा विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं ज्योतिबांवर केलेल्या टीकेनें मर्मभेद केला व शास्त्रीबुवांनीं केलेल्या टीकेचाच कोळसा ते अजूनही उगाळीत राहिले आहेत. ज्योतिबांच्या कार्याचें समालोचन या विषयावर चार शब्द लिहिल्याखेरीज पुरें होणार नाहीं. चिपळुणकरांनीं ज्योतिबांवर केलेली टीका त्यांनीं खुद्द आपल्या स्वबांधवांवर–लोकहितवादी यांच्यावर–केलेल्या जहाल टीकेच्या मानानें किती तरी सौम्य होती. आणि ज्योतिबांवर विष्णुशास्त्र्यांनीं केलेल्या टीकेचा रोखही आपल्या पांडित्याच्या डौलांत ज्योतिबांच्या मराठी अपांडित्याचा उपहास करण्याकडेच जास्त होता. ज्योतिबांनीं 'गुलामगिरी' या पुस्तकांत दशावतारांचा जो इतिहास सांगितला आहे, तो पाहिल्यावर विष्णुशास्त्री यांनीं केलेला ज्योतिबांचा उपहास जरी मर्मभेदक व तीव्र वाटला, तरी तो अकारण व अप्रस्तुत होता असें आजही दिसत नाहीं.

" ब्राह्मण म्हणजे सर्वच अत्यंत सुजन आहेत व त्यांत दोष म्हणून सांपडावयाचे नाहींत, किंवा शूद्रांचे दु:खाक्रोश सर्व व्यर्थ असून त्यांच्या स्थितींत सुधारणा करण्याची बिलकुल गरज नाहीं असें आमचें मुळींच म्हणणें नाहीं " या शब्दांनीं विष्णुशास्त्र्यांनीं ज्योतिबांच्या समाजकार्याबद्दल गर्भित मान्यताच व्यक्त केली आहे. " आलीकडील इंग्रजी विद्येच्या प्रसारानें पूर्वीचे समज पुष्कळ पालटून गेल्यानें आधुनिक विद्वन्मंडळांत शूद्राविषयीं पूर्वीप्रमाणें ग्रह राहिले नाहींत " या वाक्यानेंही ज्योतिबांच्या समाजकार्याकडे द्वेषानें अंध होऊन चिपळुणकरशास्त्रीबोवा पाहत नव्हते हें स्पष्ट दिसतें. इंग्रजी अंमलांतील पारतंत्र्यावगुंठित नवसुधारणा व नवविचार यांच्याशीं विष्णुशास्त्री इतरांप्रमाणें पूर्ण समरस न झाल्यामुळें त्यांच्या मनाची अस्वस्थता लोकहितवादी यांसारख्या प्रामाणिक स्वजननिंदकावर व ज्योतिबांसारख्या दलितोद्धारकावर टीका करतांना तीव्र शब्दांत प्रकट झाली असेंच म्हटलें पाहिजे. पण सत्यशोधक सांप्रदायिकांनींही या टीकेची भरपूर प्रमाणांत परतफेड करून शाब्दिक व सक्रिय अशा दोन्ही प्रकारीं वचपा काढला !

ज्योतिबांचें कार्य हें अशा प्रकारें मानवसमाजाच्या कल्याणासाठीं उच्च हेतूंनीं झटणाऱ्या श्रेष्ठ कार्यकर्त्याला शोभण्यासारखेंच झालेलें आहे. डोळे दिपविणारें उच्च ध्येयवादित्व अथवा बुद्धिमत्ता व पांडित्य यांचें आकर्षक तेजोवलय त्यांच्याभोंवतीं नाहीं. पण प्रामाणिकपणा, कळकळ, स्वार्थनिरपेक्षता या दैवी गुणांचें प्रशांत तेज त्यांच्यावर पडलेलें आहे. ज्योतिबांच्या या तेजाची शोभा वाढविण्यासाठीं आपल्या दिवट्या ज्योतिबांच्या अनुयायांनीं पाजळून वर धरल्या; पण ज्योतिबांच्या पुढारी अनुयायांना या दिवट्यांच्या प्रकाशांत स्वत:चा मार्ग दिसला तरी ज्योतिबांच्या बहुजनसमाजरूपी बळीराजाचें दैन्य अजून यत्किंचित्‌ही दूर झालेलें नाहीं. ज्योतिबांचें स्मरण करून त्यांचे चढाऊ अनुयायी नव्या व अपरिचित सत्याच्या प्रकाशांत येऊन उभे राहिले आहेत. कॉंग्रेसचे सत्योपासक व ज्योतिबांचे सत्यशोधक या उभयतांचेंही हें संयुक्त सत्यनारायण व्रत दरिद्रीनारायणाला दैन्यहारक ठरो, हीच सत्यग्राहीची प्रार्थना आहे.

विविध वृत्त, ता. ५ डिसेंबर १९३७

REFBK-0006384